म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५५४

# निर्माल्य

REFBK-0013785

ग. त्र्यं. माडखोलकर

नागपूर प्रकाशन

# निर्माल्य

ग. त्र्यं. माडखोलकर

नागपूर प्रकाशन क्र. ८४

# निर्माल्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नोंद दि ...

ग. त्र्यं. माडखोलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

किमत ६ रु. २५ पैसे

नागपूर प्रकाशन
नागपूर प्रकाशन
ऑक्टोबर, १९६४

प्रकाशक :
**दि. मा. धुमाळ,**
नागपूर प्रकाशन,
सीताबर्डी, नागपूर १

*

*या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, उतारे घेण्याचे, अनुवादाचे वगैरे कॉपीराइटचे सर्व हक्क सौ.* **उमा माडखोलकर** *बी. ए., बी. टी., धनतोली, नागपूर १, यांच्या स्वाधीन आहेत.*

वेष्टन
कलाकार
**श्री. भांजीभाई पाटणकर**
शंकरनगर, नागपूर १

*

मुद्रक :
**पां. ना. बनहट्टी,**
नारायण मुद्रणालय,
धनतोली, नागपूर १

*गुरुवर्य*

**नरसिंह चिंतामण केळकर**

*यांच्या चरणीं*

REFBK-0013785

# माडखोलकर–वाङ्मय

## कादंबऱ्या

(१) मुक्तात्मा
(२) भंगलेलें देऊळ
(३) शाप
(४) कांता
(५) दुहेरी जीवन
(६) मुखवटे
(७) नवे संसार
(८) डाक बंगला
(९) नागकन्या
(१०) चंदनवाडी
(११) प्रमद्वरा
(१२) अनघा
(१३) स्वप्नान्तरिता
(१४) अरुंधती
(१५) रुक्मिणी
(१६) ऊर्मिला

## कथा–संग्रह

(१) शुक्राचें चांदणें
(२) रातराणीचीं फुलें

## प्रबंध

(१) आधुनिक कविपंचक
(२) चिपळूणकर : काल आणि कर्तृत्व
(३) विलापिका
(४) वाङ्मयविलास
(५) स्वैर विचार
(६) माझे आवडते लेखक
(७) अवशेष
(८) आव्हान
(९) माझी नभोवाणी
(१०) परामर्ष
(११) जीवनसाहित्य
(१२) व्यक्तिरेखा
(१३) दोन तपें
(१४) हाक
(१५) एका निर्वासिताची कहाणी
(१६) मी पाहिलेली अमेरिका
(१७) निर्माल्य
(१८) साहित्य–शलाका

# अनुक्रमणिका


निवेदन

१ ‘तरुण भारता’चा पुनर्जन्म — १

२ बारा वर्षांच्या वनवासानंतर — २०

३ दुसरें लग्न करण्याची प्रथा अनिष्ट आहे काय ? — २४

४ वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याची फोल बढाई — २७

५ २६ जानेवारी — ३०

६ बडोद्याच्या महाराजांचा कायदेभंग — ३५

७ बुद्धिचापल्याचें शिक्षण — ३९

८ बहिऱ्याशी बातचीत — ४३

९ कंदमुळांची गोडी — ४७

१० गोऱ्या माणसाचें ओझें — ५१

११ शनि-मंगळांची युति — ५३

१२ विक्रमाचें स्वप्न — ५६

१३ वैशाखी — ५९

१४ मग ‘वाट चुकलेल्यां’चें काय ? — ६२

१५ एका वेळीं दोन लग्नें — ६७

१६ आनंदवनभुवनांत महात्माजी — ७०

१७ सूर्यग्रहण — ७४

१८ इतिहासाची पुनरावृत्ति कां होते ? — ७७

१९ क्रांतीची लाट कशी थोपवणार ? — ८०

२० दोन तपें — ८५

२१ ऑगस्ट नवरात्र — ९२



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों वि ........

| | | |
|---|---|---|
| २२ | जनशक्तीची जोपासना | ९८ |
| २३ | जनशक्तीला धार पाहिजे | १०२ |
| २४ | जनसेना हीच जनशक्ति | १०७ |
| २५ | जनशक्तीच्या तीन आघाड्या | ११२ |
| २६ | अहिंसा आणि असंतोष | ११८ |
| २७ | दोन तपांची फलश्रुति | १२५ |
| २८ | इथून वाटा वेगळ्या फुटणार | १३४ |
| २९ | महाराष्ट्राच्या उत्कर्षाची तळमळ | १४० |
| ३० | 'स्वातंत्र्य' 'स्वातंत्र्य' तें हेंच काय ? | १४५ |
| ३१ | हा संहार काय अखेर व्यर्थच ठरणार ? | १५० |
| ३२ | आज ईश्वराजवळ काय मागावें ? | १५६ |
| ३३ | देवस्थानांवरील दरोडे | १६० |
| ३४ | उच्चार, अनुच्चार आणि दुरुच्चार | १६७ |
| ३५ | 'युद्धगुन्हेगार' ही काय चीज आहे ? | १७१ |
| ३६ | त्वं ही दुर्गा दशप्रहरणधारिणी | १७७ |
| ३७ | महात्माजी | १८१ |
| ३८ | नव लाख दिवे हे तुझ्या घरीं | १८६ |
| ३९ | प्रबोधिनी | १९० |
| ४० | 'लपावें अती आदरें रामरूपीं' | १९४ |
| ४१ | 'उखळांत दिलें शिर !' | १९७ |

# निवेदन

ता. २ जानेवारी १९४४ रोजीं श्रीनरकेसरी स्मारक मंड ाने नागपूर येथे 'तरुण भारत' हें दैनिक माझ्या संपादकत्वाखाली सुरू केलें. त्या दैनिकाच्या पहिल्या वर्षांत प्रसिद्ध झालेले काही निवडक संपादकीय लेख आणि 'मुक्तमति' या टोपण नावाने लिहिलेला एक लेख यांचा संग्रह या पुस्तकांत केलेला आहे. गेल्या पंचेचाळीस वर्षांत नियतकालिकांतील माझ्या लेखांचे अनेक संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत आणि त्यांच्या अनेक आवृत्त्याहि निघालेल्या आहेत. त्या संग्रहांतील लेख बव्हंशी साहित्यप्रधान आहेत. तसें स्वरूप या संग्रहांतील लेखांचे नाही. केवळ दैनिकासाठी लिहिलेल्या माझ्या संपादकीय लेखांचा हा पहिलाच संग्रह प्रसिद्ध होत आहे. त्या दृष्टीने, या संग्रहातील लेखांचे स्वरूप आणि निवड यांच्यासंबंधी, वाचकाना विश्वासात घेऊन, थोडे निवेदन करणे अवश्य वाटते.

वीस वर्षांपूर्वी 'तरुण भारत' ज्या वेळी सुरू करण्यात आला, त्या वेळी दैनिक वृत्तपत्रांच्या व्यवसायाला नागपूर शहरांतील आणि विदर्भांतील परिस्थिति सर्वथैव प्रतिकूल होती. दैनिकाला आवश्यक असलेल्या कोणत्याच प्रकारच्या यांत्रिक सोई त्या वेळी नागपुरांत नव्हत्या. टेलिप्रिंटर नव्हता; सकाळी काढलेल्या फोटोचा ब्लॉक संध्याकाळी हमखास मिळण्याची खात्री नव्हती; निरनिराळ्या शहरी एकामागून एक ताज्या डाक आवृत्त्या पाठवता येतील अशी आग-गाड्यांची सोय नव्हती; व सकाळचा ताजा अंक निदान सायंकाळी तरी रेल्वेपासून दूर असलेल्या अंतर्गत प्रदेशांत मोटारने रवाना करता येईल अशी दळणवळणाची व्यवस्थाहि नव्हती. शिवाय, मध्यप्रांत–वऱ्हाड हा त्या वेळी मालगुजारी म्हणजे जमिनदारी पद्धतीचा प्रांत असल्यामुळे, लोक साहजिकच सुखवस्तु होते. अर्थात् त्यांच्या जीवनाला म्हणण्या-सारखी गति नव्हती. लेखक काय आणि कंपॉझिटर काय रात्रपाळी

करावयाला सारखेच नाखूष असत; व दोघांचीहि थोडी बहुत शेतीवाडी असल्यामुळे, ते शेतीच्या कामासाठीं किंवा सणासुदीच्या निमित्ताने केव्हा रजेवर जातील, याचाहि काही नेम नसे. त्यांतच हा प्रांत द्विभाषी असून, हिंदी भाषिकांची त्यांत बहुसंख्या होती. त्यामुळे, मराठी दैनिके काढण्याचे जे प्रयत्न तोंपर्यंत नागपूर शहरांत झालेले होते, ते काही यशस्वी होऊ शकले नाहीत. प्रांतिक स्वायत्ततेच्या मनूंत १९३६ सालानंतर मंत्रिमंडळाच्या आश्रयाने नागपुरांत निघालेली मराठी दैनिकेंसुद्धा कांही फार दिवस चालू शकली नाहीत

अशा परिस्थितींत, अगदी तुटपुंज्या भांडवलावर काढलेलें 'तरुण भारत' दैनिक स्थिर आणि यशस्वी करण्याची जी जबाबदारी वयाच्या चव्वेचाळिसाव्या वर्षीं मजवर येऊन पडली, ती आपण कितपत पार पाडू शकू, याबद्दल माझे स्वतःचे मनच मुळी अतिशय साशंक होते. कारण दैनिकाच्या कामाचा तोपर्यंत मला मुळीच अनुभव नव्हता. १९२२-२३ सालीं पुण्यास 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीं'त असताना माझा 'ज्ञानप्रकाश' दैनिकाशी जरी निकट संबंध आलेला होता, तरी तो फक्त त्याच्या आठवड्यांतून दोन वेळा निघणाऱ्या 'काव्य-शास्त्र-विनोद' आणि 'परराष्ट्रीय राजकारण' या दोन पुरवण्या चालवण्यापुरता. खुद्द 'ज्ञानप्रकाश' कचेरींतसुद्धा त्या वेळी दैनिकाला अवश्य असलेली टेलिप्रिंटरसारखी यंत्रसामुग्री तर नव्हतीच; पण असोसिएटेड प्रेस किंवा युनायटेड प्रेस यांच्या ताज्या तारा घेण्याचीहि पद्धत नव्हती. अर्थात्, 'ज्ञानप्रकाश'शी माझा सुमारें दीड वर्ष संबंध असतानासुद्धा, दैनिकाच्या आधुनिक स्वरूपाच्या कार्यपद्धतीची काहीहि कल्पना मला त्या काळांत येऊ शकली नाही. १९२४ सालच्या ऑगस्टमध्ये मी नागपूर येथील 'महाराष्ट्र' वृत्तपत्राच्या संपादक-मंडळावर आलो, तेव्हा तें साप्ताहिक होतें. पुढे तें द्वि-साप्ताहिक झाले. तथापि, दैनिकाचा म्हणून जो कांही धबडगा आणि धावपळ असते, त्याचा काहीच अनुभव द्वि-साप्ताहिकाच्या कचेरीत येण्याचा संभव नव्हता. त्यामुळे, 'तरुण भारता'चे संपादकत्व ज्या वेळी मी स्वीकारलें, त्या वेळी मी दैनिकाच्या कामाच्या बाबतींत निखालस अननुभवी आणि

अज्ञानी होतो. अडाणीच म्हणाना ! इतका की, आता महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्यांत डेप्युटी डायरेक्टरच्या हुद्यावर असलेले माझे पहिले सहकारी श्री. यशवंतराव पिटके यानी ज्या वेळीं ता. १ जानेवारी १९४४ रोजीं सायंकाळीं असोसिएटेड प्रेसच्या नागपुरातील प्रतिनिधीकडून आलेले ताज्या तारांचें भेंडोळें माझ्यासमोर ठेवलें, तेव्हा त्यांतील तारा मला काही केल्या वाचता येईनात आणि समजेनातहि. श्री. पिटके यानी नागपुरातील 'हितवाद' दैनिकाच्या संपादकमंडळावर काम केलेले असल्यामुळे तारा वाचण्याच्या शास्त्रांत ते साहजिकच तरबेज झालेले होते. त्यांच्याकडून त्या शास्त्राचा पहिला धडा त्या दिवशी सायंकाळीं मला प्रथम मिळाला.

या अननुभवाच्या भरीला माझी स्वत:ची आणखी जी एक खास अडचण होती, ती निराळीच ! ती अडचण म्हणजे माझी संस्कृतनिष्ठ मराठी भाषा ! १९३३ साली 'मुक्तात्मा' ही माझी पहिली कादंबरी जेव्हा प्रकाशित झाली, त्या वेळी 'केसरी'त केलेल्या त्या कादंबरीच्या समालोचनांत विदर्भातील मराठी भाषेचे अग्रगण्य पंडित प्रो. डॉ. शं. दा. पेंडसे यानी, तिच्या क्लिष्ट भाषेवर टीका करताना, संस्कृत-प्राचुर्याच्या बाबतीत मी मोरोपंतांवर मात केली, असे प्रशस्तिपत्र मला दिलेले होते. माझे गुरुबंधु श्री भाऊसाहेब खांडेकर यांच्या पोटात आपल्या या धाकट्या बंधूविषयी मायेचा उमाळा असल्यामुळे, त्यांच्या हाती त्या वेळी कडाडत असलेला टीकेचा आसूड काही त्यानी माझ्यावर चालवला नाही, ही गोष्ट खरी. पण, 'मुक्तात्मा' कादंबरीवर टीका करताना त्यानीसुद्धा हळूच असा रेशमी चिमटा घेतला की, "निबंधाची भाषा आणि कादंबरीची भाषा यांत दोन ध्रुवांइतके अंतर असते, ही साधी गोष्ट काही गजाननरावाना कळली नाही. तेव्हा ती कळेपर्यंत कादंबरीलेखनाच्या फंदात त्यानी न पडलेलें बरें !" आचार्य अत्रे हे त्या वेळी 'वायुपुत्रा'चे सोज्वळ 'सान रूप' धारण करून श्री. प्र. श्री. कोल्हटकर यांच्या 'संजीवनी' साप्ताहिकातून भुभुक्कार करीत असत. त्या 'वायूपुत्रा'ने एक दिवस अचानक आपले लांगूल आपटून बिचाऱ्या 'मुक्तात्म्या'वर तडाका उडवला आणि माझी अशी कुचाळी केली की,

" माडखोलकरांची ही कादंबरी मी मोठ्या जिज्ञासेने वाचायला हाती घेतली. पण, पहिली दोन तीन पाने वाचल्यावर मला अशी काही हुडहुडी भरली की, मी ती मुकाट्याने धाबळीत गुंडाळून ठेवून दिली. मला वाटले, हा जडजंबाल लेखक कशाला कादंबरीच्या वाटेला गेला ?" सध्याचे लोकप्रिय विनोदी लेखक श्री. पु. ल. देशपांडे यानी तर बडोदं येथे त्या वेळी निघत असलेल्या ' अभिरुचि ' मासिकात माझ्या संस्कृतप्रचुर भाषाशैलीचा सुंदर नमुना तयार करून माझ्या भाषेच्या विडंबनाचा अहेर मला जाहीर रीतीने केला. फार काय सांगावें ? ' महाराष्ट्रा 'चे मुख्य संपादक कै. दादासाहेब ओगले हे तसे मोठे सौम्यप्रकृति. पण ते सुद्धा मला वारंवार म्हणावयाचे, "अहो भाऊसाहेब, थोडे सोपे लिहीत जा ना ! आपला ' महाराष्ट्र ' खेड्यापाड्यात जातो. मला-देखील तुमचे ते मोठमोठे प्रचारात नसलेले संस्कृत शब्द वाचताना ठेचकळल्यासारखे होते. मग बिचाऱ्या खेड्यातल्या वाचकाना कशी कळणार ही तुमची भाषा ? " तेव्हा, " संस्कृत-प्राकृत-मिश्रित यास्तव कोणी म्हणेल ही कंथा " अशा प्रकारची मोरोपंती थाटाची बोजड दुर्बोध भाषा लिहिणारा व त्यामुळे सगळ्या महाराष्ट्रातल्या अनेक धुरंधर टीकाकारांच्या आणि दांडग्या विनोदाचार्यांच्या उपहासाचा वर्षानुवर्ष विषय होऊन बसलेला जो मी !—त्या माझ्यासारख्या जडजंबाल लेखकाच्या संपादकत्वाखाली निघालेले दैनिक लोक हौसेने कसे वाचतील ?

ही शंका केवळ माझ्याच मनात आली असे नाही; तर ' तरुण भारता 'चे पहिले व्यवस्थापक माझे रसिक स्नेही श्री. माधवराव दातार यांच्या मनात तर त्या शंकेने अगदी धुमाकूळ घातला. ता. १५ डिसेंबर १९४३ रोजीं ' तरुण भारता 'चे कार्यालय उघडल्या दिवसा-पासून ते मला सारखे नेहमी कळकळीने म्हणावयाचे, " भाऊसाहेब, आता तुमची ती निबंधातली आणि कादंबऱ्यातली भाषा काही दैनिकांत चालायची नाही हां ! तुम्ही अगदी सोप्या भाषेंत छोटे छोटे अग्रलेख लिहीत जा आणि त्यांत विनोदहि येऊ दे मधून मधून ! नाही तर आपला ' तरुण भारत ' लोकप्रिय होणे फार कठीण जाईल बरें !" बिचाऱ्या माधवरावाना हें काय माहित की, विनोदाचें मला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ............
क्रमांक ............ वि:
नों दि

अजिबात वावडें आहे ? माझे गुरु कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर याना माझ्या ठिकाणी असलेल्या ज्या अनेक वैगुण्यांबद्दल नेहमी खंत वाटत असे, त्यांत विनोदबुद्धीचा अभाव हें मुख्य वैगुण्य ! आपल्या परिवारातल्या तत्कालीन बड्या लेखकांशी स्वतःच्या या नव्या धाकट्या शिष्याची ओळख करून देताना ते माझ्या गंभीर मुद्रेकडे अनुकंपेने पाहात, हळहळत पण हसत हसत उद्‌गारावयाचे, “ हे माडखोलकर हुबेहूब गडकऱ्यांसारखी भाषा लिहितात. पण विनोदाचे अंग मात्र याना अजिबात नाही. मी पुष्कळ सांगत असतो याना. पण विनोदी लिहिण्याकडे मुळी कलच नाही यांचा ! काय करावें याना ? ’ श्री. माधवराव दातार यांच्या या सूचनेतली खोच अगदी उघड होती. लोक दैनिक इतक्या उत्सुकतेने घेतात, तें खरोखरी ताज्या बातम्यांसाठी. आणि त्या देण्याची तर कांहीच यांत्रिक सोय नागपुरात नव्हती. उलट, ताज्या गरमागरम सनसनाटी बातम्यानी गजबजलेली मुंबईची दैनिकें त्या वेळी अमरावतीपर्यंत सकाळी सातच्या आंत नागपूर मेलने येऊन पोचत असल्याकारणाने, त्यांच्यापुढे ‘ तरुण भारता ’चा टिकाव लागणे अशक्य होते. अर्थात् त्याचे नावीन्य, आकर्षकता आणि उपयुक्तता लोकांच्या गळी उतरवण्याचा फक्त एकच उपाय होता. तो म्हणजे ‘ संदेश ’ दैनिकाचे संपादक कै. अच्युतराव कोल्हटकर यांच्याप्रमाणे अत्यंत चटकदार आणि चुरचुरीत, खमंग आणि खोचदार असे दणकेबाज अग्रलेख लिहिणे ! त्या दृष्टीने श्री. दातार यांची ही सूचना–वाटल्यास सावधगिरीचा इशारा म्हणा !—अगदी समर्पक होता. शिवाय, त्यांचे सौजन्य असें की, केवळ सूचना करूनच न थांबता, त्यानी स्वतः ‘ मुक्त ’ या टोपण नावाने, अनेक विनोदी चुटके आणि छोटे छोटे फुटकळ लेख ‘ तरुण भारतां ’त लिहून, अशा प्रकारचे रोचक लिखाण करण्याचा धडा मला पर्यायानें घालून दिला.

तथापि, मला जी संस्कृतनिष्ठेची आनुवंशिक देणगी आई–वडिलांच्या कृपेमुळे लाभलेली होती आणि ज्या देणगीच्या जोरावर माझ्या भाषाप्रभुत्वाचा बोलबाला तोपर्यंत सगळ्या महाराष्ट्रांत झालेला होता, त्या देणगीच्या तावडीतून वयाच्या चव्वेचाळिसाव्या

वर्षीं सुटणे आणि ‘ बालबोध ’ मासिकाचे संपादक कै. विनायक कोंडदेव ओक यांच्यासारखी आबालसुबोध भाषा लिहिणे मला कसें शक्य होतें ? तरीसुद्धा, प्रस्तुत पुस्तकांत समाविष्ट केलेला ‘ बारा वर्षांच्या वनवासानंतर ’ हा पहिल्या अंकातला अग्रलेख शक्य तितका सोपा करण्यासाठी मी दोन वेळा लिहून काढला; व ‘ तरुण भारता ’च्या सल्लागार मंडळाचे प्रमुख माझे ज्येष्ठ मित्र कै. हरिभाऊ मोहनी याना तो तपासून पसंत करण्यासाठी सादर केला. त्यानी तो दोन तीन वेळा काळजीपूर्वक वाचला; व त्याना खटकलेले त्यांतील तीन चार संस्कृत शब्द, तांदुळांतून खडे काढून टाकावेत त्याप्रमाणे, खोडून टाकून त्यानी मला परत दिला. अशा रीतीने, तो लेख पुरेसा सोपा झाला असल्याचे सर्टिफिकेट जेव्हा त्यानी संतोषाने मान हलवून दिलें, तेव्हा मला खरोखरीच मोठी धन्यता वाटली; व झटून प्रयत्न केल्यास आपल्यालाहि सोपी भाषा लिहिता येईल, असा आत्मविश्वास त्या दिवशी प्रथमच माझ्या मनांत उदित झाला. पण ‘ स्वभावो दुरतिक्रमः ’ हेंच खरें ! त्यामुळे, क्लिष्ट लिहिण्याचें जे वळण माझ्या लेखणीला जन्मापासूनच लागलेलें होतें, तें थोडेंच सुटणार ? त्या वळणाने दुसऱ्याच अग्रलेखापासून डोकें वर काढले आणि नंतर असा काही जोर केला की, श्री. हरिभाऊ मोहनी, श्री. माधवराव दातार, शेठ खुशालचंद प्रभृति ‘ तरुण भारता ’च्या उत्कर्षाविषयी आतुर असलेली मित्रमंडळी जरी मला पुनःपुन्हा प्रेमाने खडसावीत असत, तरी माझे येळकोट काही केल्या जाईना. प्रस्तुत संग्रहातील लेख पाहिल्यावर, संपादकीय लिखाण बालबोध करण्याच्या बाबतींत माझ्या या सगळ्या सुहृदांची मी किती विलक्षण निराशा केली असेल, याची यथार्थ कल्पना वाचकाना येईल. पण केवळ क्लिष्टतेनेच भागले नाही. माझे अग्रलेख जसे संस्कृतप्रचुरतेमुळे सामान्य वाचकाला दुर्बोध वाटण्यासारखे असत, तसेच ते कंटाळा येण्याइतके लांबलचकहि ! केव्हा केव्हा तर वाचकांची दमछाक करतील असे दहा बारा रकान्यांचे अतिदीर्घ अग्रलेखहि मी लिहिलेले आहेत. असे अग्रलेख की, ज्या लेखानी ‘ तरुण भारता ’चे मधले सवा दीड पान व्यापलेले पाहिल्यावर माझे प्रेमळ

सहकारीसुद्धा एकमेकांकडे साश्चर्य, साशंक आणि सभय मुद्रेने पहावयाचे ! तरी देखील, गेल्या वीस वर्षांत ' तरुण भारता 'ने आपल्या प्रसाराने आणि प्रभावाने सारा विदर्भ संपूर्णतया व्यापला व खपाच्या बाबतींत विदर्भातील सर्व इंग्रजी, हिंदी आणि मराठी दैनिकांवर मात केली, हें केवळ श्रीनरकेसरी प्रकाशन मंडळाचें सुदैव होय.

या संग्रहासाठी ' तरुण भारता 'च्या पहिल्या वर्षांतील संपादकीय लेखांची निवड करताना मी कोणत्या कसोटचा लावल्या, हें सांगणे अवश्य वाटतें. पहिली कसोटी ही की, ज्या लेखांसंबंधी त्या त्या विषयांच्या जाणकारांची पत्रें मला आली, त्यांपैकी बरेच लेख मी या संग्रहांत समाविष्ट केलेले आहेत. अशा जाणकारांत माझे वृत्तपत्र-व्यवसायांतील गुरु कै. नरसिंह चिंतामण केळकर यांचे ऋण माझ्यावर याहि बाबतीत फार मोठे आहे. १९४३ सालच्या डिसेंबरांत मी, ' तरुण भारत ' दैनिकाचें संपादकत्व स्वीकारणार असल्याचें त्याना कळवून, त्यांचा आशीर्वाद मागितला. तेव्हा, उलट डाकेने त्यांचे जे पत्र मला आलें; त्यांत त्यानी असे स्पष्ट लिहून टाकलेलें होतें की, " तुम्हाला माझा आशीर्वाद सदैव आहेच. पण, तुम्ही दैनिकाचें संपादक व्हावे, ही गोष्ट काही मला रुचली नाही. आतापर्यंत ' महाराष्ट्रा 'सारख्या द्वि–साप्ताहिक वृत्तपत्रांत तुम्ही काम करीत होता. त्यामुळे, अवांतर लेखनाला तुम्हाला भरपूर वेळ मिळाला; व तुम्ही निरनिराळ्या प्रकारचे वरच्या दर्जाचे साहित्य पुष्कळ निर्माण केले. पण, दैनिकाचा सगळाच कारभार इतका जबरदस्त असतो की, त्यांतून तुम्हाला तुमच्या हौसेने लिहावयाला फुरसत काढता येईल, असें मला वाटत नाही. हें मी तुमचें आणि मराठी साहित्याचेंहि नुकसान समजतो. या बाबतींत खाडिलकरांचे उदाहरण मी तुमच्या नजरेस आणून देतो. ' केसरी 'त असेपर्यंत त्यानी जी नाटके लिहिली, त्या नाटकांबद्दल एरवी कोणाचे काही मतभेद असले, तरीसुद्धा त्या नाटकांची गुणवत्ता आणि यश ही त्यांचा निंदकसुद्धा नाकारू शकणार नाही. पण, दैनिकाची जबाबदारी त्यानी घेतल्यानंतर, त्यांच्या नाट्यगुणाना उतार लागला, ही गोष्ट अगदी सहज दिसणारी आहे. तुमच्याहि बाबतीत मला तीच

भीति वाटते. तथापि, तुम्ही जे हे नवे काम हाती घेतले आहे, त्यांत तुम्हाला यश येईल, असा मला विश्वास वाटतो." पण, कै. तात्यासाहेब केळकर केवळ नुसता आशीर्वाद देऊनच थांबले नाहीत; 'तरुण भारता'तील अग्रलेख काळजीपूर्वक पाहून, जेव्हा त्यासंबंधी मला काही लिहावे असे त्याना वाटले, तेव्हा कार्डावर थोडक्यात सहा सात ओळी सूत्रमय लिहून ते आपलें म्हणणे ताबडतोब कळवीत असत. माझ्या संपादकीय लिखाणाच्या बाबतींतील या त्यांच्या कळकळीला उपमाच द्यावयाची झाली, तर ती माझे गुरु कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यानी चिपळूणकरांवरील माझे टीकालेख तपासण्याच्या बाबतींत जी विलक्षण आपुलकी आणि आस्था १९२१–२२ साली दाखवलेली होती, तिची देता येईल. तात्यासाहेबांच्या या प्रोत्साहक पत्रांची मला इतकी काही सवय झालेली होती की, पहिले वर्ष संपल्यानंतर जेव्हा त्यानी अशा प्रकारची पत्रे लिहिणे हळुहळू बंद केलें, तेव्हा मला चैन पडेनासे झालें. शेवटी, १९४५ च्या ऑक्टोबरमध्ये नागपूर येथील राजाराम वाचनालयाच्या सुवर्णमहोत्सवासाठी ते येथे आले असता, ता. २ ऑक्टोबर रोजी माझे ज्येष्ठ सहकारी श्री. ए. श्री. पटवर्धन यांच्यासह मी त्यांची येथील सुप्रसिद्ध कायदेपंडित श्री. ह. ना. गोखले यांच्या घरी भेट घेतली; व मला पत्रे लिहिण्याचे थांबवल्याबद्दल खेद व्यक्त करून खुलासा विचारला. तेव्हा ते उद्‌गारले, "मी वर्षभर तुमचें दैनिक काळजीपूर्वक पाहिले आणि माझें सर्व बाबतींत समाधान झाले. म्हणून आता काही लिहिण्याची गरज मला वाटत नाही. खरोखरी, तुम्ही अवघ्या दीड वर्षांत आपल्या दैनिकाचा जम बसवून, नरकेसरी स्मारक मंडळाने त्याच्यासाठी घातलेल्या भांडवलाची भरपाई केलीत."

कै. तात्यासाहेब केळकर यांचें जें पहिलें विस्तृत सटीक पत्र मला आलें, तें 'बडोद्याच्या महाराजांचा कायदेभंग' या 'तरुण भारता'च्या ता. १३ फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या अग्रलेखासंबंधी ! त्या लेखांतील माझे प्रतिपादन त्याना सयुक्तिक वाटले. पण, कै. राजर्षि श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड यांचा थोर वारसा घेऊन बडोद्याच्या गादीवर आलेल्या प्रतापसिंहमहाराजांसारख्या त्यांच्या

पौत्राने दुसरें लग्न करून सयाजीरावांच्या सुधारणावादी धोरणाशी विसंगत असें वर्तन केल्याबद्दल मी महाराजाना दोष दिला नाही, हें काही तात्यासाहेबाना आवडले नाही. दैवयोग असा की, या अग्रलेखासंबंधी स्वातंत्र्यवीर बॅ. विनायकराव सावरकर आणि त्यांचे बंधु डॉ. ना. दा. सावरकर या दोघांचीहि पत्रे मला एकाच डाकेने आली. बॅ. सावरकर यानी त्या लेखांतील समर्पक युक्तिवादाबद्दल अगदी मोकळेपणाने माझे अभिनंदन केलेले होते. इतकेच नव्हे, तर त्या लेखापूर्वी 'तरुण भारता' च्या ता. ६ जानेवारीच्या अंकात 'मुक्तमति' या टोपण नावाने 'दुसरें लग्न करण्याची प्रथा अनिष्ट आहे काय?' हा जो त्याच विषयावरील माझा लेख प्रसिद्ध झालेला होता, त्याचा उल्लेख करून स्वातंत्र्यवीरानी 'तरुण भारता'ने या बाबतींत योग्य धोरणाचा अवलंब केल्याबद्दल प्रशंसा केलेली होती. सावरकर बंधूंच्या या पत्रा-पाठोपाठच ता. १६ फेब्रुवारी १९४४ रोजीं बॅ. सावरकर यानी बडोद्याच्या महाराजाना केवळ दुसरें लग्न केल्याबद्दल पदच्युत करण्यात यावे, अशा आशयाचा जो ठराव मुंबईच्या हिंदु सभेचे एक प्रमुख कार्यकर्ते श्रीमान् गोविंदलाल शिवलाल मोतीलाल यानी कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये त्या वेळीं आणलेला होता, त्याचा खणखणीत निषेध करणारे पत्रक काढलें. डॉ. ना. दा. सावरकर यांचे मला आलेले पत्र मी ता. १८ फेब्रुवारीच्या अंकांत प्रसिद्ध केलें. त्या पत्रांत अग्रलेखाचे अभिनंदन करून "त्या लेखांतील विचार नि विधेये ही फार समंजसपणाची आहेत" असें म्हटलेलें होते. या अग्रलेखाने जी खळबळ त्या वेळी महाराष्ट्रांत उडवली, तिचा प्रतिध्वनि खुद्द बडोदे संस्थानांतहि उमटला. बडोद्याचे त्या वेळचे सरकारी वकील 'राजरत्न' श्री. गंगाधर माधव तांबे यांच्याकडून 'एक वटोदरस्थ' या सहीने लिहिलेले विस्तृत पत्र मुंबईहून माझ्याकडे प्रकाशनार्थ आले. ता. १ फेब्रुवारी १९४१ रोजी बडोदे संस्थानांतील वाङ्मय परिषदेचे जे सातवे अधिवेशन बडोदे येथे भरलेले होते, त्याचे 'राजरत्न' हे स्वागताध्यक्ष होते आणि मी अध्यक्ष होतो. त्यानंतर पुढे पाच वर्षांनी ते श्रीमंत प्रतापसिंहरावमहाराज गायकवाड यांच्या मंत्रिमंडळात अन्नमंत्री झाले. श्री. तांबे यानी, वाङ्मय

परिषदेच्या अधिवेशनाच्या वेळी बडोद्यास झालेल्या परिचयाची आठवण देऊन, हें पत्र 'तरुण भारता'त जसेच्या तसे प्रसिद्ध करण्याची विनंती मला आग्रहपूर्वक केलेली होती. 'राजरत्ना'नी स्वतः हें पत्र लिहिलेलें होते की नाही, हे सांगणे कठीण. पण, त्या पत्रात महाराजांच्या दुसऱ्या लग्नाचें समर्थन करून, 'तरुण भारता'च्या अग्रलेखांतील काही मुद्यांवर आणि श्रीमान् गोविंदलाल शिवलाल मोतीलाल यांच्या ठरावावर कायद्याच्या आणि घटनेच्या दृष्टीने सयुक्तिक टीका केलेली होती. 'राजरत्नां'च्या विनंतीप्रमाणे ता. १६ फेब्रुवारीच्या अंकात, संपादकीय उत्तरासह, तें पत्र प्रसिद्ध झालें. तो अंक हाती पडल्याबरोबर मात्र, कै. तात्यासाहेब केळकर यानी मला कार्ड टाकून, 'वटोदरस्था'च्या पत्राला उत्तर देताना बडोद्याच्या महाराजांचे दुसरे लग्न समर्थनीय नाही, या मुद्याचे मार्मिक प्रतिपादन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या अग्रलेखाच्या अनुषंगाने आणखीहि एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. ती ही की, 'तरुण भारता'च्या ता. ६ जानेवारीच्या अंकात दुसरे लग्न करण्याच्या प्रथेचे समर्थन करणारा जो 'मुक्तमती'चा लेख प्रसिद्ध झालेला होता, त्याची दुसरी बाजू म्हणून नागपूर येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. कमलाबाई सर्वटे यानी 'संसारात बदसूर कां निर्माण होतात?' हा लेख माझ्याकडे पाठवला; व तो ता. ७ जानेवारीच्या 'तरुण भारतां'त प्रसिद्ध झाला. 'तरुण भारता' व्यतिरिक्त इतरहि अनेक मराठी वृत्तपत्रांतून बडोद्याच्या महाराजांवरील माझ्या अग्रलेखावर बरीच उलट सुलट टीका आली; व अशा रीतीने 'तरुण भारता'ने पहिल्या दोन महिन्यांच्या आंतच महाराष्ट्रांतील विचारी कार्यकर्त्यांचे आणि वाचकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले.

इथेच ओघाने संपादकीय बाबतीतील एका महत्वाच्या गोष्टीचा खुलासा करणे इष्ट होईल, असे वाटते. ती गोष्ट ही की, मी स्वतः 'तरुण भारता'चा मुख्य संपादक असताना, त्याच्या ता. ६ जानेवारीच्या म्हणजे चवथ्याच अंकात, 'मुक्तमति' या टोपण नावाने बडोद्याच्या महाराजांच्या दुसऱ्या लग्नाविषयी समर्थनपर लेख का लिहिला? या प्रश्नाचे उत्तर वृत्तपत्रव्यावसायिकाना खचित बोधप्रद वाटेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम
क्रमांक ........ वि.
ता. दि.



१९२१-२२ साली कै. तात्यासाहेब केळकर यांच्याजवळ मी राहात असता, त्यानी स्वत: निरनिराळ्या टोपण नावानी 'केसरी'त अनेक लेख आणि पत्रे लिहिलेली माझ्या पाहाण्यात आली होती; व त्यांपैकी दोन तीन पत्रे तर त्यानी मलाच 'डिक्टेट' केलेली होती. अशा प्रकारच्या एका पत्राचे 'डिक्टेशन' संपल्यावर मी त्याना विचारलें, "तात्यासाहेब, आपण 'केसरी'चे मुख्य संपादक आहात. मग अशा रीतोने निर-निराळ्या टोपण नावानी आपण 'केसरी'त का लिहिता ?" तेव्हा ते हसून मला म्हणाले, "बरं विचारलंत. नाही तर तुमचा कदाचित् गैरसमज झाला असता. गेल्या चाळीस वर्षांत चिपळूणकर, आगरकर, टिळक, खाडिलकर आणि मी असे 'केसरी'चे आम्ही एकंदर पांच सहा संपादक होऊन गेलो. आमची सर्वांची मनोवृत्ति किंवा मते ही एकच होती, असें कोणीच म्हणू शकणार नाही. आगरकर हे 'केसरी'चे संपादक असताना ते स्वत: कधी आपल्या नावावर किंवा कधी टोपण नावाने लेख लिहित असत, हें तुम्हाला माहितच आहे. तरीसुद्धा गेली चाळीस वर्षे 'केसरी'चे स्वत:चे म्हणून एक सर्वच बाबतींतील विशिष्ट धोरण लोकांच्या मनांत पक्के ठसून गेलेले आहे. याचा अर्थ असा की, एकादे वर्तमानपत्र जे कार्यकर्ते काही उद्देशाने काढतात आणि निश्चयाने चालवतात, त्यांच्या कल्पनांनुसार त्या वर्तमानपत्राच्या धोरणाचा साचा बनून जातो; व मागाहून येणाऱ्या संपादकांची वैयक्तिक मते काहीहि असली, तरी त्याना त्या साच्याला अनुरूप अशा पद्धतीनेच नंतर लिहावे लागते. म्हणून, एकाद्या संपादकाला तो संपादन करीत असलेल्या वर्तमानपत्राच्या परंपरागत विशिष्ट धोरणापेक्षा जेव्हा निराळे असें काही लिहायचें असते किंवा संपादकीय मताप्रमाणेच स्वत:चें वैयक्तिक मतहि लोकांपुढे येणे अवश्य आहे असें वाटते, तेव्हा त्याने टोपण नांवाने लेख किंवा पत्र लिहिणें हेंच सोईचे ठरतें. एकाच व्यक्तीने, एकाच वेळी, एकाच विषयावर जर आपल्या वर्तमानपत्रांतून परस्परभिन्न मतांचे प्रदर्शन केले, तर त्यामुळे त्याचे आणि त्या वर्तमानपत्राचेंहि हसें झाल्याविना राहाणार नाही. म्हणून, मुख्य संपादकानेसुद्धा, स्वत:च्या नावावर निघणाऱ्या वर्तमानपत्रांत, जरूर

परिषदेच्या अधिवेशनाच्या वेळी बडोद्यास झालेल्या परिचयाची आठवण देऊन, हें पत्र 'तरुण भारता'त जसेच्या तसे प्रसिद्ध करण्याची विनंती मला आग्रहपूर्वक केलेली होती. 'राजरत्ना'नी स्वत: हें पत्र लिहिलेलें होते की नाही, हे सांगणे कठीण. पण, त्या पत्रात महाराजांच्या दुसऱ्या लग्नाचें समर्थन करून, 'तरुण भारता'च्या अग्रलेखांतील काही मुद्यांवर आणि श्रीमान् गोविंदलाल शिवलाल मोतीलाल यांच्या ठरावावर कायद्याच्या आणि घटनेच्या दृष्टीने सयुक्तिक टीका केलेली होती. 'राजरत्नां'च्या विनंतीप्रमाणे ता. १६ फेब्रुवारीच्या अंकात, संपादकीय उत्तरासह, तें पत्र प्रसिद्ध झालें. तो अंक हाती पडल्याबरोबर मात्र, कै. तात्यासाहेब केळकर यानी मला कार्ड टाकून, 'वटोदरस्था'च्या पत्राला उत्तर देताना बडोद्याच्या महाराजांचे दुसरे लग्न समर्थनीय नाही, या मुद्याचे मार्मिक प्रतिपादन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या अग्रलेखाच्या अनुषंगाने आणखीहि एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. ती ही की, 'तरुण भारता'च्या ता. ६ जानेवारीच्या अंकात दुसरे लग्न करण्याच्या प्रथेचे समर्थन करणारा जो 'मुक्तमती'चा लेख प्रसिद्ध झालेला होता, त्याची दुसरी बाजू म्हणून नागपूर येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. कमलाबाई सर्वटे यानी 'संसारात बदसूर कां निर्माण होतात?' हा लेख माझ्याकडे पाठवला; व तो ता. ७ जानेवारीच्या 'तरुण भारतां'त प्रसिद्ध झाला. 'तरुण भारता' व्यतिरिक्त इतरहि अनेक मराठी वृत्तपत्रांतून बडोद्याच्या महाराजांवरील माझ्या अग्रलेखावर बरीच उलट सुलट टीका आली; व अशा रीतीने 'तरुण भारता'ने पहिल्या दोन महिन्यांच्या आंतच महाराष्ट्रांतील विचारी कार्यकर्त्यांचे आणि वाचकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले.

इथेच ओघाने संपादकीय बाबतीतील एका महत्वाच्या गोष्टीचा खुलासा करणे इष्ट होईल, असे वाटते. ती गोष्ट ही की, मी स्वत: 'तरुण भारता'चा मुख्य संपादक असताना, त्याच्या ता. ६ जानेवारीच्या म्हणजे चवथ्याच अंकात, 'मुक्तमति' या टोपण नावाने बडोद्याच्या महाराजांच्या दुसऱ्या लग्नाविषयी समर्थनपर लेख का लिहिला? या प्रश्नाचे उत्तर वृत्तपत्रव्यावसायिकाना खचित बोधप्रद वाटेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

१९२१-२२ साली कै. तात्यासाहेब केळकर यांच्याजवळ मी राहात असता, त्यानी स्वत: निरनिराळ्या टोपण नावानी 'केसरी'त अनेक लेख आणि पत्रे लिहिलेली माझ्या पाहाण्यात आली होती; व त्यांपैकी दोन तीन पत्रे तर त्यानी मलाच 'डिक्टेट' केलेली होती. अशा प्रकारच्या एका पत्राचे 'डिक्टेशन' संपल्यावर मी त्याना विचारलें, "तात्यासाहेब, आपण 'केसरी'चे मुख्य संपादक आहात. मग अशा रीतीने निरनिराळ्या टोपण नावानी आपण 'केसरी'त का लिहिता?" तेव्हा ते हसून मला म्हणाले, "बरं विचारलंत. नाही तर तुमचा कदाचित् गैरसमज झाला असता. गेल्या चाळीस वर्षांत चिपळूणकर, आगरकर, टिळक, खाडिलकर आणि मी असे 'केसरी'चे आम्ही एकंदर पांच सहा संपादक होऊन गेलो. आमची सर्वांची मनोवृत्ति किंवा मते ही एकच होती, असें कोणीच म्हणू शकणार नाही. आगरकर हे 'केसरी'चे संपादक असताना ते स्वत: कधी आपल्या नावावर किंवा कधी टोपण नावाने लेख लिहित असत, हें तुम्हाला माहितच आहे. तरीसुद्धा गेली चाळीस वर्षें 'केसरी' चे स्वत:चे म्हणून एक सर्वच बाबतींतील विशिष्ट धोरण लोकांच्या मनांत पक्के ठसून गेलेले आहे. याचा अर्थ असा की, एकादे वर्तमानपत्र जे कार्यकर्ते काही उद्देशाने काढतात आणि निश्चयाने चालवतात, त्यांच्या कल्पनांनुसार त्या वर्तमानपत्राच्या धोरणाचा साचा बनून जातो; व मागाहून येणाऱ्या संपादकांची वैयक्तिक मते काहीहि असली, तरी त्याना त्या साच्याला अनुरूप अशा पद्धतीनेच नंतर लिहावे लागते. म्हणून, एकाद्या संपादकाला तो संपादन करीत असलेल्या वर्तमानपत्राच्या परंपरागत विशिष्ट धोरणापेक्षा जेव्हा निराळे असें काही लिहायचें असते किंवा संपादकीय मताप्रमाणेच स्वत:चें वैयक्तिक मतहि लोकांपुढे येणे अवश्य आहे असें वाटते, तेव्हा त्याने टोपण नांवाने लेख किंवा पत्र लिहिणें हेंच सोईचे ठरतें. एकाच व्यक्तीने, एकाच वेळी, एकाच विषयावर जर आपल्या वर्तमानपत्रांतून परस्परभिन्न मतांचे प्रदर्शन केले, तर त्यामुळे त्याचे आणि त्या वर्तमानपत्राचेंहि हसें झाल्याविना राहाणार नाही. म्हणून, मुख्य संपादकानेसुद्धा, स्वत:च्या नावावर निघणाऱ्या वर्तमानपत्रांत, जरूर

वाटल्यास, टोपण नावाने लिहिण्याची पद्धत पडलेली आहे. या पद्धतीमुळे वर्तमानपत्राचें परंपरागत धोरण सांभाळलें जाते आणि संपादकालाहि स्वतःचें मत आपल्या वर्तमानपत्रांतून लोकांपुढे मांडल्याचे समाधान लाभते." कै. तात्यासाहेब केळकर यांचा हा युक्तिवाद मला अगदी समर्पक वाटला; व तदनुसार गेल्या वीस वर्षांत 'तरुण भारता'मध्ये मी निरनिराळ्या टोपण नावानी केव्हा संपादकीय धोरणाला पूरक म्हणून तर केव्हा टीकात्मक म्हणूनहि अनेक लेख आणि पत्रे लिहिलेलीं आहेत. त्यांपैकीच एक हा 'मुक्तमती'चा लेख होय.

बडोद्याच्या महाराजांच्या दुसऱ्या लग्नावरील या लेखाप्रमाणेच म. गांधी यांच्या मुक्ततेनंतर 'तरुण भारता'ने त्यांच्या धोरणावर जे टीकात्मक लेख लिहिले, त्यामुळेहि बरीच खळबळ उडाली. महात्माजींची ढासळलेली प्रकृति लक्षात घेऊन ता. ६ मे १९४४ रोजीं हिंदुस्थान सरकारने त्याना बंधमुक्त केले. तेव्हापासून त्यानी १९४२ सालच्या 'चले जाव' आंदोलनासंबंधी जे परस्परविसंगत खुलासे आणि प्रतिखुलासे, ब्रिटिश सरकारशी तडजोड करण्याच्या आशेने, करावयाला सुरवात केली, त्यावर मी "मग 'वाट चुकलेल्यां'चे काय?', 'आनंदवन-भुवनांत महात्माजी" 'इतिहासाची पुनरावृत्ति का होते?' इत्यादि सडेतोड अग्रलेख लिहिले. त्यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रांतील विचारी कार्यकर्ते आणि वाचक यांचें लक्ष 'तरुण भारता'कडे गेले. विशेषतः, ता. १ ऑगस्ट १९४४ पासून तों ता. १० ऑगस्ट १९४४ पर्यंत टिळक आणि गांधी यांच्या राजकारणावर लिहिलेल्या तुलनात्मक विश्लेषणपर अग्रलेखांविषयी श्री. तात्यासाहेब केळकर, डॉ. बाबासाहेब जयकर, रा. ब. डॉ. गो. स. सरदेसाई, श्री. ज. स. करंदीकर, बॅ. विनायकराव सावरकर, प्रो. डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. त्र्यं. वि. पर्वते प्रभृति महाराष्ट्रांतील प्रमुख विचारवंतांची जी पत्रें मला आली, त्यामुळे सतत दहा दिवस ऐतिहासिक दृष्टीने केलेल्या त्या विचारमंथनाचें सार्थक झाल्यासारखे मला वाटलें. डॉ. बाबासाहेब अंबेडकर यांच्याशी जरी माझा निकट संबंध होता, तरी मुद्दाम पत्र लिहून आपले मनोगत किंवा मत कळविण्याची त्यांची प्रवृत्ति नव्हती. पण, माझी 'चंदनवाडी' ही कादंबरी वाचल्यावर

तिच्यासंबंधीचा आपला अभिप्राय जसा त्यानी अगत्याने पत्र लिहून मला कळवला, त्याचप्रमाणे टिळक आणि गांधी यांच्यावरील या तौलनिक अग्रलेखांसंबंधीची आपली अनुकूलताहि त्यानी पत्ररूपाने मला कळवली. या लेखमालेनंतर ता. १५ सप्टेंबर १९४४ रोजीं 'देवस्थानांवरील दरोडे' हा जो अग्रलेख प्रसिद्ध झाला, त्याने तर मोठीच खळबळ उडवली. ता. २७ जुलै रोजीं जेजुरीच्या खंडोबाच्या देवस्थानावर दरोडा पडला; व त्या दरोड्याशी संबंध असल्याच्या संशयावरून 'अरुण कुळकर्णी' हें नाव धारण करून नागपुरास राहात असलेल्या श्री. शिवगौडा पीरगौडा पाटील या तरुण इसमाला ता. ९ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली. ही धरपकड लोकांच्या डोळ्यांपुढे अगदी ताजी असतानाच प्रतापगड, पर्वती, आडिवरे आणि जेजुरी या महाराष्ट्रांतील चार मुख्य देवस्थानांवरल्या दरोड्यांवर हा अग्रलेख मी लिहिला. तो प्रसिद्ध झाल्याबरोबर महाराष्ट्राच्या अगदी कोनाकोपऱ्यांतून धन्यवाद देणारी अनेक पत्रें 'तरुण भारता'ला आलीं. त्यांत श्री. शंकरराव देव, रा. ब. डॉ. गो. स. सरदेसाई, बॅ. विनायकराव सावरकर, श्री. ना. गो. चापेकर, म. म. प्रो. द. वा. पोतदार, श्री. ज. स. करंदीकर, प्रो. डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. रघुनाथशास्त्री कोकजे प्रभृति कार्यकर्त्यांची जीं पत्रें मला आलीं, त्यामुळे या जिव्हाळ्याच्या नाजूक प्रश्नाकडे महाराष्ट्रांतील जनतेचे लक्ष वेधण्यासाठी आपण केलेला प्रयत्न यशस्वी झाल्याचें समाधान माझ्या मनाला लाभलें.

या अग्रलेखांप्रमाणेच, चिमूर–आष्टी खटल्यांतील फाशीची शिक्षा झालेल्या आरोपींना वाचवण्यासाठी 'तरुण भारता'ने जो प्रचार केला आणि जे सुमारे दहा अग्रलेख न्यायालयांच्या निरनिराळ्या निर्णयांवर वेळोवेळी लिहिले, त्यामुळे त्याच्या विदर्भांतील लोकप्रियतेचा पाया घातला गेला, असें म्हणावयाला शंका वाटत नाही. या आरोपींना वाचवण्यासाठी डॉ. ना. भा. खरे यांच्या अध्यक्षतेखाली फाशी निवारक समिति स्थापन झालेली होती; व व्हॉइसरॉयांच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर डॉक्टरसाहेबांची नेमणूक झाल्यानंतर जरी समितीचे

अध्यक्षपद त्यानी सोडून दिलें, तरी त्यांचे सक्रिय सहाय्य समितीला शेवटपर्यंत हर एक बाबतींत होत असे, हें त्या काळांतील एक उघड राजकीय गुपित होते. डॉ. खरे हे जसे फाशी निवारक समितीचे तसेच 'तरुण भारत' सुरू करणाऱ्या श्रीनरकेसरी स्मारक मंडळाचेहि संस्थापक आणि अध्यक्ष होते. या दुहेरी घनिष्ठ संबंधामुळे 'तरुण भारता'ने चिमूर–आष्टीच्या आरोपीना फासावरून वाचवण्याचा प्रश्न जिवाभावाने हाती घ्यावा, हें अगदी स्वाभाविक होतें. डॉ. खरे यांच्या-नंतर समितीच्या अध्यक्ष झालेल्या सौ. अनसूयाबाई काळे आणि त्यांचे समितीतील इतर सहकारी यांच्या चिकाटीच्या प्रयत्नांमुळे या प्रश्नाची समाधानकारक रीतीने तड लागेपर्यंत, 'तरुण भारता'ने त्याचा प्रचार एक प्रकारें जिवावर उदार होऊन केला. या काळांत न्यायालयांच्या निर्णयावर जे अग्रलेख 'तरुण भारता'त आले, ते बहुतेक श्रीनरकेसरी स्मारक मंडळाचे सदस्य आणि 'तरुण भारता'चे कायद्याचे सल्लागार नागपूरचे सुप्रसिद्ध कायदेपंडित श्री. रा. का. मनोहर यांच्या काटेकोर नजरेखालून गेलेले होते. तरीसुद्धा, मध्यप्रदेश सरकारचे तत्कालीन चीफ सेक्रेटरी श्री. जयरत्नम् यानी मला मुद्दाम समक्ष भेटीला बोला-वून हा प्रचार न थांबवल्यास 'तरुण भारत' कार्यालयाला कुलूप ठोकणे सरकारला भाग पडेल, असा स्पष्ट इशारा दिला; व डॉ. खरे यांच्याकडेहि 'तरुण भारता'च्या सरकारविरोधी धोरणाबद्दल तक्रार करण्यात आली. त्या वेळी डॉक्टरसाहेबानी दिल्लीहून जें पत्र मला कळकळीने पाठवलें, त्यांत अशा आशयाचे उद्गार काढलेले होते की, "आपले तान्हें मूल देवीच्या दुखण्याने दगावावे, असें कोणालाहि वाटणार नाही. तुमच्यावर कोणतेहि बंधन घालण्याची मला इच्छा नाही. आणि तुम्ही जें लिहीत आहात तें मला पूर्णपणे पसंत आहे. पण, तुमच्या कडक लिहिण्यामुळे 'तरुण भारत' दगावणार नाही, अशी काळजी मात्र तुम्ही घ्या." चिमूर–आष्टीच्या बाबतींतील 'तरुण भारता'च्या या कामगिरीची आचार्य विनोबा भावे यांच्यापासून तों राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज यांच्यापर्यंत सर्वांनी मुक्त कंठाने प्रशंसा केली; व चिमूर–आष्टी प्रकरणांतील सातहि आरोपींच्या देहान्त शिक्षा

रद्द झाल्यावर तर 'तरुण भारता'वर विदर्भातील सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून स्तुतीचा वर्षाव झाला. या पुस्तकांत 'तरुण भारता'त चिमूर–आष्टीवर आलेल्या अग्रलेखांपैकी फक्त 'उखळांत दिलें शिर!' एवढा एकच अग्रलेख नमुन्यादाखल दिलेला आहे.

'तरुण भारता'तील काही अग्रलेखांमुळे माझ्यासंबंधीचा जो एक दृढमूल ग्रह दूर झाला, त्याबद्दल उल्लेख करणें गमतीचें होईल. कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्याप्रमाणेच कै. तात्यासाहेब केळकर यांचीहि माझ्याविषयी अशीच समजूत होती की, मला विनोदाचें अंग अजिबात नाही. पण, 'बुद्धिचापल्याचें शिक्षण', 'बहिऱ्याशी बातचीत', 'कंदमुळांची गोडी' इत्यादि माझे अग्रलेख वाचून कै. तात्यासाहेब केळकर यानी मोठ्या संतोषाने मला असें लिहिलें की, "तुमचे हे अग्रलेख वाचून मला आश्चर्य वाटलें आणि आनंदहि झाला. तुम्हाला आठवत असेल की, १९२१ साली 'केसरी'साठी मुंबईतील सामाजिक घडामोडींवर तुम्ही विनोदी शैलीने बातमीपत्र लिहावें, अशी सूचना मी तुम्हाला केली होती. त्याप्रमाणे दोन तीन बातमीपत्रें तुम्ही पाठवलींत. पण, तुम्हाला विनोद जमत नाही, असें मला दिसून आले; व म्हणून मी तो नाद सोडून दिला. त्यानंतर तुमच्या 'मुक्तात्मा' या कादंबरीत थोडा विनोदगुण मला आढळला. पण तिच्या संस्कृतप्रचुर भाषेखाली तो दबल्यासारखा झाला होता. त्यामुळे 'त ण भारता'तल्या या तुमच्या अग्रलेखांतला सूक्ष्म उपहास आणि उपरोध पाहून मला आनंद वाटला." त्याचप्रमाणें 'उच्चार, अनुच्चार आणि दुरुच्चार' या माझ्या ता. १६ सप्टेंबरच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या अग्रलेखातील युक्तिवादहि त्याना विशेष आवडला होता. तथापि, त्याबद्दल माझे कौतुक करताना, अनुच्चारित अनुस्वारांविरुद्ध त्यानी स्वतः १९२८ साली केलेल्या उपक्रमावर 'महाराष्ट्र' वृत्तपत्रांतून मी जी टीका केलेली होती आणि त्यांच्याशी त्या वेळीं जाहीर रीतीने माझा जो वाद झालेला होता, त्याची आठवण मला देऊन, "तुम्ही अखेर माझ्या भूमिकेवर आलात!" असा टोमणा मारावयाला मात्र ते विसरले नाहीत. केळकरांनी लिहिलेल्या टिळकचरित्राचा दुसरा आणि तिसरा खंड हे १९२८

सालच्या फेब्रुवारीत प्रसिद्ध झाले. त्या दोन खंडांत त्यानी अनुच्चारित अनुस्वार न लिहिण्याची जी नवी पद्धत स्वीकारली होती, तिच्यावर 'महाराष्ट्र' साप्ताहिकाच्या ता. ११ मार्च १९२८ च्या अंकांत 'टिळकचरित्रांतील शुद्धलेखन' या मथळ्याखाली विस्तृत लेख लिहून त्या पद्धतीतील सगळे दोष मी मराठी भाषाभिज्ञांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला होता. या माझ्या लेखासंबंधी जुन्या पिढीतील विख्यात वैयाकरण कै. प्रो. नारायण दासो बनहट्टी यानी आपल्या 'मराठी भाषेची लेखनपद्धति' या १९३२ साली प्रकाशित झालेल्या ग्रंथांत असे उद्‌गार काढलेले आहेत की, "केळकरांचे 'ऋणानुबंधी' आणि महाराष्ट्रांतील एक सुप्रसिद्ध लेखक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यानी टिळकचरित्रांतली विचित्र लेखनपद्धति पाहून 'महाराष्ट्र' पत्रांतच या वादास प्रथम तोंड पाडलें. त्यानी 'टिळक-चरित्रांतील शुद्धलेखन' या नावाचा लेख लिहून त्यांत केळकराना जवळ जवळ आव्हान केल्यासारखेच केले. तेव्हा केळकरानी, यापुढे निकराची व तीव्र विरोधाची आव्हानें स्वीकारण्याचा प्रसंग येऊं नये म्हणूनच की काय, हें सौम्य आव्हान स्वीकारलें; व त्यांनी 'महाराष्ट्र' पत्रांत माडखोलकरांच्या लेखास उत्तरादाखल एक लेख लिहिला." हा लेख ता. १८ मार्च १९२८ च्या 'महाराष्ट्रा'च्या अंकांत प्रसिद्ध झाला. केळकरानी माझ्या लेखाला दिलेल्या या उत्तराला प्रत्युत्तर देण्याची माझी इच्छा होती; व त्यांच्या उत्तरावरील माझे आक्षेप मी खाजगी पत्राने त्याना लगेच कळवलेहि. पण, त्याना प्रत्युत्तर देण्याचा माझा मानस कै. दादासाहेब ओगले यांच्याजवळ मी बोलून दाखवताच, ते चष्म्यांतून आपले डोळे मजकडे रोखून उद्‌गारले, "तात्यासाहेबाना तुम्ही आपले गुरु मानता. त्यांच्यावर जें नमनाचें शरसंधान तुम्ही केलेंत, तेवढ्याने तुमचें समाधान झालें नाही का ? त्याना काय शरतल्पीं निजवायचा विचार आहे का तुमचा ?" दादासाहेबांच्या या खोचक प्रश्नांतील ध्वनि उघड होता. केळकर हे किती झालें तरी टिळक पक्षाचे मूर्धाभिषिक्त पुढारी. तेव्हा, त्यांच्यावर एकदा आपल्या 'महाराष्ट्र' साप्ताहिकांतून टीका आली तेवढी पुरे,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम

असें जर दादासाहेबाना वाटलें असलें, तर त्यांत आश्चर्य नाही. अर्थातच केळकरांपुरती मी आपली लेखणी आवरती घेतली. ‘उच्चार, अनुच्चार आणि दुरुच्चार’ या माझ्या अग्रलेखासंबंधी केळकरानी जें माझें कौतुक केले, त्याला सोळा वर्षांपूर्वीच्या या आम्हा गुरुशिष्यांतील वादाची पार्श्वभूमि होती. त्यांच्याप्रमाणेच या अग्रलेखाबद्दल श्री. ना. गो चापेकर आणि प्रो. कृ. पां. कुळकर्णी यांचीहि अभिनंदनपर पत्रें मला आलेली होती. पण, मला विशेष आश्चर्य वाटलें, तें या गोष्टीचें की, सार्वजनिक प्रश्नांसंबंधी सामान्यतः मुग्ध असणारे नागपूरचे तत्कालीन हायकोर्ट जज्ज न्या. वि. वि. सर्वटे यानी, या माझ्या लेखातील प्रतिपादनाला पोषक असा फाऊलरच्या कोशांतील उतारा देऊन, त्याचें समर्थन करणारें पत्र ‘तरुण भारता’कडे पाठवलें. तें पत्र ता. १९ सप्टेंबरच्या अंकात प्रसिद्ध झालें. फ्रेंच शब्दांच्या उच्चारांसंबंधी फाऊलरने असें म्हटलेलें आहे की—

“To say a French word in the middle of an English sentence exactly as it would be said by a Frenchman in a French sentence is a feat demanding an acrobatic mouth; the muscles have to be suddenly adjusted to a performance of a different nature, and after it as suddenly recalled to the normal state; it is a feat that should not be attempted; the greater its success as a TOUR DE FORCE, the greater its failure as a step in the conversational progress; for your collocutor, aware that he could not have done it himself, has his attention distracted whether he admires or is humiliated.”

फाऊलरच्या या अभिप्रायावरून पाश्चात्य भाषांतील शब्दांच्या उच्चारांसंबंधी या अग्रलेखात केलेला युक्तिवाद किती तर्कशुद्ध होता, हें कळून येईल.

असो. आतापर्यंत दिलेल्या या माहितीवरून ‘तरुण भारता’च्या पहिल्या वर्षांतील संपादकीय लेखांची निवड कोणत्या दृष्टीने केलेली

आहे, याची वाचकाना कल्पना येईल. ज्या लेखांत साहित्यगुणाचा, विचाराच्या नवीनपणाचा किंवा विशेष प्रकारच्या माहितीचा काही अंश आहे असे मला वाटलें, अशा लेखांचा संग्रह या पुस्तकांत केलेला आहे. 'ज्ञानप्रकाश' 'केसरी' आणि 'महाराष्ट्र' या तीन वृत्तपत्रातून येऊन गेलेले माझे बरेच साहित्यविषयक लेख पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले आहेत. पण, 'तरुण भारता'त प्रचलित प्रश्नांवर लिहिलेले संपादकीय लेख या संग्रहाच्या रूपाने मराठी वाचकवर्गापुढे प्रथमच येत असल्यामुळे, आता विदर्भाबाहेरील मराठी कार्यकर्त्यांना आणि जनतेला 'तरुण भारता'चे धोरण आणि कार्य यांची थोडी तरी कल्पना येईल, अशी मला उमेद वाटते.

वृत्तपत्रातील माझ्या संपादकीय लेखांचा हा पहिला संग्रह माझे गुरु कै. तात्यासाहेब केळकर याना मी नितान्त भक्तिभावाने अर्पण करीत आहे. साहित्याच्या क्षेत्रात जसे कै. तात्यासाहेब कोल्हटकर हे माझे गुरु होते, तसे वृत्तपत्रव्यवसायाच्या क्षेत्रात कै. तात्यासाहेब केळकर हे माझे गुरु होते. ही 'द्विविधा निष्ठा' हाच माझ्या वाङमयीन जीवनाचा एकमेव आधार होय. या दोघांच्या सान्निध्यामुळें माझें जीवन समृद्ध झालें आणि कृपाशीर्वादामुळे कृतार्थ झालें. १९२१ सालच्या जानेवारीत केळकरांशी माझा परिचय झाल्यापासून तों १९४७ च्या ऑक्टोबरमधे त्यांचें देहावसान होईपर्यंत त्याना वारंवार भेटण्याची, त्यांच्याजवळ मधून मधून राहाण्याची आणि त्यांच्याबरोबर काही ना काही काम करण्याची जी जी संधि मला मिळाली, ती ती शिक्षणप्रद ठरली. मदालसेने आपल्या मुलाना ब्रह्मज्ञानाचे शिक्षण उपजल्या क्षणापासून कसें दिलें याचें वर्णन मोरोपंतानी असे केलेले आहे की, "स्तन पाजिता, निजविता, हालविता बाळकासि खेळवितां । दे बोध जो सुदुर्लभ थोरांसि सहस्रकल्प मेळविता ॥" केळकरांच्या सहवासात जें शिक्षण मला मिळालें, त्याचे वर्णन याच पद्धतीने करता येईल. एकाद्या विषयाचा व्यासंग कसा करावा येथपासून तों विरामचिन्हें कशी द्यावीत येथपर्यंत लेखनकलेतील प्रत्येक गोष्ट मी त्यांच्यापाशी शिकलो. याचे एक लहानसे उदाहरण देण्याजोगे आहे. १९२१ साली पेशव्यांच्या पुण्यातील शनिवारवाड्याचे

उत्खनन करण्याचे जेव्हा सरकारने ठरवले, तेव्हा केळकरांनी त्या वाड्यासंबंधी अगदी बारीक सारीक माहिती आणि उल्लेख असलेले अनेक इंग्रजी मराठी ग्रंथ आणवले; व ते सर्व काळजीपूर्वक वाचून नंतर 'केसरी'त त्या वाड्याविषयी वर्णनपर लेख लिहिले. मला ते लेख 'डिक्टेट' करीत असताना ते उद्‍गारले, "मी शनिवार वाड्याचा नुसता चौथरा पाहिलेला आहे. पण, गेले सात आठ दिवस त्या वाड्यासंबंधीचे सगळे ग्रंथ वाचून मी माझ्या मनाशी त्याच्याविषयी अशी अचूक कल्पना बांधलेली आहे की, आता जो हा मजकूर मी तुम्हाला सांगेन, तो वाचल्यावर लोकांच्या डोळ्यांसमोर शनिवारवाडा प्रत्यक्ष उभा राहील!" ही जी विलक्षण मननशील अभ्यासू वृत्ति केळकरांच्या ठिकाणी होती, तिचा माझ्यावर फार परिणाम झाला.

वस्तुतः कोल्हटकर हे साहित्य-ज्योतिर्गणितादि अनेक परस्पर-विरोधी शास्त्रांचें गाढ अध्ययन केलेले आणि त्या सर्व शास्त्रांविषयी सतत मौलिक दृष्टीने चिंतन करीत आलेले अलौकिक प्रतिभेचे पंडित. उलट केळकर हे विलक्षण बहुश्रुत,—वृत्तपत्रव्यवसायातील गरजेनुसार अनेक विषयांची स्वतः हसत खेळत ओळख करून घेऊन वाचकाना हसत खेळत ओळख करून देणारे हौशी निबंधकार! तरीसुद्धा कोल्हट-करांपेक्षा त्यांचा धाक मला जास्त वाटे. कोल्हटकरांचा धाक सुरवातीला काय मला वाटला असेल, तेवढाच. त्यांची बोलण्याची शैली विनोद-प्रचुर असल्यामुळे त्यांच्याशी मोकळेपणाने वागणे सोपे जात असे. शिवाय माझ्यावर त्यांची मायाहि फार होती. त्यामुळे आम्ही एकमेकांशी वाटेल त्या खाजगी विषयासंबंधीदेखील निःसंकोच मनाने बोलत असू. १९२० सालच्या मे महिन्यांत त्यांच्याशी माझा परिचय झाला. त्या वेळी ते पन्नाशी उलटलेले श्रेष्ठ साहित्याचार्य आणि मी विशीच्या घरांतला होतकरू पोरसवदा लेखक होतों. पण हें वयाचें किंवा दर्जाचें अंतर त्यांच्या सहवासांत मला कधीहि जाणवलें नाही. एकादे बिकट शास्त्रीय प्रमेय समजावून सांगतानासुद्धा ते कधी कंटाळल्याचे किंवा रागावल्याचे मला आठवत नाही. उलट, फेऱ्या घालीत 'डिक्टेशन' देत असताना, एकादा शब्द नीट ऐकू न आल्यामुळे,

मी जर पुन्हा विचारला, तर केळकर चटकन तो शब्द सांगत, पण उग्र मुद्रेने ! तथापि त्याबद्दल मला कधी विषाद वाटला नाही किंवा त्याना दोष देण्याच्या बुद्धीनेहि मी हें लिहिलेले नाही. त्यांची स्वतःची बैठक पक्की होती; व पहाटे उठल्यापासून तों मध्यरात्री निजेपर्यंत घड्याळाच्या काट्याबरहुकूम त्यांची कामे सारखी चालत असत. भोजनोत्तर तासभर दुपारीं काय वामकुक्षि करतील, तेवढीच विश्रांति ! इतक्या काटेकोरपणाने आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण कामी लावणाऱ्या त्यांच्यासारख्या कर्तृत्ववान् नेत्याने, 'डिक्टेशन' देण्याच्या भरात असताना, मी मधेच अडथळा उत्पन्न केल्याबद्दल नाराज व्हावे, हें स्वाभाविकच म्हटले पाहिजे. पण, हाती घेतलेले प्रत्येक काम ठराविक मुदतीत जास्तीत जास्त परिश्रम घेऊन उत्तम रीतीने पार पाडण्याचा प्रयत्न करण्याची प्रवृत्ति त्यांच्या कडक शिस्तीमुळेंच माझ्या ठिकाणीं उत्पन्न झाली, हें येथे कृतज्ञतेने सांगणे मला अवश्य वाटते.

केळकरांच्या या कडक शिस्तीचे एक उदाहरण येथे देण्यासारखे आहे. १९२१ साली बडोदे येथे भरणार असलेल्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदावर त्यांची निवडणूक झाल्याबरोबर त्यानी मला पत्र लिहून असें कळवलें की, "मी काही कामासाठी परवा सकाळी मुंबईस येत आहे. तुम्ही माझ्याबरोबर राहाण्याच्या तयारीने सरदार-गृहात या." मी त्याना बोरीबंदर स्टेशनवरच भेटलो. आम्ही दोघे व्हिक्टोरियांतून सरदारगृहात येत असता ते मला म्हणाले, "मी तुमची परीक्षा पहायची ठरवली आहे. त्या परीक्षेत तुम्ही जर माझ्या कसोटीला उतरलात, तर कोल्हटकर तुमची जी तारीफ मजजवळ करतात, ती खरी आहे, असें मी समजेन." त्यावर मी नम्रतेने एवढेंच म्हटलें, "परीक्षेला उतरण्याचा प्रयत्न करणें एवढेंच फक्त माझ्या हातीं आहे." ते नुसते हसले,— काही बोलले नाहीत. सरदारगृहात गेल्यावर त्यानी चहा मागवला आणि तो आम्ही घेत असता ते मला म्हणाले, "हें पहा, माझ्या बडोद्याच्या भाषणाची तयारी आपल्याला करायची आहे. मी पुण्याहून येताना काही ग्रंथांची यादी आणली आहे. आता आपण रॉयल एशियाटिक

सोसायटीच्या लायब्ररीत जाऊ. तेथून त्या यादीतले जेवढे मिळतील तेवढे ग्रंथ घेऊन परत येऊ. मी ते ग्रंथ चाळीन आणि त्यावरून टिपणे तुम्हाला सांगेन. तुम्ही स्वतः माझ्या भाषणात कोण कोणते विषय आले पाहिजेत, कोण कोणत्या व्यक्तींचा उल्लेख मी केला पाहिजे, गेल्या वर्षांत प्रसिद्ध झालेल्या कोण कोणत्या ग्रंथांविषयी मी गौरवपर बोललें पाहिजे, वगैरे गोष्टींचा विचार करून तपशीलवार टिपणे तयार करा; व शक्य तोंवर तीं इथेच मला द्या. मी पुण्यास गेल्यावर तुम्हाला माझ्या सवडीने पत्र किंवा तार करून बोलावीन; व तुम्ही आल्याबरोबर भाषण सांगायला सुरवात करीन." त्याप्रमाणे पंधरा दिवसानी त्यांचे पत्र मला आले आणि मी पुण्यास जाऊन हजर झालो. त्या वेळी सकाळी साडे आठचा सुमार होता. ते 'केसरी' कचेरीत जाण्याच्या घाईत होते. मला पाहिल्याबरोबर ते म्हणाले, "तुम्ही आता इथून हलू नका. माझ्या टेबलावर जीं टिपणें ठेवलेली आहेत, तीं सगळीं काळजीपूर्वक वाचा. मी अकरापर्यंत परत येईन. मग आपण त्याबद्दल बोलू. दुपारी मी निजून उठल्यावर तीन वाजता तुम्हाला मजकूर सांगायला सुरवात करीन. तुम्ही एकसारखे किती वेळ बसून लिहू शकाल ?" मी म्हटलें, "आपण म्हणाल तितका वेळ !" त्याबरोबर ते हसून उद्‌गारले, "म्हणजे माझ्या तोंडून कंटाळल्याची किंवा थकल्याची कबुली काढायची वाट पाहाणार तुम्ही असंच ना ? पाहू या कोण कंटाळतो तें !"

त्यानंतर त्या दिवशी दुपारी वामकुक्षि उरकून चहा घेतल्यावर साडे तीनच्या सुमाराला केळकरानी मला मजकूर सांगावयाला जी सुरवात केली, ती आमची बैठक रात्री दीड वाजेपर्यंत चालली होती. भाषण लिहिण्याच्या कामांत व्यत्यय येऊ नये म्हणून "केळकर घरी नाहीत," अशी पाटी त्यानी बाहेरल्या बाजूला मुद्दाम लावलेली होती. तरीसुद्धा पुण्यातील दोन प्रमुख कार्यकर्ते त्याना सायंकाळी ६॥ च्या सुमारास भेटावयाला आले. त्यांच्या कानांवर तात्यासाहेबांचा आवाज पडल्यामुळे ते सरळ जिना चढून वर आले. तेव्हा, तात्यासाहेब उभ्या उभ्याच त्याना हसून म्हणाले, "अहो, मी

घरी नाही अशी पाटी लावलेली आहे ना खाली ? तरीसुद्धा वर आलात का तुम्ही ? " त्यावर त्या गृहस्थानी उत्तर दिले, "पाटी लावलेली पाह्यली आम्ही. पण आपला आवाज आम्ही ऐकला आणि म्हणून वर आलो." तत्क्षणीच तात्यासाहेब त्याना म्हणाले, "हें पहा, आता मी स्वतःच तुम्हाला सांगतो 'केळकर घरी नाहीत' म्हणून ! मग तर माझें म्हणणें खरें मानून तुम्ही परत जाल ना ? उद्याचा दिवस मी घरी नाही हें लक्षांत ठेवा आणि परवा मला भेटायला या." दुसऱ्या दिवशीं पहाटे पाचच्या सुमारास ते माझ्या खोलीत आले आणि मला उठवून म्हणाले, "आज मला पराकाष्ठेचा आनंद झाला आहे. तुम्ही चटकन तोंड धुवून या. मी चहा घेताना सांगतो तुम्हाला ! " आणि त्याप्रमाणे आम्ही चहा घेत असता, सौ. ताईंच्या समोरच, त्यानी सविकल्प समाधीची आपली उपपत्ति मला समजावून सांगितली. नंतर ते मला विनोदाने म्हणाले, "तुम्हाला आपल्या गुरूंचा फार अभिमान आहे. आणि ते मोठे साहित्यपंडित आहेत, ही गोष्टहि खरी. मी काही पंडित किंवा 'जीनियस' नाही त्यांच्यासारखा; व स्वतःची परंपरा, संप्रदाय किंवा गुरुपीठ निर्माण करायला जें अलौकिकत्व लागतें, तेंहि माझ्या ठिकाणी नाही. पण, ही उपपत्ति काही त्याना सुचली नसती, हें खास ! आपलें भाषण लिहून संपल्यावर तुम्ही पत्र लिहून आता जें मी हें बोललों, तें तुमच्या गुरूना कळवा !" तेव्हा मी त्याना विचारले, "आपण स्वतःला 'जीनियस' समजत नाही, हे ठीक आहे. पण ते लोकाना कसे पटेल ? लोक तर आपल्याला प्रतिभाशाली पंडित समजतात." त्यावर ते म्हणाले, "लोक भले समजोत ! पण मी मात्र स्वतःसंबंधी कोणत्याच प्रकारच्या भ्रमात नाही. कार्लाइलने 'जीनियस'ची व्याख्या 'अपरिमित परिश्रम करण्याची शक्ति' अशी केलेली आहे ती जर खरी असेल, तर मात्र मी 'जीनियस' आहे. कारण मी अगदी लहान सहान लेख लिहितानासुद्धा माझ्याकडून करवेल तितकी तयारी करीत असतो. तुमचे गुरु किंवा शिवरामपंत परांजपे यांच्या ठिकाणी जी प्रतिभाशक्ति आहे, ती माझ्या ठिकाणी खचितच नाही. तुम्हाला

माहीत नाही, माडखोलकर! मी 'मराठा' पत्राचा संपादक म्हणून टिळकांजवळ आलो आणि माझ्या मागून खाडिलकर आले ते 'केसरी'च्या संपादकमंडळावर! मला त्या वेळी मराठी लिहिण्याचा फारसा सराव नव्हता. त्यामुळे, टिळकांच्या भोवतालच्या मंडळीत सर्वांचीच अशी समजूत मजविषयी होती की, परांजपे आणि खाडिलकर यांच्या मानाने मी मराठी लिहिण्यात कमी आहे. म्हणून मी निश्चय केला की, आपण त्या दोघांच्या बरोबरीला यायचे. त्यासाठी मी सगळे उत्तम संस्कृत कवि आणि मुक्तेश्वर, वामन, रामदास, मोरोपंत यांच्यासारखे काही मराठी कवि यांच्या साहित्याचा झटून अभ्यास केला. मी 'जीनियस' असेन तर कष्टाच्या कमाईने तयार झालेला 'जीनियस' आहे!" त्या दिवशी मध्यरात्रीं दोनच्या सुमारास भाषण लिहून संपलें. त्या वेळी मोठ्या प्रसन्न चित्ताने ते मला म्हणाले, "माडखोलकर, तुम्ही माझ्या कसोटीला उतरलात. माझा आशीर्वाद आहे तुम्हाला,—माझ्या डोळ्यांदेखत तुम्ही साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष व्हाल!" पुढे १९४६ च्या मे महिन्यात, नागपूरहून बेळगावच्या साहित्यसंमेलनासाठी अध्यक्ष म्हणून जाताना, मी महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे होणार असलेल्या माझ्या सत्काराच्या निमित्ताने पुण्यास उतरलो आणि दुपारी चारच्या सुमारास सौ. शांताबाईसह त्याना भेटावयाला गेलो. त्या वेळी मी त्यांच्या पायांवर मस्तक ठेवण्यासाठी खाली वाकताच ते माझे हात धरून मला म्हणाले, "बडोद्याच्या संमेलनाच्या वेळी तुम्ही माझें भाषण लिहिलेंत, तेव्हा जो आशीर्वाद मी तुम्हाला दिला होता, तो खरा झाला. तुमचे गुरु कोल्हटकर जर आज हयात असते, तर त्यानाहि फार आनंद झाला असता." वयाच्या एकविसाव्या वर्षी, मी केळकरांच्या हाताखाली काम करीत असताना, ही जी शिस्त त्यानी मला लावली, तिच्यामुळेच गेल्या चाळीस वर्षात माझी सर्व दृष्टीनी इतकी प्रगति झाली.

केळकरांविषयी हा जो धाक मला वाटे, तो अनाठायी असल्याचा अनुभव अगदी सुरवातीपासूनच मला अनेकदा येऊन गेलेला होता. त्यांचे बडोद्याचे अध्यक्षीय भाषण लिहून पूर्ण झाल्यानंतर जी शाबासकी

त्यानी मला त्या दिवशीं रात्रीं दिली, ती उतावळेपणाची होती, हें बहुधा बडोद्यास पोचल्याबरोबर त्यांच्या लक्षांत आलें असावें. भाषणाचें काम संपल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं ते दौऱ्यावर जावयाला निघाले. निघण्याच्या वेळीं भाषणाचें हस्तलिखित माझ्या स्वाधीन करून ते मला म्हणाले, "हें सर्व तुम्ही काळजीपूर्वक वाचा. तुम्हाला ज्या योग्य वाटतील त्या दुरुस्त्या त्यांत करा; व मग तें 'केसरी'कडे छापायला द्या. मी बाबाना तसें सांगून ठेवलेलें आहे. प्रुफें पहिल्यापासून शेवटपर्यंत तुम्ही स्वतः तपासलीं पाहिजेत. त्यांत कुठेहि चूक राहाता कामा नये. भाषण वाचून दाखवायचें असतें, हें माहितच आहे तुम्हाला !" त्यांच्या या सूचनांप्रमाणे मी हस्तलिखित तपासून तें 'केसरी' छापखान्यांत छापण्यासाठी श्री. बाबासाहेब विद्वांस यांच्याजवळ दिलें; व मशिनवरील शेवटल्या फर्म्यापर्यंत सगळीं प्रुफें छापखान्यांत हजर राहून तपासली. भाषणाची छपाई पूर्ण झाल्यावर मी परत मुंबईस गेलों. बडोद्याचें संमेलन संपल्यावर तेथून पुण्यास यावयाला निघताना केळकरानी मला मुंबई येथे भेटण्याबद्दल कार्ड टाकलें होतें. त्याप्रमाणे मी स्टेशनवर त्याना भेटावयाला गेलों. दरम्यान त्यांच्या भाषणावर 'ज्ञानप्रकाश'दि वर्तमानपत्रांत आलेल्या प्रतिकूल टीका मी वाचलेल्या होत्या. त्यामुळे माझें मन अस्वस्थ होऊन गेलेलें होतें. कारण, त्या टीकांत त्याच सुमारास निधन पावलेले बडोदे राज्यांतील ग्रंथपाल कै. ज. स. कुडाळकर यांचा उल्लेख केळकरानी आपल्या भाषणांत न केल्याबद्दल त्याना ठपका देण्यांत आलेला होता. भाषणासाठी दिवंगतांची नामावलि मी तयार केलेली असल्यामुळे अर्थातच या न्यूनतेची जबाबदारी मजवर होती. केळकरानी आगगाडीतून उतरल्याबरोबर मला हसत हसत विचारले, "काय, वाचल्यात भाषणावरल्या सगळ्या टीका ?" तेव्हा मी त्याना म्हटलें, 'कुडाळकरांचें नांव माझ्या हातून गळलें, ही मोठी चूक झाली. मला फार वाईट वाटते त्याबद्दल." त्यावर ते उद्गारले, "त्यांत इतके वाईट वाटून घेण्याजोगे काहीच नाही. मी ती चूक भाषण वाचून दाखवीत असताना सुधारून घेतली. पण, आधुनिक कवींचा कैवार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ........................
क्रमांक ...................... वि: ..........
नोंदे दि:


घेतल्याबद्दल माझ्यावर जो कडाका काही टीकाकारानी उडवला आहे, तो तुम्ही पाहिलात ना ? असं चालायचंच !" आम्ही सरदार-गृहांत गेल्यावर विलायतेच्या प्रवासावरलें आपलें ओवीबद्ध विनोदयुक्त काव्य त्यानी 'विविधज्ञानविस्तारा'चे संपादक रावसाहेब रामकृष्ण रघुनाथ मोरमकर याना देण्यासाठी मजजवळ दिलें; व ते मला म्हणाले, "याची सगळी प्रुफे तुम्हीच पाहा. तुम्हाला जर त्यातला एकाद दुसरा शब्द बदलावासा वाटला, तर बदला. मी रामभाऊना तसें कळवीन." पुण्यास गेल्यावर त्यानी लगेच तसे पत्र रावसाहेबाना पाठवले. तें पत्र मला मोठ्या कौतुकाने दाखवून रावसाहेब उद्गारले, "तुमच्यावर इतका विश्वास आहे नरसोपंतांचा !" या सुरवातीच्या प्रसंगावरून मला केळकरांविषयी वाटणारा धाक हा एका परीने कसा अकारण होता, हें दिसून येईल.

यापेक्षा सर्वच दृष्टीनी अधिक कठीण असा प्रसंग १९३२ सालीं घडला. कोल्हटकरांच्या सर्व लेखांचा आणि भाषणांचा संग्रह ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्याची कल्पना, बडोद्याच्या भाषणाचे काम चालू असतानाच, केळकरानी मला सुचवली होती; व त्यांच्या आणि कोल्हटकरांच्या सल्ल्याने लेखांची आणि भाषणांची निवडहि करण्यांत आलेली होती. नऊशेपेक्षा जास्त पानांचा हा लेखसंग्रह प्रसिद्ध करण्याची अवघड जबाबदारी श्री. वि. स. खांडेकर, श्री. गं. दे. खानोलकर आणि मी अशा तिघानी घेतली होती. त्याला केळकरानी प्रस्तावना लिहावी, अशी कोल्हटकरांची इच्छा होती. तदनुसार मी त्याना केलेली विनंति मान्य करताना केळकरानी अशी अट मला घातली की, "प्रस्तावनेची तयारी करण्यासाठी आणि 'डिक्टेशन' घेण्यासाठी तुम्ही स्वत: जर पुण्यास येऊन जरूर तितके दिवस रहायला तयार असाल, तरच मी हें काम करीन." त्याप्रमाणे १९३२ सालच्या जूनमध्ये मी या प्रस्तावनेच्या कामासाठी पुण्यास गेलो. बडोद्याच्या भाषणाप्रमाणे ही एकुणपन्नास पानांची प्रस्तावनाहि दोन दिवस अहोरात्र बैठक घालून त्यानी हाता-वेगळी केली. मी पुण्याहून नागपुरास परत आल्यावर संपूर्ण प्रस्तावना कोल्हटकराना वाचून दाखवली; व त्यानी तिला संमति दिल्यावर ती

मुंबईस श्री. खानोलकर यांच्याकडे छपाईसाठी पाठवली. मुंबईच्या कर्नाटक छापखान्यांत हा ग्रंथ त्यांच्या देखरेखीखाली छापला जात होता. प्रस्तावनेची प्रुफे स्वत: केळकरानी एकवार तपासल्यानंतर माझ्याकडे पाठवली. तींहि मी सर्व कोल्हटकराना वाचून दाखवलीं; व त्यानी ज्या किरकोळ दुरुस्त्या मला सुचवल्या, त्या मी लगेच त्या प्रुफांत केल्या. त्यानंतर फायनल प्रुफें जेव्हा माझ्याकडे आली, तेव्हा कोल्हटकरानी पुन्हा तीं माझ्याकडून वाचवून घेतली. त्या वेळी त्यांचे नुकतेच सेवानिवृत्त झालेले बंधु, नागपूर हायकोर्टाचे माजी न्यायाधीश श्री. दिगंबर कृष्ण ऊर्फ अण्णासाहेब कोल्हटकर हे उपस्थित होते. त्याना त्या प्रस्तावनेतील मधला सुमारे १०–१२ ओळी मजकूर आपल्या बंधूंच्या कीर्तीला कमीपणा आणणारा आहे असे वाटले; व तो गाळून टाकण्यात यावा अशी सूचना त्यानी आग्रहाने केली. स्वत: कोल्हटकर हे त्या वेळी पक्षघाताने आजारी असल्यामुळे शरीराने विकल तसे मनाने दुर्बल झालेले होते. मला स्वतःला काही तो भाग त्याना कमीपणा आणणारा आहे, असें वाटलें नाही. म्हणून मी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्नहि केला. पण कोल्हटकर बंधूना काही माझे म्हणणे पटले नाही. शेवटीं तो भाग गाळून टाकण्याचें मी ठरवलें; व त्याप्रमाणे प्रुफांतील त्या भागावर काट मारून आणि श्री. खानोलकर यानाहि तो गाळण्यासंबंधी स्वतंत्र पत्र लिहून मी प्रुफें कर्नाटक छापखान्याकडे परत पाठवली. हा सगळा प्रकार केळकराना मी सविस्तर पत्र लिहून कळवला; व त्यांची आगाऊ अनुमति न घेता प्रस्तावनेतील मजकूर गाळल्याबद्दल क्षमाहि मागितली. तेव्हा, केळकरांचें जें पत्र उलट डाकेने मला आले, त्यांत त्यानी असें लिहिलेलें होतें की, "प्रस्तावनेतील कोल्हटकराना पसंत न पडलेला मजकूर तुम्ही गाळलात, याबद्दल मला तुमचा राग येण्याचे किंवा तुमच्याविषयी माझा गैरसमज होण्याचे काहीच कारण नाही. कारण प्रस्तावनेत योग्य वाटतील ते बदल करण्याचा अधिकार मी तुम्हाला दिलेलाच होता. पण, हा भाग गाळल्याने जर कोल्हटकर बंधूंचे खरोखरीच समाधान झाले, तर तुम्ही या बाबतींत केलेल्या सगळ्या

परिश्रमांचे चीज झाले, असे मी म्हणेन. पण, हें कलियुग म्हणजे कलहयुग आहे, ही गोष्ट तुम्ही लक्षांत ठेवा !"

दुर्दैवाने केळकरांचा हा शेवटला इशारा, कोल्हटकर लेखसंग्रह प्रसिद्ध झाल्याबरोबर, खरा ठरला कोल्हटकरांचे ज्येष्ठ शिष्य श्री. मामासाहेब वरेरकर यानी प्रस्तावनेतला मी गाळलेला भाग कर्नाटक छापखान्यांतून कसा हस्तगत केला, हें त्यानाच माहित ! तो त्यांच्या हातीं आल्यावर त्यानी मुंबईच्या 'विविधवृत्त' साप्ताहिकांत 'नागपुरांतील पुणेरी पीर' या मथळ्याखाली मजवर दोन तीन लेख लिहिले; व त्यांत हा गाळलेला भाग ठळक टाइपांत उद्धृत करून कोल्हटकरांची प्रतिष्ठा कमी करण्याच्या केळकरांच्या कारस्थानात मी संगनमत केल्याबद्दल माझ्यावर अनन्वित टीका केली. ती टीका कोल्हटकर बंधूंच्या वाचनात आल्यावर त्यांचेंहि मत माझ्याविषयी कलुषित झालें. त्यांतच श्री. ना. गो. चापेकर, श्री. ना. के. बेहेरे, डॉ. अ. ना. भालेराव, श्री. माधवराव जोशी, श्री. गोविंदराव टेंबे, श्रीमंत सौ. सुमतिबाईसाहेब पवार प्रभृति मंडळीनी, कोल्हटकराना जाणून बुजून कमीपणा आणण्यासाठी केळकरानी ही प्रस्तावना लिहिलेली आहे, अशा आशयाची आपलीं मतें प्रत्यक्ष भेटींत आणि पत्रांतून कोल्हटकरांच्या कानावर घातल्यामुळे तर, त्यांचा राग परमावधीला गेला. त्याना असासुद्धा संशय आला की, मीच या प्रस्तावनेचा कच्चा मसुदा तयार केलेला असावा ! शेवटी एक दिवस डोळ्यांत पाणी आणून जेव्हा त्यानी सरळ मला जाब विचारला, तेव्हा मी त्यांच्या पायांवर हात ठेवून असें सांगितलें की, "या प्रस्तावनेसाठी कच्ची टिपणे मी तयार केली, ही गोष्ट खरी. पण प्रस्तावनेतील अक्षर न् अक्षर केळकरानी जसे मला 'डिक्टेट' केले, तसे मी लिहिलेलें आहे. त्यांत माझे स्वतःचे एक अक्षरहि नाही." त्यावर त्यानी मला विचारले, "माझ्यापेक्षा तुमचा ओढा केळकरांकडे अधिक आहे की नाही ?" तेव्हा मी त्याना असें उत्तर दिलें की, "माझा ओढा त्यांच्यापेक्षा आपल्याकडे जास्त आहे, हे आपण आजपर्यंत अनेकदा अनुभवलेले आहे. आपल्यावर माझी जी भक्ति आहे,

ती त्यांच्यावर नाही, हे आपण जाणता." हें माझें उत्तर ऐकल्यावर कोल्हटकरांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रु आले; व माझ्या खांद्यांवर हात ठेवून ते उद्गारले, "गजाननराव, आता कोणी मला काही सांगितले तरी तुमच्याविषयी मी पुन्हा कधी शंका घेणार नाही." ही घटना श्री. अण्णासाहेब कोल्हटकर यांच्या समोरच घडली. केळकरांच्या कानांवर अर्थातच या सगळ्या गोष्टी गेल्या. त्यामुळे, १९३३ सालच्या मे मध्ये मी पुण्यास गेलो असता ते मला विनोदाने म्हणाले, "माणसाने गुरु कधी करू नये. त्यांत तुमची चूक अशी झाली की, तुम्ही दोन गुरु केलेत. या तुमच्या 'द्विविधा निष्ठे'बद्दल तुम्हाला भरपूर प्रायश्चित्त मिळून गेले!" त्यावर मी त्याना म्हटलें "वसिष्ठ आणि विश्वामित्र हे दोघे हाडवैरी असूनसुद्धा रामाने त्यांचे शिष्यत्व केलें. आपण दोघे तर कॉलेजात असल्यापासून स्नेही म्हणून प्रसिद्ध. कोल्हटकरांच्या अध्यक्षतेखाली पुण्यास भरलेल्या साहित्यसंमेलनांत त्यांचे डोळे आणि आपले कान एकाच वेळी बिघडल्याबद्दल आपण दोघानी ज्या कोटया त्यावरून एकमेकांच्या स्नेहभावाविषयी केल्यात, त्या शेकडो लोकानी ऐकलेल्या आहेत. अशा स्थितींत मी आपणा दोघांना गुरु केले, यांत माझे काय चुकले? साहित्याचा दोन अगदी भिन्न शाखांत मला प्रावीण्य मिळवायचे होते. म्हणून, मी त्या दोन शाखांवर प्रभुत्व असलेले दोन गुरु केले, यांत माझे काही चुकले, असे मला वाटत नाही. माझी निष्ठा 'द्विविधा' असली, तरी ती पक्की आहे, हें आपण अनुभवलेलें आहे." मला वाटते, केळकरांशी इतका धिटाईने आणि मोकळेपणाने मी पूर्वी कधीच युक्तिवाद केला नसेन. तेहि माझ्या या खुलाशाने प्रसन्न होऊन उद्गारले, "तुम्ही आमची दोघांची मर्जी गेली बारा वर्षे उत्तम रीतीने सांभाळलीत. हें तुमचें 'तप' सार्थकी लागेल. गुरुजनांच्या भावनाना जो शिष्य इतका जपतो, त्यालाच विद्या साध्य होत असते!" "सकोप दिसती गुरु, क्षणभरीच जें तापलें। जल ज्वलनसंगमें त्यजि न शैत्य तें आपलें॥" असें जें मोरोपंतानी म्हटलेलें आहे, तें केळकराना यथार्थतेने लागू पडतें. तरीसुद्धा त्यांच्याविषयींच्या माझ्या मनावरील धाकाचें दडपण काही फारसें कमी झाले नाही.

केळकरांविषयीच्या या धाकाला कदाचित् आणखीहि एक कारण असू शकेल. कोल्हटकराना सार्वजनिक जीवन असें प्रायः काही नव्हतेंच. त्यांचें सर्व आयुष्य तेल्हारा, खामगाव, जळगाव यासारख्या वऱ्हाडांतल्या दुय्यम शहरी वकिली करण्यात गेले. त्यामुळे, त्यांच्याच शब्दात सांगावयाचें म्हणजे, बुद्धिमान्, कलाकुशल आणि साहित्यप्रेमी व्यक्तींच्या सहवासासाठी त्यांचे मन नेहमी भुकेलें असे. उलट, केळकरांचें सर्व आयुष्य, लो. टिळकांसारख्या राष्ट्रनेत्याच्या छत्राखाली, सार्वजनिक चळवळींच्या धबडग्यात गेलें. सार्वजनिक कामांच्या निमित्ताने ज्या कार्यकर्त्याचे शेकडो लोकांशी सतत संबंध येतात, त्याला कोणाचविषयी फारशी आपुलकी किंवा अगत्य वाटेनासे होतें; व तो कार्यलोभी म्हणून उपयुक्ततावादी बनतो. केळकरांच्या स्वभावाची घडण अशाच प्रकारची होती. अर्थात्, कोल्हटकरांचा मुक्काम कोर्टाच्या सुटीच्या दिवसात पुण्या-मुंबईस असला, म्हणजे त्यांच्याभोवती जसा शिष्यांचा आणि चाहात्यांचा परिवार नेहमी दृष्टीस पडे, तसा केळकरांच्या भोवती सहसा कधी दिसत नसे. तरीसुद्धा, मला मात्र त्यानी, त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. बापूसाहेब केळकर यानी म्हटल्या-प्रमाणें, स्वतःचा मुलगा समजूनच खरोखरी वागवले. पण, जुन्या संयुक्त कुटुंबांत वडलांचा जो धाक मुलाना जन्मभर वाटत असे, तोच मलाहि केळकरांबद्दल सदैव वाटे. ता. २९ मे १९४० रोजीं पुणे येथे माझ्या अध्यक्षतेखाली शारदोपासक संमेलनाचें नववें अधिवेशन भरलें होतें. त्या अधिवेशनाला हजर राहाण्याची विनंती केळकरानी मान्य केलेली होती. पण ते थोडे उशिरा सभागृहांत आले. व्यासपीठावर येताच ते हात जोडून कौतुकाने हसत हसत मला म्हणाले, "नमस्कार, अध्यक्षमहाराज!" तत्क्षणींच मी गडबडीने उठून व्यासपीठावर त्याना साष्टांग नमस्कार घातला. त्याबरोबर टाळ्यांचा कडकडाट झाला. श्री. मामासाहेब वरेरकर हे त्या वेळीं माझ्या शेजारी बसलेले होते. ते नंतर मला म्हणाले, "गजाननराव, तुम्ही केळकराना फार भिता. कोल्हटकरांविषयी काही तुम्हाला असा धाक कधी वाटला नाही." मी त्याना लगेच उत्तर दिले, "आपलें म्हणणें

खरे आहे, मामासाहेब ! त्या धाकामुळेच मी केळकरांच्या हाताखाली इतक्या लवकर तयार झालो, असें मला वाटतें.'' विशेषतः, केळकरानी ज्या काळात आपल्या वृत्तपत्रव्यवसायातील कर्तृत्वाने कीर्तीचें शिखर गाठलें, त्या काळांत त्यांच्याजवळ राहून काम करण्याचें भाग्य मला लाभल्यामुळे, माझी प्रगति जलद झाली. लॉर्ड मोर्ले यांनी वृत्तपत्रीय साहित्याचें वर्णन 'धांदलें साहित्य' (Literature in hurry) या शब्दानी केलेले आहे. त्या शब्दातील खोच अशी की, वृत्तपत्रांचे रकाने भरू. काढण्यासाठी तात्कालिक प्रश्नांच्या निकडीने जे साहित्य घाईघाईने निर्माण करण्यात येतें, त्यांत अभिजात साहित्य-गुण हा केव्हाहि कमीच आढळावयाचा ! पण, १९१० सालीं 'केसरी 'चे संपादकत्व आपल्याकडे घेतल्यापासून तों १९३० सालापर्यंत त्या वीस वर्षांच्या कालावधीत अग्रलेखापासून तों प्रवासवृत्तापर्यंत जें नाना प्रकारचें साहित्य केळकरानी 'केसरी 'तून लिहिलें, त्या त्यांच्या लिखाणाला "साहित्यसोनियाच्या खाणी" या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दांनी गौरवावयाला शंका वाटत नाही.

या कालखंडातील शेवटलीं दहा वर्षें मी केळकरांची शागिर्दी इमानदारीने केली. 'शागिर्दी' या शब्दाला थोडा हलकेपणाचा वास येतो, हें मला माहित आहे. तरीसुद्धा, खुद्द केळकरांच्याच तोंडून मी तो शब्द ऐकलेला असल्यामुळे, स्वतःच्या बाबतींत त्याचा उपयोग करणें मला अप्रशस्त वाटत नाही. लो टिळक यांच्याविषयीच्या आपल्या मतभेदातीत निष्ठेचें वर्णन मजजवळ करताना, बोलण्याच्या ओघांत त्यानी 'शागिर्दी' हा शब्द वापरलेला होता. आपल्या 'गतगोष्टी' या आत्मचरित्रपर ग्रंथाविषयी बोलताना १९४० सालच्या मे महिन्यांत ते मला एकदा म्हणाले की, "टिळकांचे आणि माझे मतभेद जगजाहीर होते. त्या मतभेदांमुळे मी दोन तीन वेळा राजिनामा कसा दिला, ही हकिकत मी तुम्हाला सांगितलेलीच आहे. पण, याचा अर्थ असा होत नाही की, टिळकांविषयी माझी निष्ठा कमी होती किंवा त्यांच्या सेवेंत मी कसूर केली. खाडिलकर हे त्यांचे अनन्य भक्त होते. तसा मी अर्थातच नव्हतों. पण भक्ति आणि निष्ठा

या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत. टिळकांविषयीच्या निष्ठेंत मी खाडिलकराना हार गेलो नसतों; व त्यांच्याइतक्याच इमानाने मी टिळकांची शागिर्दी केली, असें मी अभिमानाने म्हणेन. उलट टिळकाना मात्र आम्हा दोघांपेक्षा आपल्या इतर प्रांतांतील सहकाऱ्यांचें आणि शिष्यांचें अगत्य अधिक वाटत असल्याचा जो अनुभव केव्हा केव्हा येई, त्याबद्दल मला वाईट वाटत असे. याचे एकच उदाहरण तुम्हाला सांगतों. होमरूल लीगतर्फे जेव्हा विलायतेला शिष्टमंडळ पाठवण्याचे ठरलें, तेव्हा ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदाना सादर करण्यासाठी आपली कैफियत इंग्रजीत तयार करावी, असे टिळकानी ठरवले; व ती कामगिरी श्री. विपिनचंद्र पाल यांच्यावर सोपवली. पण पालबाबूनी ठरलेल्या मुदतींत काम केले नाही आणि पैसेहि जास्त मागायला सुरवात केली. शेवटी टिळकानी कैफियत तयार करण्यासंबंधी मला विचारले. त्या वेळीं मात्र मी कधी नव्हे तें माझें मन अगदी स्पष्ट शब्दांत त्यांच्यापुढे उघडे केलें. मी त्याना असें बोललों की, ' हें काम प्रथमच तुम्ही माझ्यावर सोपवायला हवें होते. गेली २०-२२ वर्षे मी ' मराठ्या 'चा संपादक असून इंग्रजी लिहिण्याच्या बाबतीतील माझी योग्यता तुम्हाला माहित आहे. शिवाय आपल्या पक्षांत श्री. सीतारामपंत दामले यांच्यासारखी तुमच्या लोभांतली अनेक माणसे इंग्रजी लिहिण्यात निष्णात आहेत. तरीसुद्धा तुम्ही आम्हा सगळ्याना वगळून पालबाबूना हें काम सांगितलें, ही गोष्ट काही मला आवडली नाही. आता तुम्ही म्हणाल त्या मुदतींत मी कैफियत पुरी करून देईन.' आणि खरोखरीच, ' दि केस फॉर इंडियन होमरूल ' हें पुस्तक मी, स्वतःला माझ्या खोलीत कोंडून घेऊन, टिळकानी सांगितलेल्या तारखेला त्यांच्यापुढे ठेवलें. त्यांनी सांगितलेलें प्रत्येक काम पार पाडण्यांत ही जी तत्परता मी दाखवली, तिच्यामुळेच त्यांचा विश्वास मला संपादन करता आला. एरवी, खाडिलकरांचें तादात्म्य त्यांच्याशी सर्वच बाबतींत माझ्यापेक्षा जास्त होतें, हें कबूल करायला मला काहीहि संकोच वाटत नाही. पण, टिळकांची शागिर्दी मा आम्ही दोघानी सारख्याच निष्ठेने केली, ही गोष्ट खाडिलकरहि

मान्य करतील, असें मला वाटतें." केळकरांनी ज्या अर्थाने 'शागिर्दी' हा शब्द या संभाषणांत योजलेला मी ऐकला, त्या अर्थाने मीहि त्यांची शागिर्दी निष्ठेने केली, असें मला म्हणता येईल. प्रस्तुत लेखसंग्रहात जो काही गुणांश वाचकाना दिसून येईल, त्याचें श्रेय या शागिर्दीलाच दिलें पाहिजे. त्या दृष्टीने, हें पुस्तक त्याना अर्पण करणें म्हणजे 'गंगातर्पण गांगें' करण्यासारखेंच होय. तथापि, त्यांच्या मजवरील कधीहि न फिटणाऱ्या ऋणाचा जाहीर रीतीने निर्देश करण्याचा एक प्रयत्न, म्हणूनच मी हें पुस्तक त्याना आज अर्पण करीत आहे.

या लेखसंग्रहातील संदर्भ तपासण्यासाठी दुर्मिळ ग्रंथ आणि माहिती मिळवून देण्याच्या कामी नागपूर विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख, सुप्रसिद्ध कवि आणि ग्रंथकार प्रो. भ. श्री. पंडित, माझे स्नेही श्रीमंत राजे प्रतापसिंहराव भोसले यांच्या बहुश्रुत पत्नी सौ. राणी कांचनमालाबाईसाहेब भोसले, विदर्भ साहित्य संघाचे व्यासंगी कार्यालयीन चिटणीस श्री. ह. गो. येगावकर आणि चि. प्रा. सुनील सुभेदार यांची जी मदत झाली, तिचा निर्देश कृतज्ञतेने करणे अवश्य आहे. त्याचप्रमाणे, चि. चन्द्रशेखर फडणीस, चि. सौ. उमा माडखोलकर आणि चि. राजीवलोचन माडखोलकर यांचे या लेखसंग्रहाची उपांगे तयार करण्यापासून तों मुद्रितें तपासण्यापर्यंत सर्वच कामात जें सहाय्य झालें, तेंहि उल्लेखनीय होय. माझे प्रकाशक मित्र श्री. दिगंबरराव धुमाळ यानी हौसेने हा लेखसंग्रह काढण्याची कल्पना मला सुचवली व नारायण मुद्रणालयाचे चालक श्री. पां. ना. बनहट्टी आणि त्यांचे सुपुत्र श्री. मधुसूदन पां. बनहट्टी या दोघानी 'तरुण भारता'च्या फायलीतरून त्याचे परिश्रमपूर्वक शुद्ध मुद्रण केले, याबद्दल मी त्यांचाहि फार आभारी आहे. नागपूरचे तरुण चित्रकार श्री. भांजीभाई पाटणकर यानी पुस्तकाच्या नावाला अनुरूप असें वेष्टनावरील चित्र तयार करून दिलें, हेंहि शेवटी आभारपूर्वक नमूद करणे जरूर आहे.

धंतोली, नागपूर १<br>१३-९-१९६४

ग. त्र्यं. माडखोलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों वि: ........................

# नि र्मा ल्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............
क्रमांक ............ दि: ............
93604

# ‘तरुण भारता’चा पुनर्जन्म

‘ लग्न पहावें करून नि घर पहावें बांधून ’ अशा आशयाची एक म्हण मराठींत आहे. मी या अवघड मानल्या गेलेल्या दोन्ही गोष्टी, फारसें कुणाचें साहाय्य नसतां, करून पाहिलेल्या आहेत. पण, दैनिक ‘ तरुण भारत ’ काढण्याच्या कामीं, डॉ. खरे यांच्यासारखा सहाय्यक आणि श्री. ए. श्री. पटवर्धन यांच्यासारखा सहकारी लाभलेला असतांना सुद्धा, ज्या नाना प्रकारच्या अडचणी तें निघण्यापूर्वीं आणि निघाल्यानंतरहि गेल्या सबंध वर्षांत आल्या, त्या लक्षांत घेतल्यावर, ‘ लग्न पहावें करून नि घर पहावें बांधून ’ या म्हणींत ‘ दैनिक पहावें काढून ’ असें आणखी तिसरें कलम घालावयाला मला शंका वाटत नाही.

१९३५ सालपर्यंत आपण दैनिक पत्राचे संपादक होऊं, ही कल्पना माझ्या स्वप्नांतहि कधी आली नव्हती. ती आकांक्षा माझ्या मनांत जुन्या मध्यप्रांत–वऱ्हाड प्रांताचे तत्कालीन गृहमंत्री कै. ना. डॉ. ई. राघवेंद्र राव यांनी प्रथम उत्पन्न केली.

१९३६ च्या जानेवारींतील गोष्ट. एक दिवस रात्रीं माझे मित्र नागपूरचे सुप्रसिद्ध कायदेपंडित आणि कामगार पुढारी रावसाहेब रामचंद्र

वासुदेव फुले हे अचानक माझ्या घरीं आले आणि मला म्हणाले, 'जरा फिरायला चलता का भाऊसाहेब, माझ्याबरोबर ?—'

'कुठं चलायचं ? ' मी त्यांना विचारलें.

'मोटार नेईल तिकडे जायचं. पण चांगलं दीड दोन तास घरीं परत येतां येणार नाही असं समजून निघा तुम्ही—'

त्यांनी हसत हसत म्हटलें.

आम्ही बाहेर येऊन तडक मोटारींत बसलों आणि त्यांनी मोटार भरधाव वेगाने सोडली.

आम्ही सहज फिरावयाला निघालेलों नाही, याची मला जाणीव होती. पण, हायकोर्टाला वळसा घालून त्यांनी जेव्हा हजारी पहाडाच्या चढणीला मोटार लावली, तेव्हा मात्र मी बुचकळयांत पडलों. परंतु त्यांना मी विचारलें मात्र कांही नाही.

तेहि कांही न बोलतां संथपणाने धूम्रपान करित मोटार वेगाने चालवीत होते.

हजारी पहाडावरील ना. डॉ. राव यांच्या बंगल्यापाशीं मोटार येतांच त्यांनी वेग कमी केला आणि मोटार कमानीखाली आणून उभी केली.

चपराशाने पुढे येऊन मोटारीचें दार उघडलें आणि कोणताहि शिष्टाचार न पाळतां आम्ही सरळ गृहमंत्र्यांच्या अभ्यासिकेत गेलों.

रावसाहेबांनी माझा त्यांच्याशीं इंग्रजी भाषेंत परिचय करून दिल्यावर त्यांनी उठून माझ्याशीं हस्तांदोलन केलें आणि टेबलावरील सिगारेटचा डबा आमच्यापुढे धरला.

रावसाहेबानी त्यांतली एक सिगारेट घेतली आणि मी नमस्कार-पूर्वक नकार दर्शविला.

त्याबरोबर गृहमंत्र्यांनी मला विचारलें, 'काय, तुम्ही धूम्रपान कधीच करीत नाही ? '

'नाही–'

'छान! माणसाला कोणतंहि व्यसन नसावं हें चांगलं. व्यसन म्हणजे तें एक वर्मच असतं माणसाचं—'

ते आपल्या खुर्चीवर बसून उद्‌गारले. ते स्वतः धूम्रपान सुरू करतील, अशी माझी अपेक्षा होती. पण त्यांनी कांही त्या डब्यांतली सिगारेट घेतली नाही. खादीचें पांढरें शुभ्र कुडतें त्यांनी अंगांत घातलेलें होतें; व हवेंत गारवा असल्यामुळे खादीची शालहि पांघरली होती.

नंतर थोडा वेळ औपचारिक प्रश्नोत्तरें झाल्यावर त्यांनी मला विचारलें—

'तुम्ही कांही पेय घेणार नाही का?—'

आणि, मला उत्तर देण्याची संधि न देतां, त्यांनीं आपल्या खुर्चीच्य वरल्या बाजूला लोंबत असलेली विजेची घंटी दाबून म्हटलें —

'आपण कॉफी घेऊं या थोडी. आज हवेंत चांगलीच थंडी आहे नाही?—'

घंटीचा आवाज होतांच आंत आलेल्या चपराशाला त्यांनी घाईं घाईने हिंदींत कांही तरी सांगितले आणि ते आम्हाला म्हणाले—

'चला, आपण आंत जाऊं या—'

आम्ही आंत टेबलापाशीं जाऊन बसल्यावर त्यांनी मला विचारलें-

'तुमचं बहुतेक आयुष्य वृत्तपत्रव्यवसायांत गेलंय नाही का?—

'हो—'

'हे चांगले कादंबरीकारहि आहेत आणि विशेष म्हणजे राजकीय उपन्यास लिहिण्याबद्दल ख्याति आहे यांची—'

रावसाहेबांनी मध्येच म्हटलें.

'हो, मी ऐकलंय खरं. मला वाटतं, तुमच्या कादम्बऱ्या हा तुमच्या वृत्तपत्रव्यवसायाचाच एक भाग असावा. स्विफ्ट आणि डिस्रायली यांनी आपल्या राजकारणांतील अनुभवांचा उपयोग करून उत्कृष्ट उपरोधिक उपन्यास लिहिलेले आहेत. लोकमान्य टिळक यांचे एक पट्टशिष्य खाडिलकर

यांची नाटकं तशा प्रकारचीं आहेत असं म्हणतात; न् त्यांनी कौन्सिल-प्रवेशावर एक सुंदर प्रहसन लिहिलं असल्याचं अभ्यंकरांच्या तोंडून ऐकलंय मी. पण त्यांचीं नाटकं पाहाण्याची संधि मिळाली नाही मला. मनुष्याच्या उपरोधबुद्धीच्या विलासाला राजकारणाइतकं अनुकूल उत्कृष्ट क्षेत्र दुसरं क्वचितच सांपडेल—''

त्यांनी हसत हसत तें वाक्य संपविलें, तोंच चपराशी कॉफी घेऊन आला.

स्वतःच सारखें झपाझप बोलत रहावयाचें आणि त्या सपाटचांत दुसऱ्याला बोलावयाला संधि द्यावयाची नाही, हा जो गृहमंत्र्यांचा स्वभावविशेष, तो या प्रसंगीं प्रथमच माझ्या अनुभवाला आला.

रावसाहेबानी पेल्यांत गरम कॉफी ओतली. त्याबरोबर त्या काळचाभोर मद्रासी कॉफीचा कटुमधुर वाफारा हवेंत दरवळला. पेल्यांतील साखर चमच्याने ढवळून गृहमंत्र्यांनी त्या कॉफीचा एक घोट घेतला आणि आपले घारे तीक्ष्ण डोळे माझ्याकडे रोखून मला म्हटलें—

'मी आता एक प्रश्न विचारणार आहे तुम्हांला न् त्याचं सरळ उत्तर दिलं पाहिजे तुम्हीं—'

'कोणता प्रश्न ?'

मी चमकून विचारलें.

'यांनी सांगितलं नाही तुम्हांला कांही ?'

त्यांनी रावसाहेबांकडे साभिप्राय पहात विचारलें.

'छे ! घरून निघतांना इथं यायचं आहे, याचीसुद्धा कल्पना दिली नव्हती त्यांनी मला—'

मी म्हटलें. रावसाहेब कांही बोलले नाहीत. ते मिस्किलपणाने हसत होते.

'तो आहेच तसा वस्ताद !—'

डॉ. राव त्यांच्याकडे पाहून उद्गारले आणि लगेच माझ्याकडे वळून त्यांनी विचारलें—

'समजा, मी मराठी दैनिक काढायचं ठरवलं इथं, तर तुम्ही मुख्य संपादक व्हाल का त्याचे ?—'

तो प्रश्न मला अगदी अनपेक्षित होता. त्यामुळे मी गोंधळून गेलों. पण, लगेच स्वतःला सावरून घेऊन, तोंडापाशीं नेलेला कॉफीचा कप बशींत ठेवीत म्हटलें—

'तें धोरणावर अवलंबून राहील आपल्या दैनिकाच्या—'

'धोरण ? धोरण कांग्रेसविरोधी राहील त्या दैनिकाचं. निवडणुकी जवळ आलेल्या आहेत, हें माहितच आहे तुम्हांला—'

'मग त्याचं संपादकत्व स्वीकारणं बहुतेक शक्य होणार नाही मला—'

'का बरं ? तुम्ही कांही गांधीवादी नाही. 'महाराष्ट्रां'त तुम्ही काँग्रेसच्या विरुद्ध जितकं लिहितां, त्यापेक्षा आमच्या दैनिकांत कांही जास्त लिहावं लागणार नाही तुम्हांला. आमच्या 'डेली न्यूज'चं धोरण पाहाताच आहांत तुम्ही—'

१९३३ सालीं श्री. वेंकटरमण यांच्या संपादकत्वाखाली सुरू केलेल्या 'डेली न्यूज' या इंग्रजी दैनिकाचा निर्देश त्यांनी आपल्या दृष्टीने अगदी समर्पक म्हणून केला होता.

पण मी त्यावर त्यांना उत्तर दिलें—

'गांधींवर 'महाराष्ट्रां'त जरी टीका येत असली, तरी ती कांही केवळ गांधी किंवा काँग्रेस याच्याविषयीच्या विरोधबुद्धीनं केलेली नसते. एकादा मनुष्य गांधीवादी नसला, म्हणून तो हमखास गांधीविरोधी असेलच, असें नाही. शिवाय गांधीविरोध आणि काँग्रेसविरोध या दोन गोष्टी अगदी निराळ्या आहेत—'

'छे ! हें चुकीचं आहे तुमचं म्हणणं. आज गांधी म्हणजेच काँग्रेस असं समीकरण होऊन बसलेलं आहे हिंदी राजकारणात. तुमच्यासारख्या वृत्तपत्रव्यवसायांत मुरलेल्या माणसाला जाणीव असलीच पाहिजे या परिस्थितीची—'

'हो. पण तरीसुद्धा माझ्या विधानाला बाध येत नाही. काँग्रेस आजपर्यंत निरनिराळ्या गटांच्या ताब्यांत रहात आलेली आहे. त्या गटांच्या धोरणावर टीका करणें किंवा त्या गटांना विरोध करणें, म्हणजे काँग्रेस या संस्थेला विरोध करणें नव्हे. ७-८ सालीं मेहता-गोखले यांच्या मुठींत असलेल्या काँग्रेसच्या धोरणावर टिळकांनी अत्यंत कडक टीका केली. पण म्हणून कांही टिळकांना कोणी काँग्रेसविरोधी म्हटलं नाही-'

'नाही कसं ? मेहतांनी त्यांना काँग्रेसद्वेष्टे ठरवलं; व त्यांची आणि त्यांच्या पक्षाची काँग्रेसमधून हकालपट्टीहि केली. आज गांधी गटाच्या विरुद्ध जो मनुष्य टीका करील, त्याच्यावरहि काँग्रेसच्या बाहेर पडण्याचा प्रसंग आल्याशिवाय रहात नाही, हें निदान तुमच्या सारख्या महाराष्ट्रीयाला तरी मी सांगायला नको. खरोखरी, तुम्ही माझी निराशा केलीत आज, माडखोलकर ! —'

बोलतां बोलतां त्यांचा आवाज चढत गेला. टेबलावरली कॉफी थंड होत चालली होती. पण त्या एक दोन घोट घेऊन खाली ठेवलेल्या कपांना हात लावण्याची इच्छा आता कोणालाच उरलेली नव्हती. तथापि त्या त्रस्त मन:स्थितींतहि गृहमंत्री शिष्टाचाराखातर विचारते झाले—

'काय, आणखी हवी आहे कॉफी तुम्हाला ? '

'नको—'

रावसाहेब उद्गारले आणि मला डोळ्याने खूण करून चटकन उभे राहिले.

ना. डॉ. रावहि लगेच उठले.

त्यांच्यामागोमाग आम्ही बाहेर आलों; चपराशाने पुढे केलेल्या पानदानांतला एक एक विडा घेतला; व जावयाला निघालों.

गृहमंत्री आता थोडे शांत झालेले होते. त्यांनी हस्तांदोलनासाठी हात माझ्यापुढे केला आणि म्हटलें—

'तुमची यापुढं वारंवार भेट होत जाईल अशी आशा आहे माडखोलकर, मला— '

आमची मोटार त्यांच्या बगिचांतून बाहेर पडून उताराला लागतांच रावसाहेब फुले थोडे रागानेच उद्‌गारले—

'भाऊसाहेब, तुम्ही आज केवढा मौका गमावलात, याची कल्पना नाही तुम्हाला ! आणखी तीन चार महिन्यांनी हंगामी गव्हर्नर होणार असलेला हा माणूस तुम्हाला आपल्या दैनिकाचा संपादक होण्याचं आमंत्रण देतो आणि तुम्ही तें नाकारतां—खरोखरी तुम्हाला कांही व्यवहार कळत नाही असं म्हणावं लागतं मला ! 'हितवाद'चा मुख्य संपादक असूनहि त्यांनी म्हटल्याबरोबर वेंकटरमणनं 'हितवाद' सोडून 'डेली न्यूज'चं संपादकत्व स्वीकारलं; न् जन्माचं कल्याण करून घेतलं आपल्या. आणि तुम्ही हा आयता चालून आलेला मौका दवडलात ! काय म्हणावं तुम्हाला ? —'

'मी तुमच्यावर फार रागावलों आहे आज, रावसाहेब. घरून निघतांना तुम्ही कल्पना द्यायला हवी होती मला या प्रकाराची. खरोखरी, तुम्ही मला अचानक गाठून माझ्या तोंडून तुम्हाला हवी असलेली कबुली काढायचा घाट घातला होतात आज ! पण मी पक्का असल्यामुळेच बचावलों या प्रसंगांतून—'

'अहो, प्रसंग कसला आला आहे त्यांत ? चांगली संधि आली होती चालून— '

'मी प्रसंगच म्हणतो त्या संधीला. डॉ. राव यांच्यासारख्या करड्या, अरेराव मुत्सद्याच्या वर्तमानपत्राचं संपादक व्हायचं म्हणजे रोज सांजसकाळ ते फोनवर जे मुद्दे सुचवतील त्यांवर लिहायचं किंवा जो इंग्रजी मजकूर ते टाईप करून पाठवतील त्याचं भाषांतर करून तो आपला अग्रलेख म्हणून छापायचा ! हें परवडण्यासारखं नाही मला—'

* * *

डॉ. राव यांनी आपल्या निरोपाच्या वाक्यांत व्यक्त केलेल्या इच्छेप्रमाणे त्यांची आणि माझी भेट पुढे वारंवार होत गेली; व आमच्या संबंधांनाहि अत्यंत घनिष्ठ आणि विश्रब्ध स्वरूप लवकरच आलें. पण दैनिकाच्या संपादनाचा प्रश्न मात्र नंतर त्यांनी कधी काढला नाही.

नाही म्हणावयाला, १९३८ सालच्या सप्टेंबरमध्ये खरे-प्रकरण प्रांतिक कायदेमंडळांत गाजल्यावर, एक दिवस रेस्ट हाऊसमध्ये आम्ही रात्रीं गप्पा मारीत बसलों असतां, त्यांनी मला विचारलें—

'आता जर तुम्हांला काँग्रेसविरोधी दैनिकाचं संपादक व्हायला सांगितलं, तर व्हाल की नाही ?—'

त्या प्रश्नांतली खोच माझ्या तत्क्षणींच लक्षांत आली; व मी त्यांना हसून म्हटलें—

'नाही. मी दोन वर्षांपूर्वी जें उत्तर आपल्याला दिलं होतं, तेंच माझं मत अद्यापहि कायम आहे. गांधी गटाला विरोध म्हणजे काँग्रेस-विरोध नव्हे. स्वतः डॉ. खरे हे आजहि आपल्याला 'प्रॉटेस्टंट काँग्रेसमन' म्हणवून घेतात तें याच दृष्टीनं—'

'तुम्ही हट्टी आहांत माडखोलकर, एवढंच म्हणतों मी ! —'

ते हसून उद्गारले. पण त्या हास्यांतहि कटुतेची छटा होती. नंतर आपला आवाज किंचित् नरमावून ते कळकळीने म्हणाले—

'दोन वर्षांपूर्वी तुमची आणि माझी प्रथम भेट झाली, त्या वेळी आपल्या प्रांतांतले एक बुद्धिमान्, बहुश्रुत आणि राजकारणी दृष्टीचे वृत्तव्यावसायिक म्हणून ओळखीत होतों मी तुम्हांला. पण, आज तुमचा एक स्नेही म्हणून मी तुम्हांला सांगतों की, आपल्या बुद्धीची आणि लेखणीची चमक दाखवून तुम्हांला जर या प्रांतांत कांही विशेष कार्य करायची आकांक्षा असेल, तर तुम्ही दैनिकाचे संपादक होण्याची संधि दवडूं नका पुन्हा. यापुढला काळ दैनिकांचा आहे. मी मणीलाहि ('हितवाद'चे तरुण संपादक) हेंच सांगत असतों नेहमीं—'

* * *

१९३८ च्या सप्टेंबरमध्ये डॉ. राव यांनी जो हा कळकळीचा सल्ला मला दिला, तो अमलात आणण्याची संधि १९४३ च्या सप्टेंबर-मध्ये आली. ज्या 'नरकेसरी स्मारक मंडळा'तर्फे 'तरुण भारत' आज प्रसिद्ध होत आहे, त्याची स्थापना डॉ. खरे यांनी, आपल्या कांही मित्रांच्या सहकार्याने, ता. ६ सप्टेंबर १९४३ रोजीं केली. पण आमच्या मनांत मात्र स्वतःचें स्वतंत्र वर्तमानपत्र काढण्याची कल्पना १९४० सालापासूनच घोळत होती.

१९४०च्या जुलैंत, लोकनायक अणे यांच्या हीरक महोत्सवाच्या कार्यासाठी श्री. ए. श्री. पटवर्धन आणि मी चांदा येथे गेलों असतां, आमचा मुक्काम आमचे स्नेही, चांदा जिल्ह्यांतील प्रमुख कॉंग्रेस कार्यकर्ते शेठ खुशालचंद यांच्याकडे होता. त्या वेळीं जेवतांना शेठजींनी मला विचारलें—

'भाऊराव, आणखी किती वर्षं 'महाराष्ट्रां'त नोकरी करायचा विचार आहे तुमचा ? पटवर्धन, माधवराव दातार, तुम्ही न् मी अशा चौघांनी मिळून जर वर्तमानपत्र काढलं, तर उत्तम चालेल तें. फक्त हिंमत बांधायचाच काय तो प्रश्न आहे--'

'पण या युद्धाच्या दिवसांत तें जमणं शक्य नाही, शेठजी. युद्ध संपेपर्यंत थांबलं पाहिजे आपल्याला--'

श्री. पटवर्धन यांनी त्यांना अगदी धिम्मेपणाने उत्तर दिलें.

पण, आश्चर्याची गोष्ट अशी की, युद्धकाळांत नवीन वर्तमानपत्र काढणें शक्य नाही, असें म्हणणाऱ्या पटवर्धनांनी १९४३ च्या जानेवारींत स्वतःचें वर्तमानपत्र काढण्याचा आपला निर्धार एक दिवस सायंकाळीं अचानक मला सांगितला.

प्रो. भनसाळी यांचें उपोषण सुटल्यानंतर तीन चार दिवसांनी, डॉ. खरे यांच्या घरून आम्ही सायंकाळीं परत येत असतां, कॉंग्रेसपक्षीय वर्तमानपत्रांनी भन्साळी-प्रकरणांतील डॉ. खरे यांच्या यशस्वी शिष्टा-ईचें महत्त्व कमी करण्याचा जो पद्धतशीर प्रयत्न केलेला होता, त्यावरून

बोलतांना श्री. पटवर्धन मला एकदम म्हणाले, 'मी 'संकेत' किंवा 'तरुण भारत' यांपैकी कोणत्या तरी पत्राचं डिक्लेरेशन करायच्या विचारांत आहे, भाऊराव ! आपण दोघे तिघे मिळून तें चालवूं-- '

आपल्या नेहमीच्या पद्धतीने पटवर्धनांनी तें वाक्य अगदी सहज म्हणून संथपणाने उच्चारलें. पण, त्या संथ सहजोद्‌गाराच्या मागे जो पराकाष्ठेचा दुर्धर निर्धार होता, त्या निर्धारानेच अनेक दुस्तर अडचणीं-वर मात करून अखेर 'तरुण भारता' चा पुनर्जन्म घडवून आणला.

हा निर्धार तडीस नेण्याच्या कामीं श्री. पटवर्धन यांना अत्यंत निष्ठेने आणि चिकाटीने जर कोणी साथ दिली असेल, तर ती 'तरुण भारता 'चे कार्यकारी संपादक श्री. भय्यासाहेब उधोजी यांनी. ते प्रथम स्वतःच्या नांवाने डिक्लेरेशन करावयाला तयार नव्हते, हें खरें. पण, डॉ. खरे यांच्या आज्ञेनुसार एकदा त्यांनी डिक्लेरेशन केल्यानंतर, मग मात्र 'तरुण भारता'चा पहिला अंक बाहेर पडेपर्यंत त्यांनी हर एक बाबतींत पटवर्धनांच्या बरोबरीने परिश्रम घेतले.

भय्यासाहेबांची पहिली कल्पना लिमिटेड कंपनी स्थापन करून साप्ताहिक किंवा द्विसाप्ताहिक वर्तमानपत्र काढण्याची होती. पण, कै. नरकेसरी बॅ. अभ्यंकर यांच्या स्मारक योजनेचा एक भाग म्हणून वर्तमान-पत्र काढावयाचें व त्यांतून जर कांही फायदा झालाच तर त्याचा ठरा-विक अंश त्यांना प्रिय असलेल्या कार्यावर खर्च करावयाचा, अशा दुहेरी उद्देशाने ट्रस्ट स्थापन करण्याची कल्पना पटवर्धनांनी काढली; व तीच अखेर मान्य होऊन १९४३ च्या सप्टेंबरमध्ये 'नरकेसरी स्मारक मंडळ' अस्तित्वांत आलें.

साप्ताहिक किंवा द्विसाप्ताहिक काढण्याऐवजी दैनिक काढण्याचा आग्रह मात्र मी धरला. वर्तमानपत्र निघाल्यास मी त्याचें संपादक व्हावयाचें की नाही, हें कांही त्या वेळीं ठरलेले नव्हतें. पण, 'मंडळां 'त मला घेण्याचें जेव्हा निश्चित झालें, तेव्हा पटवर्धन आणि उधोजी या दोघांनाहि मी स्पष्ट सांगून टाकलें की, 'तुम्ही साप्ताहिक किंवा द्विसा-प्ताहिक वर्तमानपत्र जर काढणार असाल, तर मी या योजनेंत सामील

होणार नाही. द्विसाप्ताहिक काढणें म्हणजे 'महाराष्ट्रा'शीं चढाओढ करणें होय. त्या स्पर्धेत मला कोणत्याहि नात्यानें भाग घेणें शक्य नाही. या प्रांतांत तीन इंग्रजी आणि दोन हिंदी दैनिकें आहेत. पण मराठी दैनिक मात्र एकहि नाही. म्हणून, दैनिक वर्तमानपत्र जर आपण काढलें, तर प्रांताची कांही तरी विशेष सेवा आपण केल्यासारखी होईल; व दैनिकाच्या योजनेंत भाग घ्यायला मलाहि कांही संकोच वाटणार नाही—'

माझा हा युक्तिवाद त्यांना पटला; व 'तरुण भारत' दैनिक स्वरूपांत सुरू करण्याचें ठरून हिंदुस्थान सरकारकडे तशी परवानगी मागण्यांत आली.

पण, 'मंडळा'च्या घटनेचा मसुदा ज्या जन्माष्टमीच्या दिवशीं, म्हणजे ता. २२ ऑगस्ट १९४३ रोजीं रात्रीं, डॉ. खरे यांच्या घरीं चर्चा करून पक्का करण्यांत आला, त्याच दिवशीं दुपारीं दैनिक काढावयाला परवानगी देतां येत नाही, असें हिंदुस्थान सरकारचें पत्र आमच्या हातीं पडलें. तो नकाराचा खलिता 'मंडळा'च्या त्या पहिल्या अनौपचारिक बैठकींत वाचून दाखवूनच भय्यासाहेबांनी कामाला सुरवात केली.

आणि, मुख्यत: दैनिक पत्र सुरू करण्यासाठी म्हणून जें हें 'मंडळ' ता. ६ सप्टेंबर रोजीं स्थापन झालें, त्याच्या गंगाजळींत त्या दिवशीं रोकड रक्कम किती होती म्हणाल ? तर अवघे पांचशें रुपये ! डॉ. खरे यांनी ट्रस्ट निर्माण करतांना, 'नरकेसरी' प्रेसची तीन चार हजार रुपयांची जुनी यंत्रसामग्री आणि पांचशें रुपयांची रोख रक्कम यांचा स्ट्रटची मिळकत म्हणून निर्देश करून, दैनिक काढण्याच्या या धाडसी उपक्रमाला धडाडीने हात घातला.

गेल्या उन्हाळ्यांत रत्नागिरीच्या 'बलवंत' पत्राचे चालक श्री. गजाननराव पटवर्धन हे 'तरुण भारत' कचेरींत आले असतां यांनी मला विचारलें, 'किती लाखांचा ट्रस्ट केलाय डॉक्टरसाहेबांनी?' तेव्हा मी त्यांना उत्तर दिलें, 'किती लाखांचा कुठला आला आहे ? फक्त पांचशें रुपयांचा ट्रस्ट केलेला आहे हा !' पण माझें हें उत्तर

त्यांना खरें वाटेना. माझ्या शेजारीं उभ्या असलेल्या पटवर्धनांकडे वळून त्यांनी विचारलें, ‘ काय हो, खरं बोलतात का, भाऊसाहेब ? ’ त्यावर पटवर्धनांनी त्यांना म्हटलें, ‘ हो. ट्रस्ट डीडमध्ये जी रक्कम आहे, ती बरोबर सांगितली त्यांनी तुम्हांला.’ तेव्हा गजाननरावांनी पुन्हा विचारलें, ‘ मग हा चालतो कसा एवढा खर्च ?’ मी त्यांना हसत हसत उत्तर दिलें, ‘ अहो, द्रौपदीची थाळी मिळाली आहे आम्हांला. त्यामुळं, उद्या एकादा दुर्वास जरी सत्त्व घ्यायला आला, तरी तो संतुष्ट होऊन जाईल इथून ! ’

अशा रीतीने, हातांत हिंदुस्थान सरकारची परवानगी किंवा पुरेसा पैसा नसतां, आम्ही दैनिक काढण्याच्या उद्योगाला लागलों खरे. पण आमच्यापैकी कुणालाच खरोखरी दैनिकाच्या साधनसामग्रीची किंवा कार्यपद्धतीची नीट कल्पना नव्हती. पटवर्धनांनी आपल्या चौकस स्वभावानुसार निरनिराळ्या प्रकारची जी माहिती गोळा केलेली होती, तेंच काय तें आमचें भांडवल. त्यांनी तयार केलेली यादी घेऊन मी मुंबईला गेलों; व ‘मौजे’च्या भागवतबंधूंच्या सल्ल्याने छापखान्याचें सामान घेतलें. आमच्या भगिनी सौ. अनसूयाबाई काळे या दिल्लीला परवानगी मिळवण्यासाठी गेल्या. पण, त्यांना जरी श्री. हैदरी यांनी खाजगी पत्र लिहून परवानगीबाबत लेखी आश्वासन दिलेलें होतें, तरी प्रत्यक्ष परवानगीचा खलिता कांही हातीं पडला नव्हता; व छापखान्याचें सामानहि नागपुरास येऊन पोचलेलें नव्हतें.

अशा अनिश्चित स्थितींत डिसेंबरचा शेवटला आठवडा उजाडला. दैनिक सुरू करण्याचा मुहूर्त ता. २ जानेवारी १९४४,—नरकेसरींचा नववा स्मृतिदिन,—हा ठरलेला होता. तो मुहूर्त चार दिवसांवर आला आणि आमची तर कांहीच तयारी नव्हती. स्टिक्स नाहीत, कॉलम रूळ नाहीत, केसींत पुरेसा टाईप नाही, मशिन धड नीट बसलेलें नाही आणि कागदाचा परवानाहि हातीं आलेला नाही. ही सगळी परिस्थिति पाहून ता. २ जानेवारीचा मुहूर्त साधतो की नाही, याची सर्वांनाच शंका वाटू लागली. श्री. पटवर्धन तर ता. ३० डिसेंबर रोजीं सायंकाळीं आम्हांला म्हणाले सुद्धा की, 'नाहीच ता. २ जानेवारीचा मुहूर्त साधला, तर आपण

ता. २६ जानेवारीचा मुहुर्त ठरवूं. आपल्याला काय, दोन्ही दिवस सारखेच महत्त्वाचे आहेत—'

पण, हें बोलत असतांनाच ता. २ जानेवारीचा मुहूर्त टळूं नये, म्हणून ते आपल्याकडून प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते.

* * *

दैनिक काढण्याच्या आणि यशस्वी करण्याच्या बाबतींत आमच्या मंडळीचा सर्व भर आणि विश्वास माझ्यावर होता. वस्तुतः मी त्यांच्या पक्षाचा नव्हे किंवा पक्षविषयक राजकारणाच्या साच्यांत बसण्यासारखी माझी मनोवृत्तीहि नाही. प्रसंगीं विसंगतपणाचा आरोप पत्करूनहि प्रत्येक प्रश्नाचा स्वतंत्र बुद्धीने विचार करण्याचा माझा प्रथमपासूनच स्वभाव आहे. तरीसुद्धा डॉ. खरे, पटवर्धनप्रभृति मंडळींनी मला आपल्या ट्रस्टमध्ये घेतला आणि दैनिकाच्या संपादनाची सर्व जबाबदारी मजवर टाकण्याचें ठरविलें. ती जबाबदारी आपल्या हातून कितपत यशस्वी रीतीने पार पडेल, याबद्दल माझी मलाच खात्री नव्हती. माझे पुण्या–मुंबईचे सर्व स्नेही, मी दैनिकाच्या रगाड्यांत पडून स्वतःचें आर्थिक आणि शारीरिक नुकसान करून घेऊं नये, अशा मताचे होते; व श्री. तात्यासाहेब केळकर यांनीहि, 'तरुण भारता'ला आशीर्वाद देतांना माझें अवांतर लेखन त्यामुळे बंद पडेल, अशी भीति व्यक्त केली होती. किंबहुना, 'महाराष्ट्र' कचेरींतील माझे सहकारी श्री. पां. चि. करकरे यांनी मला कळकळीने असा सल्ला दिला कीं, 'भाऊसाहेब, आतां तुम्ही वृत्तपत्रव्यवसायांतून अनायासें बाहेर पडतां आहांत, तर या संधीचा फायदा घेऊन सरळ बोलपटाच्या धंद्याकडे वळा. आज तुम्ही लोकप्रिय आहांत आणि त्या धंद्यांत तुम्हाला मागणीहि आहे. तेव्हा अशी संधि डावलून तुम्ही दैनिकाची जबाबदारी आपल्या डोक्यावर घेण्यांत कांही अर्थ नाही.' दैवयोग असा की, माझे तरुण मित्र 'मौजे'चे संपादक श्री. वि. पु. भागवत यांनी याच सुमारास मुंबईच्या एका प्रसिद्ध फिल्म कंपनीतर्फे मला चित्रकथा लिहिण्याची विनंती करून माझें उत्तर तारेने मागितलेलें होतें.

पण, श्री. करकरे यांना जें उत्तर मी समक्ष दिलें, तेंच श्री. भागवत यांना लेखी कळविलें. तें असें की, 'चोवीस वर्षांपूर्वी स्वतःच्या अंतःकरणप्रवृत्तीला प्रमाण मानून, वडलांचा सल्ला न ऐकतां, मी लेखनव्यवसायाकडे कांही एका उद्देशाने, कांही एका ईर्ष्येने वळलों. या दैनिकाच्या योजनेमुळे तो उद्देश अंशतः तरी सिद्धीस नेण्याची जी संधि मला कदाचित् मिळेल, ती इतर कोणत्याहि लाभापेक्षा मला मोलाची वाटते; व म्हणून कामधेनूप्रमाणे हुकमी पैसा देणारें माझें कादंबरीलेखन बंद पडण्याची आणि त्याहिपेक्षा दैनिकाच्या रात्रपाळीचा ताण माझ्या अधु डोळ्यांना न सोसण्याची मला पूर्ण खात्री असतांनासुद्धा मी ही जबाबदारी पत्करीत आहें.'

अर्थात् ही जबाबदारी अंगावर घेतांना माझ्या डोळ्यांपुढे घोरणाचा प्रश्न मुख्य होता. आमचा स्ट्रस्ट म्हणजे बोलून चालून बारभाईंची खेती. त्यांत सर्व दर्जांच्या, सर्व वर्गांतल्या आणि सर्व प्रकारच्या मतांच्या व्यक्ति आहेत. ही परिस्थिति लक्षांत घेऊन मी ट्रस्ट आणि वर्तमानपत्र या दोहोंच्याहि बाबतींतील माझ्या धोरणाच्या मर्यादा स्वतःच्या मनाशीं निश्चित केल्या. या दोन्ही बाबतींत, अगदी स्पष्ट बोलावयाचें म्हणजे, श्री. कृ. प्र. खाडिलकर यांचा आदर्श मी आपल्या डोळ्यांपुढे ठेवलेला आहे. ट्रस्टचा आपल्यावरील विश्वास जोपर्यंत कायम आहे, तोपर्यंत निष्ठेने वर्तमानपत्राचें काम करावयाचें; व ट्रस्टला आपण अप्रिय किंवा अविश्वसनीय वाटूं लागल्याचें ज्या दिवशीं प्रत्ययास येईल, त्या दिवशीं, कोणत्याहि प्रकारची हुजत न घालतां किंवा तक्रार न करतां, ट्रस्टमधून बाहेर पडावयाचें. त्याचप्रमाणे स्वतःच्या कोणत्याहि वैयक्तिक स्वार्थासाठी किंवा प्रचारासाठी वर्तमानपत्राचा उपयोग करावयाचा नाही आणि मराठी वर्तमानपत्रांतून जे व्यक्तिविषयक वाद नित्य चालू असतात त्यांचाहि संपर्क त्याला लागूं द्यावयाचा नाही. हें धोरण गेले नऊ दहा महिने इतक्या दक्षतेने पाळलें गेलेलें आहे की, नागपुरांतील कांही इंग्रजी–मराठी वृत्तपत्रांनी अत्यंत असभ्य वैयक्तिक टीका 'तरुण भारता'वर केलेली असतांनादेखील, 'तरुण भारता'ने अवाक्षरानेहि तिची दखल घेतलेली नाही.

हें व्यक्तिगत धोरण झालें. 'तरुण भारता'च्या राजकीय धोरणाचा प्रश्न यापेक्षा किती तरी बिकट आणि नाजूक होता. फाशीनिवारक समिति, महाविदर्भ सभा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, चरखा संघ आणि संयुक्त महाराष्ट्र सभा या संस्थांशीं 'तरुण भारता'च्या चालकांचा निकट संबंध असल्यामुळे, राजबंदींची मुक्तता आणि दुःखनिवारण, महाराष्ट्राचें एकीकरण, महाविदर्भाची स्वतंत्र प्रांतघटना आणि महात्माजींचा रचनात्मक कार्यक्रम हे त्याचे जिव्हाळ्याचे प्रचारविषय साहजिकच ठरून गेले; व गेल्या मेमध्ये म. गांधी हे बंधमुक्त होईपर्यंत 'तरुण भारता'च्या धोरणांत कोणत्याहि प्रकारची चलबिचल लोकांना दिसून आली नाही. किंबहुना, 'तरुण भारत' हें देशांतील कोणत्याहि विद्यमान राजकीय पक्षाचें मुखपत्र नाही, असें पहिल्याच अंकांतील अग्रलेखांत स्पष्ट जाहीर केलेलें असतांहि, तें काँग्रेसवादी पत्र आहे, असाच समज दृढ झाला.

पण, गांधीजींनी आजारांतून उठल्यावर आपल्या बदललेल्या धोरणाचे जे एक एक प्रकार, उलट सुलट खुलाशांसह, प्रदर्शित करावयाला सुरवात केली, त्यामुळे त्यांच्यावर टीका करणें प्राप्त झालें. तशी टीका येऊ लागतांच 'तरुण भारत' हें खरेपक्षीय म्हणजेच काँग्रेसविरोधी पत्र आहे, असा गवगवा सुरू झाला. त्या गवगव्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून गांधीजींच्या धोरणांतील जें काय ग्राह्य वाटेल त्याचा पुरस्कार आणि जें ग्राह्य वाटणार नाही त्याचें खंडन करण्याचा आपला क्रम 'तरुण भारता'ने चालू ठेवला. त्यामुळे काँग्रेसविरोधाबरोबर आणखी विसंगतपणाचेहि आरोप होऊं लागले. हे सारे गैरसमज दूर करण्यासाठी मी 'तरुण भारता'चें धोरण खुलासवार स्पष्ट करण्याचें ठरविलें; व धोरणाचा कच्चा मसुदा तयार करून तो ट्रस्टकडून मंजूर करून घेतला. त्या कच्च्या सूत्रमय टिपणावरून पटवर्धनांनी पक्का तपशीलवार मसुदा तयार केला; व जुलैच्या शेवटल्या आठवड्यांत वीर हरकरे यांच्याशीं चर्चा करून आम्ही 'तरुण भारता'ची विचारप्रणालि निश्चित केली. सुदैवाने टिळक सप्ताह जवळ आलेला होता.

तेव्हा, ती संधि साधून 'तरुण भारता'च्या धोरणाचें दिग्दर्शन करणारी लेखमाला मी लिहावी, अशी सूचना पटवर्धनांनी केली; व तदनुसार ता. १ ऑगस्टपासून ता. ९ ऑगस्टपर्यंत गेल्या दोन तपांतील हिंदी राजकारणावर चर्चात्मक लेख लिहून मी 'तरुण भारता'चें धोरण सर्वच दृष्टीनीं विशद केलें. 'तरुण भारता'ने साजरें केलेलें हें 'ऑगस्ट नवरात्र' अतिशय गाजलें.

संपादकीय धोरणाइतकाच दैनिकाच्या स्वरूपाचा प्रश्नहि व्यावहारिक दृष्टचा महत्त्वाचा होता. नागपूरला दैनिक चालविणें, हें अनेक कारणांमुळे अत्यंत अवघड होऊन बसलेलें आहे. एक तर, हें शहर दुभाषी; व गेल्या सात आठ वर्षांत येथे निघालेल्या हिंदी दैनिकांनी वाचकवर्गाच्या अभिरुचीला एक प्रकारचें वळण लावून टाकलेलें आहे. दुसरें असें की, येथे टेले प्रिंटरची सोय नसल्यामुळे सकाळीं आठच्या सुमारास कलकत्ता मेलने वर्ध्यापर्यंत येऊन पोचणाऱ्या मुंबईच्या दैनिकांशीं बातम्यांच्या ताजेपणाच्या बाबतींत येथील दैनिकाला टक्कर देणें अशक्य आहे. म्हणून मी दैनिकाचें स्वरूप निश्चित करतांना ( १ ) अग्रलेख, ( २ ) जिल्हावार बातमीपत्रें व ( ३ ) महायुद्ध, चित्रपट आणि साहित्य यांच्याविषयी तीन समालोचक सदरें हे त्याचे तीन विशेष ठरवून टाकले. दैनिकांतील अग्रलेख हा आखूड आणि अळणी असावा, असा सामान्यतः संकेत आहे. त्यामुळे, 'तरुण भारतां'त जेव्हा तीन चार कॉलमांचे पल्लेदार अग्रलेख येऊं लागले, तेव्हा आमच्या सर्व स्नेही मंडळींनी माझ्या या अविचाराचा निषेध केला; व शेठ खुशालचंद यांनी तर एक दिवस फूटपट्टी हातांत घेऊन अग्रलेखाची लांबी किती असावी, याचें प्रमाण मला दाखवून दिलें. तेव्हा, शेठजींना मी अगदी संथपणाने सांगितलें की, "अग्रलेख हें 'तरुण भारता'चें एक वैशिष्टच आहे; व केवळ अग्रलेखासाठी 'तरुण भारत' वाचला जावा अशी माझी आकांक्षा आहे." गेल्या नऊ महिन्यांत आमच्या ठिकठिकाणच्या एजंटांकडून आणि शेंकडो अनोळखी वाचकांकडून 'तरुण भारता'च्या अग्रलेखांसंबंधी जी अनाहूत प्रशंसापर पत्रें आलेलीं आहेत, त्यांवरून माझी ही आकांक्षा सफल झाली, असें म्हणावयाला मला शंका वाटत नाही.

अग्रलेखाच्या बाबतीत 'तरुण भारता 'चें जें हें वैशिष्टय आता सर्वमान्य झालेलें आहे, त्याचें श्रेय अंशतः माझे प्रमुख सहकारी श्री. पां. चि. करकरे यांना दिलें पाहिजे. मेपर्यंत 'तरुण भारतां 'तील सगळे अग्रलेख एकटाकी लिहिले गेले. त्या सुमारास श्री. करकरे हे 'तरुण भारत-नरकेसरी ' संस्थेला येऊन मिळाले; व त्यांनी संपादकीय जबाबदारीचा निम्मा वाटा तत्परतेने उचलला. त्यांच्या समतोल पण तडफदार लेखणीइतकीच माझे छोटे सहकारी श्री. य. बा. शास्त्री यांची हरकामी कलाचतुर लेखणीहि 'तरुण भारता 'च्या लोकप्रियतेला कारण झालेली आहे.

* * *

'तरुण भारत ' सुरू करण्याच्या कामीं अगदी आरंभापासून ज्या नाना प्रकारच्या अडचणी आल्या, त्यांची परमावधि ता. १ जानेवारी रोजीं मध्यरात्रीं मशिनवर त्याचा पहिला फर्मा चढण्याच्या वेळीं झाली.

आमचा तरुण प्रिंटर दत्तू अदमने याने सायंकाळीं सहाच्या सुमारास जेव्हा मशिन चालवून पहाण्याचा प्रयोग केला, तेव्हा मशिनने कोणत्याहि प्रकारची गडबड केली नाही. त्यामुळे, रात्रीं छपाई निर्विघ्न पार पडेल, अशा खात्रीने तो निश्चित मनाने जेवावयाला घरीं गेला.

रात्रीं अकराच्या सुमारास आतलीं दोन पानें तयार झालीं. दत्तूने तीं मशिनवर चढवलीं; व फर्मा ठोकून प्रूफहि काढलें. त्यानंतर, मोटर चालू करून छपाई रीतसर सुरू करावयाची, म्हणून त्याने नारळ फोडला. लगेच छपाईला वेगाने सुरवात होऊन त्या आनंदाच्या भरांत आम्ही प्रसाद खाल्ला. पण, जेमतेम दहा कागद छापून होतात न होतात, तोंच सिलिंडर उलटें फिरलें आणि छपाई बंद करावी लागली.

मशिनचा आवाज थांबतांच मी दत्तूला विचारलें, 'काय रे, काय झालं, दत्तू ? मशिन चालेल ना नीट ? का दुसरीकडे छापून घ्यायची व्यवस्था करायची ?--'

त्याबरोबर तो म्हणाला, 'बेलन एकदम उलटं फिरल्यामुळं मी काय बिघडलंय तें पाहाण्यासाठी बंद केलंय मशिन. पण आता सुरू करतों पहा पुन्हा-- '

दुसऱ्या दिवशीं सकाळीं १० वा. नागपूरचे दानशूर रसिकाग्रणी श्रीमंत बाबुराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'तरुण भारता'चा प्रकाशन समारंभ व्हावयाचा होता. त्याचीं निमंत्रणें सर्वांना गेलेलीं होतीं. म्हणून मी दत्तूला म्हटलें, 'पहा बरं ! अंक उजाडतां तयार झाला पाहिजे, दत्तू— '

'त्याबद्दल निर्धास्त रहा भाऊसाहेब, तुम्ही— '

दत्तूनें मला हसत हसत उत्तर दिलें.

त्यानंतर पहाटे तीन वाजेपर्यंत मशिन सुरू करण्याचे त्याचे प्रयत्न सारखे चालू होते. पण त्याला यश येईना. त्या ऐन थंडीच्या कहरांत तो घामाघूम होऊन गेला होता. बाहेरचीं दोन पानें तयार होऊन मशिनजवळ पडलीं होतीं; व मी आणि आमचा कामगार वर्ग त्या अडेलतट्टू मशिनशी चाललेली दत्तूची झटापट पहात होतों.

शेवटीं पहाटे चारच्या सुमारास मी त्याला म्हटलें, 'दत्तूभय्या, खरं सांग मला. तुझी खात्री आहे ना मशिन नीट चालेल अशी ? नाही तर दुसरीकडे व्यवस्था करतों छपाईची. सकाळीं समारंभाच्या वेळेपर्यंत जर अंक छापून तयार झाला नाही, तर केवढी फजिती होईल आपली ! — '

दत्तूने आपल्या कपाळावरला घाम हाताने निपटीत मला म्हटलें, 'तुम्ही बिलकूल फिकीर करूं नका, भाऊसाहेब ! माझं काय वाटेल तें झालं तरी चालेल. पण मी उजाडतां अंक काढून देईन तुम्हांला. तुम्ही बेलाशक घरीं जाऊन निजा आता— '

त्याने ते शब्द इतक्या आत्मविश्वासाने उच्चारलेले होते की, मला नंतर कांही बोलणें योग्य वाटलें नाही; व मी मुकाटचाने घरीं जावयाला निघालों. पण, मला सारखें वाटे, उद्या सकाळीं उजाडतां अंक खरोखरीच आपल्या दृष्टीस पडेल का ?

या शंकेने मन तळमळत आणि जागरणाने डोळे जळजळत असतांनाच एकदाचें उजाडलें; व मी चहा कसाबसा संपवून धंतोलीवर जाणारी बस गाठण्यासाठी टिळक पुतळ्यापाशी येऊन उभा राहिलों. पण, मनांत मात्र एकसारखा विचार येत होता की, अंक खरोखरीच छापून निघाला असेल का ?

या संशयाकुल मन:स्थितींतच मी धंतोलीवर आलों. उधोजींच्या बंगल्यापाशीं जातांच मशिनचा आवाज कानांवर आला; व समारंभासाठी केलेली खुर्च्यांची मांडामांडहि दृष्टीस पडली. त्याबरोबर माझ्या जिवांत जीव आला.

मी तडक छापखान्यांत गेलों. मशिनपाशीं दत्तू उभा होता आणि छपाई धडाक्याने चालू होती. मला पाहातांच तो हसून उद्गारला 'भाऊसाहेब, तुम्हांला खात्री वाटत नव्हती. पण अंक निघाला अखेर—

'दत्तूभय्या, तारीफ आहे तुझी ! तुझ्या हिंमतीला मोल नाही खरोखरी--'

मी कृतज्ञतेने म्हटलें.

पण, त्याची ती हिंमत आमच्या संस्थेला लाभावी, असा दैवयोग नव्हता. कारण त्यानंतर अकरा दिवसांनी रक्ताच्या वांत्या होऊन दत्तू तडकाफडकी मृत्युमुखीं पडला.

त्या प्रसंगाला नऊ महिने होतील आता. पण, अजूनहि तें नाठाळ मशिन सुरू झाल्याचा आवाज माझ्या कानांवर आला, म्हणजे दत्तूची आठवण होऊन मनाला अतिशय वेदना होतात.

--**धनुर्धारी**, दिवाळी अंक, ऑक्टोबर १९४४

# बारा वर्षांच्या वनवासानंतर

१९३१ च्या मार्चमध्ये कायदेभंगाच्या चळवळींत 'तरुण भारत' बंद पडला. आज बारा वर्षांनी तो पुन्हा सुरू करण्याचा सुयोग आला आहे.

एक तपाच्या या कालावधींत केवळ हिंदी राजकारणांतच नव्हे, तर एकंदर सर्वच जगाच्या राजकारणांत इतकी विलक्षण उलथापालथ घडून आलेली आहे की, राजकीय जीवनांत आजपर्यंत जीं तत्त्वें किंवा मूल्यें सामान्यतः लोकहिताच्या दृष्टीने यशस्वी आणि अविवाद्य समजलीं जात होतीं, तीं सगळीं कोलमडून पडलेलीं दिसत आहेत. १९३१ सालीं 'कम्युनिस्ट' हा शब्द उच्चारतांच लोकांच्या अंगावर रोमांच उठत आणि सरकारला कांपरें भरत असे; व 'पब्लिक सेफ्टी बिला'वर जें वादरण १९२९ सालच्या फेब्रुवारींत मध्यवर्ती असेंब्लींत झालें, त्यांत हिंदुस्थान सरकारचे तत्कालीन गृहमंत्री सर जेम्स क्रेरॉर यांनी असे उद्गार काढले होते की, "कम्युनिस्टांची चळवळ ही समाजाचा आणि संस्कृतीचा विध्वंस करणारी असून, हिंदुस्थानाचा त्या चळवळी-पासून बचाव करण्यासाठीं हें बिल आम्ही आणीत आहोंत!" पण, आज तेच उत्पाती कम्युनिस्ट ब्रिटिश सरकारचे दोस्त आणि साथीदार बनलेले असून, हिंदुस्थानाच्या बचावासाठी त्या सरकारशी अहमहमिकेने सहकार्य करीत आहेत. या एकाच उदाहरणावरून राजकीय विचारक्षेत्रांत सध्या चालू असलेल्या उलथापालथीची थोडीशी कल्पना येईल.

अर्थात् महायुद्धानंतर जगाच्या राजकारणाचें स्वरूप आमूलाग्र बदलणार, हें निश्चित आहे; व त्याची प्रतिक्रिया हिंदी राजकारणा-वरहि झाल्याशिवाय रहाणार नाही. आज हिंदुस्थानांत जे अनेक राजकीय पक्षोपपक्ष आहेत, त्यांपैकी एकाचीहि भूमिका तत्वतः

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत

शास्त्रशुद्ध नाही. हिंदी राजकारणांतील सर्वांत बलाढ्य जी राष्ट्रसभा म्हणजे कांग्रेस पक्ष, त्याची भूमिका गेल्या पन्नास वर्षांत इतकी कांही बदलून गेलेली आहे की, राष्ट्रसभेचे आद्य प्रवर्तक सर ॲलन ह्यूम हे जर कांही यौगिक चमत्काराने आज कालनिद्रेंतून जागे झाले, तर त्यांना सध्याचें तिचें साम्राज्यविरोधी लढाऊ धोरण पाहून भोवळ आल्याशिवाय रहाणार नाही. तीस वर्षांपूर्वी स्वराज्याची मागणी आणि चळवळ ही कायदेशीर ठरवून घेण्यासाठी कै. लो. टिळक यांना मुंबई हायकोर्टाकडे दाद मागावी लागली होती. पण, राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांनी दीड वर्षापूर्वी जी क्रिप्स योजना झिडकारून दिली, त्या योजनेत तर संपूर्ण स्वातंत्र्याला पायाभूत असलेला ब्रिटिश साम्राज्यांतून फुटून निघण्याचाहि हक्क हिंदुस्थानाला बहाल करण्यांत आलेला होता ! तेव्हा, राष्ट्रसभेच्या ध्येय-धोरणांत हें जें विलक्षण परिवर्तन गेल्या तीस वर्षांत वेगाने घडून आलें, तें जरी बदलत्या लोकमताचें निदर्शक म्हणून अभिनंदनीय ठरण्यासारखें असलें, तरी राष्ट्रसभेला स्वतःची अशी निश्चित तात्विक भूमिका नाही, हें त्यावरून स्पष्ट दिसतें. किंबहुना राष्ट्रसभेचे जुन्या युगांतील पुढारी ना. श्रीनिवास शास्त्री आणि नव्या युगांतील पुढारी पं. जवाहरलाल नेहरू या दोघांनीहि ही गोष्ट मान्य केलेली आहे.

पण, हिंदी राजकीय पक्षोपपक्षांना तात्विक भूमिका असूं नये, ही गोष्ट एका परीने स्वाभाविकच ठरते. परतंत्र राष्ट्राला पारतंत्र्याच्या पाशांतून सुटणें हीच गोष्ट प्रथम इतकी महत्वाची वाटते आणि तिच्यावर आपल्या सर्व शक्ति त्याला इतक्या हिरीरीने एकाग्र कराव्या लागतात की, त्यामुळे राजनैतिक तत्वांचा काथ्याकूट करणें त्याला परवडतच नाही. राष्ट्रसभेच्या ध्येय-धोरणांत राजनैतिक सुसंगतिपेक्षां जी अनेक भावनांची आणि तत्वांची भेसळ झालेली दृष्टीस पडते, ती याच कारणांमुळे. शिवाय, राजकीय पारतंत्र्याच्या जोडीला हिंदुस्थानांत दुर्दैवाने जातीय आणि धार्मिक भेदभावहि जबरदस्त असल्यामुळे, शुद्ध तात्विक राजकीय संघटनेचा मार्ग चालू घटकेला दुष्कर

होऊन बसलेला आहे. हिंदु महासभा, मुस्लिम लीग, दलित पक्ष, शीख समिति हीं हिंदी राजकीय चळवळींत वारंवार कानांवर आदळणारीं नावें हिंदी राजकीय पक्षसंघटना किती जातिविशिष्ट आहे, याची साक्ष देतात. ही स्थिति बदलेल तेव्हा खरें. पण, आज तरी राजकीय वातावरण हें जातीय वादामुळे दूषित होऊन गेलेले आहे, यांत शंका नाही. महायुद्धानंतर जगाच्या राजकारणाला कोणते स्वरूप प्राप्त होतें, त्यांत हिंदुस्थानाची स्थिति किंवा दर्जा काय राहातो व युद्धोत्तर पुनर्घटनेच्या नानाविध प्रयत्नांतून कोणतीं तत्वें निष्पन्न होतात, या गोष्टींचा दूरवर विचार करून आज बंदिवासांत किंवा वनवासांत असलेल्या राष्ट्रसभेच्या नेत्यांना आणि इतरहि पक्षांच्या धुरीणांना सध्याच्या राजकीय कोंडीतून मार्ग काढावा लागेल.

'तरुण भारता 'ला आपल्या भोवतालच्या या धूसर आणि दूषित वातावरणाची पूर्ण जाणीव आहे. देशांतील सर्वांत बलाढ्य राजकीय संस्था जी राष्ट्रसभा, तिची चळवळ बेकायदा ठरलेली असून, तिचे पुढारी बंदिवासांत, वनवासांत किंवा अज्ञातवासांत आयुष्य कंठीत आहेत. इतर जातिविशिष्ट पक्ष हे चढचा सुरांत आपआपल्या राष्ट्रघातकी मागण्यांची तुतारी फुंकण्यांत इतके कांही गर्क आहेत की, ब्रिटिश सरकार त्यांच्यापैकी कोणालाहि न मोजतां राज्यकारभार सुखेनैव हाकीत आहे, याची त्यांना जाणीवहि नाही. देशाच्या भावी उत्कर्षाची सर्व भिस्त ज्या तरुण पिढीवर आहे, ती तरुण पिढी आज अंशत: तुरुंगात, अंशतः रणांगणावर आणि अंशत: निरनिराळ्या युद्धोपयोगी खात्यांत विभागली गेलेली आहे. असें आज देशांतील एकंदर परिस्थितीचें भीषण चित्र आहे. पण, या परिस्थितीने मन खचूं न देतां तिच्यांतून बाहेर पडण्याच्या दृष्टीनें लोकमत तयार करणे आणि त्याला जरूर तर अगदी नवीन वळण लावणें, हें आज राजकीय विचारवंतांचें पहिलें कर्तव्य ठरतें. 'तरुण भारता'ला या कर्तव्याचीहि पूर्ण जाणीव आहे. जुन्या विचारप्रणालि आणि जुन्या पक्षसंघटना यांना महायुद्धानंतरच्या नव्या राजकारणांत स्थान नाही.

इतकेंच नव्हे, तर युद्धानंतर हिंदुस्थानाला जो काय राजकीय दर्जा मिळेल, तो ध्यानांत घेऊनच देशांतील राजकीय पक्षांना आपले धोरण ठरवावें लागणार आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊनच 'तरुण भारत' आपलें कार्य करील.

'तरुण भारत' हें कोणत्याहि प्रचलित राजकीय पक्षाचें मुखपत्र नाही. नरकेसरी स्मारक मंडळाने प्रांताच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन, सध्याच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत, हें दैनिक सुरू केलेलें असून, त्याचें स्वरूप आणि घटना या दोहोंतहि लोकहिताची दृष्टि रहावी, वैयक्तिक किंवा सामुदायिक स्वार्थसाधनाला कोणत्याहि प्रकारचा वाव त्यांत राहूं नये, अशी दक्षता घेतली आहे. अर्थात् 'तरुण भारत' हें निव्वळ एक वृत्तपत्र नसून, नागपूर प्रांतांतील अग्रगण्य झुंजार नेत्याच्या तेजस्वी स्मृतीला वाहिलेली ती एक राजकीय संस्था आहे. या दृष्टीने मध्यप्रांत–वऱ्हाडांतील एकंदर जनतेचा 'तरुण भारता'वर विशेष हक्क आहे आणि 'तरुण भारता'चाहि त्या जनतेवर विशेष हक्क आहे. कै. नरकेसरी बॅ. अभ्यंकर यांनी राजकारणांत कधी जातगोत मानली नाही, धर्मभेद आणले नाहीत, हिंदी-मराठीच्या वादाचा स्पर्श मनाला होऊं दिला नाहीं; तर केवळ देशांतील लढाऊ चळवळीचें पाऊल पुढें पडावें आणि त्यांत आपला प्रांत आघाडीला रहावा, एवढीच फक्त दृष्टि ठेवली. 'तरुण भारता'चें धोरण नरकेसरींच्या या विशाल आणि ओजस्वी परंपरेला धरून राहील, एवढेंच फक्त आज आम्ही म्हणतो.

आज या क्षणी तरी आम्ही वाळूवर उभे आहोंत. पण, नरकेसरींच्या पुण्याईने आणि प्रांतांतील जनतेच्या पाठिंब्यानें त्या वाळूचा खडक बनेल, असा आम्हाला विश्वास वाटतो.

२–१–१९४४

# दुसरें लग्न करण्याची प्रथा अनिष्ट आहे काय ?

बडोद्याचे तरुण सुसंस्कृत अधिपति श्रीमंत प्रतापसिंहमहाराज गायकवाड यांनी पीठापुरमच्या राजकन्येशीं द्वितीय विवाह केल्याची बातमी 'तरुण भारता'च्या कालच्या अंकांत प्रसिद्ध झाली आहे. मुंबईच्या एका दैनिकाने या विवाहाचें वर्णन 'फडकीय' या विशेषणाने केलेलें आहे. जणुं कांहीं, पहिली बायको जिवंत असतां दुसरें लग्न करण्याची पातकी प्रथा फक्त साहित्यिकांनीच पाडली आहे आणि तीहि गेल्या पांच सहा वर्षांत ! पण, वस्तुस्थिति अशी आहे कीं, पहिली पत्नी विद्यमान असतांना दुसरें लग्न करण्याची प्रथा हिंदुस्थानांत अत्यंत पुरातन असून, आजहि कांही पांढरपेशा जाति सोडल्यास इतर सर्व जातींत अनेकपत्नीत्व सर्रास चालू आहे. रघुवंशाच्या पहिल्या सर्गांत कविकुलगुरूनें दिलीपाच्या जनानखान्याचा उल्लेख करून असें म्हटलेलें आहे कीं,—

तया मेने मनस्विन्या लक्ष्म्याच वसुधाधिपः
कलत्रवंतमात्मानं अवरोधे महत्यपि ।

" दिलीपाचा जनानखाना फार मोठा असतांहि तो राजर्षि आपली पट्टराणी सुदक्षिणा आणि राजलक्ष्मी या दोहोंनाच फक्त आपल्या भार्या समजत असे ! " शाकुंतलांतहि दुष्यंताचा जनानखाना भला मोठा आहे हें लक्षांत घेऊन कविकुलगुरूनें आपली मुग्ध नायिका जी शकुंतला, तिला, "आपल्या सवतींशीं सख्य ठेव–कुरु प्रियसखीवृत्ति सपत्नीजने," असा सोज्वळ सल्ला देवबिला आहे. दशरथाला चार मुख्य राण्या व शिवाय इतर उपपत्न्या होत्या, हें प्रसिद्धच आहे. अलीकडे रा. ब. भास्करराव जाधव यांनी एकपत्नीव्रती म्हणून गाजलेल्या रामालाहि

उपपत्नी होत्या, असा शोध लावलेला आहे ! अर्थात् राजामहाराजांनी काय किंवा सामान्य जनांनी काय अनेक बायका एका वेळीं करण्याची प्रथा ही पुरातन नाही काय ?

म्हणूनच ज्ञानकोशकार कै. डॉ. केतकर हे नेहमी म्हणत असत कीं, "एकपत्नीत्व हें ख्रिस्ती नीतीच्या दडपणामुळें आपल्याकडे आलेले एक खूळ आहे. राज्यकर्त्यांच्या ख्रिस्ती धर्माच्या नादी लागलेल्या पहिल्या पिढींतील सुधारकांना ज्याप्रमाणें हिंदु धर्मांतील देवदेवतांच्या अनेकत्वाची लाज वाटून त्यांनी एकेश्वरी मताचा पुरस्कार केला, त्याप्रमाणे त्यांना अनेकपत्नीत्वाची लाज वाटून त्यांनीं एकपत्नीव्रताचें ढोलगें पिटावयाला सुरवात केली !" ज्ञानकोशकारांची ही टीका रास्त असो वा नसो, एवढी गोष्ट मात्र खरी की, ख्रिस्ती धर्माने एकपत्नीव्रताची सक्ती केल्यामुळें ख्रिस्ती समाजांत प्रच्छन्न व्यभिचार फार बोकाळला. याचें अगदी नमुनेदार उदाहरण द्यावयाचें झालें, तर तें इंग्लंडच्या राजांचें देतां येईल. आठव्या हेन्रीने एकामागून एक आठ लग्नें केली. तीं करण्यासाठीं त्याने कॅथलिक धर्माविरुद्ध बंड पुकारलें; आपल्या नावडत्या राण्यांना व्यभिचारी ठरवून टाकल्या किंवा सुळावर दिल्या; व अनीतीचें कोणतेंहि कृत्य करावयाचें शिल्लक ठेवलें नाहीं. त्यानंतरच्या इंग्लंडच्या राजांनी जरी इतके अनन्वित प्रकार केले नाहींत, तरी तिसऱ्या आणि चवथ्या जॉर्जच्या रखेल्यांनी इंग्लंडच्या राजदरबारांत घातलेला धुमाकूळ प्रसिद्धच आहे. फार कशाला ? आपले परमपूज्य सातवे एडवर्ड बादशहा यांचा रंगेलपणा, त्यांचे पॅरिसमधील इष्काचे रंगढंग, त्या वेळची नामांकित कादंबरीलेखिका मेरी कॉरेली हिच्याशीं असलेलें त्यांचें रहस्य हे सारे बोधप्रद प्रकार कोणाला माहित नाहींत ? यूरोपांत जणु असा अलिखित संकेतच दिसतो कीं, माणसाने दुसरें लग्न करूं नये; —चोरून व्यभिचार करावा किंवा रखेल्या ठेवाव्यात ! अगदीं अलिकडे रुमानियाचा राजा कॅरोल आणि त्याची स्वरूपसुंदर रखेली मादाम लापेस्क्यु यांनी चालू महायुद्धाच्या धामधुमींत यूरोपांत घातलेला गोंधळ लोकांच्या स्मरणांत ताजाच आहे.

ख्रिस्ती नीतींतील एकपत्नीव्रताच्या बडेजावामुळें युरोपांतील विशेषत: बड्या लोकांत चालणारे अनैतिक प्रकार पाहिले, म्हणजे हिंदु किंवा मुसलमान धर्मांतलें अनेकपत्नीत्व श्रेयस्कर म्हणावें लागतें. याचा अर्थ, पहिली बायको जिवंत असतांना दुसरें लग्न करण्याच्या प्रथेचा मी पुरस्कार करतों, असा मात्र कोणी समजूं नये. मला फक्त एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, बेकायदेशीर विवाहबाह्य संबंधांमुळें विशेषत: स्त्रीचें होणारें नुकसान लक्षात घेतलें असतां, व्यभिचारापेक्षा द्वितीय विवाह हाच केव्हांहि इष्ट ठरतो. पुरुष हा जात्याच बहुस्त्रीक आहे, असें शास्त्रज्ञांचें मत आहे. त्यांचें म्हणणे असें आहे कीं, " निसर्गाने स्त्रीवर गर्भधारणा आणि अपत्यसंगोपन यांची जबाबदारी टाकून तिला एका वेळीं अनेक पुरुषांशीं संबंध ठेवणें अशक्य केलेलें आहे. तशा प्रकारचे संबंध ठेवणे तिला आरोग्यदृष्ट्या घातक होतें. " शास्त्रज्ञांचें हें प्रमेय जरी विवाद्य म्हणून सोडून दिलें, तरी एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, अनेक बायका करण्याच्या पुरुषांच्या प्रवृत्तीकडे स्त्रीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. हिंदुस्थानातील हिंदु किंवा मुसलमान समाजांतले बहुतेक सगळ्या खालच्या जातींचे लोक हे आर्थिक दृष्टया अनेक लग्नें करणारे आहेत. शेतकरी, कोष्टी वगैरे श्रमजीवी वर्गांत घरांतल्या संसारकरू बायकोच्या जोडीला बाहेर शेतांत किंवा मागावर काम करणारी दुसरी बायको आणणें, ही केवळ एक आर्थिक बाब किंवा सोय समजली जाते. तिचा पुरुषाच्या बहुस्त्रीकत्वापेक्षां आर्थिक जीवनाशी अधिक संबंध दिसतो.

पण, पहिली बायको जिवंत असतांना दुसरी बायको करण्याच्या प्रथेच्या इष्टानिष्ट बाजू अशा रीतीनें दर्शविल्यावर मला हें स्पष्ट सांगावेसें वाटतें की, गृहसौख्याच्या दृष्टीने अनेकपत्नीत्व हें एकंदरींत अनिष्टच ठरेल. पुराणांतील दाखला द्यावयाचा झाला, तर कौसल्या आणि कैकेयी यांच्यांतील सापत्नभावामुळे रामाला भोगावा लागलेला वनवास आणि दशरथाला आलेला अपमृत्यु हें एकच उदाहरण पुरेसे म्हणता येईल. " कुरु प्रियसखीवृत्ति सपत्नीजने " हा वृद्ध कण्वऋषीनीं शकुंतलेला

सासरी जातांना केलेला उपदेश मोठा सोज्वळ असला, तरी आचरणाला किती अशक्य होता, हें कालिदासाच्याच नाटकांतील सवतींच्या भांडणावरून दाखवतां येईल. तेव्हा गृहसौख्याच्या आणि संसार-स्वास्थ्याच्या दृष्टीने एकपत्नीत्व हेंच केव्हांहि आदर्श ठरतें. मग तो आदर्श आचरणाला कितीहि कठीण असो.

—**मुक्तमति**, ६-१-१९४४

# वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याची फोल बढाई

कलकत्ता येथे ता. ११ जानेवारी रोजीं एक लष्करी गणवेषांतील वृत्तपत्र प्रसिद्ध झालें आहे. तें कोणते म्हणाल, तर 'सिआक !' 'सिआक' म्हणजे 'साऊथ ईस्ट एशिया कमांड' – 'आग्नेय आशियांतील लष्करी हुकमतीचें केंद्र.' हें पत्र दररोज प्रसिद्ध व्हावयाचें असून, त्या कमांडचे प्रमुख लॉर्ड लुई माउंटबॅटन हे त्याचे प्रवर्तक दिसतात. या लष्करी दैनिकाचें जातक वर्तवितांना लॉर्ड लुई यांनी अशी बढाई मारलेली आहे की, "बातमी सरळपणाने आणि प्रामाणिकपणाने देणाऱ्या व आपली मतें धैर्याने आणि आवेशाने व्यक्त करणाऱ्या स्वतंत्र आणि अनियंत्रित वृत्तसंस्थेइतकें, ज्या उदात्त ध्येयांसाठी आज आपण लढतों आहोंत, त्यांचें दुसरें प्रतीक नाही !" हिंदुस्थानाच्या दक्षिण टोकाला म्हणजे मद्रास येथे 'क्रॉनिकल'चे संपादक श्री. ब्रेल्वी हे, अ. भा. संपादक परिषदेचे अध्यक्ष या नात्याने, हिंदी वर्तमानपत्रांच्या तोंडांत नाना प्रकारच्या नियंत्रणांचे कांटेलगाम, महायुद्धाचें निमित्त करून, ब्रिटिश सरकारने घातल्याबद्दल त्याचा धिक्कार करीत असतां, लॉर्ड लुई यांनी हिंदुस्थानाच्या पूर्व टोकाला असलेल्या कलकत्ता शहरीं वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याला दोस्त राष्ट्रांच्या युद्धहेतूचें प्रतीक म्हणावें, यापरती दुसरी उपरोधिक घटना कोणती असूं शकेल ? इंग्रजींत अशी एक ग्राम्य म्हण आहे की, अंगांत लष्करी गणवेष चढविल्यावर, दारू न झोकतांच, मनुष्य

नशा चढून वल्गना करूं लागतो ! लॉर्ड लुई यांनी 'स्वतंत्र आणि अनियंत्रित' वृत्तपत्रांच्या महतीबद्दल जी बढाई या सरकारी दैनिकाच्या पहिल्याच अंकात मारलेली आहे, ती वाचून आम्हाला तरी या इंग्रजी म्हणीची आठवण झाली.

खाकी वेषांतील जें हें दैनिक कलकत्ता येथे लॉर्ड लुई यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यांत आलेलें आहे, त्याचें स्वागत हिंदी वर्तमानपत्रें निदान एका कारणास्तव तरी खास करतील. तें कारण असें कीं, युद्धविषयक बातम्यांच्या प्रकाशनाच्या बाबतींत त्यांची स्वतःची जी मुस्कुटदाबी हिंदुस्थान सरकारने नाना परींनी केली आहे, तिची हुकमत या पत्रावर चालणार नसल्यामुळें, निदान या दैनिकांतून तरी लष्करी हालचालींचा खरा प्रामाणिक वृत्तांत लोकांना वाचावयाला मिळेल. त्याच्या या पहिल्या अंकातच एक बातमी, अगदी अपूर्वाईची म्हणून, मुख्य प्रधान श्री. चर्चिल यांच्या संदेशाच्या रूपानें देण्यांत आलेली आहे. ती अशी की, आसामच्या सरहद्दीवर जी हिंदी फौज जपानविरुद्ध लढत आहे, ती चौदावी पलटण होय ! या निनावी पलटणीच्या पराक्रमाच्या अद्भुत कथा जरी सरकारी पत्रकांतून नित्य वाचावयाला मिळत असत, तरी तिचें नांव मात्र लोकांना आजपर्यंत माहित नव्हतें. तें तिच्या तोंडावरील बुरखा बाजूला सारून जाहीर केल्याबद्दल चर्चिलसाहेबांना जितके धन्यवाद द्यावेत तितके थोडेच होतील ! अशा तऱ्हेचा लोकांत उत्साह आणि उत्कंठा वाढविणारा गौप्यस्फोट जर या दैनिकांतून होणार असेल, तर तें हिंदुस्थानांतील कोणत्याहि वर्तमानपत्रापेक्षां लोकप्रिय झाल्याशिवाय राहाणार नाही ! लष्करी वर्तमानपत्रांची प्रथा यूरोपांत नेपोलियनच्या काळाइतकी जुनी आहे; व त्या प्रथेची खरी उपयुक्तता 'युद्धवार्ता' किंवा 'युद्धसमाचार' या नांवाचीं जी शेंकडों सरकारी वृत्तपत्रें आज हिंदुस्थानांत निघत आहेत, तीं वाचून कधीहि येणार नाही. नेपोलियन लढाईवर असतांना त्याच्या लष्करी वर्तमानपत्राचे जे अंक निघत, त्यांत फ्रेंच सैनिक आणि जनता यांच्यांत युद्धोत्साह उत्पन्न करणारे त्याचे स्वतःचे लेख येत; व त्याची लेखणी ही त्याच्या तरवारीइतकीच

प्रभावी असल्यामुळें तिची तळपहि विजेप्रमाणें लोकांना दिपवीत आणि स्फुरवीत असे.

पण, लढाई सुरू झाल्यापासून लोकांना अधिकृत युद्धसमाचाराचा पुरवठा करण्यासाठी गावगन्ना जीं सचित्र आणि विचित्र वर्तमानपत्रें त्या त्या ठिकाणच्या रावबहादुरांच्या किंवा खानबहादुरांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यांत आलेलीं आहेत, त्यांचे ठोकळेबाज स्वरूप पाहिल्यावर, लोकांनीं स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन करांच्या रूपाने दिलेल्या पैशाचा सरकारने, अगदीं सोज्वळ हेतूने कां होईना, असा अपव्यय करावा, याबद्दल कोणाला खेद होणार नाही ? ब्रिटिश सरकारनें युद्धहेतूंच्या बाबतींत केलेली पद्धतशीर उडवाउडव मनांत सारखी डाचत असतांहि हिंदी वर्तमानपत्रांनी एकमुखानें सरकारच्या युद्धप्रयत्नांना पाठिंबा देण्याचें ठरविलें; व सरकार आणि राष्ट्रसभा यांच्यांत खटका उडून देशांतील राष्ट्रीय चळवळ ही दडपून टाकली गेल्यानंतरहि वृत्तपत्रांनी, आपला सगळा मनःक्षोभ गिळून, सरकारशी शक्य तितकें जुळतें घेण्याचें धोरण कायम ठेवलें आहे. अशा स्थितींत सरकारला वेगळी वर्तमानपत्रें काढण्याची खरोखरी काय गरज होती ? सरकारी ' युद्धसमाचारां 'तून म्हणा किंवा ' युद्धवार्ता 'तून म्हणा ज्या शिळ्या आणि पाल्हाळिक बातम्या येत असतात, त्या वाचून लोकांत युद्धोत्साह उत्पन्न होईल, असें सरकारला खरोखरीच वाटतें काय ? मग या भाडोत्री वर्तमानपत्रांचा उपयोग काय ? विशेषतः, सरकारचीं प्रांतिक आणि मध्यवर्ती प्रकाशन खातीं हीं युद्धविषयक पत्रकांची पैदास, कागदाच्या भयंकर महागाईच्या या काळांतहि, प्रत्यहीं हजारोंनी निरनिराळ्या भाषांतून करित असतां, ही वर्तमानपत्रें काढण्याची आणि चालविण्याची काय गरज होती ? स्वतःचीं ही स्वतंत्र वर्तमानपत्रें काढून सरकारनें फक्त हिंदी राष्ट्रीय वृत्तपत्रांविषयीच्या आपल्या अविश्वासाचें प्रदर्शन केलें, एवढेंच !

सरकारचा हा अविश्वास आणि त्यामुळें त्याने वृत्तपत्रांवर घातलेले नाना प्रकारचे निर्बंध लक्षांत घेतां, लॉर्ड लुई माउंटबॅटन यांनी

' वृत्तपत्रांचें स्वातंत्र्य हें मित्र राष्ट्रांच्या युद्धहेतूंचें प्रतीक ' असल्याची जी बढाई मारलेली आहे, ती कोणाला खरी वाटेल ? लष्करी बातम्यांवरील कडक नियंत्रण जरी सोडून दिलें, तरी तुरुंगांत एकादा राजबंदी आजारी पडला असल्याची किंवा राजबंदींना वाईट रीतीनें वागविलें जात असल्याची सामान्य तक्रार जरी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली, तरी सरकार जें एकदम त्याचें नरडें धरावयाला आज धावतें, तें काय वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याविषयींच्या त्याच्या प्रेमाचें निदर्शक आहे ? म्हणूनच संपादक परिषदेचे अध्यक्ष श्री. ब्रेल्वी यांनी मद्रास येथे ता. १० रोजीं केलेल्या भाषणांत सरकारला असा रास्त इषारा दिलेला आहे की, " केवळ लष्करी कारणांमुळें आवश्यक असलेले निर्बंध सोडले, तर देशांतील राजकीय परिस्थिति आज इतकी कांही निवळलेली आहे की, वृत्तपत्रांवर कोणताहि निर्बंध ठेवण्याचें आता कारण नाही. इतकेंच नव्हे, तर राजबंदींना मिळणारी निर्घृण वागवणूक व अशाच प्रकारचीं लोकांची इतर गाऱ्हाणी चव्हाठ्यावर आणण्यासाठी तरी आता देशी वृत्तपत्रांना अनिर्बंध स्वातंत्र्य देणें अवश्य आहे. " लॉर्ड माउंटबॅटन यांनी ' सीआक ' च्या पहिल्या अंकात म्हटल्याप्रमाणें वृत्तपत्रांचें स्वातंत्र्य हें जर खरोखरीच दोस्तांच्या उदात्त युद्धहेतूंचें प्रतीक असेल, तर हिंदुस्थान सरकारनें वृत्तपत्रांवर घातलेले जुलमी निर्बंध आता कां रद्द करूं नयेत ?

१३-१-४४

# २६ जानेवारी

१९३० सालीं लाहोर येथें रावी नदीच्या तीरावर राष्ट्रसभेच्या ध्वजाला साक्ष ठेवून हिंदी जनतेने संपूर्ण स्वातंत्र्याची जी घोषणा केली, तिच्या संस्मरणाचा आजचा दिवस आहे. फर्मानशाहीच्या या काळांतहि, सौ. सरोजिनी नायडू यांनी आपल्या ओजस्वी संदेशांत म्हटल्याप्रमाणें,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम
क्रमांक
नों दि


हिंदुस्थानातील दलित जनता हा दिवस निष्ठेने आणि धैर्याने पाळील, याबद्दल आम्हाला शंका नाही. पण, हा दिवस जसजसा जवळ येऊं लागला, तसतसें सरकारने कारण नसतां जें कडकलक्ष्मीचें थैमान सुरू केलेलें आहे, तें मात्र अगदी निरर्थक आणि विसंगत वाटते. राष्ट्रसभेची चळवळ ही सरकारनें बेकायदा ठरवल्यापासून गेल्या दीड वर्षांत हिंदुस्थानातील राष्ट्रीय जीवन मरगळल्यासारखे झालेलें असून, दुष्काळानें आणि महागाईनें गांजलेला बहुजनसमाज भीतीने आतल्या आत पिचत आणि कुढत आहे. अशा स्थितींत, सरकारने कुठे तरुण कार्यकर्त्यांना अटक करून, कुठे सभाबंदीचा हुकूम जारी करून, तर कुठे स्वातंत्र्यदिन आम्ही कोणत्याहि स्वरूपांत पाळूं देणार नाही असें जाहीर करून, जनतेच्या भावनांची पायमल्ली करण्यांत काय मिळवलें ? आज ठिकठिकाणी स्वातंत्र्यदिनानिमित्त सभा झाल्या असत्या, मिरवणुकी निघाल्या असत्या किंवा ध्वजवंदनाचे मूक समारंभ झाले असते, तर ब्रिटिश साम्राज्याची प्रतिष्ठा त्यामुळे ढासळली असती काय ?

किंबहुना, सद्यःस्थितींत सरकारने ज्या पद्धतीने स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवाला मनाई केलेली आहे, ती पद्धत लक्षांत घेतां, त्यांनी आपल्या स्वतःच्या हातांनी केवळ ब्रिटिश साम्राज्याच्याच नव्हे, तर मित्र राष्ट्रांच्याहि प्रतिष्ठेला नाट लावला आहे, असें म्हटल्याशिवाय रहावत नाही. कारण, अमेरिकेचे अध्यक्ष श्री. रूझवेल्ट यांनी दोन वर्षांपूर्वी प्रथम अटलांटिक सनदेच्या रूपाने आणि नंतर पंधरा दिवसांपूर्वी मूलभूत हक्कांच्या कराराच्या रूपाने जी चतुर्विध स्वातंत्र्याची घोषणा केली, त्या घोषणेला या दडपशाहीने हरताळ फासला गेलेला नाही काय ? रूझवेल्टसाहेबांच्या चतुर्विध स्वातंत्र्याच्या घोषणेतील एक कलम 'भीतिपासून मुक्तता' हें आहे. पण, आज हिंदुस्थानातील जनतेला इतर स्वातंत्र्य तर राहोच, पण भीतिपासून मुक्त होण्याचें, निर्भयतेने आपले खाजगी आणि सार्वजनिक व्यवहार करण्याचें मूलभूत स्वातंत्र्यहि उरलेलें नाही, याची वाट काय ? स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवाला प्रतिबंध करणारे जे नाना प्रकारचे हुकूम

प्रांताप्रांतातून गेल्या आठवड्यांत निघालेले आहेत, ते हुकूम लोकांची भीति वाढवतील की कमी करतील ? तेव्हा, सरकारने स्वातंत्र्य-दिनाच्या निमित्ताने गेल्या आठवड्यांत जे दडपादडपीचें सत्र एकदम सुरू केलें, तें युद्धहेतूंच्या म्हणजे अटलांटिक सनद आणि मूलभूत हक्कांचा करार या दोन्ही युद्धजन्य घोषणांच्या दृष्टीनें निरर्थक आणि विसंगत नाही काय ? आता, हिंदी राष्ट्राची स्वातंत्र्याची प्रतिज्ञा ही श्री. रूझवेल्ट यांच्या चतुर्विध स्वातंत्र्याच्या सनदेच्या चौकटींत न बसण्याइतकी निरर्गल आहे, असें जर हिंदुस्थान सरकारचें म्हणणे असेल, तर मात्र गोष्ट निराळी !

हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाच्या विकासाचा गेल्या चाळीस वर्षांचा इतिहास इतका उज्ज्वल पण भीषण आहे की, त्या इतिहासांत या आठवड्यांतील दडपशाहीचें पान हें खास शोभून जाईल ! आज स्वातंत्र्य–पूर्ण स्वातंत्र्य–हा शब्द ज्याच्या त्याच्या तोंडीं खेळतो आहे. इतकेंच नव्हे, तर दीड वर्षांपूर्वीं ब्रिटिश सरकारतर्फे हिंदी पुढाऱ्यांशी शिष्टाई करावयाला आलेले मध्यस्थ सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांच्याहि तोंडून त्या शब्दाचा उच्चार होऊन गेल्यामुळे त्या शब्दाला आता बादशाही मान्यता लाभलेली आहे. पण, विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत, म्हणजे बंगालच्या फाळणीची चळवळ सुरू झाल्यावर, १९०५–६ सालीं ज्यांनी 'स्वातंत्र्य' हा शब्द प्रथम उच्चारला, त्यांपैकीं काहींना जन्मठेप काळे पाणी पाहावें लागलें, हें विसरून चालणार नाही. वसाहतीचें स्वराज्य, स्वातंत्र्य आणि पूर्ण स्वातंत्र्य हे हिंदी राजकारणांतील तीन अतिपरिचित शब्द हिंदुस्थानातील राजनैतिक विचारक्रांतीचे तीन टप्पे दर्शवितात; व यांपैकी प्रत्येक टप्पा गांठतांना त्या त्या काळांतल्या हिंदी पुढाऱ्यांना स्वतःचें सर्वस्व पणाला लावावें लागलेलें आहे. 'वसाहतीचें स्वराज्य' म्हणजे 'कलोनियल सेल्फगव्हर्मेंट' हे हिंदी राष्ट्राचें ध्येय असल्याची घोषणा जेव्हा कै. ना. गो. कृ. गोखले यांनी काशीक्षेत्री भरलेल्या राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदावरून १९०५ सालीं केली, तेव्हा हा नेमस्त म्हणून गाजलेला पुण्याचा मिठ्ठास बोलणारा

मराठा मुत्सद्दी अखेर आपल्या जातिगुणावर गेला, असे उद्‌गार सर व्हॅलेंटाईन चिरोल प्रभृतींनी जळफळत काढले. पण, कै. ना. गोखले यांनी जे हें ध्येय आपल्या मृदुमधुर वाणीने काशीक्षेत्रीं घोषित केलें, तें प. वा. दादाभाई नौरोजी यांनी पुढल्याच वर्षी कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रसभेंत आपल्या अध्यक्षीय चतुःसूत्रीत ग्रथित करून त्याला उदयोन्मुख हिंदी राष्ट्राच्या अधिकृत ध्येयाची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

अशा रीतीनें वसाहतीच्या स्वराज्याला राष्ट्रसभेच्या ध्येयप्रणालींत आणि कार्यक्रमांत ज्या क्षणी स्थान मिळालें, त्या क्षणापासूनच ब्रिटिश नोकरशाहीने तें ध्येय हाणून पाडण्यासाठी चंग बांधला. सुरतेला झालेला जहाल-मवाळांचा समरप्रसंग, त्यानंतर लगेच लो. टिळक आणि शि. म. परांजपे यांना झालेल्या कडक शिक्षा, सावरकरबंधूंच्या कपाळी ऐन तारुण्यांत आलेलें काळ पाणी, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, सरदार अजितसिंह आणि अरविंद घोष यांच्यावर आलेले हद्दपारीचे आणि देशोधडीला लागण्याचे प्रसंग ! ---या सगळ्या एकाहून एक रोमांचकारी घटनांचें देदीप्यमान प्रभावलय स्वातंत्र्याच्या ऊर्जस्वल अत्युग्र ध्येयाभोवती त्या वेळी तळपत होतें; व सूर्याचें दर्शन घेण्याची अतीव उत्कंठा असावी, पण त्याच्याकडे पाहाणे जसे मानवी चर्मचक्षूंना शक्य होऊं नये, तशी अवस्था स्वातंत्र्याच्या ध्येयाच्या बाबतींत दलित हिंदी जनतेची झालेली होती. १९१४ सालीं टिळक तुरुंगांतून सुटून आल्या-नंतर लगेच महायुद्ध सुरू झालें; व उदात्त युद्धहेतूंच्या भडक जाहिराती रणदुदुंभींच्या निनादांत फडकूं लागल्या. टिळकांनी या संधीचा फायदा घेतला आणि स्वातंत्र्याचें जें ध्येय भीतिग्रस्त जनतेच्या हृदयांत खोल जाऊन दडलेलें होतें, त्याला आवाहन देऊन स्वराज्याच्या लढाऊ चळ-वळीचा बीजमंत्र बहुजनसमाजाला दिला. टिळकांच्या एकसष्टाव्या वाढ-दिवशी त्यांच्यावर बजावलेली जबर जमानतीची नोटीस हें त्या नव्या चळवळीला नोकरशाहीने दिलेलें आव्हान होतें. पण तें आव्हान टिळकांनी

स्वीकारलें आणि आपल्या डोळ्यांदेखत स्वराज्याच्या चळवळीची परिसीमा झालेली पाहिली. आजच्या प्रसंगीं स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेचा जेव्हा जेव्हा आणि जिथे जिथे उद्घोष केला जाईल, तेव्हा तेव्हा आणि तिथे तिथे स्वातंत्र्याच्या ध्येयविकासाचा हा स्फूर्तिदायक इतिहास आणि त्या ध्येयाचे हे धीरोदात्त द्रष्टे या दोहोंचेहि स्मरण तरुण पिढीनें कृतज्ञताबुद्धीने केलें पाहिजे. महाराष्ट्रांत बाळ गंगाधर टिळक, शिवराम महादेव परांजपे, विनायक दामोदर सावरकर आणि गणेश दामोदर सावरकर, बंगालमध्ये बिपिनचंद्र पाल आणि अरविंद घोष व पंजाबांत सरदार अजितसिंह आणि लाला लाजपतराय यांनी जी स्वातंत्र्याची ज्योत आपलें सर्वस्व इरेला घालून लावली, तिच्याच उत्तरोत्तर उज्ज्वल होत गेलेल्या प्रकाशांत आपण आज ध्येयसिद्धीचा खडतर मार्ग आक्रमीत आहोंत, हें नवीन पिढीनें कृतज्ञतेनें स्मरलें पाहिजे.

त्या महाभागांनी पुरस्कारिलेल्या या स्वातंत्र्याच्या ध्येयाला जागतिक प्रतिष्ठा जर कोणी मिळवून दिली असेल, तर ती म. गांधी आणि पं. जवाहरलाल नेहरू यांनी होय. हिंदुस्थानाचें दास्यमोचन म्हणजेच पूर्ण स्वातंत्र्य हा केवळ राष्ट्रीय प्रश्न नसून, अखिल जगाचें भवितव्य—म्हणजेच जगांतील सर्व दलित राष्ट्रांचे दास्यमोचन—त्याच्या स्वातंत्र्यावर अवलंबून आहे, ही जी अत्यंत विशाल,—एका अर्थाने जगड्व्याळ,—पण अतिशय वास्तविक भूमिका गांधी–नेहरूंनी हिंदी स्वातंत्र्याच्या ध्येयाला प्राप्त करून दिली आणि जागतिक राजकारणाच्या व्यासपीठावर तें ध्येय धडाडीने उभे केलें, त्यामुळेच आज त्या ध्येयाला सरळ विरोध करणे ब्रिटिश साम्राज्यशाहीला अशक्य झालेलें आहे. १९३० सालीं लाहोरच्या राष्ट्रसभेंत संपूर्ण स्वातंत्र्याची निस्संदिग्ध घोषणा करण्यापूर्वी महात्माजींनी वसाहतीचें स्वराज्य आणि स्वातंत्र्य या दोन्ही ध्येयांकडे पाहाण्याचा आपला दृष्टिकोन विशद करतांना असें स्पष्ट म्हटलेलें होतें कीं, " ब्रिटिश साम्राज्यांत राहाण्याचेंच जर आम्ही ठरवलें, तर जगांत शांतता आणि सदिच्छा यांचा प्रसार करण्यासाठीच त्या साम्राज्यसत्तेचे भागिदार म्हणून आम्ही राहूं; —ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पिळणुकीच्या

ब्रीदाला हातभार लावण्यासाठी नव्हे. " ( If I choose to remain in the Empire, it is to make a partnership of power for promoting peace and goodwill in the world,—never to promote exploitation or what is known as Britain's imperialistic creed. ) ब्रिटिश साम्राज्याविषयीचें आपले सात्विक धोरण महात्माजींनी इतक्या ऋजुतेने व्यक्त केल्यामुळेच सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांना साम्राज्यातून इच्छेस येईल तेव्हा बाहेर पडण्याच्या हक्काला म्हणजे पर्यायाने राष्ट्रसभेच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या घोषणेला मान्यता द्यावी लागली ! व पंचवीस वर्षांपूर्वी जें स्वातंत्र्याचे ध्येय उच्चारून दाखविणेसुद्धा बेकायदा ठरलेलें होतें, तें ब्रिटिश सरकारच्या श्वेतपत्रिकेंत अखेर समाविष्ट झाले ! ! ब्रिटिश साम्राज्यशाहीच्याच केवळ नव्हे, तर जगाच्या राजकारणांत ज्या स्वातंत्र्याच्या ध्येयाला अशा रीतीने अविचल प्रतिष्ठा मिळालेली आहे, तें ध्येय दडपून टाकावयाला आता जगातली कोणती शक्ति समर्थ होणार आहे ?

२६–१–४४

# बडोद्याच्या महाराजांचा कायदेभंग

बडोद्याचे तरुण अधिपति श्रीमंत प्रतापसिंहमहाराज गायकवाड यांच्या दुसऱ्या लग्नामुळे उठलेले वादळ जरी सध्या थोडे शमल्यासारखे दिसत असलें, तरी पुढल्या आठवड्यांत तें पुन्हा घोंघावूं लागण्याचा संभव आहे. कारण, मुंबईच्या हिंदु सभेचे एक प्रमुख कार्यकर्ते श्रीमान् गोविंदलाल शिवलाल मोतीलाल यांनीं दिल्लीच्या कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये, बडोद्याच्या महाराजांनी आपल्या स्वतःच्या राज्यांतील एकपत्नीव्रताचा कायदा मोडलेला असल्यामुळे त्यांचे राज्याधिकार काढून घेण्यात यावेत, अशी शिफारस हिंदुस्थान सरकारला करणारा ठराव आणला आहे. या ठरावाला कौन्सिल ऑफ स्टेटच्या बिनसरकारी

कार्यक्रमांत पांचवें स्थान मिळालेलें असून, बहुधा ता. १६ फेब्रुवारी रोजीं तो चर्चेला येईल, असें वाटतें. अशा रीतीने बडोद्याच्या महाराजांच्या दुसऱ्या लग्नाचें जें प्रकरण आजवर वर्तमानपत्रांच्या चावडीवर गाजत आणि गरजत होते, तें आता पुढल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारच्या राजधानींतील प्रतिष्ठितांच्या सभागृहांत न्यायनिवाड्यासाठी चर्चेला निघणार आहे. त्या वेळी या प्रकरणावरील टीका-टवाळीला पुन्हा ऊत आल्याशिवाय राहाणार नाही, हें निश्चित.

बडोद्याच्या महाराजांच्या लग्नासंबंधी जो हा ठराव श्रीमान् गोविंदलाल शिवलाल यांनी कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये आणण्याचें ठरविलें आहे, त्याला त्या वरिष्ठ कायदेमंडळाच्या विद्वान् अध्यक्षांनी परवानगी कशी दिली, हें आम्हाला समजत नाही. कारण आज जी मध्यवर्ती राज्यघटना हिंदुस्थानांत प्रचलित आहे, त्या घटनेनुसार हिंदी संस्थानें ही हिंदुस्थानांतील ब्रिटिश मुलुखांत मोडत नसून, त्या संस्थानांच्या अधिपतींचें वर्तन किंवा त्यांचा अंतर्गत कारभार यांची चर्चा करण्याचा अधिकार ब्रिटिश मुलखांतील हिंदी कायदेमंडळांना नाही. हिंदी राज्यघटनेंत हिंदी हिंदुस्थान आणि ब्रिटिश हिंदुस्थान असे दोन स्पष्ट विभाग केलेले असून, त्यांपैकी हिंदी हिंदुस्थान म्हणजे संस्थानें हीं घटनेप्रमाणे परराष्ट्रें समजलीं जातात. म्हणूनच मध्यवर्ती हिंदी कायदेमंडळाच्या कामकाजासंबंधीच्या नियमावलींत संस्थानिकांचें वर्तन आणि संस्थानांचा अंतर्गत कारभार यांची चर्चा करावयाला मनाई करणारे प्रतिबंधक नियम घातलेले आहेत. कौन्सिल ऑफ स्टेटच्या कामकाजाच्या नियमावलींतील तेविसाव्या नियमाच्या एका पोट कलमांत असें स्पष्ट म्हटलेले आहे की, "ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थान सरकार यांच्या संस्थानिकांशीं असलेल्या संबंधाविषयी किंवा संस्थानिक आणि त्यांचे कारभारी यांच्या प्रकरणाविषयी ठराव आणता येणार नाही." ( No resolution shall be moved affecting relations of the foregoing authorities (H. M. G. or G. G. in C. ) with any Prince or Chief under suzerinty

of his Majesty or relating to affairs of such Prince or Chief or administartor of a territory of any such Prince or Chief.) इतका व्यापक आणि निस्संदिग्ध निर्बंध कौन्सिल ऑफ स्टेटच्या नियमावलींत घातलेला असतांना त्याच्या अध्यक्षांनी श्रीमान् गोविंदलाल शिवलाल यांच्या ठरावाला परवानगी कशी दिली?

अर्थात् श्रीमान् गोविंदलाल शिवलाल यांचा हा ठराव गैरसनदशीर आहे, हे उघड आहे. पण एवढ्यानेच भागत नाही. हा ठराव जसा गैरसनदशीर म्हणजे बेकायदा तसाच अप्रस्तुतहि आहे. बडोद्याच्या महाराजांनी दुसरें लग्न आणि तेंहि पीठापुरमच्या राजकन्येसारख्या ख्यातचरित्र स्त्रीशी केलें, ही गोष्ट केवळ नैतिक दृष्टयाच नव्हे, तर राजकीय दृष्टयाहि गैर केली, असें आमचें स्पष्ट मत आहे. हिंदु धर्माने विशेषतः क्षत्रियांना आणि त्यांतहि राजन्यांना 'सन्तानार्थाय' अनेक लग्नें करून बहुप्रज होण्याचा हक्क बहाल केलेला आहे, ही गोष्ट खरी. पण, आपल्या आदरणीय पितामहांनी जो एकपत्नीत्वाचा कायदा, स्त्रीदाक्षिण्याच्या, सुसंस्कृतीच्या आणि न्यायबुद्धीच्या अभिमानाने बडोदे संस्थानांत जारी केला आणि ज्या कायद्याला आपण स्वतः गादीवर आल्यावर संमति दिली, तो कायदा मोडून दुसरें लग्न करण्यांत महाराजांच्या हातून प्रमाद झाला, यांत शंकाच नाही. कारण, या त्यांच्या कायदेभंगामुळे त्यांचे स्वतःचें किंवा प्रजेचें नैतिक नुकसान कांही झालें वा न झालें, तरी त्यांचे जे अनेक हितशत्रु संस्थानांत आणि संस्थानाबाहेर, नलराजाच्या वाईटावर टपलेल्या छिद्रान्वेषी कलिप्रमाणे, त्यांच्या हातून एकादी चूक होण्याची वाट पहात आजवर टपून बसलेले होते, त्यांच्या हातीं या कृत्यामुळे कोलित दिल्यासारखे झालेलें नाही काय? विशेषतः, त्यांचे आजे कै. सयाजीरावमहाराज गायकवाड यांना, त्यांच्या हातून घडलेल्या लहान सहान चुकांच्या काटयांचा नायटा करून, त्यांच्या हितशत्रूंनी आमरण कसा उपद्रव दिला, हें काय महाराजांच्या कानावर कधी गेलेलें नसेल? म्हणून, त्या दृष्टीने तरी त्यांनी हा अविचार करावयाला नको होता, असेंच आम्ही म्हणतों.

पण, त्याबरोबरच आम्हांला हेंहि स्पष्ट सांगावेसें वाटतें की, महाराजांचा हा अविचार इतका अनैतिक आणि इतका प्रजाहितविघातक खास नाही की, ज्याबद्दल त्यांचे राज्याधिकार छिनावून घेऊन ऐन तारुण्यांत त्यांच्यासारख्या एरवी राज्यकार्यकुशल नरेशाचा तेजोवध करण्यात यावा! एकापेक्षां अधिक लग्नें केल्याबद्दल किंबहुना रखेल्या ठेवल्याबद्दल राजाना पदच्युत करण्याचा हा आधुनिक नीतिदंडक जर अमलात आणण्याचें ठरलें, तर बिचाऱ्या हिंदुस्थानांतील परतंत्र संस्थानिकांवरच काय, पण यूरोपांतील स्वतंत्र ख्रिस्ती राजांवरहि सिंहासनावरून खाली उतरण्याचा प्रसंग येईल. बडोद्याच्या महाराजांचें दुसरें लग्न हें एरवी कोणाला कितीहि आक्षेपार्ह वाटण्यासारखे असलें, तरी हिंदु धर्मशास्त्रांच्या आणि लोकरूढीच्या दृष्टीने तें अनैतिक किंवा अप्रशस्तहि ठरत नाही. अशा स्थितींत, महाराजांच्या या तारुण्यसुलभ प्रमादाबद्दल त्यांच्यावर झालेल्या कडक टीकेवर समाधान न मानता, आणखी त्यांना गादीवरून खाली ओढण्याचा प्रयत्न करण्यात यावा, हें अप्रस्तुत आणि अन्यायाचे नव्हे काय? हिंदुस्थानांतील कित्येक संस्थानिकांप्रमाणे महाराजांनाहि वाममार्गांने आपला हा नवा प्रेमसंबंध सुखेनैव चालू ठेवता आला असता. पण, तसल्या कोणत्याहि चोरट्या किंवा छुप्या शिष्टसंमत मार्गाचा अवलंब न करिता, महाराजांनी सरळ दुसरें लग्न करण्याचा कमीपणा, स्वतः संमत केलेला कायदा बुद्ध्या मोडून, धैर्याने पत्करला, याबद्दल त्यांना कोणते प्रायश्चित्त द्यावयाचे, याचाहि कांही विवेक आहेच की नाही?

पण, कौन्सिल ऑफ स्टेटच्या विद्वान् अध्यक्षांनी जरी श्रीमान् गोविंदलाल शिवलाल यांच्या ठरावाला परवानगी दिलेली असली, तरी ना. व्हाइसरॉय हे असला गैरसनदशीर ठराव हिंदी कायदेमंडळापुढे येऊं देतील, असे आम्हाला वाटत नाही. कारण, हिंदी संस्थानिकांना कोणत्या कारणामुळे किंवा परिस्थितीत पदच्युत करावें, यासंबंधीचे ब्रिटिश सरकारचे संकेत ठरलेले आहेत. (१) राज्याधिकारांचा बेगुमान दुरुपयोग, (२) बादशहांशी असलेल्या स्नेहभावांत विघात उत्पन्न

होईल असा उघड राजद्रोह आणि (३) देशातील शांततेचा भंग होईल असा संस्थानासंस्थानांतील संबंधांचा विच्छेद ( flagrant misuse of Sovereign powers, open disloyalty involving breach of the alliance with the Crown, and breach of inter-state relations threatening the peace of the country. ) या तीनच कारणांमुळे संस्थानिकाला पदच्युत करता येते किंवा गादीचा राजिनामा द्यावयाला भाग पाडतां येते. बडोद्याच्या महाराजांनी यांपैकी कोणते कृत्य केलेलें आहे की, ज्याबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांचे राज्याधिकार काढून घ्यावेत ? त्यांच्या राज्यकारभारांत कोणत्याहि प्रकारचें वैगुण्य त्यांच्या उपद्व्यापी हितशत्रूंनाहि दाखवता येऊं नये, इतकें त्यांचे वर्तन आणि धोरण संस्थानिक या नात्याने व्यवस्थित आहे. मग त्यांना पदच्युत कशाबद्दल करणार ? दुसरें लग्न करणे हा असा अघोर गुन्हा खास नाही की, ज्याबद्दल एकाद्या एरवी प्रजाहितदक्ष संस्थानिकाला पदच्युत करण्याची आगलावी शिफारस कौन्सिल ऑफ स्टेटने करावी आणि ब्रिटिश सरकारने ती चोंबडी शिफारस शिरोधार्य मानून महाराजांना अन्यायाने गादीवरून काढावें. तेव्हा, श्रीमान् गोविंदलाल शिवलाल यांचा हा गैरसनदशीर आणि अन्यायकारक ठराव कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये चर्चेला येऊं देऊन एक नवा अनिष्ट पायंडा हिंदुस्थान सरकार पाडणार नाही, अशी अपेक्षा करणे चुकीचें होईल काय ?

१३-२-१९४४

# बुद्धिचापल्याचें शिक्षण

दुसऱ्या बाजीरावसाहेबांच्या अनेक गोष्टी इतिहासांत प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी एक गोष्ट अशी आहे की, पुण्यातले त्या काळचे नामांकित व्युत्पन्न हरिदास सदाशिव माणकेश्वर यांचे कीर्तन ऐकून श्रीमंत इतके काही खूष झाले की, त्यांना तिथल्या तिथे दिवाणगिरीचीं वस्त्रें

बहाल करून रावबाजींनी त्यांची नाना फडणिसांच्या जागेवर स्थापना केली. असे हे हरदासाचे दिवाण झालेले सदाशिव माणकेश्वर खडकीच्या लढाईच्या वेळीं जेव्हा पालखींत बसून रणमैदानावर जावयाला निघाले, तेव्हा पुण्याच्या लोकांनी उलट दिशेने पळ काढावयाला सुरवात केली. त्या वेळीं रावबाजींच्या या पालखीपदस्थ दिवाणांनी आपल्या हुजऱ्याला असा प्रश्न केला की, " हे लोक आज असे उलटच्या दिशेने का पळत सुटले आहेत ? " त्यावर हुजऱ्याने हात जोडून असे उत्तर दिले की, " कसूर माफ करावी, महाराज !—लोक म्हणतात, ' कारभारी काय आज पालखीत बसून अलिपष्टनसाहेबांपुढे कीर्तन करायला निघाले आहेत कां ? पालखींत बसून युद्धावर जाणारा सेनापति लढाई काय जिंकणार तें दिसतेंच आहे ! अशा स्थितींत पुण्यांत राहून फुकट मरण्यात काय अर्थ ? '—असें म्हणत हे लोक शहर सोडून पळत सुटले आहेत ! "

रावबाजींनी निदान हरदासाला तरी दिवाणगिरी बहाल केली. पण अयोध्येच्या एका नबाबाच्या मर्जीची चेष्टितें कांही औरच ! त्याने आपल्या सलगींतल्या एका दरबाऱ्याला, केवळ तो बुदबळे उत्तम खेळतो, म्हणून वजीरपद बहाल केलें. बाकी त्यांतहि त्याची कांही चूक नव्हती म्हणा ! वजिराला नाही तरी राजकारणाच्या क्षेत्रांत बुद्धिबळाचेच डाव खेळावयाचे असतात की नाही ? पुढे हे खेळियाचे वजीर झालेले दरबारी नबाबसाहेबांबरोबर एकदा शिकारीला गेले असतां हुजुरांनी दुपारीं त्यांना एकदम स्वयंपाक करण्याचा हुकूम फर्मावला; व स्वतःहि अस्तन्या सारून ते पाकसिद्धीच्या तयारीला लागले. त्या खानदान दरबाऱ्याने उभ्या हयातींत कधी चूल पाहिली नव्हती. तो जेव्हा स्वयंपाक करावयाला राजी होईना, तेव्हा नबाबसाहेबांची मर्जी खप्पा होऊन ते उद्‌गारले, " माझ्या वजिराचे बुद्धिकौशल्य मसलतखान्यापासून तो मुदपाकखान्यापर्यंत सर्वत्र अकुंठित चाललें पाहिजे ! " आणि तिथल्या तिथेच तो वजीर पदभ्रष्ट झाला. अयोध्येच्या या नबाबाच्या कानांवरून ' न खलु धीमतामविषयो नाम ' हें संस्कृत सुभाषित जरी कदाचित् गेलेलें नसलें, तरी त्याच्या दरबारच्या

विद्वान् इंग्रज रेसिडेंटाच्या कृपेने " जो मनुष्य एका कामात पटु तो सर्वच कामात पटु " अशा आशयाचे विभूतिपूजक कार्लाईलचें वचन बहुधा गेलेलें असावें !

वर दिलेल्या या दोन आख्यायिका वाचून आमच्या वाचकांना कदाचित् असें वाटेल की, राजकीय विषयावर अग्रलेख लिहिण्याचा कंटाळा आल्यामुळे, आज आम्ही हे हरदासी गोष्टींचें आख्यान लावलें असावें. वास्तविक मधून मधून तसें करावयालाहि कांही हरकत नाही. किंबहुना, ' अमृतबझार पत्रिके 'चे आद्य संपादक कै. शिशिरकुमार घोष हे, आठवड्यातून एक दोन वेळा तरी पुराणांतील किंवा इतिहासांतील आख्यान लावून, प्रतिपक्षाला आपल्या वक्रोक्तीच्या विषाराचे घुटके पाजीत असत. पण, आम्हाला हे जे आज हरदासी प्रसंगाचे दाखले सुचत आहेत, ते मात्र राजकीय विषयांचा तुटवडा पडला किंवा शिशिरबाबूंचे अनुकरण करण्याची लहर आली म्हणून नव्हे. हिंदुस्थानांत जोपर्यंत ब्रिटिश सरकारची फर्मानशाही चालू आहे, तोंपर्यंत राजकीय विषयांना काय तोटा ? किंबहुना, त्या फर्मानशाहीचीच जी एक चुणूक ता. ११ फेब्रुवारीच्या प्रांतिक सरकारच्या गॅझेटांत आमच्या सहजगत्या दृष्टीस पडली, ती पाहूनच आम्हाला वरील ऐतिहासिक गोष्टींची आठवण झाली. ता. ११ च्या गॅझेटांत नेमणुकांच्या सदराखाली पुढील नवीन नेमणुका जाहीर करण्यात आलेल्या आहेतः—( १ ) श्री. एम. एच. नानावटी, नागपूरच्या मॉरिस कॉलेजांतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक, यांची नागपूर येथे ई. ए. सी. म्हणून नेमणूक; (२) श्री. एफ. सी. श्रीवास्तव, डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स, यांची बिलासपूर येथे ई. ए. सी. म्हणून नेमणूक; (३) रा. सा. टी. बी, जोग, सुपरिंटेंडेंट नॉर्मल स्कूल, वर्धा, यांची रायपूर येथे ई. ए. सी. म्हणून नेमणूक; ( ४ ) श्री. बी. एच. मेहता, मॉरिस कॉलेजातील इंग्रजीचे दुय्यम प्राध्यापक, यांची छिंदवाडा येथे ई. ए. सी. म्हणून नेमणूक; (५) श्री. जे. सी. दीक्षित, नागपूरच्या सायन्स कॉलेजातील पदार्थविज्ञान शास्त्राचे प्राध्यापक, यांची अमरावती येथे ई. ए. सी. च्या

जागी नेमणूक; व (६) श्री. जी. सी. चतर्जी, नागपूरच्या सायन्स कॉलेजातील इंग्रजीचे प्राध्यापक, यांची जबलपूर येथे ई. ए. सी. च्या जागी नेमणूक! मध्यप्रांत—वऱ्हाडांतील शिक्षण खात्यातल्या सहा अनुभविक गृहस्थांची एकदम बंदोबस्त खात्यांत जी ही नेमणूक झाली, तिने इतिहासांतील असले अनेक सदृश चमत्कार आमच्या डोळ्यांपुढे उभे केले असले, तर त्यांत नवल काय ?

शिक्षण खात्यांतून बंदोबस्त खात्यांत या सहा सद्‌गृहस्थांची नेमणूक करण्यांत प्रांतिक सरकारने जे बुद्धिचापल्य प्रकट केले आहे, त्याबद्दल आम्ही त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. माणसे जन्मभर एका विषयांत म्हणा, व्यवसायांत म्हणा किंवा खात्यांत म्हणा जर सारखी काम करित राहिली, तर तेंच तें काम सतत केल्याने त्यांच्या बुद्धीला गंज चढतो; व मन आंबल्यासारखें होऊन जातें. तो गंज झडून जावयाला अशा प्रकारच्या परस्परविरोधी खात्यात अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे यासारखा दुसरा अचूक, गुणकारी उपाय कोणता दाखवता येईल ? कल्पना करा, पोलिस खात्यांतला जमादार जर उद्या प्राथमिक शाळेचा हेडमास्तर झाला, तर तो आपल्या रुबाबाने सारा दिवस कल्ला करून शाळा डोक्यावर घेणाऱ्या पोरांना एकदम शिस्त लावणार नाही काय ? किंवा प्राथमिक शाळेचा हेडमास्तर जर उद्या पोलिस खात्यांत नेमला गेला, तर तेथील हडेलहप्प जमादारांच्या तोंडी संभावित शुद्ध भाषा खेळणार नाही काय ? पदार्थ-विज्ञानशास्त्राचा प्राध्यापक ई. ए. सी. होऊन बंदोबस्त खात्यांत गेल्याने त्या त्या भागांतील पदार्थविज्ञानाला प्रोत्साहन मिळेल आणि अर्थ-शास्त्राचा प्राध्यापक ई. ए. सी. झाल्याने जमाबंदी खात्यांत नवे अर्थ-शास्त्रीय संशोधन होईल. हे लाभ सामान्य आहेत काय ? छे छे ! हिंदुस्थानासारख्या गरीब देशांत प्रत्येक माणसाला प्रत्येक काम करता आले पाहिजे;––शिक्षण खात्यातला माणूस अबकारी खात्यांत फेकला किंवा पोलिस खात्यांतला माणूस शिक्षण खात्यांत बदलला, तरी त्यांपैकीं कोणत्याहि खात्यांत त्या माणसाची बुद्धि सारख्याच चपलतेने

चालली पाहिजे. त्या दृष्टीने, आमच्या प्रांतिक सरकारने सुरू केलेली ही खातेबदलाची प्रथा अभिनंदनीय असून, इतर प्रांतिक सरकारें तिचें अनुकरण त्वतपरतेने करतील, अशी आम्हाला आशा आहे.

१६–२–१९४४

# बहिऱ्याशीं बातचीत

गेल्या शनिवारी सकाळी व्हाइसरॉय लॉर्ड वॅव्हेल यांनी रामटेकला भेट देऊन तेथील खेडुतांशी गुजगोष्टी करण्यांत दोन तास घालविले. हिंदुस्थानांत व्हाइसरॉय म्हणून जो इंग्रज उमराव येतो, तो कसला ना कसला तरी छंद घेऊन येतो; व त्याच्या त्या छंदाच्या नादावर सारें दरबारी राजकारण झुलत असतें. लॉर्ड रीडिंग हे 'न्यायाधीश' म्हणून, लॉर्ड इर्विन हे 'शेतकरी' म्हणून आणि लॉर्ड लिन्लिथगो हे 'वळूवल्लभ' म्हणून प्रसिद्ध होते. लॉर्ड कर्झन यांना वैभवाच्या प्रदर्शनाची हाव होती. ही हाव तृप्त करण्यासाठी त्यांनी दिल्लीला बादशाही दरबार भरवून आणि सर्व संस्थानिकांना आपल्यापुढे मुजरा करावयाला लावून दिल्लीच्या तक्तावर 'गोरा मोगल' आरूढ झाला असल्याचा देखावा जगाला दाखवला ! एका व्हाइसरॉयाला ऐतिहासिक महत्वाचे जुने दागिने आणि चिजा गोळा करण्याचा नाद होता. त्या नादाच्या भरांत दक्षिण महाराष्ट्रांतल्या एका ब्राह्मण संस्थानिकाच्या गळ्यांतला मौल्यवान कंठा आणि एका मराठा संस्थानिकाच्या आयुधागारांतला जडावाचा खंजीर त्याने लंबा केल्याची एक रसभरित गप्प पुण्यास उठली होती. लॉर्ड वॅव्हेल यांना खेडीं पाहाण्याचा आणि वृत्तव्यावसायिकांशीं ओळख करून घेण्याचा नाद आहे, असें दिसतें. कारण, दिल्लीला व्हाइसरॉयाच्या प्रासादांत प्रस्थान ठेवल्यावर त्यांनी जर पहिली गोष्ट कोणती केली असेल, तर ती ही की, बिचाऱ्या अर्धपोटी रोजंदारी करणाऱ्या वृत्तव्यावसायिकांना उपाहाराला बोलावून त्यांचा शाही सन्मान केला !

अर्थात् बडे लाट नागपुरास आल्यावर त्यांनी आपल्या या दोन लाडांचें कोड यथास्थित पुरवून घ्यावें, यांत नवल काय? गेल्या शनिवारी सकाळी लॉर्ड वॅव्हेल हे ना. गव्हर्नर यांच्यासह प्रथम कामठीच्या लष्करी ठाण्यावर गेले; व तेथील प्रमुख अधिकाऱ्यांसह थोडा वेळ गप्पागोष्टी करून नंतर नागपूरपासून तेवीस मैलांवर असलेल्या रामटेक तहसिलींतील आमडी या गांवाला त्यांनी भेट दिली. श्रीरामचंद्र हे शरयूपार होऊन नंदिग्रामला गेल्यावर त्या खेड्यांतील गुहकप्रभृति गावकऱ्यांना जसा हर्ष झाला असेल, तसा दिवाळीदसऱ्याचा आनंद आमडीच्या खेडवळांना व्हाइसरॉयांच्या चर्ममंडित चरणकमलांचे रजःकण आणि त्यांच्या रथचक्रांच्या मृदुमर्मर वायुगतीने उधळलेला गुलाल नाकातोंडांत गेल्यावर झाला असेल! बडे लाट येणार म्हणून गाव झाडून लोटून स्वच्छ करण्यांत आलेला होता; खेडुतांनी सणासुदीचे पोषाख चढवलेले होते; व मध्यप्रांत-वऱ्हाडांतील ग्रामीण जीवनाची ओळख व्हाइसरॉयसाहेबांना झटपट करून देण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांनी जरूर ती घोकंपट्टीहि करून ठेवलेली होती. इतकी पूर्व तयारी आगाऊ करून ठेवल्यानंतर व्हाइसरॉयांची ही आमडीची धूळभेट सर्वच अर्थांनी रंगतदार व्हावी, हें अपेक्षितच होतें. त्या भेटींतील संवाद हे तर रंगभूमीवरील भाषणांइतकेच नाट्यपूर्ण वाटावेत, असे झाले. आनंदाची गोष्ट ही की, स्थानिक वार्ताहरांचा तांडा बड्या लाटांबरोबर देण्याची दक्षता प्रांतिक सरकारने घेतल्यामुळे व्हाइसरॉय, त्यांच्या परिवारांतील अधिकारी आणि या प्रसंगासाठी मुद्दाम जमविलेले खेडुत यांच्यांत जो सुखसंवाद झाला, तो बरोबर घेतलेल्या या वार्ताहरांच्या लेखनचापल्यामुळे आतां सर्व प्रांताला उपलब्ध झाला, हें त्याचें केवढें अहोभाग्य!

आमडी येथे झालेल्या या नाट्यघटनेंतील मुख्य भूमिका गंगाराम नांवाच्या आमडीच्या नशीबवान मालगुजाराला लाभली होती; व बंदोबस्त खात्याचे हजरजबाबी चिटणीस श्री. रहिम हे 'प्रॉम्प्टर'चें काम करीत होते. बडे लाट आणि गंगाराम यांच्यांत पुढील प्रश्नोत्तरें झालीं—

बडे लाट—हा मालगुजार (गंगाराम) या खेडयांतच रहातो ना ?

श्री. रहिम—नाही हुजूर, हा 'गैरहजर' (Absentee) मालगुजार आहे. हा नागपुरांत राहातो आणि इथल्या शेतींत कांहीसुद्धा लक्ष घालीत नाही.

बडे लाट—या खेडयांतील लोकांजवळ शिल्लक रोकड किती असेल ?

श्री. रहिम—वीस हजारांपर्यंत.

बडे लाट—मग शिलकेंत टाकावयाला त्यांच्याजवळ भरपूर पैसा असतो म्हणतां ?

श्री. रहिम—हो तर ! सध्या त्यांची फारच चंगळ उडाली आहे. ते लग्नकार्यें अशा धडाक्याने साजरीं करतात की यंव !

बडे लाट—या खेडयांत बनिया आहे की नाही ?

श्री. रहिम—प्रत्येक खेडयांत एक बनिया हा असतोच.

या शेलक्या प्रश्नोत्तरांवरून वाचकांच्या हें लक्षांत येईल की, आमडीचा जो 'गैरहजर' मालगुजार गंगाराम बडया लाटांची आपल्या गावाला होणारी ही धूळभेट साजरी करण्यासाठी म्हणून मुद्दाम नागपूरहून रामटेक येथे आलेला होता, त्याची म्हणजे गावच्या यजमानाची आणि त्याच्या बादशाही पाहुण्याची एका अवाक्षरानेहि बोलाचाल झाली नाही. बोलण्याचें सगळें काम श्री. रहिम यांनी केलें. याचें कारण काय ? कारण अगदी साधें आहे. गंगाराम हा ठार बहिरा होता ! त्यामुळे त्याच्या वतीने ऐकण्याचें आणि बोलण्याचें अशीं दोन्ही कामें श्री. रहिम यांनाच करावीं लागलीं. गंगारामासारख्या बहिऱ्या इसमाला मुद्दाम यजमानकीची वस्त्रें देऊन जो नागपूरहून आमडीला आणवण्यांत आला, तो काय धड कानांचा दुसरा यजमान गावांत मिळण्यासारखा नव्हता म्हणून ? छे, छे ! हा सगळा मनोरंजक

नाट्यप्रसंग पहात असतांना एका मार्मिक वार्ताहराने असे उद्गार काढले की, "व्हाइसरॉयांना भलतें सलतें उलट उत्तर दिले जाऊं नये, म्हणून त्यांच्या स्वागतार्थ मुद्दामच हा बहिरा यजमान निवडलेला असावा !"

आमडीच्या या 'ग्राम्य' कार्यक्रमाइतकाच रविवारी सायंकाळी गव्हर्मेंट हाऊसमधील उद्यानोपहाराचा नागर कार्यक्रमहि नाट्यपूर्ण झाला. विशेष हें की, या वेळी विविध वेषभूषांनी नटलेला रमणीगण हजर असल्यामुळे, या कार्यक्रमाला अक्षरशः रंगत आलेली होती. या वेळी गव्हर्मेंट हाऊसवर उपाहारार्थ गेलेल्या बड्या बड्या भाग्यवंतांना नागपूरच्या 'वासंतिक' उन्हाचे चटके चुकवीत जें पाऊण तास ताटकळत उभे रहावें लागलें, तें पाहून आम्हाला दक्षिण भारतांतील एका अवलिया म्हणून गाजलेल्या मुस्लिम संस्थानिकाच्या 'खड्या दरबारा'-ची आठवण झाली. हे संस्थानिक केव्हा केव्हा असा दरबार भरवीत की, त्यांत ते स्वतः उभे राहात आणि सगळ्या मानकऱ्यांनाहि आपल्या बरोबर तास न् तास उभे राहावयाला लावीत ! त्यांना या 'खड्या दरबारा'चा इतका विलक्षण शौक होता की, ते लहर लागतांच क्षणार्धांत बैठ्या दरबाराचें रूपांतर 'खड्या दरबारां'त करीत असत. त्या 'खड्या दरबारा'ची थोडीशी चुणूक रविवारच्या या उद्यानोपहाराच्या वेळीं नागपूरच्या प्रतिष्ठित नागरिकांना आणि वृत्तव्यावसायिकांना पहावयाला मिळाली, हें खरोखरी त्यांचे सुदैव होय. आजपर्यंत अनेक बडे लाट नागपूरला आले आणि गेले. पण, त्यांच्याशी हस्तांदोलन करण्याचा आणि त्यांच्या 'खड्या दरबारां'त उभे राहाण्याचा जो हा बहुमान नागपूरच्या संपादकांना आणि वृत्तव्यावसायिकांना मिळाला, त्यामुळे त्यांचे घोडे गंगेंत न्हाले ! यूरोपमध्ये वृत्तपत्रसंस्था ही राज्यांतील 'चवथी दौलत' ( Fourth Estate of the realm ) समजली जाते. तो दर्जा जरी अद्याप हिंदी वृत्तपत्रसंस्थेला आलेला नसला, तरी अनेक आय. सी. एस. अधिकाऱ्यांच्या समोर बिचाऱ्या संपादकांशीं बरोबरीच्या नात्याने हस्तांदोलन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलान
अनुक्रम ........ वि. ........
क्रमांक ........



करून बड्या लाटांनी जी प्रत्येकीं दोन तीन मिनिटें बातचीत केली, ती हिंदुस्थानांतील लोकशाहीच्या वाढत्या वर्चस्वाची निदर्शक आहे असें समजावयाचें की बड्या लाटांच्या छांदिष्ट लहरीचा तो एक विनोदविलास समजावयाचा ?

२९-२-४४

# कंदमुळांची गोडी

रामायणांत असा एक प्रसंग आहे की, शरयूपार झाल्यावर श्रीरामचंद्रांनी अरण्यात जेव्हा पहिला मुक्काम केला, तेव्हा लक्ष्मणाने रानातून खणून तोडून आणलेली कंदमुळेफळे राम आणि सीता यांच्यापुढे ठेवलीं. तो जंगली उपाहार सीतेपुढे ठेवतांना लक्ष्मणाच्या मनाला काय वाटलें असेल, कोण जाणे. पण रामाच्या मनाला मात्र अत्यंत वेदना झाल्या. त्याच्या मनांत आले की, जनकराजाची लेक आणि महाराज दशरथाची सून अशा या युवराज्ञीवर रानातली कंदमुळे खाण्याचा प्रसंग यावा, हे केवढे दुर्दैव ! पण सीतेने तीं कंदमुळे मोठ्या गोडीने खाल्ली. इतकेंच नव्हे, तर राजवाड्यातल्या पक्वान्नांपेक्षा सुद्धा त्यांची रुचि काही और आहे, असे म्हणून तिने रामाचे समाधान केले. त्यावर रामाने तिला म्हटले, "ज्या तुझ्या सुकुमार शरीराला तलम रेशमी वस्त्रेंसुद्धा बोचत असत, त्या तुला वल्कले नेसतांना देखील जर काही वाटले नाही, तर या कंदमुळांची गोडी तू वाखाणावीस, यांत काय नवल ?"

रामायणातला हा प्रसंग आज आठवण्याचे कारण असे की, बंगालच्या गव्हर्नरांच्या पत्नी सौ. केसी यांनी नुकतीच कंदमुळे आणि ज्वारीची भाकर यांची चव घेऊन पाहिली व हे दोन्ही पदार्थ फार रुचकर लागतात म्हणून जाहीर केले, अशी बातमी आमच्या वाचनात आली. कंदमुळे खाण्याचा हा जो यशस्वी प्रयोग बाईंनी करून पाहिला, त्याचा

परिणाम कलकत्त्याच्या गव्हर्मेंट हाऊसमधील खान्यावर काय होईल? आणि जर कांही झालाच, तर गव्हर्मेंट हाऊसमधील खान्याच्या त्या प्रशस्त टेबलावर झालेली ही खाद्यक्रांति तेथे येणाऱ्या लब्धप्रतिष्ठित मेजवानांना कशी दिसेल? पीच, ॲपल वगैरे फळांच्या ऐवजी जेव्हा कंदमुळे टेबलावरील प्लेट्समधून ठेवलेली त्यांच्या दृष्टीस पडतील, केक्स, सॅण्डविचेस यांच्या ऐवजी भाकरझुणका वाढलेला जेव्हा त्यांना आढळून येईल किंवा उंची मद्याच्या ऐवजी शहाळ्याचे पाणी किंवा फारच झाल्यास नीरा पिण्याचा प्रसंग जेव्हा त्यांच्यावर येईल, तेव्हा त्यांना काय वाटेल? विशेषतः, कंदमुळे गोड आणि चविष्ट असतात, हा आपण लावलेला अपूर्व शोध सौ. केसीबाई जेव्हा खान्याच्या वेळीं आपल्याभोवती बसलेल्या दरबाऱ्यांना आणि मानकऱ्यांना सांगतील, तेव्हा त्या शोधाचे केवढे कौतुक होईल? किंबहुना, गव्हर्मेंट हाऊसमधील खान्यांत जर असा बदल खरोखरीच झाला, सर कलकत्त्यावर सध्या जी शत्रूची विमाने मधूनच केव्हा तरी बाँबफेक करतात, त्यांच्याऐवजी, कंदमुळांच्या या सात्विक फलाहाराच्या प्रभावाने, एकादे वेळी वैकुंठांतली किंवा कैलासांतली विमाने तेथे अचानक येऊन उतरावयाची!

गोष्टीवरून गोष्ट आठवते, त्याप्रमाणे या प्रसंगावरून आम्हांला दौलताबादचा सुलतान महमद तघलख याच्या—जो इतिहासांत वेडा म्हणून प्रसिद्ध आहे!—एका गोष्टीची आठवण झाली. हा बादशहा एकदा आपल्या राजवाड्याच्या बारींत बसून सकाळचा नास्ता करीत होता. त्या नास्त्यांत केळीं होती. त्यांच्या साली गमतीने सहज त्याने बारीतून खाली फेकल्या. खाली पटांगणात बादशहाच्या कृपादृष्टीची वाट पहात जे हजारों भिकारी आणि दरबारी–हे तरी बडे भिकारीच नव्हत काय?—खडे होते, त्यांपैकी कांही भाग्यवंतांनी मोठी शिताफी करून त्या साली झेलल्या; व मिटक्या मारीत खावयाला सुरवात केली. बादशहाने सहज नजर फेकली, तेव्हा आपण टाकलेल्या साली गोडीने चघळून खात असलेले ते लोक त्या बारीखाली त्याच्या दृष्टीस पडले. त्याबरोबर त्याने आश्चर्याने आपल्या शेजारीं बसलेल्या

खुषमस्कऱ्याला विचारलें, "केळ्यांतल्या गरापेक्षा त्यांच्या साली गोड असतात काय?" खुषमस्कऱ्या वस्ताद होता. त्याने हात जोडून उत्तर दिलें, "हां जी हुजूर! आपण ज्या केळ्यांच्या साली खाली फेकून देता, त्या खरोखरीच इतरांना गोड लागतात!" बादशहाच्या लक्षांत या उत्तरांतील खोच आली नाही आणि तो म्हणाला, "मग आपण आपल्या उमरावांना एक दिवस ही नवी चीजच खिलवूं!" आणि खरोखरीच दुसऱ्या दिवशीं त्याने आपल्या शेलक्या उमरावांना आपल्या हातांनी केळीं सोलून त्यांच्या साली खिलवल्या; व प्रत्येक उमरावाने मिटक्या मारीत हें नवें खाद्य चवीने खाण्याची कोशीस केली. सौ. केसीबाईंनी गव्हर्मेंट हाऊसमधील खान्यांत जर बाजरीची भाकर आणि कंदमुळे यांना स्थान दिलें, तर ते पदार्थ खाणें आणि त्यांची वाखाणणी करणें, हा एक कलकत्त्यांतील दरबाऱ्यांचा आवडता शिष्टाचार होऊन बसेल.

पण, कंदमुळांच्या गोडीची चटक लागून सौ. केसीबाईंनी गव्हर्मेंट हाऊसमध्ये कंदमुळें, भाकर वगैरे पदार्थ खाण्याचा प्रघात जर खरोखरीच पाडला, तर त्यामुळें बंगालमधील दुर्भिक्षांत आणखी भर पडेल, अशी आम्हाला भीति वाटते. भर्तृहरीने आपल्या एका श्लोकांत असें म्हटलेलें आहे की, "माणसें गवत खात नाहीत हें खरोखरी पशूंचें परम भाग्य होय! नाही तर पशूंना तें सुद्धा खायला शिल्लक उरलें नसतें!" भर्तृहरीची ही उक्ति कंदमुळांनाहि लागू पडण्यासारखी आहे. गव्हर्मेंट हाऊसमधील खान्यांत जर उद्या कंदमुळांचा आणि बाजरीच्या भाकरीचा समावेश झाला, तर जेमतेम ती खाऊन पोटाची खळगी कशीबशी भरणाऱ्या गरिबांचें कसें होईल? आज त्यांना खावयाला निदान रानांतलीं कंदमुळें तरी शिल्लक आहेत; व रुपयाला तीन चार पायल्या कां होईना, पण ज्वारी आज त्यांच्या पदरांत पडते आहे. तथापि, जर का गव्हर्नरसाहेब आणि त्यांचे मानकरी-दरबारी यांनी कंदमुळें आणि ज्वारी यांचा फन्ना पाडावयाला सुरवात

केली, तर गरिबांना आज उपलब्ध असलेलें हें साधेसुधें स्वस्त अन्नहि दुर्मिळ होऊन त्यांच्यावर फाके पडण्याचा प्रसंग येईल. म्हणून, कंदमुळे आणि ज्वारीची भाकर गोड असल्याचा जो हा अद्‌भुत शोध सौ. केसीबाईंनी लावलेला आहे, त्याचा परिणाम गव्हर्मेंट हाऊसमधील खान्यांवर होऊं नये, यासाठी बंगालमधील जनतेने ठिकठिकाणीं सभा भरवून ना. गव्हर्नरांना तशी विनंती करावयाला नको काय ?

७-३-१९४४

# गोऱ्या माणसाचें ओझें

एका ब्रिटिश चित्रकाराने काढलेलें एक जगद्विख्यात चित्र पुष्कळांच्या पाहाण्यांत असेल. तें चित्र असें आहे की, एक बलिष्ठ गोरापान मनुष्य आपल्या पाठीवर भलें थोरलें ओझें घेऊन भूगोलावरील काळचा रेषा आक्रमीत असून, त्याच्या कपाळावरील घामाचे थेंब पायांखालच्या काळचाभोर जमिनीवर पडत आहेत. हा गोरा मनुष्य कोणता ? त्याच्या पाठीवरील हें ओझें कसलें ? आणि ही जी काळी भूमि तो हळूहळू आक्रमीत आहे, ती कोणती ? हें चित्र म्हणजे मॅथ्यू अर्नोल्ड या सुप्रसिद्ध इंग्रजी कवीच्या 'गोऱ्या माणसाचें ओझें' ( White Man's Burden ) या कवितेंतील कल्पनेचें चित्रीकरण होय. हा गोरा मनुष्य म्हणजे आज जगांतल्या सगळ्या काळ्या--सावळ्या—पिवळ्या राष्ट्रांवर अधिराज्य भोगीत असलेला पाश्चात्य मनुष्य होय. त्याच्या पाठीवरलें तें प्राणांतिक भासणारें ओझें म्हणजे मागासलेल्या काळ्या-सावळ्या जातींच्या उन्नतीच्या जबाबदारीचें ओझें होय; व तो जी काळी भूमि आक्रमीत आहे, ती भूमि म्हणजे आशिया आणि आफ्रिका हीं श्वेतेतर लोकांचीं खंडें होत. अर्नोल्डची ती कविता आणि तिच्यावरून रेखाटलेलें तें प्रतीकचित्र—हें आशिया आणि आफ्रिका या दोन खंडांतील लोकांना मूर्तिमंत आव्हानच नव्हे काय ?

या उपमर्दकारक चित्राची आज आठवण होण्याचें कारण असें की, दक्षिण आफ्रिकेचे लंडन मधील हाय कमिशनर कर्नल डेनिस रिट्झ यांनी गेल्या सोमवारीं केलेल्या भाषणांत, हें काळ्या माणसांच्या कळवळ्याचें ओझें वाहून गोरा माणूस कसा बिचारा घामाघूम झाला आहे, याचे पुनश्च पघळ वर्णन केलेलें आहे. दक्षिण आफ्रिकेचे मुख्य प्रधान ज. स्मट्स यांनी लंडन येथे एक साम्राज्यविषयक व्याख्यानमाला सुरू केलेली असून, त्या मालेंत दक्षिण आफ्रिकेंतील वर्णभेदाच्या प्रश्नावर क. रिट्झ यांनी जें भाषण केलें, त्यांत या गोऱ्या माणसाने आपल्या डोईवर घेतलेल्या ओझ्याचा उल्लेख आलेला आहे. आफ्रिका ही मूळची निग्रो जातींची जन्मभूमि. गोऱ्या लोकांनी ती अन्यायाने बळकावली; व आता त्या भूमीचे मूळचे पुत्र आणि मालक जे निग्रो लोक, त्यांच्या उद्धाराची जबाबदारी आपल्या माथीं येऊन पडल्याबद्दल ते विव्हळत आहेत ! कर्नल रिट्झ यांनी आपल्या या भाषणांत असें सांगितलें की, " काळ्या गोऱ्यांचा प्रश्न हा कांही केवळ आफ्रिकेपुरताच मर्यादित नसून, सर्व ब्रिटिश साम्राज्यापुढेच हा प्रश्न आज आहे. आम्ही आमच्या काळ्या बांधवांना—म्हणजे निग्रोंना—कोणत्याहि प्रकारची समता देत नाही, असा आमच्यावर आरोप आहे. मी त्याचें खंडन करीत नाही. पण, नागरिकत्वाचे हक्क वापरण्याची ज्यांना पात्रता नाही, त्यांना ते देणें भयावह आहे, हें या आरोपकांना माहित नाही काय ? मागासलेल्या जातींच्या उन्नतीची जबाबदारी जिथे जिथे युरोपियन लोकांवर येऊन पडलेली आहे, तिथे तिथे अत्यंत बिकट प्रश्न त्यांना सोडवावे लागत आहेत. "

कर्नल रिट्झ यांनी हे जे उद्गार निग्रोंसंबंधी म्हणून काढलेले आहेत, ते एकट्या निग्रोंनाच लागू नसून, दक्षिण आफ्रिकन सरकार निग्रो आणि हिंदी या दोघांनाहि एकाच मापाने मोजतें. कारण, आफ्रिकन सरकारने हिंदी लोकांच्या कल्याणाची चौकशी करण्यासाठी म्हणून जें कमिशन नुकतेंच नेमलेलें आहे, त्या कमिशनच्या कक्षेंतून मताधिकाराचा प्रश्न वगळण्यांत आलेला आहे. विशेष चमत्कारिक गोष्ट ही

की, कमिशनपुढील चौकशीच्या मुद्यांत नागरिकत्वाच्या हक्कांचा समावेश करण्यात आलेला असतां, त्या हक्कांचा केवळ मेरुमणीच असा जो मताधिकाराचा प्रश्न, तो मात्र या मुद्यांतून बाजूला काढण्यांत आला आहे. इतकेंच नव्हे, तर एका हिंदी कार्यकर्त्याने ज. स्मट्स यांना कमिशनच्या कार्यक्रमांत मताधिकाराचा प्रश्न समाविष्ट करण्याची विनंती केली असतां, ज. स्मट्स यांनी ती फेटाळून लावली. या त्यांच्या नकाराची प्रतिक्रिया अशी झाली की, नाताळांतील हिंदी काँग्रेसच्या चिटणिसांनी, हिंदी लोकांच्या राजकीय दर्जाचा प्रश्न कमिशनच्या कार्यक्रमांत अंतर्भूत केल्याशिवाय, आम्ही कमिशनशीं सहकार करणार नाही, असें जाहीर केलें मध्यवर्ती असेंब्ली आणि इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स यांनीहि या मुद्यावर जोर दिला असून, ही मागणी मान्य न झाल्यास दक्षिण आफ्रिकेला ‘ जशास तसें ’ चें तत्व लागू करावें, अशी सूचना हिंदुस्थान सरकारला केली आहे.

पण, ज. स्मट्स यांचे गेल्या तीस वर्षांतील या बाबतीतलें धोरण पहातां, दक्षिण आफ्रिकेंत हिंदी लोकांना नागरिकत्वाचा दर्जा आणि मताधिकार मिळण्याची आशा करणें, हें अप्रयोजकपणाचेंच होणार नाही काय ? दक्षिण आफ्रिकेंतील बक्सबर्ग येथील नगराध्यक्ष श्री. वेंटर यांनी नुकतेंच असें बोलून दाखविलें की, म्युनिसिपल कौन्सिलांत कोणताहि काळा मनुष्य माझ्या खुर्चीला खुर्ची लावून बसलेला मला चालणार नाही ! या उद्गारांत ज्या वर्णद्वेषाचा दर्प भरलेला आहे, त्या वर्णद्वेषाने केवळ दक्षिण आफ्रिकेचाच नव्हे, तर साऱ्या ब्रिटिश साम्राज्याचाच कारभार सडलेला आहे, असें म्हटलें तर तें चूक होईल काय ? फार कशाला ? ज्या अमेरिकेला तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे हे इतक्या आग्रहाने औदार्याचें प्रशस्तिपत्र देतात, त्या अमेरिकन काँग्रेसमध्ये सीनेटर लॉरेन्स यांनी १९२४ सालापूर्वी अमेरिकेंत स्थायिक झालेल्या हिंदी लोकांना नागरिकत्वाचे हक्क देण्याची शिफारस करणारा ठराव आणला असतां, तो कमिटी नेमून टोलवण्यांत आला, ही गोष्ट कशाची निदर्शक आहे ? इंग्लंड काय, आफ्रिका काय किंवा अमेरिका काय या सगळ्या

गोऱ्या किंवा गौरग्रस्त देशांतील सरकारांचे श्वेतेतर लोकांशी वागण्याचें हें धोरण पाहिलें असतां, काळ्या-गोऱ्यांच्या वैमनस्याचा हा प्रश्न तडजोडीने सुटेल, अशी आशा करण्यांत काय अर्थ आहे? काळ्या–गोऱ्यांतील वर्णयुद्ध हेंच कदाचित् मानवजातीच्या दास्य-मोचनाला कारण होणारें जगांतील शेवटलें महायुद्ध ठरण्याचा संभव आहे. तें युद्ध जर दक्षिण आफ्रिकेच्या या दुर्योधनी धोरणामुळे जवळ येणार असेल, तर तिला धन्यवाद द्यावयाला काय हरकत आहे?

१६–३–१९४४

# शनि–मंगळांची युति

ता. २९ फेब्रुवारी रोजीं सुरू झालेली शनि–मंगळांची युति आज ता. १७ मार्च रोजीं संपते, हें वाचून मेदिनीय ज्योतिषावर श्रद्धा असलेल्या अनेक लोकांना हायसें वाटेल, यांत शंका नाही. कारण, पाऊस, वादळें, गारपीट, अपघात, आगी वगैरे या युतीचीं जीं अपेक्षित अनिष्ट फळें, तीं गेल्या दोन तीन आठवड्यांत हिंदुस्थानांतील लोकांच्या पुरेपूर प्रत्ययाला आलीं. वस्तुतः, जागतिक महायुद्धाने लोक आज इतके गांजलेले आहेत आणि पृथ्वीच्या पाठीवर कुठे ना कुठे तरी सारखा इतका मनुष्यसंहार चालू आहे की, शनिमंगळांच्या युतीमुळे जर चार दोन ठिकाणीं आगी लागल्या, अपघात झाले किंवा गारपीट झाली, तर त्याबद्दल विषाद काय म्हणून वाटावा? पण वाटतो खरा. विशेषतः, आकाशांतील ग्रहांच्या भ्रमणाचे आणि युतींचे मेदिनीय किंवा मानवी जीवनावर परिणाम होतात, अशी ज्यांची समजूत आहे, त्यांना असल्या इष्टानिष्ट फलांच्या अनुभूतीमुळे शास्त्रप्रत्ययाचा आनंद लाभतो आणि त्यांची श्रद्धा दृढ होते.

शिवाय, शनि आणि मंगळ हे दोन्हीहि ग्रह फलज्योतिषज्ञांनी विशेष अनिष्ट मानलेले असल्यामुळे, त्यांच्या युतीच्या परिणामाविषयी

साहजिकच लोकांना उत्सुकता होती. शनि हा एका अर्थाने लोकप्रिय ग्रह आहे म्हटले तरी चालेल. शनिवारीं उपवास करणारे आणि शनि-माहात्म्य वाचणारे क्रोडो लोक हिंदुस्थानांत निघतील. फार कशाला? ज्यांचा ज्योतिषावर विश्वास नाहीं, अशा लोकांनासुद्धा शनिमाहात्म्यातील विक्रमराजाच्या विपत्तीची कथा वाचून शनीच्या वक्र गतीचें कौतुक वाटत नाही काय? 'सूर्यापोटीं शनैश्चर' ही म्हणहि मराठींत सर्वतोमुखीं आहे. काळा, पांगळा, तेलकट, वाकडया बुद्धीचा आणि मंद चालीचा असा हा मुलगा आपल्या प्रकाशाने सृष्टीची धारणा करणाऱ्या सूर्याच्या पोटीं यावा, यापरती दुसरी उपरोधिक घटना कोणती असूं शकेल? सूर्याचा हा पुत्र जितका छळवादी, तितकाच पृथ्वीचा पुत्र मंगळ हाहि पीडादायक म्हणून प्रसिद्ध आहे. सूर्य हा जसा सविता, सर्व चराचर सृष्टीचा पोशिंदा, तशीच पृथ्वी ही मूर्तिमंत क्षमा, सर्व जीवजाताची धारिणी आहे. पण, गंमत अशी की, सूर्याचा पुत्र शनि हा जसा दुष्ट निपजला, तसाच पृथ्वीचा पुत्र मानलेला भौम म्हणजे मंगळ हाहि पापग्रहच आहे. मंगळ असलेल्या मुलीचें लग्न जमवावयाला किती अडचण पडते किंवा मंगळ असलेल्या मुलाला लोक मुली द्यावयाला कसे कचरतात, हें कोणाला माहित नाही? सूर्य आणि पृथ्वी ही एका परीने सर्व जीवजाताचीं मातापितरें आहेत. पण, अशा या जगत्पालकांचे पुत्र मात्र असे जगत्पीडक निपजावेत, हें नवल नव्हे काय?

पण, शनि किंवा मंगळ हे कितीहि अनिष्ट पापग्रह असले, तरी एकादा जडवादी नास्तिक असें म्हणूं शकेल की, पृथ्वीवरील पापग्रह हेच सध्या लोकांना इतके छळीत आहेत की, त्या मानाने आकाशांतील या पापग्रहांची छळणूक ही खरोखरी कांहीच नव्हे! शनि किंवा मंगळ हे पापग्रह असले आणि त्यांच्या युतीमुळे जगाला कितीहि उपद्रव होत असला, तरी मुसोलिनी आणि हिटलर यांच्यामुळे सध्या होत असलेल्या मनुष्यसंहाराच्या मानाने तो कितीसा भरेल? किंबहुना, इंग्लंड, रशिया, अमेरिका, जर्मनी आणि जपान या देशांतील लोकांना जर कोणत्या पापग्रहांची युति आज जगाला उपद्रव द्यावयाला कारण

होत आहे असें विचारलें, तर त्यांचीं उत्तरें मोठीं बोधप्रद मिळतील. इंग्लंडांतील लोकांना हिटलर हा मंगळासारखा आणि मुसोलिनी हा शनीसारखा वाटेल; तर जर्मनीतील लोकांना स्टालिन हा मंगळासारखा आणि चर्चिल हा शनीसारखा वाटण्याचा संभव आहे. उलट, हिंदुस्थानाला महायुद्धापेक्षा आपल्या स्वातंत्र्याचा लढाच आज जास्त महत्त्वाचा असल्यामुळे, हिंदी लोक असें म्हणतील कीं, ॲमेरी हा आमच्या राशीला शनीसारखा लागलेला असून, चर्चिलची पीडा आम्हांला मंगळासारखी होत आहे. आजच्या जगांत आकाशांतल्या शनि-मंगळांपेक्षा किंवा राहूकेतूंपेक्षा चर्चिल-ॲमेरी, हिटलर-मुसोलिनी किंवा स्टालिन-रूझवेल्ट या पृथ्वीवरील मुत्सद्यांची युतीच लोकांना अधिक अनर्थावह वाटत असली, तर त्यांत नवल काय ? कारण, पृथ्वीवरील या पापग्रहांनी मानवी दैन्य आणि दुःख आज जितकें वाढविलेलें आहे, तितकें आकाशांतले सगळे पापग्रह एकवटले तरी सुद्धा वाढवूं शकणार नाहीत, असेंच कोणताहि ज्योतिषी म्हणेल.

एखाद्या माणसाच्या राशीला पापग्रह आले, म्हणजे शांति, दान-धर्म किंवा जपजाप्यादि अनुष्ठान करण्याची पद्धत आहे. पण, चर्चिल-ॲमेरी, हिटलर-मुसोलिनी किंवा स्टालिन-रूझवेल्ट या पाप-ग्रहांची युति जी आज मानवजातीच्या संहाराला कारण झालेली आहे, त्या युतीवर कोणता दैवी किंवा मानवी उपाय आहे ? दिल्लीला यमुनातटाकीं जो यज्ञ नुकताच झाला, त्याचा उद्देश विश्वशांति हा असल्याचें सांगण्यांत आलेलें होतें. पण, हा यज्ञ आकाशांतील पापग्रहांच्या उपशमार्थ होता किंवा पृथ्वीवरील पापग्रहांच्या निवारणार्थ होता, याचा खुलासा मात्र याजकांनी केलेला आमच्या तरी पाहाण्यांत नाही. दिल्ली येथील यज्ञ, श्रीसंत तुकडोजीमहाराजांनी गत वर्षी केलेला विश्वशांति नामयज्ञ किंवा आता कानपूर येथे होऊं घातलेला यज्ञ हे पृथ्वीवरील पापग्रहांच्या उपशमनाला कारण होतील, असें खरोखरीच वाटतें काय ? जगाचा आजपर्यंतचा इतिहास असा आहे की, चंगीज-खानापासून तों नेपोलियनपर्यंत जे पापग्रह पृथ्वीवर उदयाला आले,

त्यांची शांति नरमेधानेच झाली. आकाशांतील पापग्रह हे त्यांच्या मानाने कदाचित् जास्त सहृदयच ठरतील; व म्हणूनच त्यांची शांति जपजाप्याने किंवा यजनदानाने होत असावी. पण, पृथ्वीवरील पापग्रह हे मात्र असे दिसतात की, सामुदायिक नरबली घेतल्याशिवाय त्यांची सूडबुद्धि तृप्त होत नाही. त्यांची शांति करण्याचा कांहीच सात्त्विक उपाय मानवजातीजवळ नाही काय ?

१७-३-१९४४

# विक्रमाचें स्वप्न

श्री. मानवेंद्र रॉय यांनी मुंबईस दिलेल्या एका व्याख्यानांत नुकतेंच असें बोलून दाखविलें की, विक्रमादित्य ही ऐतिहासिक व्यक्ति नसून, ती हिंदूंची केवळ एक कविकल्पना, एक मनोज्ञ स्वप्न आहे. भाई रॉय यांचें हें विधान अगदी शंभर टक्के खरें आहे असें समजलें, तरी त्यामुळे काय बिघडतें ? माझिनीनें म्हटलें आहे की, "ज्या देशांतील लोकांपुढे ध्येयांची स्वप्नसृष्टि नसते, त्या देशांतील लोक नष्ट होऊन जातात." (Where there is no vision, the people perish) हें त्याचें विधान खरें नाही काय ? विक्रमादित्यच कशाला, रामचंद्र, श्रीकृष्ण, बुद्ध किंबहुना ख्रिस्त या साऱ्याच विभूतींच्या अस्तित्वाविषयी संशोधकांत वाद आहेत. पण, त्या विभूतींचें चारित्र्य किंवा त्यांनी प्रवर्तिलेला ध्येयवाद यांच्याच सौंदर्याने आणि उदात्ततेने आज मानवी जीवन नटलेलें नाही काय ? राम, बुद्ध आणि ख्रिस्त या व्यक्ति, कांही संशोधक म्हणतात त्याप्रमाणे, कदाचित् अजिबात होऊन गेलेल्या नसतील. पण, त्यांचें त्यागी आणि तेजस्वी विभूतिमत्व हें आज सर्व जगाच्या स्फूर्तीचें निधान होऊन बसलेलें आहे. तेव्हा, त्या व्यक्ति ऐतिहासिक नाहीत असें संशोधकांनी अगदी कंठरवाने जरी सांगितलें, तरी त्यांच्या आदर्शाचे संस्कार ज्याच्या मनावर आणि बुद्धीवर शतकानुशतकें होत आलेले आहेत, त्या बहुजनसमाजावर असल्या तर्ककर्कश संशोधनाचा परिणाम काय होणार ?

कारण जग खरोखरी स्वप्नांवरच जगतें; अलिकडील कांही अर्थशास्त्रज्ञ समजतात त्याप्रमाणे निव्वळ भाकरीवर जगत नाही. जगांतले सगळे धर्म आणि त्या धर्मांतील स्वर्ग–मोक्षांच्या कल्पना हीं सगळीं खरोखरी स्वप्नेंच नाहीत काय? फार कशाला, कार्ल मार्क्सने वर्गविहीन समाजाची जी कल्पना आमरण मोठ्या निष्ठेने आणि धैर्याने पुरस्कारिली, ती कल्पना म्हणजे सुद्धा, वेदांतांतील निर्द्वंद्वावस्थेप्रमाणेच, एक स्वप्नच नाही काय? पण, त्या स्वप्नांत रमणें हा भाई रॉय यांचा स्वभाव बनलेला असून, त्याचा प्रचार करण्यासाठी त्यांनी खडतर कष्ट भोगलेले आहेत. मग त्यांनी विक्रमादित्याच्या कल्पनेलाच तेवढें का नाक मुरडावें? विक्रमादित्य ही, संशोधकांच्या मताप्रमाणे, अनैतिहासिक व्यक्ति असेल किंवा त्या नांवाचे अनेक राजे इतिहासांत होऊन गेलेले असतील. पण, विक्रमादित्य हें नांव उच्चारतांच शौर्य, धैर्य, चातुर्य, सौंदर्य आणि औदार्य यांचें जें वैभवशाली युग डोळ्यांपुढे उभें रहातें! —तो नवरत्नांचा दरबार की, ज्याचें पुढे दीड हजार वर्षांनी मोगल सम्राट् अकबर याने ईर्ष्येने अनुकरण केलें आणि तें मालवांचें गणराज्य की, ज्याच्या लोकशाही स्वातंत्र्याचा हेवा आजच्या समाजसत्ताक राष्ट्रांनाहि वाटावा! —त्या युगाइतके हिंदूंच्या इतिहासपुराणांतच केवळ नव्हे, तर एकंदर मानवजातीच्या इतिहासांतहि अधिक उज्ज्वल किंवा अधिक विशाल काय आढळणार आहे? विक्रमादित्य हें खरोखरीच जर एक स्वप्न असेल, तर जगांतल्या सगळ्या भव्यतेची मूस ओतून अशी स्वप्नमूर्ति निर्माण केल्याबद्दल हिंदु समाजाला धन्यता वाटावी, इतकें तें स्वप्न रम्य आणि दिव्य आहे.

आणि, विक्रमादित्याच्या सिंहासनाची जी एक कथा प्रचलित आहे, ती कथा म्हणजे त्या स्वप्नाच्या दिव्यतेचें एक प्रत्यंतरच होय. राजांचीं सिंहासनें ही अविचार आणि अत्याचार यांचीं अधिष्ठानें असतात, अशीच सामान्यतः इतिहासाची साक्ष आहे. पण, विक्रमादित्याचें सिंहासन हें न्यायाचें इतकें अचल, अविनाशी केंद्र होतें की, उज्जयिनीचा विध्वंस होऊन तें सिंहासन मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडलें गेलेलें असतांहि, गुराख्याचा एक पोरगा आपल्या सवंगड्यांतला तंटा तोडण्यासाठी म्हणून

सहजगत्या त्या ढिगाऱ्यावर बसला असतां, त्याच्या अंगांत न्यायदेवतेचा संचार होऊन त्याने अचूक निर्णय दिला. पृथ्वीपासून दोन हातांवर अधांतरीं चालणारा धर्मराजाचा रथ हा जसा जगांतील सत्यनिष्ठेचा निदर्शक होता, तसेंच विक्रमाचें हें मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडलें गेलेलें सिंहासन जगांतील न्यायनीतीचें प्रतीक होतें, हीच गोष्ट या दंतकथेवरून सिद्ध होत नाही काय? किंबहुना, मालवगणांचा लोकनियुक्त धुरीण आणि दिग्विजयी शकांचा संहारकर्ता असें ज्याचें वर्णन इतिहासपुराणांनी केलेलें आहे, त्या विक्रमाचें सिंहासन हें न्यायाचें अधिष्ठान असावें, यांत नवल काय? लाहोरपासून विजयानगरपर्यंत हिंदुस्थानांतील अनेक जुन्या राजधान्यांत स्मृतिशेष सम्राटांचीं सिंहासनें आजहि पुराणवस्तु खात्याचे दरवान आदराने दाखवितात. पण, विक्रमाचें जें सिंहासन आज पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि दाखवितां येणार नाही, तें भावी काळांतील लोकराज्यांनाहि आदर्श होऊन बसावें, यापरतें विक्रमादित्याच्या थोरवीचें आणखी कोणतें प्रमाण पाहिजे?

म्हणूनच, विक्रमाची स्मृति आणि संवत् हीं, आज दोन हजार वर्षें होऊन गेलीं तरी, या भरतखंडांत जिवंत आणि जागृत आहेत. कलियुगांत जे सहा शककर्ते सम्राट् होऊन गेल्याचें पुराणेतिहासांनी वर्णन केलेलें आहे, त्यांपैकी एकाचाहि शक आज लोकांच्या स्मरणांत राहिलेला नाही. पण विक्रमाचा शक मात्र आज आसेतुहिमाचल गाजतो आहे. इतकेंच नव्हे, तर 'विक्रमादित्य' हें नांव इतिहासांतील केवळ एक चिरविस्मृत व्यक्तिनाम होऊन न बसतां, भरतखंडांतील सम्राटांची एक स्पृहणीय पदवी, माननीय परंपरा होऊन बसली आहे. असा हा महान् नृपति आपल्याला माहित नसल्याचा बहाणा इतिहासाने केला म्हणून काय बिघडलें? त्याची कीर्ति ही हिमालयाच्या उत्तुंग शिखराप्रमाणे जगांतील सगळ्या उन्नत ध्येयांना लाजवीत युगायुगांवर पसरलेली आहे! त्याची स्मृति ही भरतभूमीच्या हृदयांतून वहाणाऱ्या गंगेच्या प्रशांत पवित्र प्रवाहाप्रमाणे भारतीयांच्या नसानसांतून स्फुरत आहे!

२५-३-१९४४

# वैशाखी

'वैशाखी' म्हणजे वैशाख महिन्यांतील पौर्णिमा. हिंदु पंचागांतील प्राय: प्रत्येक पौर्णिमा ही कोणत्या ना कोणत्या तरी पवित्र स्मृतीशी किंवा धार्मिक विधीशीं संलग्न झालेली आहे. पण, 'वैशाखी' हा शब्द उच्चारतांच विशेषतः बंगाल-बिहार प्रांतांतील जनतेच्या हृदयांत जशा भक्तिभावनेच्या ऊर्मि उचंबळून येतात, तसें बहुजनसमाजाच्या हृदयसागराला भरतीचें उधाण दुसरा कोणताहि पौर्णिमेचा चंद्र आणू शकत नसेल. कारण अडीच हजार वर्षांपूर्वी या पवित्र दिवशीं लुंबिनी वनांतील शाल वृक्षाखाली भगवान् बुद्धाचा जन्म झाला. पण, बुद्धाचा केवळ जन्मच 'वैशाखी'ला झाला असें नाही; याच पौर्णिमेच्या मध्यरात्रीं त्याला गया येथे अश्वत्थ वृक्षाखाली चार आर्य सत्यांचा साक्षात्कार होऊन त्याने बौद्ध धर्माची स्थापना केली. त्यापूर्वी तो 'गोतम बोधिसत्व' होता. 'बोधिसत्व' म्हणजे मनुष्याच्या उद्धाराचें ज्ञान मिळविण्यासाठी प्रयत्न करणारा प्राणी. हा 'बोधिसत्व' वैशाखीला 'बुद्ध' म्हणजे ज्ञानी झाला. त्यामुळे, कालची वैशाखी पौर्णिमा ही केवळ भरतखंडांतच नव्हे, तर चीन, जपान, ब्रह्मदेश, सीलोन वगैरे ज्या ज्या देशांत बुद्धाच्या धर्माचा प्रसार झालेला आहे, त्या त्या सर्व देशांत नितांत भक्तीने पाळली जाते.

पण, 'वैशाखी' ही केवळ बुद्धजन्मामुळेच पवित्र ठरलेली आहे, असें नाही. भगवंताचा नववा अवतार जो बुद्ध त्याच्या जन्मामुळे जसें या पौर्णिमेला पावित्र्य प्राप्त झालेलें आहे, त्याचप्रमाणे त्याचा दुसरा अवतार जो कूर्म तोहि याच दिवशीं भूतलावर प्रकट झाला. पण, भूतलावर प्रकट झाला, असें तरी कसें म्हणावें ? जयदेवाने आपल्या 'गीतगोविंदां'त म्हटलें आहे—

**क्षितिरतिविपुलतरे तव तिष्ठति पृष्ठे**
**धरणिधरणकिणचक्रगरिष्ठे ।**
**केशव धृतकच्छरूप जय जगदीश हरे ॥**

तेव्हा, ज्याने प्रलयसागरांत बुडत असलेली पृथ्वी आपल्या प्रचंड पाठीवर सावरून धरून तिला स्थैर्य आणलें, त्याचें वर्णन तो भूमीवर अवतीर्ण झाला, या शब्दांनी कसें करावें ? पृथ्वीची ज्याने धारणा केली किंबहुना आज पृथ्वी ज्याच्या पाठीवर स्थिर आहे, असें भाविक हिंदु समजतात, त्याने पृथ्वीवर अवतार घेतला, असें कसें म्हणतां येईल ? पण म्हटलें जातें आणि तें खरेंहि आहे. हिंदूंच्या अवतारकल्पनेंत जर कोणतें अनन्य वैशिष्टय असेल, तर तें हें की, इतर धर्मांचे संस्थापक आणि प्रेषित हे एकदाच जगदुद्धारार्थ अवतीर्ण झाले. पण हिंदु धर्मांतील परमेश्वर काय किंवा प्रेषित काय हे मात्र मानवजातीच्या उन्नतीसाठी युगायुगाला जन्म घेत असतात. या कल्पनेचें मर्म उघड आहे. परमेश्वर किंवा त्याचा प्रेषित हे भूतलावर एकदाच प्रकट होतात आणि जगाची कायमची व्यवस्था लावून जातात, ही कल्पना अप्रयोजकपणाची नाही काय ? या कल्पनेमुळेच ख्रिस्ती, मुसलमान वगैरे धर्म हे अत्यंत असहिष्णु, अत्यंत प्रगतिपराङमुख झालेले आहेत. उलट, जगाच्या उद्धारार्थ ईश्वराला किंवा त्याच्या प्रेषितांना पुनः पुन्हा अवतार घ्यावा लागतो, याचा अर्थच हा की, जग सारखें सुधारत आणि बदलत राहिलें पाहिजे,—मानवजातीची सारखी प्रगति आणि उन्नति होत राहिली पाहिजे. हिंदूंच्या अवतारकल्पनेंतील या वैशिष्टयामुळेच तो समाज इतका सहिष्णु आणि समावेशक झालेला आहे.

हिंदु अवतारकल्पनेच्या या वैशिष्टयाचे उत्कृष्ट प्रत्यंतर बुद्धचरित्राइतकें दुसरें कोणतें दाखवितां येईल ? जयदेवाने बुद्धाचें वर्णन असें केलेलें आहे की—

**निन्दसि यज्ञविधेरहह श्रुतिजातं**
**सदयहृदय दर्शितपशुघातं**
**केशव धृतबुद्धशरीर जय जगदीश हरे**

पण, आश्चर्याची गोष्ट अशी की, यज्ञांतील पशुहत्या पाहून हृदय पिळवटून गेल्यामुळे वेदविहित यज्ञमार्गाची निंदा करणाऱ्या या पाखंडयाला हिंदूंच्या मुख्य अवतारप्रणालींत स्थान मिळालें. या विसंगत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत
अनुक्रम क्रमांक वि:


घटनेचा अन्वयार्थ कसा लावावयाचा? तिचा अर्थ असा करतां येईल काय की, उपनिषदांतील तत्त्वज्ञानाच्या प्रभावानेंहि जेव्हा यज्ञयाग आणि त्यांतील पशुहनन हें थांबेना, तेव्हा 'मूले कुठार:' या न्यायाने श्रुति आणि श्रौत मार्ग हींच मुळी त्याज्य ठरविणारा बुद्ध हा तत्कालीन हिंदूंनी वंदनीय मानला? श्रुति आणि उपनिषदें यांतील अध्यात्माच्या किंवा ज्ञानाच्या कल्पना या मानवजातीच्या प्रगतीला आणि उन्नतीला अपुऱ्या पडतात, असें ज्या वेळीं हिंदु समाजांतील डोळस विचारी व्यक्तींना दिसून आलें, तेव्हा नव्या सत्याचा आणि ज्ञानाचा द्रष्टा जो बुद्ध त्याचें अनुयायित्व त्यांनी पत्करलें; व त्याला ईश्वराचा अवतार कल्पून, आपल्या अध्यात्मवाङमयांत त्याच्या नव्या तत्त्वज्ञानाचा समावेश करून घेतला. हिंदूंच्या अवतारप्रणालींत जी प्रगति आहे, मत्स्यापासून तों नरसिंहासारख्या अर्धपशुमानवापर्यंत आणि कुऱ्हाडीने मनुष्यसंहार करणाऱ्या परशुरामापासून तों 'अक्रोधेन जयेत् क्रोधम्' म्हणणाऱ्या बुद्धापर्यंत जो जीवनकल्पनेचा विकास तींत दिसून येतो, तो जगाच्या आध्यात्मिक वाङमयात खरोखरीच अपूर्व होय.

पण, बुद्ध हा केवळ नवीन ज्ञानाचा द्रष्टा होता, एवढेंच नाही; तर तो क्रांतदर्शी तत्त्वज्ञहि होता. केशवसुतांनी 'दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके' असें कवीचें वर्णन केलेलें आहे. 'क्रांतदर्शी' म्हणजे जो भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही काळांतून पलिकडे पहातो,—ज्याची दिव्य अंतर्भेदी दृष्टि युगायुगांवर खेळत असते, असा अभिनव ज्ञानाचा द्रष्टा. बुद्ध हा अशा प्रकारचा द्रष्टा,—ज्याचें तत्त्वज्ञान भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही कालांना पुरून उरेल अशा प्रकारचा क्रांतदर्शी तत्त्वज्ञ आहे,—असें म्हणावयाला काय हरकत आहे? किंबहुना, भारतीय साम्यवाद्यांचे अग्रणी राहुल सांकृत्यायन यांनी जगांतील सर्व तत्त्वज्ञानाचें आलोडन केल्यानंतर बुद्ध धर्माची जी दीक्षा घेतली, ती बुद्धाचें तत्त्वज्ञान हें मनुष्याच्या उद्धाराचें सर्वांत प्रभावी तत्वज्ञान आहे या जाणिवेनेच नव्हे काय? महात्माजींचा अनासक्तीचा आणि अनत्याचाराचा सिद्धांत

बुद्धाच्या अतृष्णेच्या आणि अहिंसेच्या सिद्धांताचेंच नवें 'दर्शन' असून, 'सम्यक् आजीवा'चा त्याचा सिद्धांत हा एका परीने साम्यवादांतील अत्युच्च कल्पनांहूनहि श्रेष्ठ म्हणतां येईल असा आहे. अशा या उदात्त तत्त्वज्ञानाचें दर्शन बोधिसत्वाला वैशाखी पौर्णिमेच्या मध्यरात्रीं अश्वत्थ वृक्षाखाली तो विमुत्तिसुखांत निमग्न असतांना झालें, म्हणून ती पौर्णिमा मानवजातीच्या इतिहासांत अविस्मरणीय होऊन बसली. त्या पौर्णिमेचा चंद्र ज्या वेळीं नभोमध्यावर येतो, त्या वेळीं ज्या नव्या ज्ञानाच्या दर्शनाने बोधिसत्व पुलकित आणि प्रसन्न झाला, त्याची प्रतीति येऊन जग हर्षभराने उद्गारतें —

**सो बोधिसत्तो रतनवरो अतुल्यो ।**
**मनुस्सलोके हितसुखताय जातो ॥**

९-५-१९४४

# मग 'वाट चुकलेल्यां'चें काय?

म. गांधी आणि व्हाइसरॉय लॉर्ड वॅव्हेल यांचा जो पत्रव्यवहार गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झाला आहे, तो जरी समेटाला अनुकूल असें वातावरण उत्पन्न करावयाला कारण झाला, तरी त्या पत्रव्यवहारांतून एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. गेलीं दीड पावणे दोन वर्षें ब्रिटिश सरकार जगाला सतत कंठरवाने असें सांगत आलेलें आहे की, १९४२ च्या ऑगस्टमध्ये गांधीजींच्या प्रेरणेनुसार अ. भा. कॉंग्रेस समितीने जो ठराव केला, तो ठराव पुढे घडलेल्या साऱ्या अनर्थांचें मूळ होय. वस्तुत: या ठरावांत कोणत्याहि प्रकारचा निश्चित आदेश जनतेला दिलेला नव्हता किंवा भावी चळवळीची रूपरेषाहि सूचित केलेली नव्हती. पण, त्या ठरावाच्या उत्तरार्धांत जो 'सँक्शन' हा युरोपियन राजकारणांत अलिकडे गाजलेला शब्द योजला होता, त्या संदिग्ध, अनाख्यात शब्दाकडे बोट दाखवूनच सरकार कॉंग्रेसवर हा आरोप करीत आलें

आहे, यांत शंका नाही. म्हणून, महात्माजींनी आपल्या ता. ९ एप्रिलच्या पत्रांत या शब्दाविषयी असा निश्चित खुलासा करून टाकला आहे की, "या ठरावांतील मागणीच्या मागे जें 'प्रमाण' किंवा 'शासन' (Sanction) आहे, तें 'प्रमाण' म्हणजे अत्याचार नव्हे, तर आत्मक्लेश होय. जो कोणी,—मग तो काँग्रेसजन असो वा अन्य कोणी असो,—या नियमाच्या विरुद्ध वागलेला असेल, त्याला त्या आपल्या कृत्याबाबत काँग्रेसचें नांव वापरण्याचा काहीहि अधिकार नाही." *( The sanction behind the demand in the resolution was not violence but selfsuffering. Anyone, be he congressman or other, who acted against this rule of conduct has no authority to use the congress name for his action. )*

गांधीजींच्या पत्रांतील हीं मर्मवाक्यें जेव्हा आज लपत छपत आयुष्याचे दिवस कंठीत असलेल्या हजारो बेपत्ता फरार कांग्रेस कार्यकर्त्यांच्या वाचनांत येतील, तेव्हा त्यांना काय वाटेल ? श्री. अच्युत पटवर्धन, श्री. नी. मु. घटवाई, सौ. अरुणा असफअली प्रभृति जे हजारो देशभक्त आज अज्ञातांत अंतर्धान पावलेले आहेत आणि ज्यांना पकडण्यासाठी सरकारने हजारो रुपयांचीं बक्षिसें लावलेलीं आहेत, त्यांना गांधीजींनी ऑगस्ट ठरावांतील 'सँक्शन' शब्दाबद्दल केलेला हा खुलासा योग्य वाटेल की अयोग्य ? गांधीजी आता 'सँक्शन' या शब्दावर काय वाटेल तें भाष्य करोत. पण, ऑगस्ट उठावणींत ज्या लक्षावधि कांग्रेस कार्यकर्त्यांनी भाग घेतला आणि आपल्या जीवितवित्ताची राखरांगोळी करून घेतली, त्यांची भावना हीं सगळीं घातापाताचीं कृत्यें करतांना अशीच नव्हती काय की आपण काँग्रेसच्या आज्ञेनुसार वागत आहोंत ? आपल्याला अत्यंत प्रिय असलेल्या जगद्वंद्य नेत्याच्या आणि राष्ट्रसभेच्या आदेशानुसार आपण वागत आहोंत अशी भावना जर त्यांच्या हृदयांत प्रज्वलित झालेली नसती, तर जीं साहसाचीं आणि स्वार्थत्यागाचीं अचाट कृत्यें १९४२ च्या त्या दोन तीन महिन्यात त्यांच्या हातून घडलीं, तीं घडलीं असतीं काय ? अशा स्थितींत, बंधमुक्त झालेल्या गांधीजींनी 'सँक्शन' या शब्दाचा आपल्या

मनांत असलेला ' आत्मक्लेश ' हा अर्थ आता जाहीर करून, "घाता-पाताचीं कृत्यें करणारांना कॉंग्रेसच्या नांवाचा उपयोग करण्याचा कांहीहि अधिकार नाही ", अशी जी घोषणा केलेली आहे, ती वाचून आपल्या पायांखालचा आधार तुटला, असें जर या फरारी देशभक्तांना वाटलें, तर नवल काय ?

अर्थात् गांधीजींची ही सँक्शनबद्दलची घोषणा ही आपली फसवणूक, —आपली नागवणूक आहे असें जर त्यांना वाटलें, तर त्यांत त्यांचा कांही दोष आहे काय ? गांधीजी फार तर त्यांना एवढेंच म्हणूं शकतील की, " गेलीं तीन तपें मी अहिंसावादी आहे. माझें जीवन अहिंसामय होऊन गेलेलें आहे आणि हिंदुस्थानाला जें स्वातंत्र्य मिळावें असें मला वाटतें तें अहिंसेच्या मार्गानें मिळालें तरच मला हवें आहे, या सगळ्या गोष्टी तुम्हाला माहित होत्या ना ? मग ऑगस्ट ठरावांतील ' सँक्शन ' या शब्दाचा अनर्थ करून तुम्ही अत्याचारी कृत्यें का केलींत ? " एका अर्थानें महात्माजींच्या या म्हणण्यांत तथ्य आहे. पण, उलट त्यांनाहि असें विचारतां येण्यासारखें आहे की, " ऑगस्ट चळवळीची पूर्व तयारी करतांना ' चले जाव ', ' उघड बंड ', ' माझ्या गैरहजेरींत ज्याच्या बुद्धीला जो मार्ग योग्य वाटेल त्या मार्गानें त्यानें जावें ' वगैरे जे शब्दप्रयोग आणि वाक्यप्रयोग तुम्ही केलेत,—किंबहुना कांही कांही प्रसंगीं हिंसा ही क्षम्य आणि अपरिहार्य असतें असेंहि जें तुम्ही सांगितलेंत,—त्या सगळ्या तुमच्या विधानांच्या अनुषंगानें ऑगस्ट ठरावाचा जो अर्थ आम्ही केला, त्यांत आमची चूक कोणती झाली ? ' हरिजन– ' च्या शेवटल्या अंकांत तुमचे पट्टशिष्य श्री. काकासाहेब कालेलकर आणि श्री. किशोरीलाल मश्रूवाला यांनी जे आदेश लोकांना दिले, ते जरी सशस्त्र नव्हे तरी सक्रिय प्रतिकाराला प्रोत्साहक नव्हते काय ? मग तसा प्रतिकार आम्ही केला, राज्ययंत्राला खीळ घालण्याची धडपड आम्ही केली व त्या प्रतिकाराचें आणि धडपडीचें पर्यवसान कुठें कुठें अनिच्छेनें अत्याचारांत झालें, तर त्याबद्दल तुम्ही आम्हांला लगेच झिडकारून दूर लोटणार काय ? सरकारच्या दहशतीची नंगी तलवार

आमच्या डोक्यावर आज लटकतेच आहे. अशा स्थितींत, आता आमच्या गुरुमाउलीनेहि आम्हाला आपल्या पायांपासून लाथाडून दूर लोटलें, तर आम्ही दोन्हीकडून नागवले गेलों, असें होणार नाही काय ?"

या त्यांच्या आर्त प्रश्नांना गांधीजी काय उत्तर देऊं शकतील ? गोपीनाथ सहा, भगतसिंग, राजगुरु प्रभृतींना गांधीजींनी ज्या अर्थाने पूर्वी ' चुकलेले देशभक्त ' ( Misguided Patriots ) म्हटलें, त्या अर्थाने या निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्त्यांना ' चुकलेले ' म्हणून धिक्कारणें किंवा अव्हेरणें त्यांना शक्य आहे काय ? ते जर ' वाट चुकले 'च असतील,—आणि चुकले आहेत यांत संशय नाही—तर गांधीजींनी आपलें मार्गदर्शनाचें कर्तव्य चोख बजावलें नाही म्हणून चुकले,—त्यांनी शेवटपर्यंत आपल्या भावी चळवळीच्या स्वरूपाबद्दल संदिग्धता आणि मुग्धता स्वीकारल्यामुळे वाट चुकले,—अशीच खरोखरी वस्तुस्थिति नाही काय ? १९४२ चा ऑगस्ट महिना उजाडण्यापूर्वी जवळ जवळ सहा महिने गांधीजी ' चले जाव ' चा घोष करीत होते, ' उघड बंडा 'ची भाषा बोलत होते आणि ' अमानुष राज्ययंत्रा 'ला खीळ घालण्याची चर्चा करीत होते. पण, मौज अशी की, आपल्या भावी चळवळीची रूपरेषा-देखील त्यांनी अगदी शेवटल्या क्षणापर्यंत म्हणजे नऊ ऑगस्टची पहाट उजाडेपर्यंतसुद्धा स्पष्ट केली नव्हती. अशा स्थितींत, गेलीं पंचवीस वर्षें ज्यांनी गांधीजींच्या प्रत्येक चळवळींत आणि कार्यांत निष्ठेने भाग घेतला, त्यांच्या साधनेला आपलें जीवितवित्त अर्पण केलें, अशा हजारो कार्यकर्त्यांनी, त्यांना अटक झाल्याबरोबर आपल्या नेत्याने निर्माण केलेल्या त्या दिङ्मूढ अवस्थेंत स्वतःच्या बुद्धीला असहकाराचा म्हणा वा सक्रिय प्रतिकाराचा म्हणा जो मार्ग सुचला त्याचें अनुसरण केलें, याबद्दल त्यांना दोष देणें कितपत न्यायाचें होईल ? ते ' वाट चुकले ' ही गोष्ट गांधीजींच्या पत्रांतील ' सँक्शन ' शब्दावरल्या भाष्याने आता सिद्धच झाली आहे. पण, ते ' वाट चुकले ' असले, तर गांधीजींनी त्यांना वेळींच वाट दाखविली नाही, शेवटल्या क्षणापर्यंत अंधारांत

ठेवलें म्हणून वाट चुकले, असेंच कोणीहि म्हणेल. तेव्हा, स्वतःच्या चुकीमुळे 'वाट चुकलेल्या' या आपल्या हजारों अनुयायांना वाचवण्याची पहिली जबाबदारी आज गांधीजींवर आहे, असें म्हणणें अयोग्य होईल काय ?

आज या कार्यकर्त्यांना विद्रोही, फितुरी आणि पंचमस्तंभी ठरवून सरकारने त्यांची मालमत्ता जप्त केली आहे, त्यांना पकडून देण्याबद्दल बक्षिसें लावलीं आहेत व त्यांच्यापैकी जे कोणी हातीं सापडले त्यांना कडक शिक्षा ठोठावल्या आहेत. अशा स्थितींत, गांधीजींनीहि जर 'ते आमचे कोणी नाहीत' असें जाहीर करून त्यांना आता झिडकारलें, तर त्यांची गति काय होईल ? आपल्या प्रिय नेत्यानेहि आपल्या साहसाचें आणि स्वार्थत्यागाचें कांही चीज केलें नाही, हें पाहून त्यांच्या भावनोत्कट मनाला किती वेदना होतील ? ब्रिटिश सरकारने बंडखोर ठरवून फासावर चढवलेल्या एका आयरिश क्रांतिकारकाने शेवटल्या क्षणीं मातृभूमीला उद्देशून असे उद्गार काढलेले होते की,—

When he who adores thee has left but the name
Of his fault and his sorrow behind,
Oh ! wilt thou weep, when they darken the fame
Of a life that for thee was resign'd !
Yes, weep, and however my foes may condemn,
For Heaven can witness, though guilty to them,
I have been but too faithful to thee.

ऑगस्ट उठावणींत फरारी झालेल्या, देशोधडीला लागलेल्या, तुरुंगांत खितपत पडलेल्या किंवा फासावर लटकण्याच्या बेतांत असलेल्या हिंदी साहसिकांची मनोभावना तरी यापेक्षा काय निराळी असणार आहे ? हे कॉंग्रेस कार्यकर्ते अहिंसेच्या व्रतापासून च्युत झालेले असतील, त्यांच्या कृतींचें पर्यवसान अत्याचारांत झालेलें असेल आणि व्हाइसरॉयांनी तक्रार केल्याप्रमाणे त्यांच्या कृत्यांमुळे युद्धकार्यांतहि अडथळे उत्पन्न झालेले असतील. त्यांच्या या वर्तनाचें समर्थन कोणीच करीत नाही.

तरीसुद्धा, त्यांना वाचवणें, हें गांधीजींचें आणि राष्ट्रसभेचें आज पहिलें कर्तव्य आहे. गांधी-इर्विन कराराच्या वेळीं भगतसिंग, राजगुरु आणि दत्त यांचीं मतें आणि मार्ग आपल्याला मान्य नसतांनाहि गांधीजींनी त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली नाही काय ? मग, सरकारने अकारण सुरू केलेल्या दडपशाहीची प्रतिक्रिया म्हणून जे अत्याचार घडले असें गांधीजी स्वतः मानतात, त्या अत्याचारांबद्दल सरकारच्या क्रोधाला बळी पडलेल्या या कार्यकर्त्यांना वाचवल्याशिवाय ते कसे राहातील ? आज जे हजारों काँग्रेस कार्यकर्ते फरार आहेत, तुरुंगांत आहेत किंवा फाशीच्या अंमलबजावणीची वाट पाहात आहेत त्यांच्या मुक्ततेची आणि जीवदानाची हमी जर समेटाच्या वेळीं गांधीजी मिळवूं शकले नाहीत, तर त्या हुतात्म्यांच्या अश्रूंनीं आणि रक्ताने डागळलेला तो समेट, तो कलंकित समेट !-तो कोणाला सन्मान्य आणि स्वीकार्य वाटेल ?

२१-६-४४

# एका वेळीं दोन लग्नें

युद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत, दुसऱ्या आघाडीवर हजारों ब्रिटिश सैनिक आज प्राणपणाने लढत असतां, गेल्या आठवड्यांत ब्रिटिश पार्लमेंट एका महत्त्वाच्या प्रश्नाचा खल करण्यांत दंग झालेलें होतें. हा प्रश्न कोणता म्हणाल ? तर एक बायको जिवंत असतां दुसरी बायको करण्याचा जो धडाका सध्या इंग्लंडमध्ये सुरू आहे, त्याला आळा घालण्याचा ! लॉर्ड मॉटिस्टन यांनी उमरावसभेंत असा ठराव आणला होता की, " (१) प्रत्येक स्त्री आणि पुरुष नागरिकाने आपल्या परिचयपत्रकांत आपल्या विवाहित अथवा अविवाहित जीवनाची सारी माहिती भरून द्यावी; व (२) लग्नासाठी परवाना मागणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर हें परिचयपत्रक अधिकारीवर्गापुढे सादर करण्याची सरकारने सक्ती

करावी." यावर ब्रिटिश सरकारतर्फे अर्ल मन्स्टर यांनी असा खुलासा केला की, दुसरें लग्न करावयाला प्रवृत्त होणारे लोक आपल्या परिचय-पत्रकांत खोटी महिती द्यावयाला चुकणार नाहीत! अर्थात् लॉर्ड मॉटिस्टन यांचा हा ठराव ब्रिटिश सरकारने स्वीकारला नाही. तथापि, इंग्लंडांत सध्या एक बायको जिवंत असतां दुसरी बायको करण्याची जी साथ आलेली आहे, तिला प्रतिबंध कसा करावा या विवंचनेंत आपण आहोंत, असें जाहीर करावयाला मात्र या चर्चेच्या प्रसंगीं ब्रिटिश सरकारचे मुखंड चुकले नाहीत.

इंग्लंडांत सध्या दुसऱ्या लग्नांची साथ आली आहे, हें वाचून मराठी वाचक खात्रीने आश्चर्यचकित होऊन जातील. कारण, मराठी वृत्तपत्रांतून नेहमीं येणारी टवाळी वाचून त्यांची अशी कल्पना झालेली आहे की, एक बायको जिवंत असतां दुसरें लग्न करणारे नरपुंगव फक्त महाराष्ट्रांतच आहेत आणि ते नरपुंगव म्हणजे मराठी साहित्यिक! पण वैयक्तिक कुचाळीच्या कर्दमांत रमणारीं मराठी वृत्तपत्रें कांहीहि म्हणोत. ही गोष्ट निर्विवाद आहे की, अनेकपत्नीत्व हें जगांतील ख्रिस्ती धर्म न स्वीकारलेल्या बहुतेक सर्व देशांत सर्रास प्रचलित असून, महाराष्ट्रांतील कांही थोडया पांढरपेशा जाति सोडल्यास इतर जातींत एका पुरुषाने अनेक बायका करणें ही एक अगदी मामुली चाल आहे. खुद्द ब्राह्मणांत आणि विशेषत: उच्च क्षत्रिय जातींतहि अनेकपत्नीत्वाची रूढि अगदी परवा परवापर्यंत होती. क्षत्रियकुलावतंस श्रीशिवाजी-महाराज यांच्या अनेक लग्नांची गोष्ट जरी दृष्टिआड केली, तरी थोरले बाजीराव, नानासाहेब, राघोबादादा, दुसरे बाजीराव वगैरे पेशवे कुटुंबांतील पुरुषांच्या अनेक स्त्रिया आणि रक्षाहि होत्या, हें इतिहासांत महशूर नाही काय? अजूनहि महाराष्ट्रांतील जुन्या संपन्न वतनदार घराण्यांतील ब्राह्मण, मराठे किंवा कायस्थ प्रभु या उच्च पांढरपेशा जातींतील पुरुषांनी एकाच वेळीं अनेक बायका केल्या असल्याचें पुष्कळ वेळां आढळांत येतें. तेव्हा, परंपरागत रूढि, पूर्वीचा इतिहास किंवा आजची समाजस्थिति लक्षांत न घेतां, केवळ साहित्यिक तेवढेच दुसरें लग्न करतात, असा भ्रम उत्पन्न करण्यांत काय अर्थ?

पण, असल्या लग्नांकडे जे केवळ कुचाळीच्या दृष्टीने पाहातात, त्यांना आपल्या समाजाची रचना आणि त्यांतील रूढि माहीत नाहीत, त्याच्या आर्थिक आणि सामाजिक गरजांची जाणीव नाही, असें म्हणणें प्राप्त आहे. हिंदु समाजांतील सामान्यत: सगळ्या श्रमजीवी जातींत अनेक लग्नें करण्याचा सर्रास प्रघात आहे. का ? तर शेतांत, गिरणींत, घाण्यावर किंवा हातमागावर काम करणाऱ्या प्रत्येक पुरुषाला अनेक बायका असणें हें कुटुंब आणि धंदा चालविण्याच्या दृष्टीने सोईचें पडतें म्हणून. या श्रमजीवी जातींतील अनेकपत्नीत्व हें आर्थिक आणि व्यावसायिक निकडीवर आधारलेलें असतें; व तीं लग्नें श्रमविभागाला कारण होतात. आर्थिक कारणांइतकेंच आणखीहि एक प्रबळ कारण एकाच वेळीं अनेक लग्नें करण्याला प्रेरक किंवा प्रोत्साहक होतें. वतनदार म्हणा किंवा संपन्न म्हणा घराण्यांतून वंशसातत्याची चाड विलक्षण असते. वंध्यत्व आणि निपुत्रिकत्व हे हिंदु समाजाने दुर्भाग्याचे दोन घोर प्रकार मानलेले आहेत ही गोष्ट जरी सोडून दिली, तरी संपत्ति किंवा जमीनजुमला जवळ असणाऱ्या व्यक्तींना आपलें घराणें सतत पुढे चालावें, अशी तळमळ वाटणें अगदी स्वाभाविक नाही काय ? या तळमळीमुळे पुष्कळदां स्वत:ला अपत्य होण्याच्या बाबतींत निराश झालेली मोठ्या घराण्यांतील स्त्री आपल्या नवऱ्याला दुसरें लग्न करावयाला भाग पाडते; क्वचित् आपल्या नात्यांतल्या तरुण मुलीशींहि त्याचें लग्न लावून देते; व अशा रीतीने वंशधारकाची जन्मदात्री जरी नव्हे, तरी 'मोठी आई' होण्याचा बहुमान मिळवते. महाराष्ट्रांतील उच्च जातींतल्या अनेक सुविद्य आणि संपन्न घराण्यांतून या कारणांमुळे झालेल्या दुसऱ्या लग्नाचीं उदाहरणें किती तरी दृष्टीस पडतील.

खुद्द इंग्लंडांतहि एकाच वेळीं अनेक लग्नें करण्याची जी ही साथ उद्भवली आहे, ती कोणत्या कारणामुळे ? तर युद्धामुळे अठरा ते चाळीस वर्षें वयाची देशांतील सबंध तरुण पिढी रणांगणावर प्रत्यक्ष लढावयाला गेल्यामुळे म्हणा किंवा युद्धकार्यांत गुंतल्यामुळे म्हणा, इंग्लंडांतील तरुण विवाहेच्छु मुलींवर कुमारी रहाण्याची आपत्ति

ओढवली आहे म्हणून ! परिस्थितीने लादलेलें हें असंमत कौमार्य सर्वच मुलींच्याने पाळणें होतें असें नाही; व त्यामुळे जे थोडे तरणेबांड पुरुष देशांत उरलेले आहेत, त्यांच्यावर अनेक तरुण मुलींच्या उड्या पडून, ही एकाच वेळीं अनेक बायका करण्याची साथ इंग्लंडसारख्या एकपत्नीव्रती ख्रिस्ती राष्ट्रांत फैलावली आहे. गेल्या महायुद्धाच्या वेळीं अनेकपत्नीत्वाबरोबरच व्यभिचार आणि तज्जन्य विवाहबाह्य संतति यांची साथ सर्व युरोपांत पसरलेली होती. या विवाहबाह्य संततीला त्या वेळीं मोठ्या कौतुकानें 'वॉर बेबीज' म्हणजे 'युद्धापत्यें' म्हणून संबोधिलें जात असे; व रशिया, फ्रान्स आणि इंग्लंड या तीन देशांनी तरी अशा लाखों युद्धापत्यांना अधर्म्य, हीन किंवा त्याज्य न मानतां त्यांचें राष्ट्रहितबुद्धीने लालनपालन केलें, हें प्रसिद्धच आहे. तेव्हा, दुसरीं लग्नें ही केवळ साहित्यिक भानगड किंवा कामवासनेच्या तृप्तीचा एक ग्राम्य प्रकार नसून, ती एक आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक समस्या आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. वैवाहिक सुख हा प्रत्येक स्त्री-पुरुषाचा जन्मसिद्ध हक्क आहे; व त्या हक्काची पूर्तता जेव्हा सामाजिक किंवा आर्थिक अडचणींमुळे होत नाही, तेव्हा समाजांत व्यभिचार आणि स्वैराचार बोकाळतो. अनेकपत्नीत्व हें एरवी कितीहि अनिष्ट आणि आक्षेपार्ह असलें, तरी व्यभिचारापेक्षा आणि स्वैराचारापेक्षा तें क्षम्य ठरत नाही काय ?

२२-६-१९४४

# आनंदवनभुवनांत महात्माजी

आषाढी एकादशीच्या दिवशीं म. गांधी हे आपल्या परिवारासह पांचगणीला जाणार आहेत. पांचगणीला जाऊन विश्रांति घेण्याचा हा सल्ला महात्माजींना कोणी दिला असेल तो असो. पण, त्यांच्या सध्याच्या मानसिक आणि शारीरिक स्थितींत त्यांना आराम करा-

वयाला इतकें सुंदर, सात्त्विक आणि सामर्थ्यप्रद स्थळ दुसरें क्वचितच सापडेल. सह्याद्रीचीं जीं उंचांतलीं उंच पठारें या महाराष्ट्रभूमींत आहेत, त्यांपैकी पांचगणी हें एक आहे. किंबहुना, गोदावरी आणि कृष्णा या दोन नद्यांच्या मधल्या ज्या निसर्गरम्य प्रदेशाला श्रीसमर्थांनी 'आनंदवनभुवन' म्हणून गौरविलेलें आहे, त्याचा हें पठार म्हणजे गाभाराच होय. श्रीसमर्थ आणि श्रीशिवाजीमहाराज यांची ही कर्मभूमि; सज्जनगड आणि प्रतापगड हे सभोवतालच्या निळसर धुक्यांतून आपलीं मस्तकें वर काढून त्या दोघांच्या अवतारकार्याची साक्ष देत आजहि या भूमींत खडे उभे आहेत; व ज्या कृष्णाकोयनांच्या प्रीतिसंगमाने सारें आनंदवनभुवन समृद्ध करून सोडलें, त्यांचें हें उगमस्थान. अशा या सह्याद्रीच्या गाभाऱ्यांत महात्माजी जेव्हा जाऊन राहातील, तेव्हा आज नव्या प्रकाशासाठी चाचपडत असलेल्या त्यांच्या दुःखदग्ध दिङमूढ मनाला त्या आनंदवनभुवनांत आशेचा नवा किरण दिसेल, अशी उमेद करावयाला काय हरकत आहे ?

किंबहुना, या महाराष्ट्रांत सह्याद्रीच्या गाभाऱ्यांतील ही एकच जागा, हें एकच स्थळ असें आहे की, जेथे ठाण दिल्यावर संशयाने आंदोळत असलेलीं मनें खडकासारखीं खंबीर व्हावीत आणि दुःखाने पोळलेलीं हृदयें आनंदाने फुलून जावीत. अफझुलखानाच्या स्वारीच्या प्रसंगीं सर्व महाराष्ट्र जेव्हा कावरा बावरा होऊन गेला, मराठ्यांच्या तरुण छत्रपतीला जेव्हा आपण कसे वागलों असतां या प्रसंगांतून यशस्वितेने पार पडूं याचा निश्चित बोध होईना, तेव्हा समर्थांनी जिला 'रामवरदायिनी' म्हणून आळविलेलें आहे, त्या प्रतापगडच्या भवानीनेच त्यांना कौल दिला नाही काय ? आज महात्माजीहि एका परीने गांगरल्यासारखे झालेले दिसत असून, पूर्वी कधी नव्हे इतकी त्यांना सल्लामसलतीची गरज सध्या वाटत आहे. प्रियजनांच्या मृत्यूमुळे त्यांचें जात्याच हळवें हळुवार मन खचून गेलेलें आहे. त्यांतच ज्यांना अभिमानाने 'अपरहृदय' म्हणावें अशा अंतेवासी पट्टशिष्यांच्या निर्णयप्रमादाची मनाला डागणी ! त्यामुळे, नदीच्या डोहांतील

कंमळांच्या वेलांत हत्तीचा पाय गुंतून त्याला कोणत्याहि प्रकारची हालचाल करणें जसें अशक्य व्हावें, तसा आज त्यांच्या नेतृत्वाचा कोंडमारा झालेला आहे. पण त्याबद्दल दोष तरी कुणाला देणार ? कारण आपलेच ओठ आणि आपलेच दात ! 'लोकीं तर्किलें तें दावी । निर्फळ करूनी ' अशा लोकविलक्षण वृत्तीचे जे महंत असतात, त्यांच्या मनोगताचा थांग शेवटल्या क्षणापर्यंत त्यांच्या अनुयायांना लागत नाही; व मग त्या अनुयायांच्या प्रमादाबद्दल अनुताप करण्याचा प्रसंग त्या महंतांवर येतो. तशीच अवस्था आज महात्माजींची झालेली नाही काय ?

मनाच्या अशा विकल, विचलित स्थितींत महात्माजी सह्याद्रीच्या गाभाऱ्यांतील या उन्नत, एकांत आणि पवित्र स्थळीं विश्रांति घ्यावयाला जावेत, हें खरोखरीच सुदैव होय. उगवत्या आणि मावळत्या सूर्याच्या सौम्यसुंदर प्रभेंत तो सज्जनगड आणि तो प्रतापगड जेव्हा महात्माजी पाहातील, शक्तियुक्तीचीं आणि नीतिभक्तीचीं तीं आनंदवनभुवनांतील उध्वस्त केंद्रें जेव्हा रोज त्यांच्या दृष्टीस पडतील, तेव्हा त्यांच्या श्रांत, संतप्त मनाला काय वाटेल ? त्या भंगलेल्या अजस्त्र किल्ल्यांच्या दर्शनाने कोणता नवा बोध, कोणती नवी स्फूर्ति त्यांच्या भ्रान्त मनाला प्राप्त होईल ? ते आज ज्या मन:स्थितींत आहेत, त्याच मन:स्थितींत एकदा समर्थहि होते. त्या वेळीं समर्थांनी भगवंताची अशी करुणा भाकलेली होती की—

**कल्याण करी देवराया । जनहित विवरी ॥**

**तळमळ तळमळ होत चि आहे । हे जन हातिं धरी ॥**

**अपराधी जन चुकत चि गेले । तुझा तूं चि सांवरी ॥**

**कठीण त्यावरि कठीण जालें । आतां न दिसे उरी ॥**

**कोठें जावें काय करावें । आरंभिली बोहरी ॥**

महात्माजी तरी आपल्या सांजसकाळच्या प्रार्थनेंत दुसरें काय मागत असतील ? समर्थांप्रमाणे तेहि देवाशीं एकांतांत हितगुज करणारे

मौनी आणि मनस्वी आहेत. आपल्या एका स्नेह्याला घातलेल्या पत्रांत 'मज रघुनाथजी वेगळें कोण्ही जिवलग नाही' असें ज्याप्रमाणे समर्थांनी म्हटलेलें आहे, त्याचप्रमाणे गांधीजीहि म्हणूं शकतील. कारण, एकपत्नी, एकबाणी आणि एकवचनी अशा त्या पतितपावनाचें भजन केल्याशिवाय, तुलसीदासजींनी गाईलेलें त्यांचें उदात्त चरित्र ऐकल्याशिवाय आणि त्याचें तें त्रिभुवनांत आदर्श ठरलेलें रामराज्य या पुरातन भूमींत पुन्हा स्थापन होवो अशी प्रार्थना केल्याशिवाय त्यांचा एकहि दिवस सुना जात नाही. म्हणून, गांधीजी मनाच्या आणि प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठी आनंदवनभुवनांत जाणार, यापरती दुसरी आनंदाची गोष्ट नाही.

किंबहुना, महात्माजी पांचगणीच्या निवांत निर्मळ वातावरणांत येऊन राहिल्यावर त्यांना मौनाची आणि मननाची इतकी मुबलक संधि मिळेल की, आपल्या अंतरात्म्याचा जो प्रकाश आज त्यांना लुप्त झाल्यासारखा वाटत आहे, तो हळुहळू प्रकट झाल्याशिवाय राहाणार नाही. सर तेज सप्रू, ने. ना. डॉ. बाबासाहेब जयकर, ना. श्रीनिवास शास्त्री प्रभृति अनेक सुहृदांना आणि मुत्सद्यांना त्यांनी सल्ला देण्यासाठी बोलाविलें आहे, हें खरें. पण, त्यांचा स्वभाव असा आहे की, इतर अनेकांची सल्लामसलत ऐकल्यावरहि ते स्वतःची बुद्धि जो निर्णय देईल, त्या निर्णयानुसारच पुढलें पाऊल टाकीत असतात. आणि तेंच बरोबर आहे. समर्थांनी बुद्धीला प्रबोधशक्ति म्हटलेलें आहे; व या शक्तीचें स्थैर्य आणि तेजस्विता ही कोणत्याहि परिस्थितींत कायम राहाणें हें त्यांनी महंताच्या सामर्थ्याचें मर्म म्हणून सांगितलेलें आहे. हें सामर्थ्य जेव्हा कोणत्याहि कारणामुळे लटपटतें, तेव्हा चराचराला कार्यप्रवृत्त करणाऱ्या आदिशक्तीची आराधना करणारे महंत हे त्या शक्तीला शरण जात असतात. कारण, त्यांची स्वतःची शक्ति म्हणजे त्या आदिशक्तीचा केवळ एक स्फुलिंग, त्या शक्तीच्या असीम सामर्थ्याची केवळ एक शलाका असते. गांधीजींना आज आपल्या प्रबोधशक्तीविषयी, आपल्या स्वतःच्या सामर्थ्याविषयी

विश्वास उरलेला नसल्यामुळेच ते बंधमुक्त झाल्यापासून सारखे कोणाशी ना कोणाशी तरी चर्चा करीत राहिलेले नाहीत काय? पण, सह्याद्रीच्या या गाभाऱ्यांत, जिथे प्रतापगडाच्या उत्तुंग टोकावर आदि-शक्तीचें जागृत स्थान आहे, तेथे जाऊन राहिल्यावर त्या शक्तीच्या साक्षात्काराने त्यांची स्वतःची प्रबोधशक्ति जागृत झाल्याशिवाय कशी राहील? समर्थांप्रमाणे ते जेव्हा त्या रामवरदायिनीची करुणा भाकतील की,—

**दुष्ट संव्हारिले मागें । ऐसें उदंड ऐकतों ।।**
**परंतु रोकडें कांही । मूळ सामर्थ्य दाखवी ।।**
**देवांचीं राहिलीं सत्वें । तूं सत्व पाहसी किती ।।**
**भक्तांसी वाढवीं वेगीं । इच्छा पूर्ण परोपरी ।।**

तेव्हा ती आनंदवनभुवनांतील आदिशक्ति त्यांच्या प्रबोधशक्तीची म्लान झालेली ठिणगी पुन्हा प्रज्वलित केल्याशिवाय कशी राहील?

३०–६–१९४४

# सूर्यग्रहण

येत्या गुरुवारीं सकाळीं जें सूर्यग्रहण होणार आहे, त्याकडे सर्व जगाचे डोळे लागलेले आहेत. हिंदुस्थानांत या ग्रहणानिमित्त कुरुक्षेत्रीं प्रचंड यात्रा भरणार असून, शिवाय अगदी लहान सहान तीर्थांच्या ठिकाणींसुद्धा नाना प्रकारचीं धार्मिक कृत्यें करण्यांत येतील. कारण हिंदूंच्या दृष्टीने सूर्यग्रहण हा पर्वकाळ आहे. समुद्रमंथनाच्या वेळीं सूर्य-चंद्रांनी चुगली केल्यामुळे अमृतप्राशन करावयाला न मिळाल्याकारणाने चिडलेले दैत्य राहु आणि केतु हे सूर्यचंद्रांचा ग्रास करावयाला जेव्हा धावतात, तेव्हा जगताला प्रकाशमान करणाऱ्या या ज्योतिर्गोलांना ग्रहण लागतें, अशी पौराणिक कथा आहे; व म्हणून ग्रहणाच्या वेळीं

या दिव्य ज्योतींच्या मुक्ततेसाठी भाविक हिंदु उपोषण, जपजाप्य, दानधर्म वगैरे करतात. इतकेंच नव्हे, तर राहु आणि केतु हे सूर्यचंद्रांना गिळू पहाणारे क्रूरकर्मे ग्रह आपल्या जातीचे आहेत, अशा समजुतीने अस्पृश्य बांधव ग्रहणाच्या वेळीं 'दे दान, सुटे गिराण' असें मोठमोठ्याने ओरडत दारोदार जातात; व त्यांना दानधर्म केल्याने ग्रहण सुटेल, अशा समजुतीने स्पृश्य हिंदु त्यांना भिक्षा घालतातहि.

राहु आणि केतु हे दैत्य असले, तरी त्यांचा आणि अस्पृश्य जातींचा संबंध काय? कारण, हे दैत्य कितीहि दुष्ट समजले जात असले, तरी ते कश्यप आणि दिति यांचे पुत्र म्हणजे अर्थातच ब्राह्मण नाहीत काय? किंबहुना, देवेंद्रानें जेव्हा मेघांचा मार्ग रोखणाऱ्या वृत्रासुराचा वध केला, तेव्हा त्याला ब्रह्महत्येचें पातक लागून कांही काळ इंद्रपदाला मुकावे लागले, ही कथा प्रसिद्धच आहे. मग ग्रहणाच्या दिवशीं अस्पृश्यांना दानधर्म करण्याची ही चमत्कारिक कल्पना कशी निघाली? राहु आणि केंतु हे छायाग्रह आहेत व त्यांची सावली सूर्यचंद्रांवर पडल्याने त्यांचा तेजोलोप होतो, हें तर या कल्पनेचें कारण नसेल? वस्तुतः, राहु आणि केतु यांची गणना जरी नवग्रहांत होत असली, तरी बुध, गुरु, शुक्र, मंगळ किंवा शनि यांच्याप्रमाणे ते काही डोळ्यांना प्रत्यक्ष दिसणारे अगर हर्षल किंवा नेपच्यून यांच्याप्रमाणे दुर्बिणीने दृग्गोचर होणारे ग्रहगोल नाहीत; तर ग्रहणाच्या वेळीं चंद्र किंवा पृथ्वी यांची जी छाया पडते, तिलाच राहु आणि केतु अशीं नांवें प्राचीन ज्योतिर्विदांनी दिलेलीं आहेत. ऋग्वेदांतील सौरसूक्तांत ग्रहणाचें असें वर्णन केलेलें आहे की, "हे सूर्या, असुर स्वर्भानूने तुला तमाने आच्छादिलें, तेव्हा कोणालाहि आपलें स्थान दिसेना. तमाने झाकलेल्या सूर्याला अत्रीने ब्रह्मज्ञानाने मुक्त केलें." अर्थात् ग्रहणाच्या वेळीं सूर्यचंद्रांवर तमाचें आच्छादन होतें, कोणताहि दैत्य त्यांना गिळीत नाही, याचें सम्यग्ज्ञान ऋग्वेदकालींहि भारतीयांना होतें, हें उघड आहे.

मग ग्रहणाच्या वेळीं जपजाप्य किंवा दानधर्म करण्याचें कारण काय? किंवा ग्रहणाचीं जीं शुभाशुभ फलें वर्तविलीं जातात, तीं काय

म्हणून ? याचें कारण उघड आहे. " सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च " असें सूर्याचें वर्णन ऋग्वेदांत केलेलें असून, हिंदूंचें त्रिकाळ संध्यावंदन हा खरोखरी सूर्योपासनेचाच एक प्रकार होय. 'आदित्यहृदया 'मध्येंहि त्याचें वर्णन " सर्वात्मा सर्वकर्ता च सृष्टिजीवनपालकः। एष एव प्रजा नित्यं संवर्धयति रश्मितः। कालात्मा सर्वभूतात्मा वेदात्मा विश्वतोमुखः। " इत्यादि नाना प्रकारच्या समर्पक विशेषणांनी केलेलें आढळतें. इतकेंच नव्हे, तर भगवद्गीतेमध्यें उत्तरायणांत शुक्ल पक्षामध्ये दिवसा आणि तेंहि रविवारीं योगी पुरुषाला मरण आलें असतां तो ब्रह्मपदाला जाऊन पोचतो, नाही तर दक्षिणायनांत कृष्ण पक्षामध्ये रात्रीं मृत्यु आला असतां त्याला चंद्रलोकाला जाऊन पुण्यांश सरल्यावर पुनर्जन्म घ्यावा लागतो, असा सूर्याचा महिमा पर्यायाने सूचित केलेला आहे. सूर्याकडे पाहाण्याची ही जी प्राचीन भारतीयांची दृष्टि, ती जरी दिसावयाला धार्मिक असली, तरी ती अर्वाचीन भौतिक शास्त्रांच्या कसोटीला उतरण्याइतकी निर्दोष आहे, असें कोण म्हणणार नाही ? किंबहुना, पुरुषसूक्तांत 'चक्षोः सूर्यो अजायत' या शब्दांनी परमपुरुषाच्या नेत्रांपासून सूर्य निर्माण झाला, असें जें वर्णन केलेलें आहे, त्या प्रतीकात्मक वर्णनांत काव्य आणि शास्त्र या दोहोंचाहि सुंदर मेळ पडलेला दिसतो.

तेव्हा, ज्या सूर्यनारायणाला प्राचीन भारतीय जगताचा आत्मा समजत होते, त्या सूर्यावर तमाचें आवरण आलें असतां, त्या आवरणांतून तो जगदात्मा मुक्त व्हावा, म्हणून त्यांनी उपोषण किंवा उपासना करावी, यांत काय नवल ? सूर्यावरील सामान्य डाग हे हवामानावर, पीकपाण्यावर आणि विद्युत्शक्तीवर अनिष्ट परिणाम करतात, असा शास्त्रज्ञांचा अनुभव आहे. मग, तो सूर्य, अल्प काळ का होईना, चंद्राच्या छायेने ग्रासला गेला असतां त्याच्या त्या ग्रहणाचा परिणाम पृथ्वीच्या जीवनावर झाल्याशिवाय कसा राहील ? सूर्यचंद्रांना छायेमुळे ग्रहणें लागतात, याची पूर्ण कल्पना असतांनाहि भारतीय आर्य पर्वकाळीं जीं धर्मकृत्यें करतात, तीं याच भावनेने ! त्याहिपेक्षा महत्वाची गोष्ट ही की, सूर्यग्रहण हें राष्ट्रीय दृष्टचा अनिष्ट असतें असा त्यांचा अनुभव

भारतीय युद्धाच्या काळापासून असल्यामुळे, त्या ग्रहणाच्या बाबतींत हिंदु लोक साहजिकच जास्त सोत्कंठ, जास्त सचिंत असतात. दुर्दैवाने उद्याचें सूर्यग्रहण हें अशा वेळीं येत आहे की, ज्या वेळीं भारताचा राष्ट्रीय आत्मा हा मोहाने ग्रस्त झालेला दिसतो. अनार्याला शोभणारें, अधोगतीला नेणारें आणि दुष्कीर्तिकारक असें ज्या कश्मलाचें वर्णन भगवंतांनी अर्जुनाचें हृदयदौर्बल्य पाहून कुरुक्षेत्रावर केलेलें होतें, त्या कश्मलाने आज भारताचा आत्मा ग्रासलेला असून, पुढारी गांगरले आहेत आणि जनता भांबावली आहे. अशा या राष्ट्रीय ग्रहणाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं '**धियो यो नः प्रचोदयात्**' या संध्यावंदनांतील गायत्रीमंत्रांतल्या शब्दांपेक्षा अधिक कोणते समर्थ किंवा समर्पक शब्द त्या जगदात्म्याची प्रार्थना करावयाला सापडतील ?

१९-७-१९४४

# इतिहासाची पुनरावृत्ति का होते ?

म. गांधी यांनी गेल्डरला दिलेल्या मुलाखतींत एक नवीन सूत्र प्रतिपादिलेलें असून, त्या सूत्राच्या आधाराने आपल्या बदललेल्या धोरणाची तरफदारी सध्या चालविली आहे. हें सूत्र असें की, "इतिहासाची पुनरावृत्ति होत नाही." (History does not repeat itself) "इतिहासाची पुनरावृत्ति होत असते," [History repeats itself] असें एक पाश्चात्य सुभाषित आहे. गांधीजींनी आपल्या नव्या सूत्राने या जुन्या लोकप्रिय सुभाषिताला एका परीने आव्हान दिलें असून, इतिहासक्रमाचे सर्वसामान्य नियम आपल्या तत्त्वज्ञानाला किंवा धोरणाला लागू पडत नाहीत, असें पर्यायाने जाहीर केलें आहे. पण हें खरें आहे काय ? किंवा प्रज्ञावान् माणसें आपल्या कोणत्याहि लोकविलक्षण कृत्यांना मोहक स्वरूप देण्यासाठी तात्त्विक समर्थनाचें तेजोवलय त्यांच्याभोवती निर्माण करतात, त्यांतलाच हा एक बुद्धि-

चापल्याचा प्रकार आहे ? विशेषत:, आपल्या प्रत्येक कृतीला तात्त्विक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा गांधीजींचा जो प्रयत्न असतो, तो लक्षांत घेतां, त्यांच्या या नव्या सूत्राची छाननी, त्यांच्या आजपर्यंतच्या वर्तनाच्या दृष्टीने करणें अवश्य आहे, असें कोण म्हणणार नाही ?

पण " इतिहासाची पुनरावृत्ति होते " या जुन्या सुभाषिताचा तरी अर्थ काय होतो ? इतिहासांत जी गोष्ट एकदा घडून गेलेली असते, ती पुन्हा जशीच्या तशीच घडलेली कांही कधी दिसत नाही. मग पुनरावृत्ति या शब्दाचा अर्थ येथे काय घ्यावयाचा ? त्याचा अर्थ फक्त एवढाच दिसतो की, मानवी स्वभावाचीं मूल तत्त्वें हीं अचल असल्यामुळे मनुष्याच्या कर्तृत्वाने घडणारा जो इतिहास, त्यांत सारखे सारखे प्रसंग वारंवार घडतांना दृष्टीस पडतात; व मानवी संस्कृतीचा पसारा आणि भपका बाह्यत: जरी डोळे दिपण्यासारखा वाढला, तरी मानवी स्वभाव हा न बदलणारा असल्यामुळे, रोजच्या व्यवहाराची कलुषता किंवा क्रूरता ही कांही कमी होत नाही. अर्थात् इतिहासाच्या पुनरावृत्तीच्या या तत्त्वांत एक प्रकारचा नियतिवाद अभिप्रेत आहे. हाच नियतिवादाचा आरोप साम्यवादी तत्त्वज्ञानांतील ऐतिहासिक विकासक्रमाच्या तत्त्वावरहि अनेक चिकित्सकांनी केलेला आहे. कारण, ऐतिहासिक विकासक्रमानुसारच जर सगळ्या गोष्टी आपोआप घडत जाणार असतील, तर मानवी कल्पकता आणि कर्तबगारी यांना स्वतंत्र वाव कुठे उरतो ? आणि मग मनुष्याची मातब्बरी ती काय उरली ? पण, इतिहासाच्या पुनरावृत्तीचें काय किंवा ऐतिहासिक विकासक्रमाचें काय हीं नियतिवादाला पर्यायाने पोषक असलेलीं तत्त्वें भारतीयांना मात्र मुळीच मान्य नाहीत. 'राजा कालस्य कारणम्' या महाभारतांतील लोकप्रिय उक्तींत मानवी कर्तृत्वाने कालाचा ओघ आणि स्वरूप बदलतें, ही भारतीयांची निष्ठा अगदी निस्संदिग्ध रीत्या व्यक्त झालेली आहे; व 'राजा' या शब्दाच्या जागीं 'नेता' हा शब्द घालतांच ती उक्ति या लोकशाहीच्या काळालाहि लागू पडते. अर्थात् गांधीजींनी, " इतिहासाची पुनरावृत्ति होत नाही " या नव्या सूत्राची घोषणा करून, पाश्चात्य तत्त्वज्ञानांतील सुसंस्कृत दैववादाला एका परीने ठोकर दिलेली नाही काय ?

पण, पाश्चात्यांच्या सुसंस्कृत दैववादाला महात्माजींनी दिलेली ही ठोकर कितीहि कौतुकास्पद असली, तरी गेल्या दोन तपांचें त्यांचें स्वतःचें राजकीय नेतृत्व या नव्या सूत्राच्या कसोटीला कितपत उतरतें ? चोवीस वर्षांच्या या काळांत १९२० सालची असहकारितेची, १९३० सालची कायदेभंगाची आणि १९४२ सालची ऑगस्ट उठावणीची अशा एकंदर तीन मोठ्या चळवळी त्यांनी केल्या. या तिन्ही चळवळींतील त्यांचीं धोरणें म्हणा किंवा डावपेच म्हणा हा सारा पुनरावृत्तीचाच डोंबारी खेळ नाही काय ? १९२० सालीं लो. टिळकांच्या आदेशानुसार राष्ट्रसभेने कायदेमंडळांच्या निवडणुकी जिंकण्याची जय्यत तयारी केली होती. पण, त्यांच्या मृत्यूनंतर गांधीजींनी कौन्सिलांत जाणें 'हराम' ठरवून असहकाराची चळवळ सुरू केली; व द्विदल राज्यघटना मोडून टाकण्याच्याहि वलगना केल्या. पण, त्यानंतर पांच वर्षांच्या आंतच 'हराम' ठरवलेल्या कौन्सिलांत काँग्रेसवाले घुसले, कांही दिवस रुसले आणि शेवटीं सहकार्याला द्राविडी पद्धतीने प्रवृत्त होऊन कायदेमंडळांच्या मायाजालांत फसले. १९३० सालीं पुन्हा हाच घोळ घालण्यांत आला. गोल परिषदेवर बहिष्कार घालून गांधीजींनी कायदेभंगाची मोहीम सुरू केली; जे अन्यपक्षीय नेते त्या परिषदेला गेले, त्यांचा 'देशद्रोही' म्हणून धिक्कार करण्यांत आला; व शेवटीं गांधीजींनी चळवळीचें अस्त्र आवरतें घेऊन स्वतःच गोल परिषदेला जाण्यासाठी इंग्लंडची वाट घाई घाईने धरली. आज पुन्हा त्याच प्रकाराची पुनरावृत्ति होत आहे. १९४२ सालीं क्रिप्ससाहेब शिष्टाईसाठी धावत पळत येथे आले असतां गांधीजींनी त्यांची योजना झिडकारल्यामुळे त्यांना रडव्या तोंडाने परत जाण्याचा प्रसंग आला. उलट, आज गांधीजी त्यांच्या योजनेपेक्षाहि हिणकस अशा राष्ट्रीय सरकारवर, कोल्हा काकडीला राजी या म्हणीनुसार, संतोष मानावयाला तयार झालेले पाहून क्रिप्ससाहेबांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु पडत असतील.

गेल्या दोन तपांतील चळवळींचे हे तीन ढोबळ प्रकार लक्षांत घेतल्यावर 'इतिहासाची पुनरावृत्ति होत नाही' हें गांधीजींचें नवें सूत्र

त्यांच्या स्वतःच्या कर्तबगारीला लागू पडतें, असें म्हणण्याचें धैर्य कोण करील ? कौन्सिलें 'हराम' आहेत असा पुकारा करणाराने "पार्लमेंटरी मनोवृत्ति आता कायमची राहाणार" (Parliamentary mentality has come to stay) अशी घोषणा करून आपल्या अनुयायांना मंत्रिपदें घेण्याचा सल्ला द्यावा या पांच वर्षांपूर्वीच्या प्रकारांत आणि "क्रिप्स योजना काँग्रेसने स्वीकारल्यास माझें स्थान तुरुंगांत आहे", असें म्हणणाऱ्याने त्या योजनेपेक्षा हिणकस असें 'राष्ट्रीय सरकार' मिळविण्यासाठी आता नाना तऱ्हेचे खटाटोप आरंभावे, या प्रकारांत उघड असणारी इतिहासाची लाजिरवाणी पुनरावृत्ति कशी छपणार ? प्रत्येक जीवनोपयोगी वस्तूवर आणि राज्यकारभाराच्या प्रत्येक खात्यावर फर्मानशाहीचे पोलादी शिक्कामोर्तब बसलेलें दिसत असतां नुसत्या मुलकी अधिकारांचें नामधारी 'राष्ट्रीय सरकार' मागण्यांत आपण त्या शब्दांची विटंबना करीत आहोंत, याचें भान गांधीजींसारख्या महामुत्सद्याला नसेल, असें कसें म्हणावें ? आणि कदाचित् आपली ही सपशेल शरणागति झाकण्यासाठीच तर त्यांनी या नव्या सूत्राचें गोंडस आवरण आपल्या निसरड्या धोरणावर घातले नसेल ना ? पण, गेल्या चोवीस वर्षांत तत्त्वें, धोरण आणि डावपेच यांची जी कंटाळवाणी पुनरावृत्ति त्यांनी आपल्या दुरतिक्रम स्वभावानुसार केलेली आहे, ती ध्यानांत घेतां हें नवें तत्त्व म्हणजे ऑगस्ट उठावणीच्या थडग्यावरील शिलालेख आहे, असें का म्हणू नये ?

२२-७-१९४४

# क्रांतीची लाट कशी थोपवणार ?

"पॅरिस मुक्त झालें—फ्रान्समध्ये आनंदी आनंद !"—"छे, पॅरिसमधील जर्मन शिबंदी अजून प्राणपणाने लढत असून, दोस्तांच्या फौजा पॅरिसपासून अद्याप बऱ्याच दूर आहेत !!" किंवा "बोर्डोचा

दोस्त फौजांनी पाडाव केला—आता इतरहि फ्रेंच बंदरांवर दोस्तांचा विजयध्वज फडकणार!!"—"छे, बोर्डो अजून पडलें नाही किंवा फ्रान्सच्या आग्नेय किनाऱ्यावर कुठेच अद्याप दोस्तांच्या फौजांचा पाय लागलेला नाही!!"—अशा ज्या परस्परविरोधी वार्ता गेल्या दोन तीन दिवसांत विशेषतः फ्रान्समधील आघाडीवरून आल्या, त्यांचा अर्थ काय? इंग्लंड आणि अमेरिका यांचें फ्रेंच आघाडीवरील सैन्य आज या शहरांत घुसलें आणि त्या बंदरात उतरलें अशा बातम्या एकामागून एक येऊन थडकाव्यात, बादशहा सहावे जॉर्ज आणि राष्ट्रपति श्री. रूजवेल्ट यांनी या शतकृत्याबद्दल सहर्ष अभिनंदनाचे संदेश आप आपल्या सेनापतींना पाठवावेत,--तोंच त्या बातम्या चुकीच्या, भडक किंबहुना निखालस खोटया असल्याचे खुलासे लगोलग प्रसिद्ध करण्यांत यावेत, हें कशाचें लक्षण आहे? जर्मनांच्या तावडींतून फ्रेंच क्रांतिकारकांनी मुक्त केलेल्या पॅरिसमध्ये ज्या क्षणीं दीपोत्सव चाललेला असेल अशी आल्हाददायक कल्पना आपण अगोदरची तार वाचून करावी, त्याच क्षणीं जर्मन शिबंदीच्या मारगिरीने पॅरिसची होळी होत असल्याचा उद्वेगजनक वृत्तांत वाचण्याचा प्रसंग आपल्यावर यावा, हा काय प्रकार आहे? इतक्या चुकीच्या म्हणा, भडक म्हणा अगर खोटया म्हणा बातम्या दोस्तांच्या नभोवाणीवरून, न मिळालेल्या विजयाची ढोलकी बडवीत, का सांगण्यात याव्यात? ज्याचा खोटे-पणा पुढल्याच क्षणीं चव्हाठयावर येतो, असला हा अनृत प्रचार करण्याचें कारण काय?

याचें कारण हें असेल काय की, रशियाची पूर्व युरोपांतील आघाडीवर जी सारखी प्रगति धडाक्याने चालू आहे किंवा त्याच्या मुसंडीमुळे जीं बाल्कन राष्ट्रें चीं चीं करीत शरण येत आहेत, तसाच पराक्रम आपणहि पश्चिम युरोपांतील आघाडीवर गाजवीत आहोंत, असा देखावा उत्पन्न करून बिचाऱ्या भोळया जगाला दिपवावें? रशि-याच्या पूर्व रणांगणावरील विजयांत जी विजेची तळप आणि धडक

आहे, ती आमच्याहि पश्चिम रणांगणावरील विजयांत आहे, असें जगाला भासवण्याचा हेतु या भडक बातम्यांच्या भरमसाट प्रचारांत असेल काय? सांगणें कठीण आहे. बाल्टिक आणि बाल्कन राष्ट्रें रशियाच्या तडाक्याने कोलमडून पडलेलीं आज दिसत आहेत; रुमानिया शरण आला आणि बल्गेरिया शरण येण्याच्या बेतांत आहे; जर्मनीला एका बाजूने पोलंडकडून आणि दुसऱ्या बाजूने हंगेरीतून निश्चित शह लागलेला आहे!–पण आपण त्या मानाने कुठे आहोंत? इटलियन आघाडीवर किंवा फ्रेंच आघाडीवर होत असलेली आपली प्रगति त्या मानाने कासवचालीची आहे, असेंच जगाला वाटण्याचा संभव नाही काय?–अशा तऱ्हेच्या कांही तरी कल्पना मनांत येऊन तर इंग्लंड आणि अमेरिका यांची युद्धवार्ता खातीं या धादांत भडक बातम्या चुरशीने उठवीत नसतील ना? रशियाच्या तोलाची बहादुरी आपण गाजवीत आहोंत आणि त्याच्या तोडीचे जय आपण मिळवीत आहोंत, असें जगाला भासवल्याशिवाय आपली आंतरराष्ट्रीय इज्जत आणि इभ्रत टिकणार नाही, अशा भावनेने तर हा अनृत प्रचार चालला नसेल? आणि, जर्मनांचा पराभव आक्टोबरांत होणार किंवा डिसेंबरांत होणार, अशी जीं भाकितें माँटगॉमेरी आणि आयझनहोअर यांच्या-सारखे जबाबदार सेनापति करीत आहेत, तींसुद्धा याच कोटींतली असतील काय?

अशा तऱ्हेचीं उतावळीं भाकितें आणि भडक बातम्या दोस्त राष्ट्रांनी स्वतःची इज्जत वाचवण्यासाठी उठवाव्यात, अशीच खरोखरी आज युरोपांतील चमत्कारिक परिस्थिति आहे. पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, रुमानिया, युगोस्लाव्हिया आणि बल्गेरिया हे युरोपांतील पांचहि देश आज सोव्हिएट क्रांतीच्या मार्गावर असून, त्यांपैकी झेकोस्लोव्हाकिया आणि रुमानिया या दोन्ही देशांत रशियाचें वर्चस्व दृढमूल होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. झेकोस्लोव्हाकियाचा जो प्रदेश जर्मनीच्या तावडींतून मोकळा झालेला आहे, त्या प्रदेशांत आपली राज्यसत्ता कशा रीतीने स्थापन करावी, याची वाटाघाट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम ........ विः ........
ग्रंथ विः ........



करण्यासाठी इतके दिवस लंडनमध्ये ब्रिटिश सरकारच्या आश्रयाला येऊन राहिलेल्या झेक मंत्रिमंडळाचे सदस्य मॉस्कोला गेलेले आहेत ! त्याचप्रमाणे, युगोस्लाव्हियांतील रशियाच्या बगलेंतला जर्मनीविरुद्ध यशस्वी उठावणी करणारा स्वतंत्र सेनापति मार्शल टिटो याचें नेतृत्व आता बालराजा पीटर याने मान्य केलेलें असून, युगोस्लाव्हियाच्या भावी राज्यघटनेंत राजपद कायम रहावें की नाही, या प्रश्नाचा विचार युगोस्लाव्हिया पूर्णपणे स्वतंत्र झाल्यावर करण्यांत यावा, असे तूर्त ठरलेलें आहे ! अर्थात् बालराजा पीटर याला इतके दिवस आपल्या दरबारीं ठेवून ब्रिटिश सरकारने युगोस्लाव्हियाला आपल्या ताटाखालचें मांजर बनविण्याचा जो घाट घातला होता, त्याला मार्शल टिटोने खो दिलेला दिसतो. रशियाच्या संरक्षक छत्राखाली रुमानियामध्ये जें नवें सरकार स्थापन होऊं घातलेलें आहे, त्यांत कमुनिस्ट पक्षाचे प्रमुख हे मंत्री म्हणून घेतले जातील, असें जाहीर झालेलें आहे. पोलंडमधील कम्युनिस्टांची जी स्वातंत्र्य समिति रशियाच्या पोलंडवरील स्वारींत भाग घेत आहे, तिचे प्रतिनिधि भावी पोलिश सरकारांत घेण्याची अट इंग्लंडातील पळपुटे पोलिश सरकार मान्य करील, असा रंग दिसतो. गेल्या दोन तीन दिवसांतल्या या साऱ्या ताज्या बातम्या युरोपांत सोव्हिएटांच्या लाल क्रांतीला प्रारंभ झाल्याचें सूचित करीत नाहीत काय ? इतकेंच नव्हे, तर चर्चिलबहादुर आज जे इटलीला सारखे खेटे घालून पोपशीं हितगुज करीत आहेत, ते युरोपांत ही जी लाल क्रांति होऊं घातलेली आहे, तिला आळा घालण्यासाठीच होय, असें म्हटल्यास तें काय चूक ठरेल ?

किंबहुना, फ्रान्सचा जो भाग जर्मनीच्या आक्रमणांतून मुक्त झालेला आहे, त्या भागांत सेनापति द गॉल यांच्या नेतृत्वाखाली जे लोकसत्ताक राज्य स्थापन व्हावें, अशी दोस्तांची इच्छा आहे, त्या राज्याचें स्वरूप केवळ जुन्या पद्धतीचें लोकसत्ताक राहील किंवा सोव्हिएट धर्तीवर समाजसत्ताक होईल, याचा भरवसा आज कोणालाच वाटत नाही. जर्मनीने पहिला टोला हाणताच १९४० सालच्या जूनमध्ये फ्रान्स

जें कोलमडून पडलें, तें त्या वेळच्या प्रजासत्ताक राज्यांतील लाचलुचपतीमुळे आणि फितुरीमुळे पडलें, असा स्पष्ट अभिप्राय आँद्रे मॉर्वा यांच्यासारख्या माहितगार फ्रेंच लेखकानें दिलेला आहे. तो अभिप्राय लक्षांत घेतां पुन्हा तशाच प्रकारची ठिसूळ लोकशाही राजवट फ्रान्समध्ये सुरू करूं द्यावयाला फ्रान्समधील समाजवादी कामगारवर्ग तयार होईल काय ? की रशियांतील सोव्हिएट राजवटीचें प्रचंड प्रतिकारसामर्थ्य पाहून नवीन प्रकारची समाजवादी लोकशाही फ्रान्समध्ये स्थापन व्हावी, असा आग्रह तो धरील ? अमेरिकन वार्ताहरांना अशी भीति वाटत आहे की, फ्रान्समध्ये समाजवादी लोकशाही म्हणजे सोव्हिएट सरकार स्थापन होणार ! त्याबरोबरच, रशियाने सीरिया आणि लेबॉनॉन यांच्या स्वातंत्र्याला मान्यता देऊन मध्य आशियांतील म्हणजे पूर्वेकडील राष्ट्रांत आपल्या धोरणाविषयी जो विश्वास उत्पन्न केला आहे, तो पाहूनहि इंग्लंड आणि अमेरिका यांच्या पोटांत कळ उठलेली दिसते. रशियाच्या या धोरणाचें अभिनंदन करतांना कैरोचें 'अल–बालाग' पत्र म्हणतें, "इराणच्या राजकारणांत रशियाला महत्त्वाचें स्थान असून, तुर्कस्थान आज रशियाच्याच धोरणाला अनुकूल आहे; व इराकमध्येहि रशियाने आपल्या वकालतीचें केंद्र स्थापन केलें आहे." (Russia now has a high place in Iran; that her policy is favoured in Turkey; and that she has created a Legation in Iraq.) चीनमध्ये तर चालू घटकेलाहि स्वतंत्र कम्युनिस्ट राज्यें असून, तीं सेनापति चँग–कै–शेक यांच्या राष्ट्रीय सरकारच्या विरुद्ध आहेत, हें प्रसिद्धच आहे.

युरोप आणि आशिया या दोन्ही खंडांत सोव्हिएट क्रांति होण्याची जीं हीं प्रसादचिन्हें दिसत आहेत, त्यांना अपशकुन किंवा अडथळा करण्याचें सामर्थ्य आज इंग्लंडच्या मनगटांत आहे काय ? सीरिया, लेबॉनॉन, तुर्कस्थान, इजिप्त, इराक वगैरे राष्ट्रांत सोव्हिएट रशियाचें हें जें वर्चस्व वाढत आहे, तेवढेच एक भय पूर्वेकडील ब्रिटिश साम्राज्याला आहे, असें नाही. जपानविरुद्ध लढण्याच्या बाबतींत

अमेरिका जी आज मुक्त हस्तानी इंग्लंडला मदत करीत आहे, तिचा मोबदला ती अखेर काय मागेल, हाहि प्रश्न ब्रिटिश मुत्सद्यांना या क्षणीं सतावीत आहे. कारण, सीनेटर केनेथ मॅककेलर यांनी असें जाहीर केलेलें आहे की, "अमेरिकेच्या बचावासाठी वेस्ट इंडीजमधील बर्मडा वगैरे बेटें अमेरिकेला अवश्य असल्यामुळे तीं इंग्लंडने युद्धानंतर आमच्या स्वाधीन केलीं पाहिजेत. चालू युद्धांत अमेरिकेने जितका स्वार्थत्याग केला आहे, तितका कांही इंग्लंडने केलेला नाही !" अर्थात् एका बाजूने लाल क्रांतीच्या पूर्वेकडील प्रसाराचें आणि दुसऱ्या बाजूने अमेरिकेच्या दोस्तीपोटीं होणाऱ्या शिरजोर मागण्यांचें असें दुहेरी संकट बिचाऱ्या ब्रिटिश साम्राज्यावर आज कोसळूं पाहात आहे. त्यांपैकी एक वेळ अमेरिकेच्या बाबतींत, सहोदर संबंधामुळे, कांही साटें-लोटें होऊं शकेल. पण रशियन सेनेच्या दिग्विजयाबरोबर पश्चिमेकडून पूर्वेकडे पसरत चाललेली लाल क्रांतीची लाट ब्रिटिश सरकार कशी थोपवून धरणार ? ती लाट थोपवून धरण्याची धडपड जर इंग्लंडने केली, तर नर्मदेचा प्रवाह आपल्या हजार हातांनी अडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहस्रार्जुनासारखीच त्याचीहि गति होणार नाही काय ?

२९-८-४४

# दोन तपें

लो. बाळ गंगाधर टिळक यांनी इहलोक सोडल्याला आज ता. १ ऑगस्ट १९४४ रोजीं दोन तपें पूर्ण होतात. लोकमान्यांच्या देहावसानाचा हा दिवस हिंदुस्थानाच्या आधुनिक इतिहासांत अनेक कारणांमुळे संस्मरणीय होऊन बसलेला आहे. चोवीस वर्षांपूर्वी त्यांच्या मृत्यूच्या या दिवशींच म. गांधी यांनी असहयोगाचें रणशिंग फुंकलें; व हिंदी राजकारणांतील टिळकयुग संपून गांधीयुगाला, केवळ नेतृत्वाचा खांदेबदल

होऊनच नव्हे, तर चळवळीच्या मूलभूत तत्त्वांतच मुळी क्रांति होऊन, विद्युद्वेगाने प्रारंभ झाला. इतकेंच नव्हे, तर १९४२ सालच्या ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत महात्माजींनी, महायुद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत, ' करेंगे या मरेंगे ' (Do or die) या निर्वाणीच्या शब्दांनी जो आदेश राष्ट्राला दिला, त्यांतून उत्पाती चळवळीचा डोंब उफाळून, सत्तावन सालच्या बंडापेक्षाहि एका परीने अधिक प्रभावी असें हिंदी लोकक्षोभाचें अत्युग्र दर्शन सर्व जगाला घडलें. अर्थात् लो. टिळक आणि म. गांधी या आधुनिक भारतांतील दोघा युगंधर विभूतींच्या स्मृतीने आणि कर्तृत्वाने ऑगस्ट महिन्याचा हा पहिला आठवडा,—ता. १ ऑगस्टपासून ता. ९ ऑगस्टपर्यंतचें हें नवरात्र—पवित्र होऊन बसलेलें आहे; व म्हणूनच हे नऊ दिवस या दोघांहि राष्ट्रोद्धारकांच्या भव्य जीवनाचें आणि दिव्य आत्मयज्ञाचें चिंतन करण्यांत सर्व जनतेने घालविले पाहिजेत.

१९०१ पासून १९४४ पर्यंतचा गेल्या चवेचाळीस वर्षांचा हिंदुस्थानाचा राजकीय इतिहास म्हणजे टिळक आणि गांधी यांच्या नेतृत्वाचा इतिहास होय. "इतिहास म्हणजे पराक्रमी व्यक्तींच्या कर्तृत्वाचा उज्ज्वल कीर्तिलेख," अशी इतिहासाची व्याख्या एका पाश्चात्य तत्वज्ञाने केलेली आहे. ती आलंकारिक व्याख्या जर अतिशयोक्तीचा यत्किंचितहि आळ न येतां कोणाच्या कर्तबगारीला लागू पडत असेल, तर फक्त टिळक आणि गांधी यांच्या ! १९०१ सालच्या जानेवारींत न्या. रानडे यांनी देह ठेवला; व हिंदी राजकारणांतील टिळकयुग सुरू झालें. न्या. रानडे हे द्रष्टे होते. स्वतः जातीनें कोणत्याहि चळवळीची धुरा शिरावर न घेतां त्यांनी राष्ट्रसंघटनेला पोषक अशा अनेक कल्पनांना फक्त चालना तेवढी दिली. पण, त्यांच्या या मंत्रदर्शित्वाचा व्याप आणि सामर्थ्य एवढें मोठें होतें की, क्रियाशून्यतेचें लांछन त्यांच्या विभूतिमत्वाला लागलेलें असतांनाहि, टिळकांचें तेज काही त्यांच्यापुढे पडूं शकलें नाही. त्यांच्या मृत्यूनंतर कर्झनशाहीला प्रारंभ होऊन तिचें पर्यवसान बंगालच्या फाळणींत झालें. त्या फाळणींतून जो प्रचंड लोकक्षोभ उफाळला, त्या प्रक्षोभाच्या ब्रिटिश साम्राज्यशाहीला जाळूं पहाणाऱ्या उग्र दीप्तींतून, महादेवाच्या क्रोधाग्नीं-

तून प्रकट झालेल्या वीरभद्राप्रमाणे, टिळकांची देदीप्यमान विभूति प्रथम हिंदी जनतेच्या दृष्टीस पडली. रानडे हे द्रष्टे, तर टिळक हे झुंजार होते; व तें झुंजारपणहि असें की, ज्याच्या दहशतीचा दंश, टिळकांच्या निधनाला आज दोन तपें उलटून गेलीं तरी, शत्रूंच्या मनांतून नाहीसा झालेला नाही. स्वराज्याच्या कल्पनेचें दर्शन रानडयांना घडलेलें होतें, ही गोष्ट खरी. पण त्या ध्येयाची मानसपूजा करण्यापलिकडे न्यायमूर्तींची मजल गेली नाही. उलट, टिळकांनी, ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या खुनशी क्रोधाचे तडाखे आपल्या वज्रमुष्टीवर झेलीत, तें अव्यवहार्य मानलें गेलेलें ध्येय देशांतील प्रत्येक व्यक्तीच्या नजरेच्या टप्प्यांत आणून उभें केलें; व त्याच्या सिद्धतेसाठी झगडणारी अभेद्य संघटनाहि राष्ट्रसभेंत निर्माण केली.

गेल्या महायुद्धाच्या ऐन मुहूर्तावर टिळकांनी सुरू केलेला हा स्वराज्याचा लढा त्यांच्या मृत्यूनंतर गेलीं दोन तपें निर्धाराने आणि निकराने पुढे चालवून गांधीजींनी चालू महायुद्धाच्या समाप्तीच्या क्षणीं तो समेटाच्या सीमेवर आणून ठेवलेला आहे; व त्या दृष्टीने गांधीजी हेच खरोखरी त्यांचे राजकीय वारस, त्यांच्या हातांतलें स्वातंत्र्याचें निशाण खाली पडूं न देता त्यांची जागा तत्परतेने आणि तडफेने घेणारे सेनानी ठरतात. किंबहुना (१) स्वराज्य, (२) स्वदेशी, (३) बहिष्कार आणि (४) राष्ट्रीय शिक्षण ही जी लढाऊ चळवळीची चतु:सूत्री टिळकांनी वंगभंगानंतर प्रवर्तित केली, तिचाच विस्तार गांधीजींनी आपल्या चतुर्दशसूत्रींत, विधायक कार्यक्रमाच्या चवदा मुद्यांत (Fourteen points) केलेला आहे, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाही किंवा वस्तुविपर्यासहि नाही. टिळकांनी लातूरला गिरणी आणि तळेगावला काचकारखाना काढला; बहिष्कार आणि मद्यपानबंदी यासाठी निरोधनाचें हत्यार उपसलें; राष्ट्रीय शिक्षणाचा प्रयोग म्हणून समर्थ विद्यालयाची स्थापना केली; अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरला कलंक आहे असें जाहीर केलें; हिंदी ही राष्ट्रभाषा व्हावी म्हणून 'केसरीं'तून प्रचार केला; व जुलमी करांविरुद्ध सक्रिय प्रतिकार करण्याच्या तत्त्वाचा

पुरस्कार करून बहुजनसमाजाला स्वराज्याच्या लढ्यांत सामील करून घेतलें. ता. २८ जुलै रोजीं पांचगणीहून गांधीजींनी जी आपल्या विधायक कार्यक्रमाची चतुर्दशसूत्री घोषित केलेली आहे, ती चतुर्दशसूत्री म्हणजे टिळकांच्या चतुःसूत्रीचाच एका परीने बदललेल्या परिस्थितीला अनुरूप असा विस्तार आणि विकास नाही काय? हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या बाबतींतहि टिळकांचेच मुत्सद्देगिरीचें धोरण गांधीजींनी आज पुढे चालविलेलें आहे. "ब्रिटिश सरकारने एकट्या मुसलमानांना स्वराज्याचे अधिकार बहाल केले, तरी मला चालतील;-मग वाटणीचा लढा झालाच, तर तो आपसांत म्हणजे आमच्यांत आणि मुसलमानांत होईल!"-असे खणखणीत उद्गार काढून लखनौच्या राष्ट्रसभेंत कांग्रेस-लीग योजनेचें समर्थन करणारे टिळक!—त्या वेळच्या त्यांच्या आणि आजच्या गांधीजींच्या धोरणांत कोणता फरक दाखवतां येईल? हिंदु आणि मुसलमान या दोन्ही जातींना आपल्या रक्तशोषक दडपणाखाली रगडणारी उपरी ब्रिटिश सत्ता नष्ट झाल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणें शक्य नाही,—दोहोंत कलागत लावणाऱ्या या तिसऱ्या पक्षाचा काटा प्रथम निघाला पाहिजे,--या जाणिवेनेच हें धोरण प्रेरित झालेलें नाही काय? म्हणूनच म्हणावयाचें की, गांधीजी हे टिळकांचे राजकीय वारस, त्यांच्या लढाऊ कार्यक्रमाची व्याप्ति आणि दीप्ति आपल्या पद्धतीने वाढविणारे तुल्यबल सेनापति आहेत.

गांधीजी हे जर अशा रीतीने टिळकांचे राजकीय वारस, त्यांनी सुरू केलेला लढा पुढे चालविणारे धुरंधर सेनानी आहेत, तर टिळक आणि गांधी यांची तात्त्विक भूमिका मूलतःच भिन्न असल्याचा जो प्रचार विशेषतः महाराष्ट्रांत करण्यांत येतो, त्याचें कारण काय? आणि या प्रचारांत तथ्य किंवा सत्य कितपत आहे? हा प्रचार सकारण आहे आणि अर्थातच सत्यहि आहे. टिळक आणि गांधी यांच्यांतील सत्य आणि शाठ्य यांच्यासंबंधीचा तात्विक मतभेद आणि वाद जरी सोडून दिला, तरी अहिंसा हा केवळ आपल्या स्वतःच्या वैयक्तिक जीवनाचाच नव्हे, तर हिंदी राष्ट्रीय चळवळीचा आणि एकंदर मानवजातीच्याहि

जीवनाचा पाया असला पाहिजे, असा जो गांधीजींचा अट्टाहास आहे, त्यामुळे स्वातंत्र्याच्या साध्यसाधनांकडे पहाण्याच्या दोघांच्या दृष्टिकोनांत जमीनअस्मानाचा फरक पडलेला आढळतो. स्वातंत्र्याच्या ध्येयाच्या बाबतींत टिळक आणि गांधी यांची पूर्ण तदात्मता आहे. पण, कैवल्यप्राप्ति हें सर्वांचें सारखेच अंतिम साध्य असलें, तरी संसारी कर्मयोगी, निवृत्तिमार्गी संन्यासी आणि देहदंडन करणारा हठयोगी यांच्या आचारांत आणि विचारांतहि जसा विलक्षण फरक पडतो, तसाच प्रकार याहि बाबतींत आहे. इंग्रजी राज्याविरुद्ध बंड केल्याने स्वराज्य मिळेल अशी थोडी जरी शक्यता टिळकांना वाटली असती, तरी बंड पुकारावयाला ते कचरले नसते. किंबहुना, इटलियन मुत्सद्दी काव्हूर किंवा आयरिश पुढारी पार्नेल यांच्याप्रमाणे, सनदशीर राजकारणाच्या जोडीला सशस्त्र क्रांतीच्या गुप्त हालचालीहि सतत चालू राहिल्याने साम्राज्यशाहीला दहशत बसते, देशांतील धाडसी लढाऊ बाणा कायम राहातो आणि या अदृश्य शक्तीचा जोर मागे असलेलें सनदशीर राजकारण यशस्वी होते, अशी टिळकांची भावना होती. त्यामुळे, त्यांनी क्रांतिकारक अत्याचारी पंथाचा किंवा त्याच्या पुरस्कर्त्यांचा, सनदशीर धोरणाच्या अभिनिवेशाने म्हणा किंवा अहिंसा-तत्त्वाच्या व्यवच्छेदक निष्ठेने म्हणा, कधीहि हिरमोड किंवा हेटाळणी केली नाही. इतकेच नव्हे, तर आपल्या साहसी ध्येयासक्तीमुळे ते जेव्हा जेव्हा संकटांत सापडले, तेव्हा तेव्हा त्यांना तत्परतेने शक्य तें सर्व सहाय्य करून त्यांच्या योगक्षेमाची चिंता टिळकांनीं वाहिली. उलट, गांधीजी अत्याचाराचा वासहि आपल्या अहिंसात्मक चळवळीला येऊं द्यावयाला तयार नसून, ऑगस्ट उठावणींत भाग घेणाऱ्या क्रांतिकारकांना मुकाटयानें पोलिसांच्या स्वाधीन व्हा, असें सांगावयाला आज प्रवृत्त झालेले आहेत !

गांधीजींच्या या अहिंसेवरील आत्यंतिक निष्ठेमुळे केवळ चळवळीच्या रोजच्या धोरणावर किंवा कार्यक्रमावरच विदारक परिणाम झालेला आहे असें नव्हे; तर हिंदी स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे पाहाण्याचा

त्यांचा दृष्टिकोनच मुळी निराळा होऊन गेलेला आहे. टिळक हे स्थितप्रज्ञ आणि यतचित्त होते; व कर्मयोगाचें जें निर्द्वंद्वत्व भगवंतांनी गीतेत वर्णन केलेलें आहे, तें रोमरोमीं बाणलेलें असल्यामुळेच त्यांच्या नेतृत्वाला वज्राची कठोरता आलेली होती. पण, मनुष्य व्यक्तिशः जरी सर्व द्वंद्वांच्या पलिकडे गेलेला असला, तरी स्वतःच्या म्हणा किंवा राष्ट्राच्या म्हणा संसारांतील कर्तव्यें पार पाडतांना त्याला वासनाविकारांचे लेप स्वतःच्या मुक्त आत्म्याला त्या त्या काळापुरते तरी होऊं द्यावे लागतात, याची टिळकांना पूर्ण जाणीव होती; व विशेषतः 'विनाशाय च दुष्कृताम्' हें कर्तव्य बजावण्याची जबाबदारी ज्यांच्यावर पडते, त्यांनी आपल्या बुद्धीला कोणत्याहि प्रकारच्या क्लैब्याचें कश्मल लागूं देतां कामा नये, याबद्दल त्यांचा फार कटाक्ष होता. या जाणिवेमुळेच टिळकांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीचें शत्रुत्व आमरण मोठ्या धैर्याने आणि ईर्ष्येने केलें. उलट, अहिंसावादाच्या आहारी गेलेले गांधीजी स्वतःला ब्रिटिश सरकारचे मित्र म्हणवण्यांत अभिमान मानतात; व त्या साम्राज्यशाहीला तिच्या संकटाच्या काळांत उपद्रव होऊं नये, अशा बेताने आपल्या धोरणांत वाटेल तो आणि वाटेल तितका फेरफरक आणि चढउतार करावयालाहि सदैव तयार असतात. खुद्द ब्रिटिश सरकारलाहि गांधीजी आपले मित्र असल्याची जाणीव इतकी पुरेपूर आहे की, टिळकांचा छळ त्यांनी ज्या पद्धतीने स्वतः केला आणि आपल्या मुठींतल्या संस्थानिकांकडूनहि करवला, त्या पद्धतीने गांधीजींचा छळ तर त्यांनी कधी केला नाहीच, उलट त्यांना सर्व प्रकारच्या सवलती देऊन शाही इतमामाने वागविलें. स्वदेश आणि त्याचें स्वातंत्र्य यांच्यासाठी टिळक वाटेल तो त्याग वा कृत्य करावयाला तयार झाले असते. उलट, महात्माजींचा अहिंसावाद इतका व्यवच्छेदक आहे की, सशस्त्र क्रांति होऊन जर उद्या स्वराज्य मिळण्याचा अद्‌भुत योग आला, तर गांधीजी तें 'हिंसेने डागळलेलें' स्वराज्य नको, असें म्हणावयाला चुकणार नाहीत ! गांधीजींचें नेतृत्व जें इतकें लहरी, इतकें अहंनिष्ठ असल्याचा प्रत्यय दुर्दैवाने गेल्या चोवीस वर्षांत बार्डोलीच्या सत्याग्रहापासून तों पाचगणीच्या प्रायश्चित्तापर्यंत आजवर अनेकदा आला, तो याच

कारणामुळे. ते आपल्या अहिंसातत्त्वाला पक्के आहेत; व त्या तत्त्वाला जेव्हा चळवळीमुळे बाध येतो असें त्यांना वाटतें, त्या वेळीं राष्ट्राच्या प्रतिष्ठेला ढळ पोचेल किंवा चळवळीचा घात होईल, याची बिलकूल पर्वा न करतां ते बेलाशक माघार घेतात.

पण, टिळक आणि गांधी यांच्या भूमिकेंतील या मूलभूत फरकामुळे जरी राष्ट्रीय चळवळीचा केव्हा केव्हा अवसानघात झाल्यासारखा दिसत असला, तरी ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध झगडण्याची लोकांची शक्ति गांधीजींनी, टिळकांच्या चतुःसूत्रीचा निष्ठेने अंगीकार करून, गेल्या दोन तपांत अपरंपार वाढवली, यांत मात्र शंका नाही. परतंत्र राष्ट्राच्या आयुष्यांत असा एक सामर्थ्यशाली क्षण येतो की, ज्या क्षणीं जागृत आणि सुसंघटित बहुजनसमाज हा आपला पुढारी काय म्हणेल याचा विचार न करतां, स्वतःच्या आत्मप्रत्ययाच्या जोरावर एक प्रकारच्या बेदरकारपणाने झुंज द्यावयाला उभा ठाकतो. १९४२ सालच्या ऑगस्टमध्ये तो क्षण शेकडों वर्षें पारतंत्र्याच्या गर्तेंत पिचत असलेल्या या निःशस्त्र राष्ट्राच्या आयुष्यांत येऊन गेला. टिळकांच्या मृत्यूनंतर गेल्या चोवीस वर्षांत गांधीजींनी निरनिराळ्या उपायांनी जी जनशक्तीची जोपासना अव्याहत केली, तिच्या प्रभावानेच हा क्षण आला, हें विसरून कसें चालेल? महायुद्धानंतर जी नवी परिस्थिति आज उत्पन्न होऊं घातलेली आहे, त्या परिस्थितींत गांधीजींचें नेतृत्व कदाचित् पंगु ठरेल; व बहुजनसमाजावर स्वतःच्या बुद्धीने स्वातंत्र्यसंपादनाचा नवा मार्ग काढण्याचीहि पाळी कदाचित् येईल. पण, जनशक्तीची जोपासना करण्याचा जो मंत्र टिळक आणि गांधी यांनी हिंदी लोकांना दिला व ज्या मंत्राच्या पुरश्चरणामुळे आज स्वातंत्र्याच्या मार्गावर या परतंत्र राष्ट्राची इतकी प्रगति झालेली आहे, त्या मंत्राचें महत्व आणि सामर्थ्य हें मात्र कोणत्याहि परिस्थितींत कायमच टिकेल. टिळकांची चतुःसूत्री काय किंवा गांधीजींची चतुर्दशसूत्री काय ही या असहाय राष्ट्राची बलोपासना आहे; व ऑगस्ट उठावणींत ती बलोपासना कसाला लागून गेली. तेव्हा, आजपासून सुरू होणाऱ्या ऑगस्टच्या या पहिल्या

आठवड्यांत पूर्ण स्वातंत्र्याचें जें ध्येय सध्याच्या धूसर परिस्थितींत अधिकच दुष्कर झाल्यासारखें वाटत आहे, त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी टिळक आणि गांधी यांच्या ऋणाचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करून पुढील भीषण लढ्याला तोंड देण्यासाठी जनशक्ति अधिकाधिक वाढवण्याचा संकल्प करणें, हेंच सर्व भारतीयांचें कर्तव्य ठरत नाही काय ?

१–८–१९४४

# ऑगस्ट नवरात्र

'नवरात्र' हा शब्द उच्चारतांच अखिल हिंदु समाजाच्या डोळ्यांपुढे बंगालचे राष्ट्रकवि बंकिमचंद्र चतर्जी यांनी आपल्या 'वंदे मातरम्' या गीतांत 'त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी' या शब्दांनी जिचें वर्णन केलेलें आहे, ती जगन्माता उभी रहाते. पण, काल ता. १ ऑगस्टपासून जें राष्ट्रीय नवरात्र हिंदुस्थानांत सुरू झालेलें आहे, त्या नवरात्राची स्मृति जरी सशस्त्र उठावणीशीं संलग्न झालेली असली, तरी या नऊ दिवसांत त्यांतील निरनिराळ्या घटनांचें जें चिंतन करावयाचें, तें जगांतील अत्यंत असहाय, अहिंसावादी म्हणून गाजलेल्या राष्ट्राचें अतुल आत्मतेज त्या घटनांतून प्रकट झालें म्हणून ! एरवीं, महात्माजींसारख्या 'करेंगे या मरेंगे' असा आदेश देणाऱ्या मूर्धाभिषिक्त पुढाऱ्याने त्या उठावणींतील घातापाताच्या कृत्यांचा कडाडून निषेध केला असता, तिचे पोवाडे गाण्याची हिंमत आज कोणाला होणार आहे ? पण, गांधीजींना ऑगस्ट उठावणींतील हिंसा जरी अभिमत नसली, तरी निःशस्त्र दलित हिंदी जनतेचें जें शौर्य आणि धैर्य, जी आत्माहुतीची तयारी आणि तळप त्या नवरात्रांत दृष्टीस पडली, तिची प्रशंसा खुद्द त्यांनी स्वतःच मुक्तकंठाने केलेली नाही काय ? मग लोकांनी हें ऑगस्ट महिन्यांतील पहिलें नवरात्र त्या आत्मयज्ञाचें स्मरण आणि चिंतन करण्यांत का घालवूं नये ?

शिवाय, ऑगस्ट उठावणी आज फसल्यासारखी दिसत असली, म्हणून काय झालें ? पहिल्या महायुद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत १९१६ सालच्या ईस्टरमध्ये जेम्स कनॉली प्रभृति आयरिश क्रांतिकारकांनी पुकारलेलें बंड तर अवघ्या दोन दिवसांत ब्रिटिश सरकारने मोडून टाकलें. पण, त्या बंडामुळेच सिनफेन चळवळीला जोर चढून, ती चळवळ पुढे आयर्लंडच्या दास्यमोचनाला कारण झाली नाही काय ? किंबहुना, १९४२ सालांतील ऑगस्ट उठावणींत आणि १९१६ सालच्या मार्च-मध्ये आयर्लंडांत झालेल्या ईस्टर उठावणींत इतकें कांही साम्य आहे की, अपेशी ईस्टर उठावणींतून सिनफेन पक्षाचें जें अभ्युत्थान पुढे झालें, तें पाहिल्यावर ऑगस्ट उठावणींतून नवा प्रभावशाली पक्ष उद्या आविर्भूत होईल, अशी आशा मनाला वाटल्याशिवाय रहात नाही. कनॉली आणि पीअर्स या निर्भेळ लोकसत्तेचा पुरस्कार करणाऱ्या आयर्लंडांतील तरुण समाजवादी पुढाऱ्यांनी, युद्धजन्य परिस्थितीचा फायदा घेऊन, 'नागरिक सैन्य' ( Citizen army ) उभारलें; व ईस्टरच्या पवित्र सोमवारीं डब्लिन शहरांतील आपल्या स्वातंत्र्यभवनावर तिरंगी झेंडा फडकावून आयर्लंडांत लोक-सत्ताक राज्य स्थापन झाल्याची घोषणा केली. डब्लिनसारखें राजधानीचें शहर अशा रीतीने ताब्यांत घेण्याचें तें त्या तरुणांचें अचाट धाडस पाहून शत्रु आणि मित्र दोघेहि क्षणमात्र दिपून गेले. पण ब्रिटिश सरकारने ताबडतोब लष्करी कुमक पाठवून बंडाचा बीमोड केला; व कनॉली, पीअर्स प्रभृति क्रांतिकारक नेत्यांना गोळ्या घालून ठार केलें. तथापि, त्यांच्या त्या उग्र आत्म-यज्ञाने स्वातंत्र्याची जी ज्वलन्त स्फूर्ति आयर्लंडांत उत्पन्न केली, तिनेच, डी व्हॅलेरा याने म्हटल्याप्रमाणे, आयर्लंड अखेर दास्यमुक्त केलें.

हाच प्रकार १९०५ सालच्या सप्टेंबर–आक्टोबरांत रशियामध्ये जी कामगार–कास्तकारांची पहिली सशस्त्र उठावणी झाली, तिच्याहि बाबतींत घडला. ता. १९ सप्टेंबर १९०५ रोजी मॉस्को येथील एका छापखान्यांत संप होऊन या क्रांतीची ठिणगी पडली; व पुढल्या

दोन महिन्यात त्या ठिणगींतून उफाळलेल्या संपाच्या ज्वाळा सव रशियाभर पसरून छापखान्यांतील कंपॉझिटरापासून तों आरमारांतील खलाशापर्यंत सर्व श्रमजीवी बहुजनसमाज या सार्वत्रिक उठावणींत ईर्ष्येने सामील झाला. पण, ज्या या प्रचंड सशस्त्र संपांत आठ लाख कामगारांनी जिवावर उदार होऊन भाग घेतला, तो संप झारच्या रिसाल्याने आणि तोफखान्याने, मुंग्यांच्या रांगा हत्तीने पायाखाली तुडवून टाकाव्यात त्याप्रमाणे, लोकांच्या जमावावर घोडेस्वार घालून आणि गोळीबार करून चिरडून टाकला. पण, झारशाहीने तो संप चिरडून गाडून टाकला, म्हणून क्रांतीच्या स्फूर्तीची ठिणगी विझली, असें थोडेंच ? उलट, लेनिनने म्हटल्याप्रमाणे १९०५ सालच्या त्या अपेशी क्रांतींतून १९१७ सालच्या नोव्हेंबरांतील शेवटल्या यशस्वी क्रांतीच्या उत्तुंग ज्वाळा उफाळल्या. इतक्या उत्तुंग ज्वाळा की, त्यांचे प्रखर तेज पाहून नोव्हेंबर ता. ७ पासून ता. १८ पर्यंतचे ते दहा दिवस सर्व जग विस्मित आणि स्तिमित होऊन गेलें. त्या क्रांतीच्या दहा दिवसांची जी रोजनिशी जॉन रीडने लिहिलेली आहे, ती वाचून,--प्रत्यहीं चढत्या वेगाने वाढणाऱ्या क्रांतीच्या आंदोलनाचें तें चित्र पाहून,--जगांतील सगळ्या दलित जनसमाजांची खचलेलीं अंतःकरणें आणि पिचलेल्या आकांक्षा नव्या आशेने पुनरपि उद्दीपित होऊन जातील.

पण, सर्व जगाला दहा दिवस हलवून सोडणाऱ्या १९१७ सालच्या क्रांतीचीं बीजें ज्या १९०५ सालच्या अपेशी उठावणींत होतीं, ती उठावणी जेव्हा अत्यंत क्रूरतेने चिरडून टाकण्यांत आली, तेव्हा भेदरलेल्या प्लेखॉनॉव्हने त्या पराभवाच्या दारुण क्षणीं असे उद्‌गार काढले की, "लोकांनी शस्त्र उपसावयाला नको होतें !" (They should not have taken to arms) त्यावर झारशाहीच्या क्रोधाग्नींत होरपळून निघालेल्या पण अधिकच आवेशाने चेतलेल्या लेनिनने त्याला असें करडें उत्तर दिलें की, "छे ! उलट आपण जास्त निर्धाराने, जास्त उत्साहाने आणि जास्त चढाईने सशस्त्र लढा करावयाला हवा

होता. केवळ शांततेने संप चालवणें अशक्य आहे. निर्भयतेने आणि निष्ठुरतेने आपण सशस्त्र लढा चालवावयाला हवा, हें आपण जनतेला समजावून द्यावयाला पाहिजे!" (On the contrary, we should have taken to arms more resolutely, energetically and aggressively. We should have explained to the masses that it was impossible to confine ourselves to a peaceful strike and that a fearless and relentless armed fight was indispensable.) १९०५ सालची उठावणी झारशाहीने दडपून टाकल्यानंतरहि बहुजनसमाजाला दास्यमुक्त करण्याची लेनिनची ज्वलंत आकांक्षा म्लान किंवा मलिन न होतां उलट वेगाने वरती उफाळली. म्हणूनच त्या पराभवानंतर रशियाला बाल्शेविक क्रांतीचें अद्भुत यश पहावयाला मिळालें नाही काय? १९०५ सालच्या पराभवाने लेनिन जर खचला असता, तर रशियाचें पुनरुत्थान कसें झालें असतें?

म्हणूनच, ऑगस्ट उठावणी विफल झाल्यामुळे निराश होण्याचें कारण नाही, असें महात्माजी आपल्या पराभवाच्या या आत्यंतिक क्षणीं लोकांना इतक्या तळमळीने आणि कळकळीने सारखे सांगत आहेत. किंबहुना, त्या उठावणींत जे घातापाताचे प्रकार घडले, ते तत्त्व आणि धोरण या दोन्ही दृष्टींनी त्यांना आक्षेपार्ह वाटत असतांनाहि, त्या लढ्यांत बहुजनसमाजाचें जें धैर्य आणि शौर्य प्रथमच इतक्या उग्रतेने प्रचंड प्रमाणावर प्रकट झालें, त्याची प्रशंसा त्यांनी इतक्या मुक्तकंठाने केली आहे. इतकेंच नव्हे, तर ऑगस्ट ठराव रद्द न करण्याचा जो आग्रह त्यांनी आज एका परीने इरेला पेटून धरलेला आहे, तोहि या बुद्धीने की, त्या ठरावाच्या मागे जी क्रांतिसंमुख लढाऊ मनोवृत्ति खडी आहे, तिचा तेजोभंग निदान आपल्या हातून तरी होऊं नये. ऑगस्ट उठावणींत जे प्रकार घडले, ते जरी त्यांना संमत नसले, तरी त्या उठावणीचा आत्मा नष्ट व्हावा, अशी मात्र त्यांची इच्छा नाही. तेव्हा, गांधीजींनी घालून दिलेल्या मर्यादेबाहेर गेलेल्या त्या उठावणींतील

कार्यकर्त्यांचा गौरव, "तुम्ही जीवनाच्या उदात्त मार्गाने गेलात," (you chose a noble path) या शब्दांनी करून ऑगस्ट ठरावामागील युयुत्सु जनभावना कायम ठेवण्याचा प्रयत्न सध्याच्या अत्यंत निराशाजनक परिस्थितींत निष्ठेने करावयाला नको काय ?

* * *

## *हुतात्म्यांना श्रद्धांजलि*

**१९१७ च्या नोव्हेंबरांतील यशस्वी बोल्शेविक क्रांतीपूर्वी १९०५ सालच्या डिसेंबरांतील उठावणीपासून तों १९१७ सालच्या मार्चमधील उठावणीपर्यंत रशियांत राज्यक्रांतीचे अनेक पद्धतशीर पण अपेशी प्रयत्न झाले. या उठावणींत बळी पडलेल्या क्रांतिकारकांविषयींची रशियन जनतेची भावना पुढील शोकगीतांत प्रकट झालेली आहे. हें शोकगीत आणि त्याचा मराठी अनुवाद पुढे दिला आहे:—**

You fell in the fatal fight
For the liberty of the people, for the honour of the people.
You gave up your lives and everything dear to you,
You suffered in horrible prisons,
You went to exile in chains......
Without a word you carried your chains because you could not ignore your suffering brothers,
Because you believed that justice is stronger than the sword.........
The time will come when your surrendered life will count.
That time is near; when tyranny falls the people will rise, great and free !

Farewell, brothers, you chose a noble path,
At your grave we swear to fight, to work for freedom and the people's happiness.........

## मराठी अनुवाद

त्या अपेशी लढ्यांत तुम्ही कामाला आलात.
जनतेच्या स्वातंत्र्यासाठी, जनतेच्या प्रतिष्ठेसाठी.
तुम्ही आपल्या प्राणांचा होम केलात, सर्वस्वाची आहुती दिलीत.
भयाण तुरुंगांत तुम्ही यमयातना भोगल्यात.
बेड्या घातलेल्या स्थितींत तुम्ही काळ्या पाण्यावर गेलात.
आपल्या असहाय बांधवांची दुर्दशा पाहावेना म्हणून तुम्ही मुकाट्याने अंगावर बेड्या वागवल्यात.
कारण न्याय हा तरवारीपेक्षा प्रबळ आहे अशी तुमची श्रद्धा होती.
तो दिवस खात्रीने उगवेल की, ज्या दिवशीं तुमच्या समर्पित जीवनाचें मोल दिलें जाईल.
तो दिवस नजीक येऊन ठेपला आहे. सुलतानीचा पाडाव होतांच लोक स्वातंत्र्याच्या ईर्ष्येने उफाळून उठतील.
बांधव हो नमस्कार! तुम्ही जीवनाच्या उदात्त मार्गाने गेलांत.
तुमच्या समाधीपाशीं आम्ही लढा पुढे चालवण्याची, स्वातंत्र्यासाठी आणि जनतेच्या सुखासाठी झगडण्याची शपथ घेत आहोंत.

२-८-४४

# जनशक्तीची जोपासना

ऑगस्ट उठावणींतील घातापाताच्या कृत्यांचा निषेध करण्यासाठी जें पत्रक ता. २८ जुलै रोजीं म. गांधी यांनी काढलें, त्यांत त्यांनी आपली स्वातंत्र्यसंपादनाची चतुर्दशसूत्री दिलेली असून, सर्व हिंदुस्थानाने जर या विधायक कार्यक्रमाचा अंगीकार निष्ठेने केला, तर आपलें ध्येय लवकर साध्य होईल, असा निर्वाळा दिला आहे. इतकेंच नव्हे, तर स्वातंत्र्यप्राप्तीचें एकमेव साधन म्हणून मी या कार्यक्रमाला प्रतिज्ञेने बांधलेला आहे, असेहि उद्‌गार त्यांनी काढले आहेत. हा कार्यक्रम विशद करतांना त्यांनी पुढील चौदा मुद्दे किंवा सूत्रें दिलीं आहेतः— (१) जातीय ऐक्य, (२) अस्पृश्यतानिवारण, (३) मद्यपानबंदी, (४) खादी, (५) ग्रामोद्योग, (६) ग्रामसुधारणा, (७) क्रियात्मक शिक्षण, (८) प्रौढ शिक्षण, (९) स्त्रियांची उन्नति, (१०) आदिवासी भूमिजनांची सेवा, (११) आरोग्यशिक्षण, (१२) राष्ट्रभाषाप्रचार, (१३) मातृभाषेविषयी प्रेम व (१४) आर्थिक समतेसाठी प्रयत्न. गांधीजींच्या या चौदा मुद्यांत नवीन कांही नाही. गेल्या दोन तपांत अनेकदा त्यांनी हे मुद्दे निरनिराळ्या स्वरूपांत लोकांपुढे मांडलेले असून, त्या कार्यक्रमाच्या सिद्धतेसाठी चरखा संघ, ग्रामसेवा संघ, हरिजन सेवासंघ, राष्ट्रभाषाप्रचार समिति, तालिमी संघ वगैरे संस्थाहि काढलेल्या आहेत.

पण, गांधीजींची तक्रार अशी आहे की, "या कार्यक्रमावर माझी स्वतःची जशी जिवंत श्रद्धा आहे, तशी दुर्दैवाने कार्यकर्त्यांची दिसत नाही." या तक्रारीचें मर्म उघड आहे. तें असें की, स्वातंत्र्याच्या चळवळीला विधायक कार्यक्रम हा पायाभूत म्हणा किंवा प्राणभूत म्हणा असल्याची गांधीजींना स्वतःला जशी पुरेपूर जाणीव आहे तशी ती कार्यकर्त्यांत अद्याप उत्पन्न झालेली नाही. आणि, ती जाणीव जोपर्यंत त्यांच्या ठिकाणीं निर्माण होत नाही,—स्वातंत्र्याच्या झगड्याची

रसद म्हणून त्या कार्यक्रमाला असलेलें महत्त्व जोंपर्यंत त्यांना पटत नाही,—तोंपर्यंत त्या कार्यक्रमाविषयी त्यांना जिवंत श्रद्धा कशी वाटणार? त्यांना ही साधी गोष्ट समजत नाही की, आघाडीवर जें सैन्य प्रत्यक्ष झुंज देत असतें, त्या सैन्याला सर्व प्रकारची साहित्यसंपदा पुरवण्यासाठी देशांत हजारों कारखाने आणि कोडों कामगार रात्रंदिवस खपत असतात. आपल्या आजच्या राजकीय चळवळींत विधायक कार्यक्रमाचें स्थान हें अशाच प्रकारचें आहे. स्वातंत्र्याचा लढा निष्ठेने, निर्धाराने आणि निर्भयतेने चालवावयाला जीं नाना प्रकारचीं चिवट, हिंमती आणि कष्टाळू माणसें लागतात, जनसमाजाशीं जो रोजचा जिव्हाळ्याचा संबंध लागतो व लोकमताची नाडी समजण्यासाठी जें सर्व सामाजिक प्रश्नांचे ज्ञान लागतें, तें मिळवण्याच्या दृष्टीने विधायक कार्यक्रमांतील प्रत्येक बाब महत्वाची नाही काय? म्हणूनच म्हणावयाचें की, विधायक कार्यक्रमाची प्रत्येक संस्था म्हणजे स्वातंत्र्याच्या लढ्याची रसद पुरवणारा कारखाना आहे.

आणि, गांधीजींनी जीं चौदा सूत्रें दिलेलीं आहेत, त्यांच्यावर नजर टाकतांच विधायक कार्यक्रमाच्या पूर्ततेवर त्यांचा इतका कटाक्ष का आहे, हें चटकन ध्यानांत येईल. हिंदुस्थानांतील जनसमाजाइतका अवाढव्य पण विस्कळित जनसमाज जगांत दुसरा आढळणार नाही. विद्या नाही, शक्ति नाही, दृष्टि नाही आणि जाणीव नाही,—असा हा जनसमाज म्हणजे, कै. लो. टिळक यांच्या मार्मिक शब्दांत सांगावयाचें झाल्यास, चेतना आणि संज्ञा नसलेला एक प्रचंड लोळागोळा आहे. दुर्दैवाने तो लोळागोळाहि असा नाही की, ज्याला एकात्म, एकजीव, एकसंध म्हणतां येईल. धर्म, जाति, पंथ, भाषा वगैरे नाना प्रकारच्या भेदांनी तो विभागलेला आहे. अशा या गोळ्यांत चैतन्य उत्पन्न करावयाचें, ऐक्याची संज्ञा जागृत करावयाची आणि त्याला स्वतःच्या पायांवर उभा करून कार्यप्रवृत्त करावयाचें म्हणजे केवढें बिकट काम आहे! "मी विधायक कार्यक्रमाला शपथेने बांधून घेतलेलें आहे," (I swear by constructive programme) असें जें गांधीजींनी म्हटलेलें

आहे, तें खरोखरी याच जाणिवेने नव्हे काय की, या प्रचंड विस्कळित जनसमाजांत जोंपर्यंत शिस्त, संघटना आणि सामर्थ्य निर्माण होत नाही, तोंपर्यंत स्वातंत्र्य मिळणार कसें ? आणि यदाकदाचित् मिळालेंच, तरी तें टिकणार कसें ? नाही तर आजच्या या विजिगीषु भांडवलशाही जगांत कोणतें गिधाड किंवा घार या गोळचावर केव्हा झडप घालील, याचा काय नेम ? आज हिंदुस्थान हें जगांतील सर्व प्रबळ महत्वाकांक्षी राष्ट्रांचें भक्ष्य होऊन बसलेलें आहे. ही त्याची हीनावस्था नष्ट व्हावी आणि जगांतल्या सगळ्या भक्षकांना तोंड देण्याचें बळ त्याच्या अंगीं यावें, म्हणून गांधीजी विधायक कार्यक्रमावर इतक्या आग्रहाने सारखा भर देत असतात.

आणि, या कार्यक्रमांतील प्रत्येक बाब जर देशांतील प्रत्येक व्यक्तीने स्वातंत्र्याच्या ध्येयावर अचल दृष्टि ठेवून निष्ठेने अंमलांत आणली, तर आपल्या राष्ट्रीय जीवनाचीं सगळीं अंगें हळुहळू सुदृढ, समृद्ध आणि समर्थ होतील, यांत यत्किंचितहि शंका नाही. कारण, या कार्यक्रमांत गांधीजींनी समाजाचें जें जें म्हणून उपेक्षित अंग आहे, त्या त्या अंगाच्या जोपासनेवर भर दिलेला आहे. हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य नष्ट व्हावयाला जीं अनेक कारणें घडलीं, त्यांत ऐक्याचा अभाव हें कारण मुख्य म्हणावें लागेल. महमद घोरीला पृथ्वीराजावर स्वारी करण्याचें आमंत्रण देणाऱ्या जयचंदापासून तों शनवार वाड्यावरील जरीपटका काढून टाकून तेथे ईस्ट इंडिया कंपनीचा तांबडा बावटा लावणाऱ्या बाळाजीपंत नातूपर्यंत गेल्या हजार वर्षांत अनेक फितुरी या अभागी देशांत पैदा झाले; व त्यांनी शत्रूला आपसांतला भेद सांगून आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी देशाच्या स्वातंत्र्याचा बळी दिला. अशा स्थितींत, गांधीजींनी जातीय ऐक्याला आपल्या कार्यक्रमांत अग्रस्थान द्यावें, यांत नवल काय ? त्याबरोबरच स्त्रिया अस्पृश्य, आणि भूमिजन म्हणजे गोंड, भिल्ल वगैरे रानटी जाती यांच्या उन्नतीवरहि त्यांनी तितकाच कटाक्ष दिलेला आहे. स्त्रिया अस्पृश्य, आणि भूमिजन यांना गांधीजींनी एका माळेंत गोवलें, याबद्दल कोणाला

93559

कदाचित् विस्मय किंवा विषाद वाटेल. पण, स्वतः भगवंतांनीच मुळी, गीतेंत भक्तिमुळें मोक्षाचा मार्ग हीनदीनांना कसा सुलभ होतो हे सांगतांना, "स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्" असे उद्‌गार काढलेले नाहीत काय? हिंदु समाजाने आपल्या या तीन घटकांची आजवर उपेक्षा केल्यामुळेच तो इतका विकल, इतका विस्कळित झालेला आहे; व म्हणूनच गांधीजींनी रचनात्मक कार्य-क्रमांत त्या तिन्ही घटकांची जोपासना यापुढे दक्षतेने झाली पाहिजे, असें म्हटलेलें आहे. आरोग्य, शिक्षण, उद्योगधंदे, भाषिक ऐक्य आणि आर्थिक समता यांच्यासंबंधी त्यांनी आखलेल्या योजना जर निष्ठेने अंमलांत आणल्या गेल्या, तर भावी हिंदी राष्ट्र सर्वांगांनी सुदृढ आणि सामर्थ्यशाली होईल, हें निश्चित.

विधायक कार्यक्रमाचा चालू राजकारणाशीं आणि संघटनेशीं असलेला हा जिवंत संबंध जर लोकांनी लक्षांत घेतला, तर उद्याच्या स्वातंत्र्याच्या लढ्याच्या दृष्टीने त्या कार्यक्रमाला असलेलें महत्त्व त्यांच्या मनावर बिंबल्याशिवाय आणि जीवनांत उतरल्याशिवाय रहाणार नाही. समर्थांनी म्हटलें आहे की, "प्रबोधशक्तीचीं अनंत द्वारें। जाणे सकळांचीं अंतरें॥" देशांतील प्रत्येक व्यक्ति म्हणज प्रबोधशक्तीचा एक एक स्फुलिंग आहे. तो स्फुलिंग दक्षतेने फुलवल्या-शिवाय सारा देश स्वातंत्र्यासाठी आत्मयज्ञ करावयाला कसा तयार होईल? विधायक कार्यक्रम ही आत्मक्लेशाचें आणि जनसेवेचें शिक्षण देणारी शाळा आहे; व त्या शाळेंतून बाहेर पडणारे निष्ठावंत सेवकच, राष्ट्राची निर्वाणीची हाक कानांवर पडतांच, स्वातंत्र्ययुद्धाच्या आघाडीवर येऊन उभे ठाकतील. त्यांचें राजकीय चळवळींतील स्थान आणि कार्य हें एका अर्थाने युरोपियन मिशनरींसारखें आहे. हे गोरे ख्रिस्ती मिशनरी जगांतल्या मागासलेल्या देशांत जातात; तेथील आबाळ-लेल्या लोकांत मिसळून धर्मप्रसार करतात; शाळा, रुग्णालयें वगैरे संस्था चालवून लोकमत आपल्याकडे वळवून घेतात; व अशा रीतीने आपल्या देशाच्या सार्वभौम सत्तेच्या स्वागताला अनुकूल अशी मनोवृत्ति त्या

त्या देशांतील जनतेंत निर्माण करतात. साम्राज्यशाहीच्या आक्रमणाचा मार्ग सुकर करण्याचें जें हें मूक कार्य, राजकारणांत सहसा प्रत्यक्ष भाग न घेतां, गोरे मिशनरी करतात, त्याच प्रकारचें पण त्यापेक्षा सर्वच दृष्टींनी निर्मळ आणि सात्विक कार्य विधायक कार्यक्रमाच्या पुरस्कर्त्यांना स्वातंत्र्याच्या लढ्यांत करावयाचें आहे. तें कार्य जाणिवेने करून त्यांनी भावी लढ्यासाठी प्रबोधशक्ति जागृत करणें अवश्य नाही काय?

३-८-४४

# जनशक्तीला धार पाहिजे

ऑगस्ट उठावणींतील अत्याचारांचा निषेध करण्याच्या निमित्तानें म. गांधी यांनी आपल्या विधायक कार्यक्रमाची जी चतुर्दशसूत्री प्रसिद्ध केली आहे, ती जनशक्तीची जोपासना करण्याच्या दृष्टीने जरी अत्यंत उपयुक्त असली, तरी त्या योजनेंत दोन महत्त्वाचीं वैगुण्यें आहेत. त्यांपैकी पहिलें मोठें वैगुण्य म्हणजे महात्माजींनी आपल्या चौदा सूत्रांत बहिष्कारावर घातलेला बहिष्कार हें होय! वस्तुत:, गांधी-जींनी बहिष्काराचा अवलंब,-धोरण म्हणून कां होईना,-गेल्या चोवीस वर्षांत अनेकदा केलेला आहे. १९२० सालीं जी असहकारितेची पहिली प्रचंड चळवळ त्यांनी केली, तींत त्यांच्या डोळ्यांसमोर परदेशी कापडाच्या होळ्या करण्यांत आलेल्या नव्हत्या काय? मग त्यांनी आपल्या चतुर्दशसूत्रींत बहिष्काराला बगल का द्यावी? स्वदेशी आणि बहिष्कार, या टिळकांनी म्हटल्याप्रमाणे, खरोखरी एकाच पदकाच्या दोन बाजू, एकाच चळवळीची एक विधायक तर एक विध्वंसक अशीं दोन अंगें आहेत. मग स्वदेशीचा अतिरेक गिरणीचें कापड त्याज्य ठरविण्यापर्यंत करून आर्थिक स्वातंत्र्यासाठी केवळ खादीचीच कास धरण्याचा आदेश जनतेला देणाऱ्या गांधीजींनी बहिष्काराला आपल्या विधायक कार्यक्रमांत का स्थान देऊं नये?

याचें कारण १९२० सालीं त्यांनी असें सांगितलेलें होतें की, बहिष्काराला हिंसेचा दर्प येत असल्यामुळे मला तो अनाचरणीय वाटतो. पण, बहिष्काराच्या चळवळीचा गेल्या चाळीस वर्षांचा इतिहास जर लक्षांत घेतला, तर महात्माजींचा हा आक्षेप निदान धोरणाच्या दृष्टीने तरी टिकण्यासारखा वाटत नाही. बंगालच्या फाळणीच्या वेळीं लो. टिळक प्रभृति हिंदी राष्ट्रीय पक्षाच्या नवोदित पुढाऱ्यांनी आयर्लंडांतील होमरूलच्या प्रभावी आंदोलनांतून ज्या अनेक कल्पना उचलून ईर्ष्येने अंमलांत आणल्या, त्यांपैकी 'बहिष्कार' ही एक होय. 'बायकॉट' या मूळ इंग्रजी शब्दाचें 'बहिष्कार' हें मराठीकरण आहे. पण, आज मराठींत त्या शब्दाचा रूढार्थ जरी परदेशी कापडावरील बहिष्कार असा झालेला असला, तरी त्याचा मूळ अर्थ मात्र खरोखरी 'असहकार' असाच होता. किंबहुना, 'बायकॉट' हा इंग्रजी शब्द हें कोणत्याहि विशिष्ट चळवळीचें किंवा चळवळीच्या साधनाचें नांव नसून, मूळांत तें आयर्लंडांतील एका लष्करी अधिकाऱ्याचें नांव होतें, हें आज सांगितल्यास तें कोणाला खरें वाटेल? १८८० सालीं आयरिश पुढारी पार्नेल याने जुलमी करांनी त्रस्त झालेल्या आयर्लंडांतील शेतकऱ्यांना त्या करांच्या पाशांतून मुक्त करण्यासाठी 'जमीन संघ' ( Land league ) स्थापन केला; व करबंदीच्या चळवळीला सुरवात केली. अर्थात् कर न देणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी जेव्हा सरकारने लिलावांत काढल्या, तेव्हा शेतकऱ्यांपुढे असा प्रश्न उभा राहिला-की, हे लिलाव बिनहरकत होऊं द्यावयाचे की त्यांना प्रत्यक्ष प्रतिकार करावयाचा? या प्रश्नाला पार्नेलने जें मुत्सद्देगिरीचें उत्तर एका जाहीर सभेंत दिलें, त्यांतूनच खरोखरी बहिष्काराची चळवळ उद्भवली.

एनिस यथे भरलेल्या शेतकऱ्यांच्या प्रचंड सभेंत त्याने असा प्रश्न विचारला की, "आपल्या शेजाऱ्याचें जप्त केलेलें शेत लिलावाला निघालें असतां जो इसम तें घ्यावयाला पुढे येतो, त्याला

तुम्ही काय शिक्षा कराल ?" त्यावर एका शेतकऱ्याने चटदिशीं उत्तर दिलें, "गोळी घालूं!" (Shoot him) तेव्हा हजरजबाबी पार्नेल हसत हसत म्हणाला, "गोळी घालण्यापेक्षा जास्त जालीम उपाय मी तुम्हाला सुचवितों. सरकारने लिलावाला काढलेली जमीन जो इसम विकत घ्यावयाला पुढे येईल, त्याला तुम्ही गोळी घालूं नका; तर एखाद्या महारोग्याप्रमाणे वाळींत टाका; त्याच्या त्या गुन्ह्याविषयींचा आपला तिरस्कार त्याला वाळींत टाकून व्यक्त करा. जगांत असा एकहि लोभी किंवा बेशरम मनुष्य नाही की, जो समाजाच्या या तिरस्कारापुढे, या असहकारापुढे टिकाव धरूं शकेल!" (I think, I heard somebody say, 'Shoot him.' But I wish to point out to you a very much better way. When a man takes a farm from which another has been evicted, you must show him on the roadside when you meet him, you must show him in the streets of the town, you must show him at the shop counter, in the fair and in the market-place, and even in the house of worship, by leaving him severely alone, by isolating him from his kind as if he was a leper of old; you must show him your detestation of the crime he has committed.) हा जो असहकाराचा प्रभावी उपाय पार्नेलने सुचविला, त्याचा प्रयोग लगेच लिलावाला निघालेल्या जमिनी विकत घ्यावयाला पुढे सरसावलेल्या कॅप्टन बॉयकॉट नांवाच्या लष्करी अधिकाऱ्यावर चवताळलेल्या शेतकऱ्यांनी केला. या कप्तानबहादुराला ठलवा मिळेना, न्हावी मिळेना, धोबी मिळेना, भंगी मिळेना, फार काय पोस्टाचा शिपाई त्याची डाक पोचवावयाला तयार होईना! हा जो सामाजिक असहकाराचा तीव्र प्रयोग कॅ. बॉयकॉटवर झाला, त्यामुळे 'बॉयकॉट' हा शब्द इंग्रजींत 'सामाजिक बहिष्कार' या अर्थाने रूढ होऊन, निःशस्त्र दलित जनतेचें तें एक अमोघ प्रतिकारास्त्र होऊन बसलें.

खुद्द टिळकांनी ज्या वेळीं 'बहिष्कार' हा शब्द प्रचारांत आणला, त्या वेळीं त्यांच्याहि मनांत केवळ विलायती मालावरील बहिष्कार एवढीच कांही संकुचित कल्पना नव्हती; तर विलायती मालावरील बहिष्कारापासून प्रारंभ करून जनतेचें प्रतिकाराचें सामर्थ्य जसजसें वाढेल, तसतसा तो बहिष्कार सरकारी राज्यकारभारापर्यंत नेऊन भिडवावयाचा आणि सरकारशीं पूर्ण असहकारिता करावयाची, इतकी त्या बहिष्काराची सर्वंकष व्याप्ति त्यांच्याहि डोळ्यांपुढे होती. किंबहुना, १९०६ सालीं कलकत्ता येथें पितामह दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनाच्या प्रथम विषयनियामक समितींत आणि नंतर खुल्या बैठकींत एका बाजूला टिळक, बिपिनचंद्र पाल यांचा राष्ट्रीय पक्ष आणि दुसऱ्या बाजूला सर फेरोजशहा मेहता, गोखले यांचा नेमस्त पक्ष यांचा या प्रश्नावर अटीतटीचा सामना झाला ! इतकेच नव्हे, तर श्री. बिपिनचंद्र पाल यांनी ज्या वेळीं त्या ठरावावर खुल्या बैठकींत बोलतांना, 'आज आम्ही विलायती कापडावर बहिष्कार घालीत असलों, तरी उद्या राज्ययंत्रावर बहिष्कार घालूं," अशी सिंहगर्जना केली, तेव्हा अध्यक्षांच्या मागल्या बाजूला व्यासपीठावर बसलेले पं. मदनमोहन मालवीय हे 'नाही ! नाही !!' म्हणून ओरडले ! राष्ट्रीय पक्ष आणि नेमस्त पक्ष यांच्यांत जो बेबनाव सुरतेला झाला, तो या बहिष्काराच्या व्याप्तीच्या प्रश्नावरच होय. सरकारच्या राज्यकारभारावर बहिष्कार घालण्याचें जें तत्त्व राष्ट्रीय पक्षानें त्या वेळीं आवेशाने प्रतिपादिलें, तें नेमस्त पक्षाला सनदशीरपणाच्या साच्यांत बसत नाही असें वाटल्यामुळेच, टिळक प्रभृति राष्ट्रीय पुढाऱ्यांना राष्ट्रसभेंतून बाहेर काढून देण्यांत आलें.

बहिष्काराच्या चळवळीचा हा उद्‌बोधक पूर्वेतिहास लक्षांत घेतला असतां महात्माजींनी आपल्या विधायक कार्यक्रमांत त्यावर बहिष्कार घालावा, याचें कोणाला नवल वाटणार नाही ? विशेषतः, बार्डोली येथील करबंदीच्या सत्याग्रहाच्या वेळीं सरदार वल्लभभाई पटेल यांनी

सरकारने लिलावाला काढलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेणाऱ्या सरकारी बगलबच्च्यांवर ज्या निष्ठुरतेने बहिष्काराचा प्रयोग केला, ती त्यांची लढाऊ निष्ठुरता ध्यानांत घेतली असतां, त्या प्रयोगाला संमति देणाऱ्या गांधीजींनी आपल्या विधायक कार्यक्रमांतून बहिष्कार खड्यासारखा वगळावा, हा तरी विसंगतपणाचा कडेलोटच नव्हे काय? फार कशाला? पं. मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य पक्ष ज्या वेळीं दिल्लीच्या मध्यवर्ती असेंब्लींत गेला, तेव्हा त्याने सरकारी समारंभ, पाटर्या, खाने वगैरेशीं संबंध न ठेवण्याचे बहिष्काराचें सामाजिक तंत्रहि मोठ्या काटेकोरपणाने कांही दिवस अंमलांत आणलेलें होतें, हें कोणाला माहित नाही? अशा स्थितींत, गांधीजींनी अहिंसेच्या अभिनिवेशाने बहिष्कारावर घातलेला हा बहिष्कार पाहून आम्हांला एका हरदासी कोटीची आठवण होते. यज्ञांत पशुहिंसा करावी की नाही, या मुद्यावर वाद चालू असतां एक पंडितंमन्य उद्गारले; "अहो, यज्ञांत पशुहिंसा होते कुठे? एक तर यज्ञांत बोकड मारला जातो, तो कोणत्याहि शस्त्राने नव्हे; तर शुद्धाचरणी सात्विक ब्राह्मण त्याला आपल्या पवित्र हातांनी बुकलून बुकलून मारतात! व दुसरें असें की, त्याला अशा रीतीने मारतांना त्याने यज्ञांतील धुराच्या लोटाबरोबर तडक स्वर्गाला जावें, असा त्यांचा प्रेमळ उद्देश असतो!!" गांधीजींची अहिंसात्मक प्रेममय असहकारिता हा या पशुयज्ञाच्या कोटींतलाच एक प्रकार नाही काय?

अर्थात् अहिंसातत्त्वाच्या अभिमानाने बहिष्काराला बगल देण्याचें महात्माजींचें हें कृत्य तत्त्व किंवा धोरण या दोन्हीहि दृष्टींनी विसंगत वाटतें. विशेषतः, युद्धाला बिनशर्त मदत करण्याचा जो आदेश राष्ट्रसभेला देण्याचा आपला निर्धार त्यांनी नुकताच बोलून दाखवला आहे, तो लक्षांत घेतां बहिष्कारावरील हा त्यांचा बहिष्कार म्हणजे निव्वळ आत्मवंचना आहे, असें म्हटल्यास तें चूक होईल काय? बार्डोलीच्या सत्याग्रहांतील सरकारी बगलबच्च्यांवरला किंवा स्वराज्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत.
अनुक्रम........ क्रमांक........ वि.........



पक्षाचा सरकारी समारंभांवरला बहिष्कार ज्यांना रुचूं आणि पचूं शकला, त्या महात्माजींनी स्वदेशीची प्रतिकारात्मक बाजू म्हणून मानला गेलेला औद्योगिक बहिष्कार तेवढा निषिद्ध ठरवावा, यांत सुसंगति किंवा औचित्य कुठे आहे ? उलट, अहिंसेच्या त्यांच्या असल्या अहंनिष्ठ लहरी शास्त्रार्थामुळे जनशक्ति पावलोपावलीं कुंठित होऊन गंजून जाते, असाच आजपर्यंतचा अनुभव नाही काय ? जनशक्ति म्हणजे कांही राजदरबारीं खुराक घालून पोसलेला ऐदी पहिलवान नव्हे. स्वातंत्र्याच्या लढ्यांत वासवी शक्तीप्रमाणें तिचें अमोघ सामर्थ्य कामी यावें हाच जर विधायक कार्यक्रमाचा उद्देश असेल, तर त्या शक्तीला प्रतिकाराची तीव्र धार सतत राहील, अशी दक्षता घ्यावयाला नको काय ? तशी कोणतीच धार विधायक कार्यक्रमाला नसल्यामुळेच लोकांना तो कार्यक्रम अराजकीय, अळणी वाटतो; व त्यावर लोकांची श्रद्धा बसत नाही. किंबहुना, समाज-सेवेचीं कामें करणाऱ्या ज्या इतर अनेक सरकारी वा निमसरकारी संस्था आज देशांत आहेत, त्यासारखेंच या विधायक कार्यक्रमाचें स्वरूप लोकांना वाटतें. तेव्हा, त्या कार्यक्रमांत प्रतिकाराचें तेज निर्माण केल्याशिवाय तो लोकप्रिय होणार नाही, हें गांधीजींना केव्हा उमजणार ?

४-८-४४

# जनसेना हीच जनशक्ति

म. गांधी यांच्या विधायक कार्यक्रमांतील सर्वांत मोठें वैगुण्य स्वयंसेवक दलाचा अभाव हें होय. लो. टिळक यांच्या हातीं राष्ट्रसभेच्या नेतृत्वाचीं सूत्रें आल्यावर त्यांचें लक्ष प्रथम स्वयंसेवक संघटनेच्या उभारणीकडे वळलें; व मुंबईचे त्यांचे कट्टे अनुयायी डॉ. साठे आणि डॉ. वेलकर यांनी नॅशनल यूनियनतर्फे राष्ट्रीय पक्षाचें स्वयंसेवकदल

उभारण्याचा प्रयत्न केला. १९१८–१९ सालीं होमरूलच्या चळवळींतील ज्या प्रचंड सभा मुंबईला भरत, त्या सभांची व्यवस्था ठेवण्याचें काम हें स्वयंसेवकदलच मुख्यतः करीत असे. टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पक्षाची जशी वाताहत झाली, तशीच या स्वयंसेवकसंघटनेचीहि झाली. राष्ट्रसभेचे सर्वाधिकार गांधीजींकडे आल्यावर त्यांनी तिची घटना जास्तींत जास्त लोकाभिमुख करून खेड्यापाड्यांतून सुद्धा तिच्या चळवळीचीं केंद्रें निर्माण केलीं, ही गोष्ट खरी. पण स्वयंसेवकसंघटनेकडे मात्र त्यांनी अजिबात दुर्लक्ष केलें. किंबहुना, जगांत राष्ट्रसभा हीच एक अशी बलाढ्य झुंजार राजकीय संस्था आहे की, जिचें आज स्वतःचें असें खडे हुकमी स्वयंसेवकदल नाही !

इतकेंच नव्हे, तर १९२३ सालीं म. गांधी तुरुंगांत असतांना, कोकोनाडा येथे मौ. महंमदअली यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या राष्ट्रसभेच्या आदेशानुसार, पं. जवाहरलाल नेहरू यांच्या प्रोत्साहनाने डॉ. हर्डीकर यांनी जें हिंदुस्थानी सेवादल उभारलेलें होतें, तें हिंदुस्थान सरकारने १९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळींत बेकायदा ठरवल्यावर त्याच्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न कांही करण्यांत आला नाही. ध्वजवंदनाचा जो कार्यक्रम प्रत्येक महिन्याच्या शेवटल्या रविवारीं अजूनहि करण्यांत येतो, तो या सेवादलानेच प्रथम सुरू केला; व बलसंवर्धनाचें विद्यालयहि त्याच्यातर्फे चालविलें जात होतें. राष्ट्रसभेचे सभासद वाढवण्याचें, तिच्या अधिवेशनाची तयारी आणि व्यवस्था करण्याचें आणि परदेशी कापडावरील बहिष्काराची मोहीम चालविण्याचें अशीं तीन कामें हें दल १९३० सालपर्यंत मुख्यतः करीत असे. या दलाचे संस्थापक आणि सेनानी डॉ. हर्डीकर हे अमेरिकेंत श्री. लाला लजपतराय यांच्या तालमींत तयार झालेले होते; व टिळकांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानांत जी स्वराज्याची चळवळ त्या वेळीं चालू होती, तिचें लोण अमेरिकन जनतेपर्यंत पोंचवण्याचें काम त्यांनी मोठ्या हिमतीने केलेलें होतें. गेल्या महायुद्धाच्या वेळीं पोलंड आणि आयर्लंड या दोन परतंत्र राष्ट्रांच्या

अमेरिकेंत येऊन राहिलेल्या निर्वासित नेत्यांनी स्वयंसैनिकांचीं प्रचंड दलें कशीं उभारलीं आणि त्या दलांनी आपआपले मायदेश दास्यमुक्त करण्यासाठी प्रत्यक्ष रणांगणावरहि कसा सामना दिला, हें डॉ. हर्डीकर यांनी स्वतः डोळयांनी पाहिलेलें होतें. त्यामुळे, लढाऊ राजकीय चळवळीला स्वयंसेवकदलांची किती आवश्यकता असते, याची त्यांना उत्कृष्ट जाणीव होती. म्हणून, हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनी हिंदुस्थानी सेवादलाची कल्पना काढली; अलीबंधूंनी त्या कल्पनेचा सक्रिय पुरस्कार केला; व पं. जवाहरलाल नेहरू हे त्याच्या उभारणीच्या उपक्रमांत हिरीरीने भाग घेऊन स्वतः जातीने त्यांत दाखल झाले. हें सेवादल म्हणजे खरोखरी राष्ट्रसभेची स्वयंसेना होती. पण, कायदेभंगाच्या चळवळींत हिंदुस्थान सरकारच्या क्रोधाला बळी पडलेल्या या दलाच्या पुनरुज्जीवनाचा कौल गांधीजी आणि वर्किंग कमिटी यांनी न दिल्यामुळे, या वर्धिष्णु जनसेनेचा आपोआप उच्छेद झाला !

पण, राष्ट्रसभेने जरी गांधीजींच्या अहिंसेच्या घातक कल्पनेच्या आहारीं जाऊन सेवादलाची उपेक्षा केली असली, तरी स्वयंसेवकदलें हीं कोणत्याहि चळवळींतील इतकी आवश्यक संघटना आहे व विशेषतः हिंदुस्थानासारख्या विस्कळित शिस्तशून्य देशांत तर तिची निकड इतकी तीव्र आहे की, डॉ. हर्डीकर यांच्या गांधीजींनी खच्ची केलेल्या दलकल्पनेला निरनिराळया व्यक्तींच्या आणि पक्षांच्या प्रयत्नाने नवे धुमारे फुटले. या अभिनव प्रयत्नांत डॉ. हेडगेवार यांच्या राष्ट्रीय स्वयंसेवकसंघ या संस्थेला अग्रपूजेचा मान दिला पाहिजे. ही संस्था आपल्या विशिष्ट तत्त्वप्रणालीने हिंदु महासभेशीं निगडित झालेली असून, तिचें स्वरूप जातीय आहे, असा प्रचार केला जातो. पण तो सर्वथैव निराधार आहे. या संघाची भूमिका शुद्ध राष्ट्रीयत्वाची आहे; कोणत्याहि विद्यमान अधिकृत राजकीय किंवा जातीय पक्षाशीं तो संलग्न झालेला नाही; त्याच्या कार्यकर्त्यांनी प्रत्येक महत्त्वाच्या राष्ट्रीय आंदोलनांत हिरीरीने भाग

घेतलेला आहे; व त्याच्या संघटनेंत जसें हिंदु समाजांतील कोणत्याहि जातीच्या तसेंच कोणत्याहि प्रांताच्या आणि धर्माच्याहि व्यक्तीला मुक्तद्वार आहे. किंबहुना, हिंदुस्थानांत राष्ट्रव्यापी असा हा एवढा एकच स्वयंसेवक संघ आहे की, ज्याने आपल्या संघटनेंत ब्राह्मणापासून मुसलमानापर्यंत सर्व जातींच्या आणि धर्मांच्या तरुणांना दाखल करून घेऊन तिचा व्याप लाहोरपासून मद्रासपर्यंत वाढविला. जातीयतेप्रमाणेच संघावर जो दुसरा ठळक आरोप केला जातो, तो हुकूमशाहीचा. पण, हुकूमशाहीशिवाय कोणतें दल, कोणती स्वयंसेना किंबहुना कोणता पक्ष आज जगांत चाललेला आहे, तर एकट्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला त्याबद्दल नांवें ठेवावींत? विशेषतः, अहिंसेच्या चाकोरीबाहेर चळवळीचा गाडा जरा गेलेला दिसतांच जिथे गांधीजींसारखा महात्मासुद्धा त्या 'वाट चुकलेल्या' बेपत्ता फरार देशभक्तांना पोलिसांच्या स्वाधीन होण्याचा हुकूम जाहीर रीतीने सोडतांना आपण पाहातों, तिथे संघाच्या हुकूमशाहीला नाकें मुरडणें हें निव्वळ ढोंग नव्हे काय? राष्ट्रसभेंत जितकी निरर्गल हुकूमशाही आज आहे, तितकीच असल्यास संघामध्येहि असेल; व कोणत्याहि स्वयंसेवकांच्या दलाला ती प्राणभूतच म्हटली पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाची तत्त्वप्रणाली कोणाला मान्य असो वा नसो, त्या संघाने देशांतील तरुणांत जातिनिरपेक्ष आणि प्रांतनिरपेक्ष ऐक्याची भावना निर्माण करून जें शिस्तीचें, सेवेचें, स्वाभिमानाचें आणि स्वार्थत्यागाचें वळण त्यांच्या जीवनाला लावलेलें आहे, तें केव्हाहि प्रशंसनीयच ठरेल.

राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाशीं कांही बाबतींत तुल्य असें जर दुसरें कोणतें स्वयंसेवकदल आज या देशांत असेल, तर तें खाकसार हें होय. संघ जसा हिंदु महासभेशीं संलग्न झालेला नाही, तसें खाकसार दलहि मुस्लिम लीगशीं निगडित झालेलें नाही. पण, संघ आणि खाकसार यांत जो महत्त्वाचा फरक आहे तो हा की, खाकसारांची संघटना ही इस्लामनिष्ठ असून, मुसलमानांच्या हितसंब-

धांचा प्रश्न जेव्हा जेव्हा उपस्थित होतो, तेव्हा तेव्हा तो राजकारणांत कसा उघड उघड भाग घेतो, हें त्याचे संस्थापक, सर्वाधिकारी आणि सेनानी श्री. अल्लामा मश्रिकी यांच्या गेल्या चार पांच वर्षांतील हालचालींवरून स्पष्टच आहे. संघ आणि खाकसार यांच्या धोरणांतील हा फरक आज जरी तितका जाणवत नसला, तरी हिंदु-मुस्लिम प्रश्न जर उद्या विकोपाला गेला किंवा हिंदुस्थानांत जर कधी अराजक माजण्याची आपत्ति ओढवली, तर त्या प्रसंगीं खाकसार दल कोणता डाव खेळेल, हें सांगणें मात्र कठीण नाही. संघ आणि खाकसार यांच्या तोडीचें देशव्यापी दल हिंदुस्थानांत तिसरें नाही. तथापि, ना. डॉ. अंबेडकर यांच्या नेतृत्वा-खाली हरिजन बंधूंनी उभारलेलें पण अजून असंघटित स्थितींत असलेलें समतासैनिक दल हें उल्लेखनीय असून, मुंबईंतील कांग्रेस कार्यकर्त्यांचें राष्ट्रसेवा दल आणि मध्यप्रांत–वऱ्हाडांतील राष्ट्रीय युवकसंघ या दोन्ही संघटना लहानच पण महत्त्वाच्या आहेत. राष्ट्रीय युवकसंघ हा आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या प्रेरणेने स्थापन झाला; व त्या दलांत कांग्रेसमधील अनेक धडाडीचे त्यागी तरुण मोठ्या उत्साहाने दाखल झाले. पण, ऑगस्ट उठावणीनंतर या संघावर सरकारची वक्र दृष्टि पडून तेलंखेडी कटाच्या खटल्या-सारख्या तोहमतींत या संघाला गुंतविण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. पण सुदैवाने तो यशस्वी झाला नाही. राष्ट्रसभेची नित्याची चळ-वळ सुरू झाल्यावर या संघाचें जर पुनरुज्जीवन करण्यांत आलें, तर कांग्रेसमधील तरुणांना एक नवें कार्यक्षेत्र उपलब्ध होईल.

हिंदुस्थानांतील स्वयंसेवक दलांची आजची ही स्थिति पाहि-ल्यावर राष्ट्रसभेसारख्या जुन्या, सुप्रतिष्ठित आणि बलाढ्य समजल्या गेलेल्या राजकीय संस्थेची स्वतःची स्वयंसेना असूं नये, याचें कोणाला नवल वाटणार नाही ? राष्ट्रसभेला स्वयंसेवकांच्या संघटनेची जोड मिळूं शकत नाही याचें मुख्य किंबहुना एकमेव कारण गांधीजींनी तिच्या भोवती उभारलेली अहिंसेची पोलादी

चौकट ! त्या चौकटींत जें जें बसत नाही—मग तें राष्ट्रसंघटनेला आणि स्वातंत्र्यप्राप्तीला कितीहि पोषक वा आवश्यक असो,—तें तें गांधीजींच्या मतें त्याज्य; व म्हणून राष्ट्रसभेलाहि अस्वीकार्य ! —असें हें दुष्ट वर्तुळ आहे. गेल्या महायुद्धाच्या वेळीं आयर्लंड, रशिया आणि पोलंड या तीन राष्ट्रांत जी क्रांतीची उठावणी झाली, ती सर्वस्वी त्या त्या राष्ट्रांतील व्हॅलेरा, लेनिन आणि पॅडरस्की यांच्यासारख्या धुरंधर क्रांतिवादी पुढाऱ्यांनी उभारलेल्या स्वयंसेवक दलांच्या,—लढाऊ जनसेनांच्या बळावरच झाली नाही काय ? तथापि, गांधीजींना जिथे हायस्कुलांतून निशाणबाजीचें शिक्षण देणेंच काय, पण लाठीकाठीचें साधें कवायती शिक्षण देणेंसुद्धा अहिंसेला बाध आणणारें व म्हणून निषिद्ध वाटतें, तिथे राष्ट्रसभेची जनसेना निर्माण होण्याचा योग येणार कसा ? आणि, जनसेना जोंपर्यंत उभारली जात नाही, तोंपर्यंत स्वातंत्र्याचे ते अहिंसक लढे प्रत्येक वेळीं शरणागतीच्या घसरगुंडीवर येऊन थडकावेत, हा जो लाजिरवाणा प्रकार गेलीं चोवीस वर्षें चालू आहे, तो तरी थांबणार कसा ?

५-८-४४

# जनशक्तीच्या तीन आघाड्या

ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं लोकमान्यांच्या मृत्यूमुळे महात्माजींकडे ज्या वेळीं हिंदुस्थानाच्या नेतृत्वाचा वारसा आला, त्या वेळीं टिळकांनी भावी राजकीय लढ्याच्या तीन आघाड्या निश्चित करून ठेवलेल्या होत्या. त्या आघाड्या म्हणजे (१) बहिष्कार, (२) अडवणूक आणि (३) प्रत्यक्ष प्रतिकार या होत. यांपैकी बहिष्काराचा प्रयोग १९०६-७ सालच्या चळवळींत प्रभावी ठरून, मोर्लेसाहेबांनी वज्रलेप म्हणून वर्णन कलेली बंगालची फाळणी रद्द होण्याच्या रूपाने,

टिळक काळ्या पाण्यावरून सुटून परत येण्यापूर्वीच, त्याच्या यशाचें माप लोकांच्या पदरांत पुरेपूर पडलेलें होतें. पण, कायदेमंडळांतील अडवणूक आणि कायदेमंडळाबाहेरील प्रत्यक्ष प्रतिकार यांचा प्रयोग करण्याची जी संधि मॉंटफोर्ड सुधारणांच्या अंमलबजावणीमुळे अगदी दत्त म्हणून पुढे उभी ठाकलेली होती, ती मात्र त्यांच्या अनपेक्षित निधनामुळे हुंकली. असहकारितेची पहिली लाट ओसरल्यावर पं. मोतीलाल नेहरू आणि श्री. विठ्ठलभाई पटेल यांनी पुढे मध्यवर्ती असेंब्लींत अडवणुकीचें तंत्र अत्यंत कुशलतेने यशस्वी करून दाखवलें, हें खरें; व त्यानंतरची कायदेभंगाची चळवळ हा प्रत्यक्ष प्रतिकाराचाच एक प्रकार होता, यांतहि कांही शंका नाही. पण, टिळकांनी योजिलेल्या धोरणाप्रमाणे हा तिहेरी लढा चालला नाही, हें त्याबरोबरच लक्षांत घेतलें पाहिजे.

टिळकांनी हें तिहेरी लढ्याचें तंत्र आयर्लंडचा झुंजार राष्ट्रीय पुढारी पार्नेल याच्या होमरूलच्या चळवळींतून उचललेलें होतें, हें उघड आहे. आयर्लंडच्या बाबतींत ब्रिटिश पार्लमेंटचें धोरण अत्यंत बेपर्वाईचें आहे, अशी बालंबाल खात्री पटल्यामुळे त्याला वठणीवर आणण्यासाठी बिगार, पार्नेल आणि ओगोर्मन या पार्लमेंटांतील राष्ट्रीय पक्षाच्या तीन सभासदांनी हें अडवणुकीचें तंत्र प्रथम अंमलांत आणलें; व त्याचा प्रयोग इतक्या बेमुर्वतखोरपणाने केला की, त्यांच्या या निरर्गल अडवणुकीची नांगी मोडण्यासाठी पार्लमेंटला आपल्या कामकाजाच्या नियमांत अखेर बदल करावा लागला. या अडवणुकीच्या बेगुमानपणाची कल्पना येण्यासाठी फक्त एकच उदाहरण दिलें तरी पुरें होईल. ब्रिटिश राज्यघटनेंत असा एक अलिखित संकेत आहे की, इंग्लंडचा राजा आणि त्याच्या कुटुंबांतील मंडळी हीं वादातीत समजलीं जावींत. पण या तिघा बंडखोर तरुणांनी हा संकेत लाथाडून एक दिवस साऱ्या ब्रिटिश जनतेला थक्क केलें. ता. २७ एप्रिल १८७५ रोजीं ब्रिटिश पार्लमेंटचा एक जमीनदार सभासद

हेन्री चॅप्लिन याने शर्यतीच्या उत्तमोत्तम घोड्यांच्या इंग्लंडांतून त्या वेळीं होत असलेल्या निर्यातीचा निषेध करणारा ठराव आणला. इंग्लंडमधील संपन्न वर्गांना शर्यतीचा किती जबरदस्त शौक आहे, हें निदान हिंदुस्थानांतील लोकांना तरी आता सांगण्याची गरज नाही. त्यामुळे या ठरावावरील चर्चा ऐकण्यासाठी त्या वेळीं युवराज असलेले बादशहा सातवे एडवर्ड हे मुद्दाम प्रेक्षकांच्या गॅलरींत येऊन बसलेले होते पण, ही चर्चा पडदपोशींत व्हावी, असें ठरलें होतें. त्यामुळे, पार्लमेंटच्या स्पीकरने चॅप्लिनला त्याचा ठराव मांडण्याची सूचना करतांच, बिगार ताडकन उठून उभा राहिला आणि समोरच्या गॅलरींत बसलेल्या युवराजांकडे पाहून उद्‌गारला, "अहो स्पीकरमहाराज, मला इथे तिऱ्हाईत माणसें बसलेलीं दिसत आहेत !" [ I espy strangers here ] युवराजांच्या उपस्थितीला बिगारने घेतलेला तो आक्षेप ऐकून बिचारा स्पीकर स्तिमित होऊन गेला; व सभागृहांतहि या त्याच्या असभ्य आक्षेपाबद्दल कुरकुर सुरू झाली. म्हणून स्पीकरने आवंढा गिळून त्याला विचारलें, "सभागृहांत तिऱ्हाईत माणसें हजर आहेत अशी खरोखरीच आपली तक्रार आहे काय ?" त्यावर बिगारने ठासून सांगितलें, "होय !" त्याची ती हरकत अगदी रास्त होती. त्यामुळे बिचारा स्पीकर निरुपायाने युवराजांकडे पाहून म्हणाला, "तसें असेल, तर तिऱ्हाइतांना मला सभागृहांतून बाहेर निघून जावयाला सांगणें भाग आहे !" आणि युवराज एडवर्ड यांना आपल्या लवाजम्यासह मुकाट्याने उठून जावें लागलें !

आयरिश राष्ट्रीय पक्षाच्या एका कुबड्या मुखदुर्बळ सभासदाने युवराजांचा असा उपमर्द केलेला पाहून तमाम ब्रिटिश जनता अगदी चवताळून गेली; व इंग्रजी वर्तमानपत्रांनी आयरिश राष्ट्रीय पक्षाच्या या असभ्य वर्तनाबद्दल एकच गिल्ला सुरू केला. इतकेंच नव्हे, तर दुसऱ्या दिवशीं पार्लमेंटच्या बैठकींत बिगार याचा आयरिश राष्ट्रीय पक्षांतील एक सहसदस्य जॉर्ज ब्रायन याने असे उद्‌गार काढले की, "मला वाटतें, मनुष्याने प्रथम संभावित आणि नंतर देशाभिमानी

असलें पाहिजे !" (I think, that a man should be a gentleman first and a patriot afterwards.) त्यावर पार्नेलने तिथल्या तिथे उठून उत्तर दिलें, "छे, छे, देशाभिमान प्रथम,—संभाविती वगैरे इतर सगळ्या गोष्टी मागाहून ! इथे गुळचट भाषणें करून कांही मिळण्यासारखे नाही. दांडगाईच केली पाहिजे !!" (Ah, it is not by smooth speeches that you will get anything done here. We want rougher work.) आणि पार्नेलच्या या उद्‌गारांत त्याच्या सर्व राजकारणाचें मर्म साठवलेलें आहे. त्यामुळे सनदशीर आणि सशस्त्र अशी दुहेरी चळवळ एकाच वेळीं शिताफीने चालवून त्याने आयर्लंडच्या स्वराज्याचा प्रश्न आपल्या हयातींत धसाला लावून घेतला. किंबहुना, आयर्लंडांत त्या वेळीं जोरांत असलेल्या क्रांतिकारक फिनियन चळवळीचा प्रवर्तक जॉर्ज मूर याने, "आयर्लंडांतील इंग्रजी सत्तेविरुद्ध चालू असलेल्या लढ्यांत जें जें कांही व्यवहार्य आणि शक्य म्हणून असेल, तें तें सर्व करावें, असें माझें स्पष्ट मत आहे," (I am in favour of whatever is practicable in the struggle against English rule in Ireland) असें जें शक्तिगर्भ सूत्र उद्‌घोषिलेलें होतें, तें जणू आपल्या राजकीय धोरणाचें ब्रीदवाक्य म्हणूनच पार्नेलने स्वीकारलें होतें. त्यामुळे फिनियन क्रांतिकारकांच्या उत्पाती चळवळीशीं त्याने निकट संबंध ठेवला; व 'जमीन संघा'ची जी करबंदीची चळवळ मायकेल डेव्हिट प्रभृति फिनियन पुढाऱ्यांनी सुरू केली, तिचाहि त्याने धडाडीने पुरस्कार केला. अर्थात् आयर्लंडांतील साऱ्या स्वराज्यवादी पक्षांतील मतभेद दूर करून, ब्रिटिश पार्लमेंटांत त्याने चालवलेल्या होमरूलच्या लढ्याला उठाव देण्यासाठी, सनदशीर चळवळीचे अभिमानी आणि सशस्त्र क्रांतीचे पुरस्कर्ते या दोघांच्याहि सहकारितेने ब्रिटिश साम्राज्यशाही-विरुद्ध संयुक्त आघाडी निर्माण करण्यांत त्याला अपूर्व यश आलें ! (Parnell's aim was to minimise Nationalist differences, to secure co-operation between

revolutionaries and constitutionalists, in the interest of the parliamentary movement.)

कारण, प्रत्यक्ष प्रतिकाराच्या (Direct action) कक्षेंत, पार्नेलच्या मताप्रमाणे, करबंदीसारख्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीपासून तों फिनियन क्रांतिकारकांच्या सशस्त्र बंडासारख्या अविनय उठावणीपर्यंत प्रतिकाराचे सारे प्रकार बसत होते. किंबहुना, १८६७ सालच्या मार्चमध्ये झालेल्या फिनियन बंडाळींत फासावर गेलेल्या क्रांतिकारकांचा उल्लेख पार्लमेंटांत जेव्हा एका ब्रिटिश सभासदाने 'खुनी इसम' (murderers) म्हणून केला, तेव्हा पार्नेलने तत्क्षणींच उठून त्या शब्दाला हरकत घेतली आणि बजावून सांगितलें की, "ते तुमच्या आमच्या इतकेच संभावित देशभक्त होते!" पण यांत नवल काय? गोखले, टिळक आणि गांधी यांच्यांत एरवी कितीहि तीव्र मतभेद असले, तरी परतंत्र जनतेला आपल्यावर होणाऱ्या जुलमाविरुद्ध बंड करण्याचा सनदशीर हक्क आहे, असें मत त्या तिघांनीहि व्यक्त केलेलें नाही काय? व ऑगस्ट उठावणींतील घातापाताचीं कृत्यें गांधीजींना मान्य नसतांनाहि तीं करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या धैर्याचा आणि शौर्याचा गौरव जो मुक्तकंठाने त्यांनी वेळोवेळीं केलेला आहे, त्याचाहि अर्थ हाच होत नाही काय? किंबहुना, चालू महायुद्धांत जर्मनीने जिंकलेल्या पोलंड, फ्रान्स वगैरे देशांतील भूमिगत उठावणीला (underground movement) चर्चिल आणि स्टालिन यांनी, जगाच्या कानठळ्या फुटतील अशा आवेशाने, नभोवाणीवरून गर्जून जी चिथावणी दिली, ती अशा प्रकारच्या उठावणीची विशिष्ट परिस्थितींतील न्याय्यता निर्विवाद सिद्ध करीत नाही काय? पण, प्रत्यक्ष प्रतिकाराच्या मर्यादेंत करबंदीपासून बंडापर्यंत सगळे प्रकार बसत असले, तरी न्याय्यान्याय्यतेप्रमाणेच शक्याशक्यतेचीहि आणखी एक मर्यादा त्याला आहे, हें विसरून चालणार नाही; व म्हणून टिळक हे, गांधीजींप्रमाणे, तत्त्वतः सशस्त्र क्रांतीच्या विरुद्ध नसतांनाहि त्यांनी अत्याचारी चळवळीचा पुरस्कार असा मात्र कधी

केला नाही. "प्रत्यक्ष बंडाच्या बाबतींत मी दैववादी आहे," असे जे उद्‌गार त्यांनी काढलेले होते, त्यांचेंहि मर्म झालें तरी हेंच होय. पण, गांधीजींप्रमाणे टिळकांनी सशस्त्र क्रांति कधी वर्ज, त्याज्य किंवा निंद्य मात्र मानली नाही. उलट क्रांतिकारकांशीं सूत्र ठेवून त्यांच्यावरील संकटाच्या प्रसंगीं त्यांना करवेल तितकें साह्य मोठ्या धैर्याने केलें.

या तीन आघाड्यांवर जनशक्तीचा सारखा जोर लागला, तरच ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं चालू असलेला आपला लढा यशस्वी होईल, याची टिळकांना पूर्ण जाणीव होती; व म्हणूनच गांधींप्रमाणे, कोणत्याहि विशिष्ट तत्त्वाच्या पोलादी साच्यांत आपली चळवळ न बसवतां, निरनिराळ्या मतांचे आणि वृत्तींचे जास्तींत जास्त लोक तींत दाखल करून घेऊन साम्राज्यविरोधाची संयुक्त आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी चालवला होता. कायदेमंडळाबाहेरील बहिष्काराची चळवळ सतत चालू ठेवून जनतेचा लढाऊ बाणा कायम ठेवावयाचा, जनशक्ति वाढवण्याच्या दृष्टीने कायदेमंडळांतील अधिकारपदें शक्य तितकी राबवून घ्यावयाचीं, ती गोष्ट ज्या वेळीं अशक्य होईल त्या वेळीं निवडणुकींत जनतेचा कौल घेऊन बाहेरच्या बहुमताचें दडपण सरकारवर आणावयाचें व त्या दडपणाचाहि परिणाम जर सरकारवर कांही झाला नाही तर प्रत्यक्ष प्रतिकाराची मोहीम सुरू करावयाची, असें टिळकांच्या या तीन आघाड्यांवरील लढ्याचें परस्परपूरक तंत्र होतें. १९२४ सालीं स्वराज्य पक्ष कायदेमंडळांत गेल्यापासून पुढे १९३० सालीं कायदेभंगाची चळवळ सुरू होईपर्यंत त्या सहा वर्षांत ज्या राजकीय हालचाली झाल्या, त्यांत या तंत्राचा अवलंब किती प्रमाणांत आणि कशा रीतीने करण्यांत आला, हें विचारांतीं सहज लक्षांत येईल. किंबहुना, या हालचालींतील एक प्रमुख सूत्रधार श्री. विठ्ठलभाई पटेल यांनी १९२० सालीं, असहकारितेच्या चळवळीला प्रारंभ होण्याच्या सुमारास, निरनिराळ्या परतंत्र राष्ट्रांतील असहकाराच्या डावपेचांचें वर्णन करणारें जें एक छोटेखानी इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध केलेलें होतें, त्यांत या तीन

आघाडयांवरील लढयाची कल्पना उत्कृष्ट रीतीने विशद केलेली होती. तेव्हा, टिळकांनी योजिलेल्या या तिहेरी लढयाचें मर्म त्यांच्या समकालीन पुढाऱ्यांना उमजलेलें होतें, हें उघड आहे. मग या लढयाचा प्रयोग यशस्वी का होऊं शकला नाही ?

६-८-१९४४

# अहिंसा आणि असंतोष

टिळकांच्या मृत्यूनंतर गेल्या दोन तपांत म. गांधी यांच्या नेतृत्वाखाली जे तीन लढे झाले, त्यांचें विश्लेषण केलें असतां टिळक आणि गांधी यांच्या राजकारणाकडे पहाण्याच्या दृष्टिकोनांतील मूलभूत फरक आणि त्या लढयांच्या अपेशाचीं कारणें या दोहोंचीहि यथार्थ कल्पना येईल. गांधीजींच्या विभूतीचे आणि नेतृत्वाचे मुख्य घटक दोन : अहंकार आणि अहिंसावाद. १९१९ सालच्या डिसेंबरमध्ये अमृतसर येथे पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनांत गांधीजींचे हे दोन्ही विशेष प्रथम जगाच्या निदर्शनाला आले. सरकारच्या दडपशाहीची प्रतिक्रिया म्हणून पंजाब आणि गुजरात या प्रांतांतील लोकांनी जे अत्याचार केले, त्यांचा निषेध करण्यासाठी त्यांनी विषयनियामक समितीत आणलेला ठराव बहुमताने फेटाळला गेला. लो. टिळक आणि देशबंधु दास हे दोघेहि या ठरावाला प्रतिकूल होते. पण, आपल्या ठरावाविरुद्ध बहुमताने दिलेला हा कौल पाहातांच, तो मुकाटयाने मान्य करण्याऐवजी, गांधीजी तेवढया त्या अपरात्री उठून उभे राहिले आणि विनयपूर्वक जाहीर करते झाले की, "राष्ट्रसभेने जर माझ्या या बाबतीतील दृष्टिकोनाचा अंगीकार केला नाही, तर मला तींत रहाणें अशक्य होईल!" अर्थात् टिळक आणि दास यांनी सरकारची दडपशाही आणि लोकांचे अत्याचार या दोहों-

चाहि निषेध करणारा ठराव तडजोड म्हणून सुचवला; व अशा रीतीने अखेर राष्ट्रसभेंतून बाहेर जावयाला निघालेले महात्माजी एकदाचे तींत राहिले !

अशाच प्रकारचा तीव्र मतभेद माँटफोर्ड सुधारणांविषयीच्या ठरावावरहि झाला. टिळक आणि दास हे दोघेहि या मताचे होते की, त्या सुधारणा निराशाजनक आहेत असें जाहीर करून, जरूर तेथे विरोध आणि शक्य तेथे सहकार्य या प्रतियोगी धोरणाचा अवलंब त्या राबवून घेण्याच्या बाबतींत करावा. (Pursuing a policy of obstruction if necessary & cooperation if possible) गंमत अशी की, टिळक आणि दास हे अशा रीतीने अडवणुकीच्या धोरणाचा पुरस्कार करीत होते; तर गांधीजींचा खाक्या मात्र या वेळी, डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, सपशेल सहकार्याचा होता; व तदनुसार त्यांनी, देशबंधूंच्या ठरावांतील 'निराशाजनक' (disappointing) वगैरे शब्द गाळून टाकावेत, सुधारणांसंबंधीच्या बादशाही घोषणेचें स्वागत पूर्ण सहकार्याचें आश्वासन देऊन करावें आणि सुधारणांचा खर्डा तयार करण्याचे परिश्रम घेतल्याबद्दल माँटेग्युसाहेबांचे आभार मानावेत, अशी तिहेरी उपसूचना या ठरावाला आणली. शेवटी याहि मुद्यावर गांधीजी इतके हट्टाला पेटले की, सहकार्याचे आश्वासन आणि आभार व्यक्त करणाऱ्या कलमाचें शेपूट दासबाबूंच्या मूळ ठरावाला जोडून टिळकांना तडजोड घडवून आणावी लागली. टिळकांच्या 'निराशाजनक' या विशेषणावर गांधीजींचा आक्षेप असा होता की, त्या शब्दांतून संन्यासाची म्हणजे सुधारणांविषयीच्या वैराग्याची वृत्ति ध्वनित होते. यावर टिळकांनी असे मार्मिक उत्तर त्यांना दिलें की, मला फलाशेची मुळीच चाड नसल्यामुळे निराशेने माझ्या कर्मयोगाला उलट जोर चढतो ! अत्याचारांच्या निषेधाच्या आणि सुधारणांच्या स्वीकाराच्या या दोन्ही ठरावांवरील चर्चेत गांधीजींचें अहंतामूलक व्यवच्छेदक धोरण प्रथमच राष्ट्रसभेंतील पक्षोपपक्षांच्या

प्रत्ययाला आलें; व त्यानंतर सात महिन्यांच्या आंतच टिळकांचें देहावसान झाल्यामुळे त्या धोरणाला मुरड घालून राष्ट्रसभेंतील निरनिराळ्या पक्षांची एकजूट कायम ठेवणारी जी एकमेव समन्वय-शक्ति देशांत होती, तीहि दुर्दैवाने नष्ट झाली.

या दोन ठरावांवर महात्माजी जे इतके इरेला पेटले, ते त्यांच्या दृष्टीने खरोखरीच अगदी योग्य कारणांमुळे. देशांतील राष्ट्रीय आणि राजकीय चळवळीचा पाया कोणता असावा, हाच मुळी या वादांत मुख्य मुद्दा होता. टिळकांनी राजकारणाचा पाया असंतोष म्हणजेच प्रक्षोभ किंवा बंडखोरीची बुद्धि हा मानलेला होता. ती बंडखोरीची बुद्धि, परिस्थितीची अनुकूलता दिसल्यास, केव्हा सायुध सशस्त्र प्रकट होईल; तर प्रतिकूलता असल्यास आपल्या उसळत्या त्वेषाला म्यान करून मिळतें घेण्याच्या सामनीतीला प्रवृत्त होईल. स्वातंत्र्यसाधनांच्या बाबतींत टिळकांनी कधीच कोणती मर्यादा स्वतःला घालून घेतली नाही; वर्जावर्जाचा घोळ घातला नाही किंवा चळवळीचें सांचेबंद कर्मकांडहि निर्माण केलें नाही. ‘असंतोषः श्रियो मूलं’ हा जसा त्यांच्या राजकारणाचा पाया, तसें ‘साधनानामनेकता’ हें त्यांच्या धोरणाचें सूत्र होतें. गांधीजींना ही त्यांच्या राजकारणाची तात्त्विक आणि व्यावहारिक भूमिकाच मुळी मान्य नव्हती. त्यांच्या दृष्टीने अहिंसा हाच हिंदी राजकारणाचा आत्मा आणि आचारधर्महि व्हावयाला हवा होता. म्हणूनच त्यांनी, पंजाब आणि गुजरात प्रांतांत लोकांनी केलेल्या अत्याचारांचा निषेध करण्याचा ठराव विषयनियामक समितीने फेटाळतांच, राष्ट्रसभेंतून निघून जाण्याची धमकी दिली; व आपलें अहिंसेचें तत्त्व त्या धमकीच्या जोरावर बहुजनसमाजाला म्हणजेच राष्ट्रसभेला मान्य करावयाला भाग पाडलें. अमृतसरच्या राष्ट्रसभेंतील हा त्यांचा पहिला तात्त्विक जय होता. त्यांनाहि या आपल्या जयाची इतकी उत्तम जाणीव होती की, तो ठराव मांडतांना केलेल्या भाषणांत त्यांनी, “या

ठरावाइतका दुसरा कोणताच महत्त्वाचा ठराव या राष्ट्रसभेपुढे आलेला नाही," ( There is no greater resolution before this congress than this one ) असे उद्गार काढून आपल्या अहंकाराचें प्रदर्शन केलें ! अमृतसर येथे राष्ट्र-सभेला अहिंसेची दीक्षा देण्याचा जो हा विधि सुरू झाला, त्याची सांगता १९२० सालीं नागपूर येथें नाग नदीच्या तीरावर झाली.

राष्ट्रसभेच्या राजकारणाचा अहिंसा हा आत्मा आणि आचारधर्म झाल्यामुळे पहिला दुष्परिणाम जर कोणता झाला असेल, तर तो हा की, देशांतील क्रांतिवादी पक्षाचें राष्ट्रीय चळवळीं-तून पूर्ण उच्चाटन झालें. क्रांतिवादी पक्षांत निव्वळ व्यक्तिगत अत्याचार करणारे दहशतवादी लोकच मोडतात असें नाही; तर सशस्त्र सार्वत्रिक उठावणीचा पुरस्कार करणाऱ्या शुद्ध क्रांतिवाद्यां-पासून तों वर्गयुद्धाशिवाय हिंदुस्थानाच्या भवितव्याचा प्रश्न सुटणार नाही असें म्हणणाऱ्या साम्यवाद्यांपर्यंत सारे गट त्या पक्षांत येतात. गांधीजींच्या अहिंसेविषयीच्या आग्रहामुळे हे सगळे स्वातंत्र्य-वादी झुंजार गट राष्ट्रसभेंतून बाहेर काढले गेले, उघडे पडले आणि सरकारला त्यांचा उच्छेद करणें अत्यंत सुलभ झालें. टिळकांची कार्यपद्धति अशी होती की, कोणत्याहि नव्या लढा गटाचा तेजोभंग न करतां राष्ट्रसभेच्या कक्षेंत त्याला ओढावयाचें आणि त्याच्या साहाय्याने जनशक्तीच्या प्रतिकाराची धार जास्तींत जास्त तीक्ष्ण करून घ्यावयाची. त्यामुळे, ध्येय आणि व्यवहार यांची फारकत न होतां, निरनिराळ्या पक्षांच्या सहविचाराने राष्ट्रसभेचें धोरण समेवर राहून, साम्राज्यशाहीला विरोध करणारी संयुक्त आघाडी तिच्या व्यासपीठावर निर्माण होत असे. पण, राष्ट्रसभेने, गांधीजींच्या आदेशानुसार, तत्त्व आणि धोरण म्हणून अहिंसेचा अंगीकार करतांच, तें तत्त्व धोरण म्हणून सुद्धा न पत्करणाऱ्या कोणत्याहि पक्षाला राष्ट्रसभेच्या व्यासपीठावर थारा उरला नाही. देशबंधु दास यांचें धोरण अर्थातच टिळकांप्रमाणेच

होतें; व म्हणून १९२४ च्या जूनमध्ये अहमदाबाद येथे भरलेल्या अ. भा. कांग्रेस समितीच्या अधिवेशनांत अर्नेस्ट डे यांचा खून केल्याबद्दल फासावर गेलेला बंगाली तरुण गोपीनाथ सहा याच्या गौरवासंबंधीच्या ठरावावर महात्माजी आणि देशबंधु यांच्यांत वादाच्या ठिणग्या पडून गांधीजींवर अखेर अश्रुपात करण्याची पाळी आली. त्यांचें अहिंसेचें आचारतंत्र हें इतकें कांही अहंनिष्ठ, अनाकलनीय आणि असहिष्णु आहे की, त्या तंत्रानुसार बॅ. सावरकर, से. बापट, श्री. सुभाष बोस किंवा श्री. जयप्रकाश नारायण यांचें वर्तनच केवळ निषिद्ध ठरलें असें नव्हे; तर लाहोरच्या तुरुंगांतील जतींद्र दास यांच्या ज्या प्रायोपवेशनामुळे राजबंदींची स्वतंत्र वर्गवारी अमलांत येऊन त्यांची तुरुंगांतील जीवनयात्रा इतकी सुखकर झाली, त्यांचा तो आत्मयज्ञहि अप्रशस्त ठरला !

तथापि, सशस्त्र क्रांतीचा प्रश्न हा व्यवहार्य राजकारणाच्या कक्षेंत येणारा नसल्यामुळे, ही हानि कोणी कदाचित् गौण म्हणेल. पण, याहिपेक्षा महत्त्वाची दुसरी हानि ही झाली की, १९१६ पासून १९२० पर्यंत राष्ट्रसभेंत जी निरनिराळ्या जातींची, धर्मांची आणि पक्षांची संयुक्त आघाडी टिळकांच्या समावेशक धोरणामुळे निर्माण झालेली होती, तिचाहि समूळ उच्छेद होऊन गेला. मुसलमानांच्या धर्मवेडाला टिळकांनी कधीहि उत्तेजन दिलें नाही; व म्हणूनच खिलाफतीसंबंधीच्या मुसलमानांच्या मागणीला जरी त्यांनी पाठिंबा दिला, तरी १९२० च्या मेमध्ये खिलाफतीच्या उद्धारार्थ असहकारितेची चळवळ करावी की नाही, याचा विचार करण्यासाठी अ. भा. कांग्रेस समितीची जी बैठक बनारस येथे भरलेली होती, तिला ते हजर राहिले नाहीत. उलट, टिळकांच्या मृत्यूनंतर एका महिन्याने कलकत्ता येथे भरलेल्या राष्ट्रसभेच्या जादा बैठकीत गांधीजींनी जो असहकाराची घोषणा करणारा ठराव मंजूर करून घेतला, तो असहकार मूलतः फक्त खिलाफतीच्या लढ्यासाठी व्हावयाचा होता, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्या ठरावाच्या मू

मसुद्यांत 'स्वराज्य' या शब्दाचा मागमूसहि नव्हता. पण, दास, लाला लजपतराय, नेहरू आणि केळकर यांनी अत्यंत आग्रह धरल्यामुळे व त्यांचा तो आग्रह मान्य न केल्यास आपला ठराव फेटाळला जाण्याचाहि संभव दिसल्यामुळे गांधीजींनी खिलाफतीच्या जोडीला त्या ठरावांत 'स्वराज्य' हा शब्द मागाहून दाखल करून घेतला! अर्थात् १९२० सालचा लढा हा मूळांत स्वराज्यासाठी सुरू करण्यांत आलेला नव्हता, ही जी या सगळ्या बनावांतील मुद्याची गोष्ट ती गांधीजींच्या राजकारणावर विदारक प्रकाश पाडते, असें कोण म्हणणार नाही? विशेषतः, ज्या खिलाफतीच्या जीर्णोद्धारासाठी गांधीजींनी हिंदी जनतेची सगळी प्रतिकारशक्ति या ठरावाच्या रूपाने इतक्या अट्टाहासाने पणाला लावली, त्या खिलाफतीचें पुढे कमाल पाशाच्या राष्ट्रीय तुर्की सरकारने कायदेशीर दफन केलें, हें लक्षांत घेतलें असतां, महात्माजींच्या या कृत्याला काय नांव द्यावें, हेंच समजत नाही. त्यांच्या या कृत्यामुळे राष्ट्रसभेच्या चळवळीला मुसलमानांची कायमची साथ तर लाभली नाहीच; उलट गोखले आणि टिळक यांच्या खांद्याला खांदा भिडवून ज्यांनी राष्ट्रसभेंत सतत वीस वर्षें प्रामुख्याने भाग घेतलेला होता, ते श्री. महमदअली जिना, गांधीजींनी डोक्यावर घेतलेल्या अलीबंधूंच्या मस्तवालपणामुळे, तिच्या चळवळींतून बाहेर फेकले जाऊन, लखनौची संयुक्त आघाडी कायमची धुळीला मिळाली. या धोरणाचे अघोर अंतिम परिणाम आज आपण प्रत्यक्ष भोगतोंच आहोंत.

अहिंसेच्या पोलादी चौकटीत गांधीजीनी राष्ट्रसभेचें राजकारण बसवल्यामुळे सर्वांत मोठी हानि जर कोणती झाली असेल, तर ती ही की, बहुजनसमाजाची प्रतिकाराची बुद्धि आणि शक्ति बोथटून गेली. "इंग्लंडवरील संकट ही हिंदुस्थानाची संधि," हें टिळकांच्या राजनीतीचें मर्मसूत्र होतें; व तदनुसार पारतंत्र्याविषयीच्या द्वेषाची चीड जनतेच्या हृदयांत धुमसत ठेवण्याचें कार्य त्यांनी

आमरण मोठ्या ईर्ष्येने केलें. उलट गांधीजी हे स्वतःला ब्रिटिश सत्तेचे मित्र म्हणवतात. चालू महायुद्ध सुरू झाल्यावर लॉर्ड लिनलिथगो यांच्याशी जी त्यांची पहिली मुलाखत झाली, त्या मुलाखतीच्या वेळी वेस्टमिन्स्टर ॲबेवर बाँब पडून त्याची धुळधाण होईल, म्हणून त्यांनी डोळ्यांतून टिपें गाळली; व भरल्या कंठाने असे उद्‌गार काढले की, "इंग्लंड आणि फ्रान्स यांचें स्वातंत्र्य जर नष्ट होणार असेल, तर हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याला काय किंमत आहे !!" ब्रिटिश साम्राज्यशाहीविषयीच्या या त्यांच्या प्रेमामुळे त्यांच्या कोणत्याहि चळवळीला साहजिकच दोन मर्यादा पडतातः पहिली अहिंसेची आणि दुसरी ब्रिटिश सत्तेविषयीच्या स्नेहभावाची. यांपैकी कोणत्याहि एका मर्यादेच्या बाहेर चळवळ जाऊं लागतांच त्यांचा धीव कासावीस होतो; ते चळवळ एकदम आवरती घेतात; तींत घडलेल्या अतिरेकांचा धिक्कार करीत सुटतात आणि ते अतिरेक करणारांना पोलिसांच्या स्वाधीन होण्याचा सोज्वळ सल्लाहि देतात. चळवळ सुरू करतांना कोणत्या वल्गना करावयाच्या आणि किती आश्वासनें द्यावयाची याला जसा सुमार नाही, तसेंच चळवळ मागे घेतांना कोणत्या कबुल्या द्यावयाच्या आणि किती नाक घासावयाचें याचाहि कांही विवेक नाही. असल्या अवसानघातकी धोरणाचें पर्यवसान अखेर देशाचे तुकडे पाडण्याच्या योजनेला संमति देण्यांत आणि लष्करी फर्मानांनी जखडलेल्या मुल्की राष्ट्रीय सरकारचा स्वीकार करण्यांत व्हावें, यांत नवल काय ? टिळक हे ब्रिटिश साम्राज्यशाहीचे शत्रु आणि प्रक्षोभाचे प्रवर्तक होते; तर गांधी हे ब्रिटिश सत्तेचे मित्र आणि तिच्याविषयीच्या विद्रोहाच्या वृत्तीचे विनाशक आहेत, असें म्हटल्यास तें चूक होईल काय ?

८-८-१९४४

# दोन तपांची फलश्रुति

गेल्या दोन तपांत गांधीजींनी ज्या तीन मोठ्या चळवळी केल्या, त्यांतील टिळकांहून वरचढ असा त्यांच्या नेतृत्वाचा एक विशेष प्रथमदर्शनींच डोळ्यांत भरतो. तो विशेष म्हणजे चळवळीचा उरूस भरवण्याचें त्यांचें विलक्षण कसब! टिळकांच्या चळवळीची चाल ही सिंहासारखी असे. सिंह पाठीशीं येऊन उभा राहिला, तरी त्याची चाहूल लागूं नये इतकी त्याची चाल सावधपणाची आणि झेप शिताफीची असते. पण महात्माजींचा सगळाच प्रकार और. कोणत्याहि चळवळीचा उपक्रम करावयाचा, तो नगारे पिटून आणि नोटिसा देऊन; व तिचा उपसंहार करावयाचा, तोहि निर्णयप्रमादाच्या नाकदुऱ्या जाहीर रीतीने काढून आणि प्रायोपवेशनाच्या प्रायश्चित्ताच्या मजलसी भरवून! जाहिरातबाजी हें जणू त्यांच्या विनयशील जीवनाचें आभरण होऊन बसलेलें आहे. महायुद्ध सुरू झाल्यापासून गेल्या चार वर्षांत हिटलर, स्टालिन आणि चर्चिल यांना काय एकदाहि पडसें झालें नसेल? पण, तुरुंगांत असोत वा तुरुंगाबाहेर असोत, गांधीजींची प्रकृतिपत्रकें जशीं सांजसकाळ निघतात, तशीं या जगज्जेत्यांचीं निघालेलीं कोणी कधी पाहिलेलीं आहेत काय? जगाला पालाण घालूं पहाणाऱ्या या महापराक्रमी पुरुषांनी सकाळीं कोणत्या रंगाच्या शेळीचें दूध घेतलें, दुपारीं कोणत्या फळांचा फडशा उडवला आणि रात्रीं किती मुसंब्यांच्या रसाचे प्याले झोकले, याचें ग्राम्य वर्णन कधी वर्तमानपत्रांतून फडकलेलें आहे काय? गांधीजींच्या या प्रदर्शनपटुतेमुळे हिंदुस्थानाच्या दास्यमोचनाच्या प्रश्नाला जागतिक प्रतिष्ठा जरी नव्हे तरी जागतिक प्रसिद्धि मात्र भरपूर लाभलेली आहे, यांत शंका नाही.

गांधीजींच्या नेतृत्वाचा दुसरा अनन्य विशेष म्हणजे त्यांनी निर्माण केलेले अनेक ट्रस्ट आणि फंड. स्वराज्याचा लढा चालवण्यासाठी लोकांजवळ पैसा मागतांना टिळकांची मजल कधी लाखांपलिकडे

गेली नाही; व शेठ मनमोहनदास रामजी यांच्यासारखा एकाद दुसरा अपवादात्मक भांडवलवाला त्यांच्या थाऱ्याला कधी सणासुदीला उभा राहिला तर राहात असे. उलट, अकिंचन म्हणून पुराणांनी गौरविलेल्या शंकराचें वास्तव्य जसें कुबेराच्या चैत्ररथ वनांत असावें, तसें दरिद्रनारायण म्हणून जगभर गाजलेले महात्माजी वर्ध्याला असोत, पुण्याला असोत किंवा दिल्लीला असोत, बजाज, ठाकरसी किंवा बिर्ला यांच्यासारख्या पुंजीपतींच्या प्रासादांत त्यांचें त्यागी जीवन व्यतीत व्हावयाचें! पण त्यांत नवल काय? साम्यवाद्यांच्या वर्गयुद्धाच्या हिंसादूषित तत्त्वज्ञानाला विरोध करतांना, भांडवलवाले हे समाजाच्या संपत्तीचे ट्रस्टी म्हणजे निधिधारक विश्वस्त आहेत, असें नवें गोंडस तत्त्व काढून गांधीजींनी भांडवलशाहीची आवश्यकता प्रतिपादिलेली नाही काय? किंबहुना, आज युद्धकार्याला बिनशर्त साह्य करण्याचें वचन देऊन, नुसत्या मुलकी कारभारावर राजी राहाण्याचें कबूल करून आणि मुस्लिम लीगच्या पाकिस्तानच्या मागणीलाहि मान्यता देऊन नकली हिणकस राष्ट्रीय सरकार स्थापन करावयाला ते जे इतके धादावलेले आहेत, ते टाटा–बिर्ला यांच्या पंचदशवार्षिक योजनेच्या सिद्धतेचा मार्ग सुकर करण्यासाठीच होत, हा त्यांच्यावर सध्या उघड उघड केला जात असलेला आरोप कोणाला माहीत नाही? तेव्हा, अशा या दरिद्रनारायणाच्या सार्वजनिक जीवनाच्या आणि चळवळींच्या चरितार्थासाठी पैसा पुरवण्याकरिता भांडवलवाल्यांत कृतज्ञतेची सात्त्विक चढाओढ चालावी, हें किती स्वाभाविक आहे? भांडवलशाहीच्या दातृत्वाची जी ही बैठक गांधीजींच्या नेतृत्वाला लाभलेली आहे, तिच्यामुळे त्यांच्या निरनिराळ्या उपक्रमांना गंगाजळीची वाण जशी कधी पडत नाही, तसेंच ते उपक्रम भांडवलशाहीच्या उत्कर्षाला साधनीभूत व्हावेत, असेंच सामान्यतः त्यांचें स्वरूप असतें.

या दोन गोष्टींच्या जोडीला गांधीजींनी टिळकांवर आणखीहि एका बाबतींत मात केलेली आहे. टिळकांवर जे अनेक आरोप त्यांच्या हयातींत करण्यांत आले, त्यांपैकी एक आरोप सवंग लोकप्रियतेचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम............ वि: ......
क्रमांक ............ नोंद वि: ......



होता. पण, त्यांच्यावर हा आरोप करणाऱ्या पुण्याच्या मवाळ-कंपूपैकी जे बुद्रुक आज सुदैवाने हयात असतील, त्यांना गांधीजींच्या लोकप्रियतेचा सवंगपणा पाहून खरोखरी आश्चर्याचा धक्का बसला असेल. टिळकांनी, गीतावचनानुसार, जन्मभर लोकसंग्रह केला, ही गोष्ट खरी. पण, तो करण्यासाठी किंवा करीत असतांना लोकांना अफाट आश्वासनें दिलीं नाहीत; अचाट कल्पनांच्या इंद्रजाळांत फशीं पाडलें नाही किंवा उत्पाती कार्यक्रमाच्या गळांत गुंतवून नंतर दगाहि दिला नाही. टिळक हे गणिति होते; व त्यामुळे त्यांच्या ध्येयवादांतहि गणिताचा काटेकोरपणा होता. बनियेगिरीच्या धंद्यांतल्या खोटीं वजनें, खोटीं मापें आणि खोटी सजावट यांपैकी कोणत्याहि ढंगाने त्यांचा ध्येयवाद किंवा कार्यपद्धति डागळलेली नव्हती. पण याहि बाबतींत गांधीजींचा सगळाच खाक्या अजब. १९३० सालीं मूलतः खिलाफतीच्या जीर्णोद्धारार्थ म्हणून त्यांनी जी असहकाराची चळवळ सुरू केली, तिच्यांतील लोकमताला हाक फोडणारी आरोळी कोणती होती म्हणाल?—तर 'एका वर्षांत स्वराज्य' ही! ती आरोळी त्यांनी ठोकल्याला आता चोवीस वर्षें होऊन गेलीं, तरी तें स्वराज्य कांही अद्याप जवळ आलेलें दिसत नाही. मग गांधीजी सध्या मागत असलेल्या मुल्की राष्ट्रीय सरकारला स्वराज्य म्हणावयाचें असेल, तर न कळे! १९३० सालच्या चळवळीच्या वेळींहि 'थोडे दिनमें गांधीराज' या घोषणेने नभोवितान दुमदुमून गेलेलें होतें. बाकी 'राष्ट्रीय सरकार' हें जरी स्वराज्य म्हणण्याच्या लायकीचें नसलें, तरी त्याला 'गांधीराज' म्हणावयाला काय हरकत आहे? गांधीजींच्या कटिवस्त्रापासून तों त्यांच्या सांजसकाळच्या प्रार्थनेपर्यंत त्यांची प्रत्येक गोष्ट ही लोकरंजनाला साधनीभूत झालेली आहे. त्यामुळे, त्यांनी कोणतीहि चळवळ हातीं घेतली, म्हणजे तिला हां हां म्हणतां उरूसाचें स्वरूप येतें.

पण, इतका जगभर गाजावाजा चाललेला असतां, इतकें पैशाचें पाठबळ लाभलेलें असतां आणि लोकसंग्रह एवढा दांडगा केलेला असतांहि

गांधीजींनी ज्या तीन मोठ्या चळवळी आतापर्यंत केल्या, त्या त्यांना स्वतःला जरी व्यक्तिशः कीर्तिकारक झालेल्या असल्या, तरी देशाच्या दृष्टीने त्या यशस्वी कां झाल्या नाहीत? याचें मुख्य कारण गांधीजींचा सर्वातिक्रामक अहंकार. त्यामुळे, त्यांच्या प्रत्येक चळवळीच्या प्रारंभीं देशांतील निरनिराळे पक्ष आणि पुढारी बेगुमानपणाने राष्ट्रसभेंतून बाहेर काढले गेले; व ज्यांनी त्यांच्यापुढे बिनशर्त मान तुकवून खादीधारणपूर्वक गांधीवादाची दीक्षा मुकाट्याने घेतली, तेवढ्यांनाच फक्त त्यांच्या चळवळींत थारा मिळाला. लो. टिळक यांनाहि नेमस्त पक्षाशीं आमरण झगडावें लागलें. पण, नेमस्त पक्ष आणि राष्ट्रीय पक्ष यांच्यांत जो वाद होता, तो तत्त्वाचा होता; खादीच्या, सुताच्या, तकळीच्या, अहिंसेच्या किंवा असल्याच कोटींतल्या कोणत्याहि अटींमुळे त्यांचा राष्ट्रसभेशीं असलेला संबंध तुटला नाही. पण गांधीजींच्या नेतृत्वाची शिस्त म्हणजे शिवव्रत! शंकराला वाहिलेल्या बेलाच्या सहस्रकांतील एक त्रिदल जरी टुंकें निघालें, तरी जशी त्याची सर्व आराधना वाया जाते, तसा गांधीजींच्या शिस्तीचा प्रकार आहे. त्यामुळे, सनदशीर पक्षांतल्या शास्त्री—सप्रू—जयकर यांच्यासारख्या ज्या सज्जनांना गांधीजींविषयी पूर्वाश्रमींच्या प्रेमाचा जिव्हाळा अद्यापहि वाटतो, त्यांना आज राष्ट्रसभेच्या व्यासपीठावर पाऊल ठेवणें अशक्य होऊन बसलेलें आहे; व कांग्रेस पक्षाच्या वृत्तपत्रांना त्यांची कुचाळी करण्यांत मोठी धन्यता वाटते. पण, गंमत अशी की, कांग्रेस पक्षाचीं पत्रें जरी डॉ. सर तेजबहादुर सप्रू, ने. ना. श्रीनिवास शास्त्री आणि ने. ना. डॉ. मुकुंदराव जयकर यांची कृतघ्नपणाने टवाळी करीत असलीं, तरी महात्माजी मात्र प्रत्येक आणिबाणीच्या वेळीं त्यांचा सल्ला अगत्याने घेतात; आपल्या मतलबासाठी त्यांना सरकार-दरबारीं मध्यस्थी घालतात; व अशा रीतीने त्यांच्या मुत्सद्देगिरीचा योग्य तो उपयोग करून घेतात. पण, सप्रू-जयकरांच्या मुत्सद्देगिरीची नेमकी संकटाच्या प्रसंगीं तेवढी आठवण व्हावी आणि इतर वेळीं आपल्या पक्षाच्या वृत्तपत्रांकडून चालणारी त्यांची नालस्ती

मात्र दिसूं नये, या महात्माजींच्या मनोवृत्तीला कोणतें नांव द्यावें ? राष्ट्रसभेच्या राजकारणांत या पुढाऱ्यांना स्थान न मिळावयाला, त्यांचें स्वतंत्रप्रज्ञत्व आपल्या नेतृत्वाला बाधक होईल, ही गांधीजींची गुप्त भीतीच कारण नाही काय ?

या त्यांच्या अफाट अहंकारामुळेच खरोखरी श्री. जिना यांना राष्ट्रसभेंतून बाहेर पडावें लागलें. एरवी, ज्या जिनांनी स्वराज्याच्या लढ्यांत टिळकांना आमरण निष्ठेने साथ दिली, वरिष्ठ कायदेमंडळांत गोखल्यांच्या आदेशानुसार आपल्या स्पष्टोक्तीने लोकपक्षाचा रुबाब राखला, सौ. सरोजिनी नायडू यांनी ज्यांचें वर्णन 'हिंदु-मुस्लिम ऐक्याचा प्रवर्तक' (Ambassador of Hindu-Moslem Unity) या शब्दांनी केलेलें होतें व लॉर्ड विलिंग्डन यांच्या नोकरशाही अंमलाला शह दिल्याबद्दल मुंबईच्या कांग्रेस कमिटीने ज्यांचें स्मारक देखतां डोळां उभारलें, ते श्री. जिना,—मुंबई येथे आगाखानांसारख्या ब्रिटिश सरकारच्या बगलबच्चांच्या तावडींतून मुस्लिम लीगला सोडवून राष्ट्रसभेशीं तिचें लखनौ येथे सहकार्य घडवून आणणारे ते श्री. जिना,— दादाभाई नौरोजी, टिळक आणि गोखले यांच्या परंपरेचे आपण अभिमानी आहोंत असें मुस्लिम लीगच्या व्यासपीठावरून जाहीर करणारे ते श्री. जिना,—सायमन कमिशनच्या विरुद्ध देशांतील सर्व पक्षांची एकजूट उत्पन्न करून त्याच्याविरुद्ध बहिष्काराची यशस्वी मोहीम करणारे ते श्री. जिना !—ते आज पाकिस्तानचे पुरस्कर्ते म्हणून देशापुढे उभे राहावेत, हा गांधीजींच्या अहंकारमूलक व्यवच्छेदक धोरणाचाच खरोखरी दुष्ट परिणाम नव्हे काय ? श्री. जिना हे अहंकारी आहेत, उद्धट आहेत आणि घमेंडखोर आहेत याची जितकी टिळकांना पूर्ण जाणीव होती, तितकेंच त्यांचें राजकीय चारित्र्य चोख आहे, देशाभिमान बावनकशी आहे आणि झुंजारपणा प्रसंगाला टिकणारा आहे, याचीहि त्यांना निकट साहचर्यामुळे पुरेपूर कल्पना होती. त्यामुळे, मानाची माळ प्रत्येक वेळीं त्यांच्या गळ्यांत घालून

आणि त्यांची मिजास योग्य रीतीने सांभाळून टिळकांनी त्यांना स्वराज्याच्या लढ्याच्या आघाडीला ठेवलें, हें त्यांचें केवढें चातुर्य ! ही जी गोष्ट टिळकांना साधली, ती गांधीजींना साधली नसती, असें थोडेंच आहे ? पण, टिळकांनी राष्ट्रहिताच्या आणि राष्ट्राच्या डोक्यावर स्वतःचा अहंकार कधीहि बसवला नाही; "मी राष्ट्रापेक्षा मोठा आहे आणि राष्ट्राला माझ्या नेतृत्वाची गरज आहे," अशा बुद्धीनें ते कधीहि वागले नाहीत; व म्हणूनच राष्ट्राने १९१९ सालीं दोन वेळां राष्ट्रसभेच्या अध्यक्षत्वाचा मुकुट त्यांच्या मस्तकावर ठेवण्याचा निर्णय घेतलेला असतांनासुद्धा, आपल्याऐवजी पं. मालवीय आणि पं. नेहरू यांना अध्यक्षपद देण्याची सूचना त्यांनी केली. राष्ट्रसभेच्या व्यासपीठावर जास्तींत जास्त संयुक्त आघाडी निर्माण करण्यासाठी निरनिराळ्या वृत्तींच्या आणि मतांच्या कर्तृत्ववान् व्यक्तींचा संग्रह करण्याचें टिळकांचें हें राष्ट्रहितैकनिष्ठ निरहंकार धोरण कुठे व श्री. सुभाष बोस यांच्यासारख्या आपल्याला मुलगा शोभेल अशा राष्ट्रसभेच्या नियुक्त अध्यक्षाला पदच्युत करण्यासाठी नाना प्रकारच्या कारवाया करणाऱ्या गांधीजींची अहंकारी अहिंसा कुठे ! पण, दैवाची सूडबुद्धि अशी विचित्र की, १९२० सालीं ज्या जिनांना राष्ट्रसभेंतून अपमानित होऊन बाहेर पडावें लागलें आणि १९३० पर्यंत ज्यांची गांधीजींनी सुखेनैव उपेक्षा केली, त्याच श्री. जिनांकडे आज गांधीजींवर बरोबरीचा तुल्यबल नेता म्हणून त्यांच्याच अटींवर समेटाचें बोलणें करण्यासाठी जाण्याचा प्रसंग आलेला आहे ! आपल्या या असल्या कृत्यांमुळे राष्ट्रसभेशीं एकनिष्ठ राहिलेले मौ. अबुल कलम आझाद यांच्यासारखे 'राष्ट्रीय' मुसलमान खोटे पडतात आणि मूर्ख ठरतात, याचेंहि भान महात्माजींना राहूं नये, हा केवढा चमत्कार !

या त्यांच्या बेसुमार अहंकारामुळेच गेल्या चोवीस वर्षांत ते हिमालयाएवढ्या चुका करूनहि शहाणपण शिकले नाहीत आणि अनेकदा अपेश येऊनहि आपल्या कार्यपद्धतींत बदल करूं शकले नाहीत. १९२० साल घ्या, १९३० साल घ्या किंवा आता १९४४ साल घ्या !

—चळवळीचा तोच उरूस, तशाच प्रकारचीं अभिवचनें आणि त्याच पद्धतीची पिच्छेहाट ! गेल्या दोन तपांत जग इतकें बदललें, पण महात्माजींच्या चळवळीच्या तत्त्वांत किंवा तंत्रांत अणुमात्र फरक पडलेला नाही. १९१९ सालच्या डिसेंबरांतील अमृतसरच्या राष्ट्रसभेंत ज्या गांधीजींनी माँटफोर्ड सुधारणा बिनशर्त स्वीकाराव्यात म्हणून टिळकांशीं हुजत घातली, त्यांनी १९२० सालच्या सप्टेंबरमध्ये कलकत्त्याच्या राष्ट्रसभेंत असहकाराचा ठराव मंजूर करून घेतला, हें कोणाला खरें वाटेल ? किंवा, १९२९ सालच्या डिसेंब्रमध्ये ज्यांनी लॉर्ड इर्विन यांनी दिलेलें गोल परिषदेचें निमंत्रण नाकारलें, तेच गांधीजी १९३१ च्या सप्टेंबरमध्ये त्याच परिषदेला हजर राहाण्यासाठी विलायतेला गेले, हें कुणाला खरें वाटेल ? किंवा, १९४२ च्या मार्चमध्ये ज्यांनी क्रिप्स योजना लाथाडली, तेच गांधीजी आज १९४४ च्या ऑगस्टमध्ये त्या योजनेहूनहि हीणकस असलेलें नकली राष्ट्रीय सरकार स्वीकारावयाला तयार व्हावेत, हें तरी कोणाला खरें वाटेल ? पण, गेल्या दोन तपांतल्या या तिन्ही सत्य घटना आहेत; गांधीजींच्या कार्यपद्धतीवर विदारक प्रकाश पाडणारे हे राष्ट्रीय चळवळींतले तीन टप्पे आहेत. याच्या जोडीला, "हिंदुस्थानाची विभागणी हें मी महापातक समजतों. श्री. राजगोपालाचार्य हे त्या पातकांत वाटेकरी व्हावयाला तयार असले, तरी मला होणें शक्य नाही..जपानच्या भीतीने त्यांनी भलत्याच फंदांत पडूं नये...पाकिस्तानवर जितकी जिनांची श्रद्धा आहे, तितकीच माझी हिंदुस्थानाच्या अखंडत्वावर आहे !"—("I consider the vivisection of India to be a sin. Shri Rajagopalachari would be a party in the sin. I cannot be a party... "Let not your fear of the Japs betray you into a worst state of things". . "If Pakistan is an article of faith with him (Mr. Jinnah) indivisibility of India is equally an article of faith with me." 26-7-42) हीं १९४२ सालच्या जुलैतील पाकिस्तानसंबंधीचीं त्यांचीं विधानें आणि

"हिंदुस्थानाच्या विभागणीसंबंधीच्या माझ्या आताच्या घोषणा या माझ्या पूर्वीच्या पाकिस्तानविषयक घोषणांशीं सुसंगत आहेत,—" ( All my recent declarations about the vivisection of India are quite consistent with all my previous declarations on the subject. ) हे राजाजींच्या मसुद्याची तरफदारी करतांना १९४४ च्या जुलैमध्ये पाचगणी येथे काढलेले उद्गार बसवले, म्हणजे गांधीजींच्या राजकारणांतील सुसंगतीप्रमाणे त्यांच्या सत्यावरहि विदारक प्रकाश पडतो. अशा स्थितींत, या दोन तपांतील लढ्यांची फलश्रुति देशाचे तुकडे पाडण्यांत आणि साम्राज्यशाहीचे पाश अधिक बळकट करण्यांत व्हावी, हें स्वाभाविक नाही काय ?

* * *

## *तळमळ*

**आयर्लंडचा राष्ट्रकवि थॉमस मूर याने आयरिश हुतात्म्यांच्या मनाच्या शेवटल्या तळमळीसंबंधी लिहिलेलें इंग्रजी गीत, त्याच्या मराठी अनुवादासह, पुढे दिलें आहे.**

When he who adores thee has left but the name
Of his fault and his sorrows behind,
Oh ! say wilt thou weep, when they darken the fame
Of a life that for thee was resign'd !
Yes, weep, and however my foes may condemn,
Thy tears shall efface their decree;
For, Heaven can witness, though guilty to them,
I have been but too faithful to thee.
With thee were the dreams of my earliest love;
Every thought of my reason was thine :
In my last humble prayer to the Spirit above
Thy name shall be mingled with mine !

Oh ! blest are the lovers and friends who shall live
The days of thy glory to see;
But the next dearest blessing that Heaven can give
Is the pride of thus dying for thee.

## मराठी अनुवाद

हे माते, तुझें पूजन करणारा हा तुझा उपासक आपल्या दोषांची आणि दुःखांची स्मृति मागे ठेवून जेव्हा निघून जाईल, तेव्हा त्याच्यासाठी एक तरी अश्रु तूं ढाळशील कां ? विशेषतः, त्याने जें आपलें जीवित तुझ्या पायांवर वाहिलेलें होतें, त्या त्याच्या आत्मयज्ञाचें यश मलिन करण्याचा प्रयत्न जेव्हा त्याच्या देशाचे शत्रु करतील, तेव्हा त्याच्या स्मरणाने तुझ्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा पडतील का ?

होय ! हे माते, तुझ्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहूं दे. मग माझ्या शत्रूंनी जरी गुन्हेगार म्हणून मला बदनाम केला, तरी त्यांचा तो आरोप तुझ्या अश्रूंनी धुवून पुसून जाईल. कारण, परमेश्वराला हें माहीत आहे की, आपल्या देशाच्या शत्रूंच्या दृष्टीने जरी मी गुन्हेगार असलों, तरी तुझ्याविषयींची माझी अनन्य निष्ठा हाच खरोखरी माझा गुन्हा होता.

हे माते, माझ्या प्रीतीचीं पहिलीं मधुर स्वप्नें तुझ्या चिंतनांतून उमललेलीं होतीं. माझ्या बुद्धीला फुटलेला विचाराचा प्रत्येक कोंब तुझ्याविषयीचा होता आणि मृत्यूला कवटाळतांना जीवनाच्या त्या शेवटल्या क्षणीं जेव्हा परमेश्वराची मी प्रार्थना करीन, तेव्हा स्वतःबरोबरच तुझ्याहि नांवाची स्मृति त्या प्रार्थनेंत मिसळलेली असेल.

हे माते, तुझ्या पूर्व वैभवाचे दिवस तुला पुन्हा प्राप्त झालेले पाहाण्याचें भाग्य ज्यांना लाभेल, ते भक्त आणि प्रेमी धन्य होत.

पण हे माते, त्याच्या खालोखाल कोणतें एक भाग्य जर परमेश्वराच्या कृपेने मिळण्यासारखें असेल, तर तें तुझ्यासाठी असा अभिमानास्पद मृत्यु येणें हें होय.

९–८–१९४४

# इथून वाटा वेगळ्या फुटणार

काल म. गांधी यांच्या आदेशानुसार आत्मशुद्धीच्या उपोषणाने ऑगस्ट नवरात्राची सांगता झाली. वस्तुतः महात्माजींनी ता. १ ऑगस्ट रोजींच जनतेला आत्मशुद्धीचा आदेश द्यावयाला हवा होता. कारण, ता. १ ऑगस्ट पासून ता. ८ ऑगस्टपर्यंत १९४२ सालीं मुंबईला ज्या महनीय घटना झाल्या, त्यांचें फक्त एक पर्यवसान ता. ९ ऑगस्ट रोजीं पहाटे झालेली सार्वत्रिक धरपकड हें होय. ती धरपकड म्हणजे जणू खुणेचा शब्द होता; व तो शब्द सरकारकडून उच्चारला जातांच ऑगस्ट उठावणीला प्रारंभ झाला, इतकेंच. पण ता. १ पासून ता. ९ पर्यंत ज्या घटना होत गेल्या, त्या सर्व घटनांतून विचारांचे एकच अंतःसूत्र अनुस्यूत झालेलें होतें, ही गोष्ट आता निर्विवाद सिद्ध झालेली नाही काय? म्हणूनच, गांधीजींनी केवळ ता. ९ हाच एक दिवस आत्मशुद्धीसाठी न निवडतां, ता. १ पासून ता. ९ पर्यंतचें सारें नवरात्र, राष्ट्रीय सप्ताहाप्रमाणे, जनतेने ऑगस्ट ठराव आणि त्यांतून उद्‌भवलेल्या घटना यांच्या चिंतनांत घालवावें, असा आदेश देणें अधिक उचित झालें असतें. तथापि, ता. ९ हा एक दिवस तरी कां होईना, त्यांनी प्रतीकात्मक निदर्शनासाठी निश्चित केला, हेंहि सध्याच्या विपरीत परिस्थितींत कांही थोडें नाही. इतकेंच नव्हे, तर ऑगस्ट ठराव ही या भरतभूमीच्या संतानांच्या नैसर्गिक हक्कांची घोषणा आहे, असें जाहीर करून त्या ठरावावरील आपल्या निष्ठेची अचलता त्यांनी पर्यायाने प्रदर्शित केली, याबद्दल त्यांना अखिल हिंदी राष्ट्राने कृतज्ञतेने धन्यवाद दिले पाहिजेत.

ता. ९ च्या कार्यक्रमासंबंधी काढलेल्या या पत्रकांत महात्माजींनी असें एक मार्मिक विधान केलेलें आहे की, "ता. ९ ऑगस्ट १९४२ हा हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांतील परिवर्तनाचा प्रसंग, क्रांतीचा दिवस होता." (That date was a turning point in

India's fight for freedom) म्हणूनच या दिवशीं आत्मशुद्धीच्या दृष्टीने आत्मनिरीक्षण करण्याची आवश्यकता त्यांनी इतक्या आग्रहाने प्रतिपादिली आहे. गेला सबंध आठवडा लोकमान्य आणि महात्माजी यांचें विशिष्ट तत्त्वज्ञान आणि कार्यपद्धति यांचें चिंतन आणि चिकित्सा करण्यांत जो 'तरुण भारता'नें घालवला, तो खरोखरी याच भावनेने. ही चिकित्सा करतांना गांधीजींच्या नेतृत्वावर जरी 'तरुण भारता'ने क्वचित् कठोर वाटण्यासारखी टीका केलेली असली, तरी गेल्या दोन तपांत जनशक्तीची नाना परीनी जोपासना करून सामुदायिक लढा करण्याचें जें शिक्षण त्यांनी जनतेला दिलें, त्या त्यांच्या महनीय कार्याची 'तरुण भारता'ला पूर्ण जाणीव आहे. इतकेंच नव्हे, तर ऑगस्ट ठरावाच्या मंत्राने ज्या अभिनव प्रतिकारशक्तीचें आवाहन आणि अभिमंत्रण त्यांनी केलें, त्या शक्तीचें भयानक विराट् स्वरूप पाहून प्रथम जरी त्यांनी अर्जुनाप्रमाणे "दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितांतरात्मा धृतिं न विंदामि शमं च" असे उद्गार काढलेले असले, तरी ऑगस्ट ठरावाच्या भूमिकेवर ते आज अचल उभे आहेत, ही या अभागी दलित राष्ट्राच्या दृष्टीने काय कमी अभिमानास्पद, कमी महत्त्वाची गोष्ट आहे? आपण उच्चारलेल्या मंत्राच्या प्रभावाने आविर्भूत झालेली अत्युग्र शक्ति पाहून जरी ते गांगरले असले, तरी त्या आत्मव्यथेच्या भरांत मंत्राचा त्याग करावयाला ते तयार झाले नाहीत,—किंबहुना त्याचा निर्धाराने उद्घोष करीत राहिलेले आहेत,—हें या असमर्थ राष्ट्राचें केवढें भाग्य! कारण, ऑगस्ट ठरावाचा हा मंत्र, त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे, क्रांतीचा म्हणजे सीमोल्लंघनाचा मंत्र आहे.

ऑगस्ट ठरावांतील भूमिकेला गांधीजी इतक्या निष्ठेने आणि निर्धाराने चिकटून राहिल्याबद्दल त्यांची जी 'तरुण भारत' प्रशंसा करतो, ती करतांना १९०७–८ सालची परिस्थिति त्याच्या डोळ्यांपुढे उभी आहे. १९०६ सालीं पितामह दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं कलकत्ता येथे भरलेल्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनांत टिळकप्रभृति

राष्ट्रसभेच्या नवोदित पुढाऱ्यांनी (१) स्वराज्य, (२) स्वदेशी, (३) बहिष्कार आणि (४) राष्ट्रीय शिक्षण ही चतुःसूत्री अध्यक्षांच्या मुखाने घोषित करवून घेतली; व राष्ट्रसभेच्या ठरावांतहि तिचा हट्टाने अंतर्भाव करून घेतला. राष्ट्रसभेच्या व्यासपीठावरून साध्य-साधनांची जी ही अधिकृत उज्ज्वल घोषणा प्रथमच झाली, तिच्यामुळे देशांत नवचैतन्याचा संचार होऊन क्षुब्ध जनसमाज आणि क्रुद्ध नोकरशाही यांच्यांत संघर्ष सुरू झाला. त्या लढ्याची उग्रता पाहून त्रस्त झालेल्या नेमस्त पुढाऱ्यांनी या साध्यसाधनांच्या चतुःसूत्रीचाच मुळी त्याग करण्याचें ठरवलें. या त्यांच्या पिच्छेहाटीच्या धोरणाला विरोध करण्यासाठी टिळकांना सुरतेला जे दोन हात त्यांच्याशीं एकेरीवर येऊन करावे लागले, तो जहाल–मवाळांचा समरप्रसंग हिंदुस्थानाच्या आधुनिक इतिहासांत अविस्मरणीय होऊन बसलेला आहे. टिळकांच्या या साहसामुळे सुरतेचें अधिवेशन उधळलें गेलें; राष्ट्रीय पक्षाची राष्ट्रसभेंतून हकालपट्टी करण्यांत आली; व त्यानंतर लवकरच सरकारने टिळकांना सहा वर्षांची शिक्षा ठोठावून काळ्या पाण्यावर पाठवले. किंबहुना, सुरतेच्या उध्वस्त अधिवेशनानंतर नेमस्त पक्षाचे अग्रणी सर फेरोजशहा मेहता यांनी 'टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतींत टिळकांविषयी असे उद्गार काढले की, "सुरतेची ही घटना म्हणजे टिळकांचा राजकीय मृत्यु होय!" पण, या मरणांतून टिळकांचें जें पुनरुत्थान झालें, तें केवळ राष्ट्रीय पक्षाचा पुढारी म्हणूनच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानाचा अनभिषिक्त नृपति, तरुण भारताचा मंत्रद्रष्टा धुरीण म्हणून झालें, हें प्रसिद्धच आहे. दादाभाईंसारख्या राष्ट्रसभेच्या तपोवृद्ध जनकाने राष्ट्रसभेला ज्या स्वराज्याच्या मंत्राची दीक्षा दिली, त्या मंत्राचा तिने त्याग करूं नये, म्हणून टिळकांनी कांग्रेस मोडल्याचा दोषारोप आपल्यावर येईल याची पर्वा न करतां, हद्दपारीच्याहि खडतर प्रसंगाला उतार वयांत आनंदाने तोंड दिलें. कारण, मंत्राचा त्याग किंवा भ्रष्टाचरण हें अधोगतीला कारण होतें, हा अध्यात्मशास्त्राचा सिद्धांत त्यांना पूर्णपणे माहीत होता. १९०७-८ सालचा हा इतिहास लक्षांत

घेतल्यावर, ऑगस्ट ठराव मागे घेण्याच्या मुद्यावर ब्रिटिश सरकार आज इरेला पेटलें असतां, गांधीजींनी त्या ठरावाचा त्याग न करण्यांत जी मंत्रनिष्ठा प्रकट केलेली आहे, तिच्याबद्दल कोणाला कृतज्ञता वाटणार नाही ?

ऑगस्ट ठराव हा क्रांतिकारक ठराव आहे, असें जें गांधीजी वारंवार म्हणत असतात, त्याचा अर्थ समजावून घेतल्याशिवाय सरकार त्या ठरावासंबंधी इतकें हट्टाला कां पेटलेलें आहे, हें कळणार नाही किंवा त्या ठरावाच्या पोटीं जीं स्फोटक बीजें आहेत, त्यांचीहि यथार्थ कल्पना येणार नाही. टिळकांच्या मृत्यूनंतर १९४२ पर्यंत गेलीं बावीस वर्षें त्यांनी सत्याग्रहाचे प्रयोग राजकारणाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत करून पाहिले. महायुद्ध सुरू झाल्यावर प्रथम १९४१ सालीं वैयक्तिक सत्याग्रहाचा आणि त्यानंतर १९४२ सालीं सामुदायिक सत्याग्रहाचा म्हणजेच 'चले जाव'चा जो लढा त्यांनी सुरू केला, तो आपल्या आयुष्यांतला शेवटला लढा, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी करावयाचा शेवटला सत्याग्रह आहे, असें ते समजत होते. १९४१ च्या डिसेंबरांत 'रचनात्मक कार्यक्रमा'वर जी पुस्तिका त्यांनी देशाच्या मार्गदर्शनार्थ लिहिली, तींत त्यांनी असे स्पष्ट उद्गार काढलेले आहेत की, "चालू लढा हा मी अखेरचाच मानीत असल्यामुळे प्रत्येक कांग्रेसजनास तीव्रतेने आत्म-संशोधन करण्याची वेळ आता आली आहे." अर्थात् सत्याग्रहाचा हा त्यांच्या दृष्टीने शेवटला प्रयोग होता. वस्तुतः, या पुस्तिकेंत 'सविनय कायदेभंगाचें स्थान' विशद करतांना त्यांनी असें स्वच्छ सांगून टाकलेलें आहे की, "स्वराज्यासारख्या सर्वसामान्य प्रश्नासाठी सविनय कायदेभंग कधीहि करतां येत नाही." त्यांच्या मतें चंपारण्यांतील कुळांवरील जुलमासारखा एखादा स्थानिक अन्याय किंवा रौलट बिलासारखा एकादा खास अन्याय यांच्या निवारणार्थच कायदेभंग परिणामकारक रीतीने करतां येतो. तथापि, आपलें हें अनुभवसिद्ध मत बाजूला ठेवून, १९२०, १९३० आणि १९४१ सालीं त्यांनी स्वातंत्र्याच्या सर्वसामान्य प्रश्नावर कायदेभंगाचा प्रयोग करून पाहिला. पण, एका बाजूने त्यांना

स्वतःला पूर्ण ठाऊक असलेल्या सत्याग्रहाच्या स्वाभाविक मर्यादांमुळे आणि दुसऱ्या बाजूने जनतेला आचरावयाला दुष्कर असलेल्या अहिंसेच्या कर्मकांडामुळे हे प्रयोग यशस्वी झाले नाहीत, हें सिद्ध आहे. त्यामुळे, भावी लढ्याच्या दृष्टीने आता सत्याग्रहाला म्हणजेच सविनय कायदेभंगाला वाव उरला नाही, हें उघड दिसतें. ऑगस्ट ठराव हा या परिवर्तनाचा,—हिंदी राष्ट्रीय चळवळीला इथून वेगळी वाट फुटली असल्याचा,—निदर्शक आहे.

मग, चालू युद्ध संपल्यावर ब्रिटिश सरकारने जर क्रिप्स योजनेनुसार, स्वातंत्र्याचे हक्क दिले नाहीत आणि पुन्हा लढा करण्याचा प्रसंग उद्‌भवला, तर साध्यसाधनें कोणतीं रहातील ? क्रिप्स योजना एरवी कितीहि सदोष असली, तरी १९१९ सालीं टिळकांनी राष्ट्रसभेतर्फे तहपरिषदेला पाठविलेल्या कैफियतींत ज्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाची मागणी केलेली होती, तें तत्त्व त्या योजनेनुसार युद्धानंतर हिंदुस्थानाला लागू करावयाला ब्रिटिश सरकार बांधलेलें आहे. या तत्त्वाप्रमाणे हिंदुस्थानाला (१) स्वातंत्र्य, (२) ब्रिटिश साम्राज्यांतून इच्छेस येईल तेव्हा फुटून बाहेर पडण्याचा म्हणजे फारकतीचा हक्क आणि (३) हिंदुस्थानांतील राष्ट्रकांचा जो संघ स्थापन होईल त्यांतून मुस्लिम बहुसंख्या असलेल्या प्रांतांनाहि विभक्त होण्याचा हक्क मिळावयाचा आहे. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाची ही क्रिप्स योजनेंतील व्याप्ति कोणाला पटेल वा न पटेल. पण, ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे की, राष्ट्रसभेने १९२७ सालीं प्रथम मद्रास येथे आणि नंतर १९२९ सालीं लाहोर येथे पं. जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेने जी संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली, तिची परिपूर्ति क्रिप्स योजनेने बव्हंशीं होऊं शकेल, हाच त्या योजनेचा घेण्याजोगा विशेष होय. पण, ब्रिटिश सरकारचें आतापर्यंतचें वंचक धोरण पाहातां युद्धानंतर ही योजना अंमलांत आणली जाईलच, याचा काय भरंवसा ? किंवा ती अंमलांत आणण्याचा देखावा जरी कदाचित् करण्यांत आला, तरी गेल्या महायुद्धानंतर इजिप्तला दिलेल्या स्वातंत्र्याप्रमाणे हें स्वातंत्र्यहि

नकली, निस्सत्व ठरणार नाही कशावरून ? अर्थात् क्रिप्स योजना मूर्तावस्थेला आल्यानंतरहि, ती जर इजिप्तच्या स्वातंत्र्याप्रमाणे रक्षण-बंधांनी जखडलेली असली तर किंवा आयर्लंडप्रमाणे ती देतांना हिंदुस्थानाची ब्रिटिश हिंदुस्थान, संस्थानी हिंदुस्थान आणि पाकिस्तान अशीं दोन अगर तीन शकलें पाडण्यांत आलीं तर जो स्वातंत्र्याचा आणि राष्ट्रैक्याचा लढा त्या परिस्थितींतून उद्भवेल, तो कशा रीतीने चालवावयाचा ?

या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें नाही. कारण या लढ्याचें स्वरूप जितकें आपल्या आंतरिक सामर्थ्यावर तितकेंच त्या वेळच्या आंतर-राष्ट्रीय परिस्थितीवरहि अवलंबून राहील. चालू महायुद्धाचा निकाल दोस्त राष्ट्रांना अनुकूल होऊन युरोपांत जर रशिया प्रबल झाला, तर त्याच्या विश्वक्रांतीच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव जागतिक राजकारणावर होऊन, त्या प्रमाणांत हिंदुस्थानावरील ब्रिटिश साम्राज्यशाहीची पकड सैल होईल, हें उघड आहे. पण, त्याबरोबरच प्रशांत महासागरां-तील अमेरिकेचें वाढतें वर्चस्व हें ब्रिटिशांच्या पूर्वेकडील सार्वभौम सत्तेचें पाठबळ ठरण्याचा संभव आहे, हेंहि लक्षांत घेतले पाहिजे. ही भवितव्यता ध्यानांत घेऊनच भावी धोरणाचा विचार करावयाला नको काय ? त्या दृष्टीने पाहातां लो. टिळक, म. गांधी आणि पं. जवाहरलाल नेहरू यांनी साम्राज्यशाहीच्या प्रतिकारार्थ जनशक्ति संघटित आणि युयुत्सु करण्यासाठी आजपर्यंत ज्या निरनिराळ्या कल्पना लोकांपुढे ठेवलेल्या आहेत, त्यांच्या समन्वयानेच भावी कार्यक्रम निश्चित करतां येण्यासारखा आहे. या कार्यक्रमानुसार पं. नेहरू प्रभृति समाजवादी पुढाऱ्यांनी पुरस्कारिलेलें ‘समाजसत्ताक स्वराज्याची स्थापना’ हेंच तरुण भारताचें अंतिम ध्येय ठरतें; व त्या ध्येयाच्या सिद्ध्यर्थ (१) रचनात्मक कार्यक्रम, (२) बहिष्कार, (३) कायदेमंडळांतील अडवणूक, (४) नागरिक सैन्याची उभारणी आणि (५) प्रत्यक्ष प्रतिकार हीं साधनें ठरतात. या साध्यसाधनांतील समाजसत्ताक स्वराज्याचें ध्येय पं. नेहरू यांच्या कार्यक्रमांतून घेतलेलें असून,

रचनात्मक कार्यक्रम गांधीजींचा आहे आणि बाकीचे चार मुद्दे टिळकांच्या शेवटल्या जाहीरनाम्यांतून उचललेले आहेत. अर्थात् या साध्यसाधनांत नवीन किंवा अपूर्व असें कांही नाही. पण, टिळक, गांधी आणि नेहरू या देशासाठी आपलें जीवितसर्वस्व वाहिलेल्या तीन धुरंधर पुढाऱ्यांनी विचारपूर्वक जीं साध्यसाधनें निश्चित केलीं, त्यांपेक्षा या पुरातन भूमीच्या अभ्युदयासाठी अधिक श्रेयस्कर साध्यसाधनें आणखी कोणतीं मिळणार आहेत ? त्या साध्यसाधनांचा प्रचार जर 'तरुण भारता'ने निष्ठेने, निर्धाराने आणि निर्भयतेने केला, तर त्याच्या अस्तित्वाचें सार्थक होईल.

१०-८-४४

# महाराष्ट्राच्या उत्कर्षाची तळमळ

टिळक पुण्यतिथीच्या सुमुहूर्तावर महाराष्ट्रांत ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यामध्ये जे अनेक शुभ उपक्रम झाले, त्यांत ने. ना. डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे महाराष्ट्र उत्कर्ष मंडळामार्फत भरलेल्या साठ ते सत्तर संस्थांच्या संमेलनाला विशेष महत्व आहे. हिंदु समाज जातिविशिष्ट असल्यामुळे आणि ब्रिटिश सरकारनेहि राज्यकारभारांत जातवारीच्या तत्त्वाला स्थान दिल्यामुळे गेल्या वीस वर्षांत जातिसंस्थांचें पीक महाराष्ट्रांत उमाप आलेलें आहे. ब्राह्मण जात ही एवढी सुसंस्कृत आणि 'ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्' या श्रुतिवचनानुसार समाजाची मुखंड मानली गेलेली ! पण त्या जातींतहि देशस्थ, कोकणस्थ, सारस्वत, कऱ्हाडे वगैरे पोटजातींच्या वेगवेगळ्या संस्था आहेत. मग इतर जातींना त्यांच्या सवत्या सुभ्याबद्दल कोणत्या तोंडाने नांवें ठेवावींत ? ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादामुळे हिंदु समाजाची ही विघटना जास्तच विकोपाला गेली; व हिंदु महासभेसारख्या अखिल हिंदु समाजाच्या

उन्नतीसाठी झटणाऱ्या मध्यवर्ति संस्थेच्या ध्वजाखालीसुद्धा सर्व हिंदु जाति एकवटणे कठीण झालें. अशा स्थितींत, ने. ना. डॉ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईला महाराष्ट्रीय समाजांतील निरनिराळ्या जातिसंस्थांचे प्रतिनिधि एकत्र आले आणि महाराष्ट्राच्या उत्कर्षाच्या प्रश्नांचा त्यांनी सहविचार केला, याबद्दल कोणाला आनंद वाटणार नाही ?

डॉ. बाबासाहेब जयकर यांनी या प्रसंगीं जें भाषण केलें, तें अप्रिय पण पथ्य वक्तृत्वाने भरलेलें आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत सध्या महाराष्ट्रीयांची पिच्छेहाट होत चाललेली आहे, याबद्दल वाद नाही. बाबासाहेबांनी आपल्या भाषणांत या परागतीचा उल्लेख करून कळकळीने असे उद्‌गार काढले की, “जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत,—वकिली घ्या, व्यापार घ्या, सिनेमा घ्या, वर्तमानपत्रें घ्या, —आज महाराष्ट्रीयांचें पाऊल मागे असल्याचें दिसतें. महाराष्ट्रीयांच्या बुद्धिमत्तेचा विक्रय होत आहे. याचें कारण महाराष्ट्रीयांमधील संघटनेचा अभाव, परस्परांविषयी अज्ञान आणि एकमेकांविषयी वैमनस्य हें आहे.” महाराष्ट्राच्या सध्याच्या दुर्दशेचें बाबासाहेबांनी केलेलें हें निदान बव्हंशीं खरें आहे. आपसांतील फाटाफूट हें महाराष्ट्रीयांचें मोठेंच वैशिष्टय आहे. दोन सुबुद्ध जाति, दोन कर्तबगार व्यक्ति, दोन एकाच कार्याला वाहिलेल्या संस्था महाराष्ट्रांत कधी एकोप्याने काम करतांना दिसावयाच्या नाहीत. शिवाजी आणि व्यंकोजी हे दोघे भाऊ स्वराज्यसंस्थापनेसाठी एकत्र येऊं शकले नाहीत; नाना फडणीस आणि महादजी शिंदे हे धुरंधर मुत्सद्दी मराठी साम्राज्याचा कारभार एकदिलाने करूं शकले नाहीत; आगरकर आणि टिळक यांना ‘केसरी–मराठा’ आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी सहकारितेने चालविणें शक्य झालें नाही किंवा अगदी जवळचें उदाहरण द्यावयाचें म्हणजे डॉ. मुंजे आणि बॅ. अभ्यंकर यांच्यासारखे नागपूरचे दोन झुंजार पुढारी एका पक्षांत फार काळ नांदूं शकले नाहीत. महाराष्ट्रांतील कोणतींहि दोन हुशार, दोन कर्तबगार माणसें म्हणजे जणू

दोन तरवारीच ! त्या एका म्यानांत राहावयाच्या कशा ? या भाऊबंदकीमुळेच महाराष्ट्रांत इंग्रजांचा प्रवेश होऊन स्वराज्य बुडालें; व या भाऊबंदकीमुळेच महाराष्ट्रांतील औद्योगिक आणि राजकीय नेतृत्व आज उपऱ्यांच्या मुठींत गेलेलें असून, मराठी भाषेंत निघालेल्या वर्तमानपत्रांची मालकीसुद्धा महाराष्ट्रीयांकडे उरलेली नसावी, अशी विचित्र अवस्था आज दृष्टीस पडत आहे.

महाराष्ट्रीयांच्या पिच्छेहाटीला आपसांतील फाटाफूट हें जसें एक कारण आहे, तसेंच दुसरें कारण व्यापारी बुद्धीचा अभाव हेंहि तितकेंच सबळ आहे. महाराष्ट्र हें स्वभावतः शेतकरी, कारकून आणि शिलेदार यांचें राष्ट्र आहे. यादवांनी देवगिरीचें राज्य स्थापन केलें तेव्हापासून तों बाजीरावाने पुणें शहराची पुनर्रचना केली तेव्हा-पर्यंतचा म्हणजे सुमारें पांचशें वर्षांचा महाराष्ट्राचा इतिहास जर पाहिला, तर त्यांत असे उल्लेख जागोजाग आढळतात की, नवीं शहरें किंवा पेठा वसवतांना प्रत्येक वेळीं राजांनी, मुत्सद्यांनी किंवा सरदारांनी व्यापारीउदमी वर्ग हा परप्रांतांतून कौलनामे देऊन मुद्दाम महाराष्ट्रांत आणवला. फार कशाला ? प्राचीन काळीं यहुदी, पारशी, अरब आणि हबशी व अर्वाचीन काळीं पोर्तुगीज, डच, फ्रेंच आणि इंग्रज हे याच कारणामुळे व्यापाराचें मिष करून आणि आमिष दाखवूनच महाराष्ट्रांत घुसले व कालांतराने संपन्न किंवा सत्ताधारी झाले नाहीत काय ? याचें एकमेव कारण हें की, महा-राष्ट्रीयांना हातांत नांगर, लेखणी किंवा तरवार धरणेंच फक्त साधतें; तागडी धरणें जमत नाही. इंग्लंड हें स्वभावतः व्यापारी राष्ट्र असल्यामुळे इंग्रजांनी जगभर व्यापार आणि साम्राज्य यांचा विस्तार करून जगांतली सगळी संपत्ति आपल्या घरांत भरली. उलट, महाराष्ट्र हें शेतकरी, कारकुनी आणि शिलेदारी राष्ट्र असल्यामुळे, अटकेपर्यंत मराठशाहीचा झेंडा नाचवून सुद्धा, नानासाहेब पेशव्याच्या मार्मिक शब्दांत सांगावयाचें म्हणजे, सुवर्णनदीचा प्रवाह महाराष्ट्राकडे वळता वहाता करण्याचा पेशव्यांचा मनसुबा तडीला जाऊं शकला नाही.

आणि, आता या पारतंत्र्याच्या काळांत तर, 'कानांत लेखणी कारकून जसे' हा उखाणा घेऊन आपल्या भावी पतीचें वर्णन करण्यांत महाराष्ट्रांतील मुलीबाळींना भूषण वाटत आहे.

मराठशाही नष्ट झाल्यावर महाराष्ट्रांतील शिलेदारीचा पिढीजात धंदा ठार बुडाला. सतराव्या आणि अठराव्या शतकांत स्वतःचें घोडें नाही असें घर आणि कमरेला समशेर नाही असा माणूस महाराष्ट्रांत सापडणें अशक्य होतें. पण यादवकालापासून महाराष्ट्राच्या पांचवीला पुजलेली ही शिलेदारी इंग्रजांनी बुद्धिपुरःसर बुडवली. इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानांतील लढवय्या जातींतूनहि त्यांनी अवघ्या शंभर वर्षांपूर्वी आपली लांडगेतोड करणाऱ्या मराठ्यांना वगळण्याचा दुष्टावाहि दाखविला. अर्थात् स्वराज्य गेल्यावर फक्त नांगर आणि लेखणी तेवढीच महाराष्ट्रांत शिल्लक उरली. पारतंत्र्यामुळे झालेल्या मराठी राष्ट्राच्या या तेजोवधाचें वर्णन करतांना शाहिराने म्हटलेंच आहे--

**तल्वार झालि बापडी । फिरंगी छडी ।**
**लागली दुनियेवर फिराया ।।**

पण, फिरंग्यांच्या छडीच्या धाकाने खाली माना घालून त्यांच्या कचेऱ्यांतून लेखणीच्या जोरावर कागदी घोडे नाचवण्याची जी मक्तेदारी महाराष्ट्रांतील पांढरपेशा वर्गांना अव्वल इंग्रजी अमदानींत मिळाली, तीहि आता उरलेली नाही. परवाच नागपूरचे नगरोपाध्यक्ष रा. ब. अण्णासाहेब दातार हे खाजगी बैठकींत बोलतांना विनोदाने म्हणाले, "शिलेदारी आणि कारकुनी हे महाराष्ट्रीयांचे दोन स्वाभाविक व्यवसाय होते, ही गोष्ट खरी. पण त्यांपैकी तरवार घेतली इंग्रजांनी काढून आणि लेखणी बसलाहे मद्रासी बळकावून ! मग आता त्यांनी जगावयाचें कसें ? यापुढे त्यांनी तागडी हातांत धरली, तरच कांही निभाव लागेल त्यांचा !" या विनोदाच्या पोटीं जें विषादपूर्ण सत्य दडलेलें आहे, त्याकडे दुर्लक्ष

करून कसें चालेल ? " महाराष्ट्रीयांच्या बुद्धिमत्तेचा आज विक्रय होत आहे, " ही जयकरांनी वर्णन केलेली दुरवस्था जर दूर करावयाची असेल, तर यापुढे साऱ्या उत्पादक व्यवसायांत महाराष्ट्रीयांनी आपली बुद्धि घालणें अवश्य नाही काय ?

या दुरवस्थेंतून बाहेर पडण्याच्या बाबतींत मार्गदर्शन करण्याची जबाबदारी ने. ना. डॉ. बाबासाहेब जयकर यांनी घेतली, ही आनंदाची गोष्ट होय. हिंदुस्थानांत हाताच्या बोटांवर मोजण्यासारखे जे अव्वल दर्जाचे मुत्सद्दी आज आहेत, त्यांत बाबासाहेबांची गणना होते. विद्वत्ता, वक्तृत्व आणि मुत्सद्देगिरी या गुणांत त्यांचा हात धरणारा व राजदरबाराप्रमाणेच गांधीजींच्याहि खलबतखान्यांत तितकीच प्रतिष्ठा असलेला त्यांच्यासारखा अष्टपैलू नेता आज महाराष्ट्रांत दुसरा सापडणार नाही. किंबहुना, महाराष्ट्राच्या वैशिष्टचांतील सगळें सौंदर्य ज्यांत एकवटलेलें आहे असा महाराष्ट्र भूमीचा अलंकार, महाराष्ट्र संस्कृतीचा फुलोरा म्हणजेच जयकर ! पण, महाराष्ट्र उत्कर्ष मंडळाचें कार्य जर खरोखरच जोराने चालावें अशी जयकरांची इच्छा असेल, तर त्यांनी 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' ही आपली नेहमीची बैठी भूमिका सोडून देऊन, निदान या आपल्या आवडत्या कामीं तरी तळमळीने पुढाकार घ्यावयाला नको काय ? 'उत्तम गुणां नाही सीमा' अशी खरोखरी इतर दृष्टीनी जयकरांची योग्यता असतांनासुद्धा, कोणत्याहि धकाधकीच्या मामलयाला अवश्य असलेला झुंजारपणा त्यांच्या वृत्तींत नसल्यामुळेच, त्यांच्या अमोल गुणांचा उपयोग महाराष्ट्राला होऊं शकला नाही, असें म्हणावयाला काय हरकत आहे ? महाराष्ट्राचा उत्कर्ष हा त्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. तो प्रश्न धसाला लावण्याची जबाबदारी जरी त्यांनी निर्धाराने उचलून ती पार पाडली, तरी पुष्कळच फायदा होईल.

१२-८-१९४४

# ‘स्वातंत्र्य’ ‘स्वातंत्र्य’ तें हेंच काय ?

भवभूतीच्या उत्तररामचरित नाटकांत असा एक गमतीदार प्रसंग आहे की, श्रीरामचंद्राने अश्वमेधाच्या दिग्विजयार्थ सोडलेला श्यामकर्ण वारु जेव्हा वाल्मीकींच्या आश्रमांत शिरून त्या रमणीय तपोवनांतली कोवळी हरळी खिकाळत आणि चौखूर नाचत खाऊं लागला, तेव्हा तें देखणें जनावर पाहून आश्चर्यचकित झालेल्या आश्रमांतील ब्राह्मण बटूंनी लवाला विचारलें, “मित्रा लवा, अरे ज्याला ‘घोडा’ ‘घोडा’ म्हणून म्हणतात, तो हाच काय ?” गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान, इंग्लंड आणि अमेरिका या तीन देशांत ‘स्वातंत्र्य’ या शब्दाचें जें चर्वित चर्वण झालें, तें पाहून कोणालाहि असाच प्रश्न सर फिरोजखान नून, श्री. विन्स्टन चर्चिल आणि श्री. फ्रँकलिन रूजवेल्ट यांना विचारावासा वाटेल की, “ज्याला तुम्ही ‘स्वातंत्र्य’, ‘स्वातंत्र्य’ म्हणून म्हणतां तें खरोखरी हेंच काय ? आणि जर तें ‘स्वातंत्र्य’ हेंच असेल, तर इंग्लंड, अमेरिका वगैरे तुमचे मायदेश जें स्वातंत्र्य आज प्रत्यक्ष भोगीत आहेत त्यांत आणि हिंदुस्थानासारख्या दलित राष्ट्रांना स्वातंत्र्य तुम्ही जें देऊं केलेलें आहे, त्या स्वातंत्र्यांत फरक काय ?” वाल्मीकिऋषींच्या आश्रमांतील तापसकुमारांनी ‘घोडा’ ही चीज कधी डोळ्यांनी पाहिली नव्हती. कुश आणि लव हे रोज सांजसकाळ वाल्मीकींनी केलेल्या रामायणाचें जें वीरगान करीत, त्यांत वारंवार आलेल्या घोड्याच्या उल्लेखांवरून त्यांनी त्या प्राण्याविषयी काय कल्पना केली असेल, तेवढीच ! पण, हिंदुस्थान आज परतंत्र असला, तरी ज्याला शुद्ध आणि संपूर्ण स्वातंत्र्य म्हणून म्हणतात, तें त्याने गमावल्याला अद्याप पुरतीं दीडशें वर्षेंहि झालेलीं नसून, त्याची उज्ज्वल स्मृति या पारतंत्र्याच्या दुर्धर काळांतहि हिंदी जनतेच्या हृदयांत सारखी धगधगत आहे. अशा स्थितींत, दारांत उभ्या असलेल्या लंबकर्णाकडे बोट दाखवून तो श्यामकर्ण वारु असल्याबद्दल कोणी जर त्याला सांगूं लागला, तर तो कसें खरें मानील ?

कारण, गेल्या आठवड्यांत विलायतेहून नुकतेच परत आलेले हिंदुस्थान सरकारचे संरक्षणमंत्री सर फिरोज नून यांनी दिल्ली येथे आणि अमेरिकेचे गृहमंत्री श्री. कॉर्डेल हल यांनी वॉशिंग्टन येथे युद्धानंतर दलित राष्ट्रांना मिळणार असलेल्या स्वातंत्र्याची जी व्याख्या केली, ती व्याख्या वाचून,—" अहो, तुम्ही जो हा घोडा म्हणून दाखवतां तो घोडा नसून तें खरोखरी गाढव आहे !, " —असें या महानुभावांना स्पष्ट सांगण्याचा प्रसंग आज जगांतील परतंत्र लोकसमाजांवर आलेला आहे. डिस्राएलीने असें म्हटलेलें आहे की, " मुत्सद्दी जो शब्दांचा उपयोग करतात, तो आपलें हृद्‌गत सांगण्यासाठी नव्हे, तर लपवण्यासाठी करतात ! " पण, सध्या जगांत मुत्सद्यांनी शब्दांचा केवळ लपंडावच चालवलेला नसून, त्यांच्या वास्तविक अर्थाची निर्दय विटंबनाहि चालवलेली आहे, असें म्हणणें भाग आहे. कारण, अमेरिका युद्धांत पडल्याबरोबर श्री. रूजवेल्ट यांनी चतुर्विध स्वातंत्र्याचा जो सिंहनाद केला, तो परिणामीं केवळ शंखनाद ठरावा, इतकी त्या स्वातंत्र्याची कुतरओढ गेलीं दोन वर्षें सारखी चाललेली नाही काय ? जगांतील ज्या पादाक्रांत किंवा परतंत्र राष्ट्रांना हें स्वातंत्र्य वस्तुतः मिळावयाला हवें, त्यांना तें मिळण्याची कितपत आशा आहे ? ता. २१ रोजीं वॉशिंग्टन येथे भरलेल्या इंग्लंड, अमेरिका, रशिया आणि चीन या चार बड्या राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय संरक्षण परिषदेचा उपक्रम करतांना श्री. कॉर्डेल हल यांनी असे उद्‌गार काढले की, " प्रत्येक राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य मिळालें पाहिजे आणि त्याचा उपभोग घेण्याचीहि खात्री वाटली पाहिजे. " पण, जिथे ब्रह्मदेश, हिंदुस्थान, सीलोन वगैरे ब्रिटिश साम्राज्यांतील देशांनाच मुळी स्वातंत्र्य मिळण्याची शक्यता आज दिसत नाही, तिथे त्या देशांतील व्यक्तींना स्वातंत्र्याचा उपभोग कसा घेतां येणार ? १९४२ सालीं सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांनी जी योजना हिंदी पुढाऱ्यांना सादर केली होती, तींत युद्धानंतर पूर्ण स्वातंत्र्य मिळण्याची हमी दिलेली होती. पण, विलायतेंत चतुर्मास राहून परत आलेले सर फिरोज यांनी ता. १५ रोजीं पत्रप्रतिनिधींना जी मुलाखत दिली, तींत असें चक्क सांगून

टाकलें की, “ युद्ध संपल्यावर कांही तरी खात्रीने मिळणार. मग तें कदाचित् वसाहतीचें स्वराज्य असेल किंवा कदाचित् त्याहिपेक्षा कमी असेल ! ” (I may be full Dominion Status or something short of it.) श्री. रूजवेल्ट यांनी जें चतुर्विध स्वातंत्र्य युद्धानंतर जगाला देऊं केलेलें आहे, तें हेंच काय ? बाकी, खुद्द म. गांधी हेच स्वत: जिथे समेटाच्या उतरणीला एकदा लागले, म्हणजे ‘स्वातंत्र्याचें सार’ ( Substance of Indpendence ) काढूं शकतात, तिथे सर फिरोज नून यांना नावें ठेवण्यांत काय अर्थ ?

राजकीय स्वातंत्र्याची ही परवड झाली. पण, सर फिरोज यांनी पत्रप्रतिनिधींना ब्रिटिश युद्धमंडळांतील चर्चेची जी माहिती आपला दिल सफासफा खोलून सांगितली, त्या माहितीप्रमाणेच जर पुढे हिंदुस्थानाची युद्धोत्तर पुनर्घटना व्हावयाची असेल, तर आर्थिक स्वातंत्र्यसुद्धा मिळण्याची कांही आशा नाही, हें स्पष्ट दिसतें. किंबहुना, आपल्या या मुलाखतींत त्यांनी ब्रिटिश भांडवलवाल्यांशीं सहकार्य करण्याची हिंदी भांडवलवाल्यांना ज्या लज्जाशून्य मनाने शिफारस केलेली आहे, ती त्यांची निर्लज्जता पाहिल्यावर हिंदुस्थान सरकारच्या संरक्षण खात्याच्या पोकळ जबाबदारीबरोबरच ब्रिटिश भांडवलशाहीची भरीव कमिशन एजन्सीहि त्यांनी घेतलेली आहे की काय, अशी शंका आल्याशिवाय राहात नाही. त्यांनी असें सांगितलें की, “ पृथ्वीच्या पाठीवर ब्रिटिश माणसासारखा भला, उमदा माणूस नाही आणि इंग्लंडसारखें दिलदार, सहृदय राष्ट्र नाही ! हिंदुस्थानाचें औद्योगीकरण व्हावें, म्हणून इंग्लंडांतील बड्या भांडवलवाल्यांना सारखी तळमळ लागलेली आहे. पण, त्यांनी आपल्याला फुकट मदत करावी, असें आपण कां म्हणून समजून चालावें ? त्यांना आपण पन्नास टक्के किंवा जरूर तर जास्त वाटा नफ्यांत देणें अवश्य आहे. तरच त्यांची मदत आपल्याला मिळेल. हिंदुस्थानाची आठशें कोट रुपयांची सुवर्ण शिल्लक आज ब्रिटिश गंगाजळींत आहे. इंग्लंडांतील भांडवलवाल्यांची अपेक्षा अशी आहे की, या आठशें कोट रुपयांची यंत्रसामुग्री आपल्याकडून मागवून

टाटा-बिर्ला योजनेचे जनक हे ती सुवर्ण शिल्लक पुन्हा हिंदुस्थानांत परत पाठवण्याची दगदग ब्रिटिश सरकारला पडूं देणार नाहीत! तेव्हा ब्रिटिश भांडवलवाल्यांशीं हिंदी भांडवलवाल्यांनी पन्नास टक्क्यांच्या वाटणीवर भागीदारी कां करूं नये?" सर फिरोज यांच्या या प्रश्नाला काय उत्तर देणार? फार तर, त्यांना एवढाच प्रतिप्रश्न विचारतां येईल की, तुम्ही जे युद्धमंडळावरील हिंदी प्रतिनिधि म्हणून विलायतेला गेलेला होतात, ते काय हिंदुस्थानाच्या आठशें कोटींच्या सुवर्ण शिलकेच्या मोबदल्यांत ब्रिटिश यंत्रसामुग्रीच्या खरेदीचा मक्ता ब्रिटिश भांडवलशाहीला देण्यासाठी? श्री. राजगोपालाचार्य यांच्या योजनेनुसार म. गांधी आणि श्री. जिना यांच्यांत जो समेट होऊं घातलेला आहे, त्यांत मुसलमानांना पन्नास टक्के राजकीय सत्ता मिळणार; व सर फिरोज यांच्या या योजनेनुसार हिंदी आणि ब्रिटिश भांडवलवाले यांच्यांत जो समेट उद्या होईल, त्यांत ब्रिटिशांना पन्नास टक्के आर्थिक सत्ता मिळणार! राजकीय आणि आर्थिक सत्तेची ही टक्केवारी जर खरोखरीच अंमलांत आली, तर हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य किंबहुना राष्ट्रीयत्व शिल्लक राहातें कुठें? कांग्रेस आणि लीग, हिंदी भांडवलशाही आणि ब्रिटिश भांडवलशाही यांच्यांतील या टक्केवार वाटणींत ज्याला 'हिंदुस्थान' म्हणून अभिमानाने म्हणावयाचें तो कुठे शिल्लक उरतो?

अशा स्थितींत रूजवेल्टसाहेबांनी युद्धानंतर चतुर्विध स्वातंत्र्य सर्व जगाला बहाल करण्याचें जें आश्वासन दिलेलें आहे, त्यावर कोणाचा विश्वास बसणार आहे? किंबहुना, युद्धानंतर हें चतुर्विध स्वातंत्र्य जगाला लाभण्याची जरी आशा नसली, तरी इंग्लंड, अमेरिका, रशिया आणि चीन यांची चतुर्मुख साम्राज्यशाही मात्र जगाच्या मानगुटीला बसणार आहे, यांत शंका नाही. आणि, ही चतुर्मुख साम्राज्यशाही केवळ व्यापारीच रहाणार नसून, ती लष्करी राहील, असें कॉर्डेल हल यांच्या आंतरराष्ट्रीय संरक्षण परिषदेंतील भाषणावरून स्पष्ट दिसतें. कारण, त्यांनी असें म्हटलेलें आहे की, "जर्मनी आणि जपान

यांना निःशस्त्र केल्यावरहि त्यांना जरब बसावी आणि जगांत शांतताभंग होऊं नये, म्हणून या चार राष्ट्रांना आपलें लष्कर नेहमी सुसज्ज ठेवणें अवश्य आहे.” हलसाहेबांच्या या साळसूद, अगदी सोज्वळ दिसणाऱ्या विधानाचा अर्थ काय होतो ? त्याचा अर्थ असाच होत नाही काय की, इंग्लंड, अमेरिका, रशिया आणि चीन हीं चार बडीं राष्ट्रें, जगांत शांतताभंग होऊं न देण्याच्या मिषाने, यापुढें सर्व जगावर आपली लष्करशाही गाजविणार ? ही गोष्ट लक्षांत घेऊनच अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकींतील रूजवेल्टसाहेबांचे प्रतिमल्ल श्री. थॉमस ड्युई यांनी असा इशारा दिलेला आहे की, “ शांततारक्षणाच्या या योजनेमुळे हीं चार राष्ट्रें जगांत वाटेल तसा धुमाकूळ घालावयाला मोकळीं रहाणार असून, सर्व जग त्यांच्या टांचेखालीं दडपलें जाणार असल्यामुळे अत्यंत दुष्ट स्वरूपाची साम्राज्यशाही जगांत स्थापन होणार आहे. ” (That would be the rankest form of Imperialism) लोकशाहीसाठी म्हणून जें हें युद्ध आज लढलें जात आहे, त्याचें पर्यवसान जर असलीं चतुर्मुख लष्करी साम्राज्यशाही जगांत प्रस्थापित होण्यांत व्हावयाचें असेल, तर त्यापरती चतुर्विध स्वातंत्र्याची विटंबना ती कोणती ?

म्हणूनच, आंतरराष्ट्रीय चलन परिषदेच्या अधिवेशनाहून ता. २१ रोजीं परत आलेले हिंदी प्रतिनिधि श्री. श्रॉफ यांनी कराची येथे विमानांतून खाली उतरतांच वार्ताहरांशीं बोलतांना असे उद्गार काढले की, “ अमेरिकन लोक आपल्यासाठी कांही करतील अशा आशेंत जर हिंदी लोक असतील, तर त्यांच्यासारखे मूर्ख तेच ! ” श्री. श्रॉफ यांचा हा इषारा समर्पक नाही, असे कोण म्हणेल ? आज इंग्लंड-पेक्षाहि एका परीने अमेरिकेला हिंदुस्थानांत आपला तळ कायम ठेवण्याची आवश्यकता जास्त आहे. प्रशांत महासागरांत जर खरोखरीच शांतता नांदावयाला हवी असेल, त्या महासागरांतील जपानचें वर्चस्व कायमचें नष्ट होऊन अँग्लो–अमेरिकनांचें पूर्वेकडील साम्राज्य जर निष्कंटक आणि निर्भय व्हावयाला हवें असेल, तर हिंदुस्थानावरील

आपल्या पोलादी सत्तेची पकड सैल होऊं देऊन इंग्लंड आणि अमेरिका यांचें कसें चालेल ? अशा स्थितींत आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत हिंदुस्थानाने अमेरिकेच्या तोंडाकडे पाहाण्यांत काय अर्थ आहे ? अर्ध्या जगाला पालाण घालूनहि ज्यांची साम्राज्यलालसा तृप्त झालेली नाही आणि शांततेच्या सोज्वळ नांवाखाली जे सर्व जगावर स्वतःची लष्करशाही स्थापण्याच्या खटाटोपांत आहेत, ते हिंदुस्थानाला काय स्वातंत्र्य देणार ? तेव्हा, म. गांधी यांनी बडचा लाटांच्या नकाराला उत्तर देतांना म्हटल्याप्रमाणे, हिंदुस्थानाने आपलें सामर्थ्य सर्व बाजूंनी वाढवणें, हाच पारतंत्र्यांतून मक्त होण्याचा एकमेव उपाय नाही काय ?

२५-८-४४

# हा संहार काय अखेर व्यर्थच ठरणार ?

रविवार ता. ३ सप्टेंबर रोजीं यद्ध सुरू झाल्याला पांच वर्षें पूर्ण होतात. पांच वर्षांच्या या काळांत रणांगणाच्या निरनिराळचा आघाडचांवर जो विलक्षण संहार झाला, तो लक्षांत घेतला असतां विश्वरूपदर्शनाच्या वेळीं ‘ कालोऽस्मिलोकक्षयकृत्प्रवृद्धः ’ या भगवंतांनी अर्जुनाला दिलेल्या उत्तराचें स्मरण कोणाला होणार नाही ? भगवंतांनी ज्या वेळीं आपलें विराट् स्वरूप अर्जुनासमोर प्रकट केलें, त्या वेळीं पृथ्वीच्या पाठीवर सैरावैरा धावणाऱ्या साऱ्या नद्या जशा समुद्राला मिळून त्यांत गडप होऊन जाव्यात किंवा पावसाळी पतंगांच्या झुंडी दिव्याच्या प्रखर ज्योतीवर झडप घालून जशा होरपळून लोळागोळा व्हाव्यात, तसें कुरुक्षेत्राच्या त्या अफाट मैदानावर जमलेलें कौरवपांडवांचें प्रचंड सैन्य आपल्या समोर द्यावापृथिवीला आक्रमून उभ्या ठाकलेल्या त्या विराट् पुरुषाच्या अजस्र जबडचांत वेगाने शिरत असल्याचें अर्जुनाने पाहिलें. तेव्हा त्याच्या अंगाचा थरकाप झाला; व

तो हात जोडून भगवंताला म्हणाला, " हे प्रभो, आपण सर्व लोकांना आपल्या जाज्वल्य मुखांनी ग्रासून टाकीत जिभा चाटीत आहांत. तेव्हा असलें हें उग्र रूप धारण करणारे आपण कोण हें मला सांगा ! "— " लेलिह्यसे ग्रसमानः समंताल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः । आख्याहि मे को भवानुग्ररूपो । " त्यावर भगवंताने त्याला हसून उत्तर दिलें, " अरे, मी लोकांचा नाश करण्यासाठी विक्राळ रूप धारण केलेला काळ असून, लोकांचा संहार करण्यासाठी येथे आलो आहे. "–" कालोस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः । " पश्चिमेपासून पूर्वेकडे पसरत गेलेल्या युद्धाच्या आघाड्यांवर भगवंताचें हेंच कराल स्वरूप आज आपल्या दृष्टीस पडत नाही काय ?

किंबहुना, रणांगणाच्या कोणत्याहि आघाडीवर आज जेवढा संहार होत नसेल, तेवढा या आघाड्यांपासून हजारों मैल दूर असलेल्या त्या त्या युध्यमान राष्ट्राच्या पिछाड्यांवर चालू घटकेला अत्यंत अमानुषतेने होत आहे, हें या युद्धाचें वैशिष्टच जितकें अघोर तितकेंच अनन्य होय. लढाईंत रणक्षेत्रावर प्रत्यक्ष मेलेले किंवा जखमी झालेले सैनिक क्रोडोंनी भरण्यासारखे असले, तरी त्यांना लढतां लढतां धारातीर्थी वीरोचित मरण आलें, एवढें तरी एक समाधान मनाला आहे की नाही ? पण, पुनवेच्या चांदण्या रात्रीं शुभ्र नितळ आकाशांतून चंद्राच्या अमृतधारांची बरसात अंगावर व्हावी अशी अपेक्षा करीत असतां, कळसूत्री विमानांतून आणि उडत्या अग्निगोलकांतून ज्वालामुखीच्या स्फोटांतून बाहेर पडणाऱ्या आगीच्या ज्वाळांना लाजविणारे जे अंगाराचे लोळ रोज इंग्लंडांतील म्हणा किंवा जर्मनीतील म्हणा जनतेवर कोसळून लाखों लोकांच्या जीवितवित्ताची राखरांगोळी करीत आहेत, त्याबद्दल मनाचें सांत्वन कसें करावयाचें ? या युद्धांत समरभूमीवर जितके लोक मेले किंवा जखमी झाले, तितकेच लोक या आकाशांतून सतत होणाऱ्या अग्निवृष्टीमुळे आंधळे, लंगडे, पांगळे, बहिरे किंवा वेडे होऊन गेलेले आहेत. युद्धोत्तर पुनर्घटनेचे जे मयासुरी कार्यक्रम आज धिसाडघाईने आखले जात आहेत, त्यांत रणभूमीवर

पाऊलहि न ठेवतां बसल्या जागीं घरच्या घरीं लुळ्यापांगळ्या आणि आंधळ्याबहिऱ्या होऊन गेलेल्या या कोटयवधि पंगु माणसांच्या उध्वस्त आयुष्याची पुन्हा आवरासावर करण्याची कांही व्यवस्था केलेली आहे काय ? जर नसेल, तर या पंगु माणसांचें भवितव्य काय ? युद्धांत जखमी झालेल्या किंवा युद्धांतून परत आलेल्या सैनिकांसाठी नोकऱ्यांची म्हणा किंवा वसाहतींची म्हणा कांही ना कांही सोय सरकार करीत आहे. पण युद्धांत भाग न घेतांहि त्याच्या दूर दूर पसरलेल्या जगड्व्याळ ज्वाळांत होरपळून निघालेल्या या अनाथअपंगांचें काय ?

तथापि, शत्रुकडून होणाऱ्या बाँबवर्षावाला जे बळी पडले, जखमी झाले किंवा घरादारांची राखरांगोळी झाल्यामुळे उघडे पडले, त्यांची कांही ना कांही सोय कदाचित् पुनर्घटनेच्या कार्यक्रमांत होऊनहि जाईल. पण, पांच वर्षांच्या या काळांत दुष्काळ आणि महागाई हीं बेसुमार बोकाळल्यामुळे जे उपासमारीला बळी पडले किंवा कायमचे दुबळे होऊन गेले, त्यांची वाट काय ? गेल्या दोन अडीच वर्षांत ब्रह्मी आघाडीवर जितके लोक ठार झाले नसतील, तितके बंगालमध्ये रस्तोरस्तीं भुकेने तडफडून मेलेले आहेत आणि अद्यापहि मरत आहेत, हें कोणाला माहीत नाही ? इंग्लंडांतील जनता आज या नियंत्रणाच्या आणि महर्घतेच्या काळांतहि सकाळच्या नास्त्याच्या वेळीं फळें, लोणी आणि पावरोटी खाऊं शकते; व इंग्लंडांत किंवा अमेरिकेंत उपासमारीने एकहि मनुष्य दगावल्याची बातमी अद्याप तरी हिंदुस्थानांत आलेली नाही. आता वृत्तनियंत्रकाने या दोन भाग्यशाली देशांतील भूकबळींच्या बातम्यांवर आपली कातर चालवलेली असेल, तर गोष्ट निराळी ! पण, शत्रूचीं विमानें डोक्यावर घारीप्रमाणे घिरट्या घालीत असतां आणि अग्न्यस्त्रांतून अंगाराचा वर्षाव सारखा होत असतां, इंग्लंडांत आबादीआबाद नांदत असावी आणि त्या मानाने शांततेचें स्मशानसौख्य भोगीत असलेल्या हिंदुस्थानांत मात्र मृत्यूचें रौद्र तांडव सतत चालू रहावें, हा केवढा चमत्कार ? विशेषत:, बर्फ, कोळसा आणि लोखंड या फक्त तीन चिजा पिकविणाऱ्या इंग्लंडांत उपास-

मारीचें नांवहि ऐकूं येऊं नये व सुजला, सुफला आणि शस्यश्यामला अशा या भरतभूमींत मात्र माणसें कुत्र्याप्रमाणे रोज पटापट भुकेने तडफडून मरावींत, या चमत्कारांतील विरोध किती भेसूर आहे ? पण हा उपरोधपूर्ण चमत्कार हिंदुस्थानांत आज प्रत्यहीं पहावयाला मिळतो आहे खरा. अन्नधान्याच्या अनियंत्रित निर्यातीमुळे, नियंत्रणाच्या सदोष अंमलबजावणीमुळे आणि मुलकी जनतेच्या गरजांकडे दुर्लक्ष करण्याच्या प्रवृत्तीमुळे जें हें उपासमारीचें भीषण सत्र आज हिंदुस्थानांत सुरू आहे, त्यापेक्षा प्रत्यक्ष रणांगणांवरील संहार पुरवला, असें म्हटल्यास तें चूक होईल काय ? त्या संहारांत शौर्याची दीप्ति आणि कीर्ति तरी आहे. पण उपासमारीच्या वेदनांनी तडफडत क्षणाक्षणाला झिजत पिचत मरण्यांत असलें कोणतें साहस किंवा समाधान आहे ? म्हणूनच म्हणावयाचें की, चालू युद्धाच्या आघाड्यांपेक्षा पिछाड्यांवर चाललेली ही मृत्यूची कराल क्रीडा अधिक अमानुष, अधिक अघोर आहे.

तथापि, युद्धाच्या आघाडीवर तोफांच्या गडगडाटांत होणारें किंवा पिछाडीवर उपासमारीच्या करुण किंकाळ्यांत होणारें हें मृत्यूचें तांडवहि मनुष्य आनंदाने पाहील,–त्या तांडवांत स्वतःचा भंगुर देहहि बेदरकारपणाने झुगारून देईल. पण केव्हा ? जेव्हा तें युद्ध हें धर्मयुद्ध आहे, धर्म्य आणि न्याय्य कारणांसाठी लढलें जात आहे, अशी त्याच्या मनाची खात्री असेल तेव्हा ! कौरवांसारख्या आपल्या चुलतभावांशी सामना देण्याचा प्रसंग स्वतःवर आलेला पाहून करुणेची भलतीच कोवळीक मनाला येऊन खचलेल्या अर्जुनाला भगवंतांनी खडसावून सांगितलें, "अरे, धर्मयुद्धांत भाग घेऊन मरण्यासारखें क्षत्रियाला दुसरें श्रेयस्कर काही नाही ! "—" धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते।" आणि, अशा प्रकारचें धर्मयुद्ध हें, हिंदु धर्मशास्त्रानुसार, स्वर्गाचें आपोआप उघडें झालेलें मूर्तिमंत द्वारच मानलेलें आहे. हिंदु धर्मशास्त्रांतील ही धर्मयुद्धाची कल्पना कोणाला कदाचित् जुनी पुराणी किंवा कदाचित् भावनाप्रधान वाटेल. पण, आधुनिक राज्यशास्त्रांतहि न्याय्य युद्धें आणि अन्याय्य युद्धें असे युद्धाचे

दोन प्रकार कल्पिलेले असून, लेनिनने पारतंत्र्य किंवा परचक्र यांच्यापासून स्वकीय जनतेचें रक्षण करण्यासाठी करावीं लागणारीं स्वातंत्र्याचीं युद्धें न्याय्य आणि परकी देश जिंकून परकीयांना गुलाम बनविण्यासाठी केली जाणारी मुलूखगिरीची साम्राज्यशाही युद्धें अन्याय्य अशी त्यांची मार्मिक व्याख्या केलेली आहे; (Lenin distinguished between two kinds of war predatory, and consequently unjust wars, and wars of liberation, just wars.) व युद्धाच्या या दोन प्रकारांतील न्याय्य युद्धालाच तो 'लोकयुद्ध' म्हणतो. लेनिनने केलेली ही न्याय्य युद्धाची म्हणजे लोकयुद्धाची व्याख्या आणि भगवंताने केलेली धर्मयुद्धाची व्याख्या यांत खरोखरी काय फरक आहे ? किंबहुना, बोल्शेव्हिकांच्या आणि भगवद्गीतेच्या या युद्धविषयक तत्त्वज्ञानांत जर खरोखरी अत्यंत महत्त्वाचें पण निर्दय साम्य कोणतें असेल, तर तें हें आहे की, त्या दोन्ही तत्त्वज्ञानांत धर्म्य म्हणजेच न्याय्य कारणांसाठी कोणत्याहि प्रकारचा आवश्यक संहार हा समर्थनीय मानलेला आहे. म्हणूनच भगवंताचा उपदेश ऐकल्यानंतर मोहमुक्त झालेला अर्जुन आपल्या आप्तेष्टांवर शस्त्र चालवावयाला निःशंक मनाने प्रवृत्त झाला !

लेनिनच्या या व्याख्येप्रमाणे पाहिलें, तर चालू युद्धांतहि एका बाजूला जर्मनी, जपान यांच्यासारखीं फासिस्ट मनोवृत्तीचीं आणि दुसऱ्या बाजूला इंग्लंड, अमेरिका यांच्यासारखी साम्राज्यशाही धोरणाचीं राष्ट्रें लढत असल्यामुळे, हें युद्ध वस्तुतः लोकयुद्ध ठरण्यासारखें नाही. पण, या युद्धांत पडतांनाच अमेरिकेने जी चतुर्विध स्वातंत्र्याची घोषणा केली, त्या घोषणेमुळे या युद्धाच्या तोंडावर एक प्रकारच्या उदात्ततेचा तजेला आल्याचा भास जगाला क्षणमात्र झाला. क्षणमात्र म्हणण्याचें कारण असें की, या चतुर्विध स्वातंत्र्याच्या पायावर आधारलेली जी अटलांटिक सनद मागाहून रूजवेल्ट आणि चर्चिल यांनी संगनमतानें जाहीर केली, ती सनद हिंदुस्थानासारख्या देशाला लागू पडत नाही, असें चर्चिल-बहादुरांनी, तिच्या उद्घोषाचे निनाद जगाच्या कानांत दुमदुमत

असतांनाच मुळी, ब्रिटिश पार्लमेंटांत बिनदिक्कत बोलून दाखविलें. अशा स्थितींत, दोस्त राष्ट्रांपैकी एकटया अमेरिकेने कितीहि औदार्याचा बहाणा केला, तरी तेवढयामुळे हें युद्ध 'लोकयुद्ध' आहे, असें मानावयाला जगाने कां म्हणून तयार व्हावें ? पण, अमेरिकेच्या मागून युद्धांत पडलेल्या रशियाने, स्वतःच्या जिवावर उलटलेल्याहि जर्मनींतील जनतेला स्वातंत्र्याचें अभयवचन देऊन आणि युरोप वा आशिया खंडांत मुलूखगिरी करण्याची आपली आकांक्षा नसल्याचें प्रसिद्ध करून, इतर युध्यमान साम्राज्यशाही राष्ट्रांप्रमाणें आपली भूमिका सूडाची किंवा लूटमारीची नाही, हें जगाच्या प्रत्ययाला आणून दिलें; व गेल्या आठवडयांत वाशिंग्टन येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय संरक्षण परिषदेंत जगांतील प्रत्येक राष्ट्राला पूर्ण स्वातंत्र्याचे अधिकार मिळाले पाहिजेत, अशीहि घोषणा केली. (We have not, and cannot have, any such war aims as the seizure of foreign territories and the subjugation of foreign people—whether it be peoples and territories of Europe or Asia.) प्रस्तुत युद्धाला जर धर्मयुद्धाचें किंवा लोकयुद्धाचें स्वरूप कोणाच्या तत्वनिष्ठेमुळे आलेलें असेल किंवा येण्याचा संभव असेल, तर तें अंशतः अमेरिकेच्या आणि मुख्यतः रशियाच्या या ध्येयनिष्ठेमुळेच होय. पण, ही त्यांची ध्येयनिष्ठा जर उद्या तहपरिषदेंत यशस्वी झाली नाही आणि हिंदुस्थान, इजिप्त वगैरे पूर्वेकडील राष्ट्रें जर या युद्धानंतरहि परतंत्रच राहिलीं, तर आज चालू असलेला हा मनुष्यसंहार वाया गेला, असेंच म्हणण्याचा प्रसंग येणार नाही काय ?

२-९-१९४४

# आज ईश्वराजवळ काय मागावें ?

आज युद्धाचा पांचवा वाढदिवस असून, दोस्त राष्ट्रांना जय मिळावा म्हणून परमेश्वराला अनन्य भावाने प्रार्थना करण्यांत आजचा दिवस खर्च करावा, अशी विनंती ना. व्हाइसरायांनी सर्व जनतेला केलेली आहे. ही बादशाही विनंती ज्या वेळीं हिंदी लोकांना नभोवाणी-वरून जाहीर करण्यांत आली, त्याच वेळीं लंडनवर येऊन कोसळ-णाऱ्या उडत्या बाँबच्या जोडीला डोव्हर खाडीला भिडलेल्या इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावरील गावांवर जर्मनीने फ्रान्सच्या उत्तर किनाऱ्यावरून तोफांचा भडिमार सुरू केल्याचीहि बातमी आलेली आहे. फ्रान्स आणि इंग्लंड यांच्या दरम्यान जी डोव्हरची लहानशी चिंचोळी खाडी आहे, त्या खाडीने गेल्या पांचशें वर्षांत अनेकदा इंग्लंडचा दिग्विजयी जेत्यांच्या आक्रमणापासून बचाव केलेला आहे. त्या दृष्टीने ती खाडी म्हणजे इंग्लंडच्या दक्षिण सरहद्दी-वरील एक खंदकच म्हणतां येईल ! उण्या पुऱ्या सत्तावीस मैलांचा हा नैसर्गिक खंदक ओलांडून इंग्लंडवर आरमारी झडप घालण्याची नेपोलियनची आकांक्षा मनांतल्या मनांत जिरून गेली; व या खंदकाच्या पलिकडल्या फ्रेंच किनाऱ्यावरील कॅले या बंदरावरून इंग्लंडवर लांब पल्ल्याच्या तोफा डागण्याची कैसरची मनीषाहि सफल झाली नाही. पण, नेपोलियन आणि कैसर या जगज्जिगीषु पुरुषांना जें साधलें नाही, तें करण्याचा हिटलरचा मनसुबा डोव्हरवरील या तोफांच्या मारगिरीसंबंधीच्या ताज्या बातमीवरून उघड दिसतो. विशेषतः, युद्धाच्या पांचव्या वाढदिवसाच्या मुहूर्तावरच त्याने कॅलेहून इंग्लंडवर तोफा डागाव्यात हा योगायोग चिंताजनक नाही, असें कोण म्हणेल ? म्हणून, आज केवळ दोस्त राष्ट्रांच्या विजया-साठीच नव्हे, तर त्याच्याहि आधी इंग्लंडवर कोसळलेल्या या नव्या संकटांतून पार पाडण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त व्हावें, यासाठी आपण ईश्वराची करुणा भाकूं या.

वस्तुतः, से. मॉंटगॉमेरी यांनी आपल्या एका मित्राला पाठविलेल्या पत्रांत नोव्हेंबरपूर्वी म्हणजे दिवाळीच्या आधीच युरोपांत तह होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. बादशहा सहावे जॉर्ज यांनी ता. १ सप्टेंबर रोजीं ज्यांना फील्डमार्शल हा अत्युच्च बहुमानाचा किताब देऊन गौरविलें, त्या मॉंटगॉमेरींसारख्या धुरंधर सेनानीच्या या अपेक्षे-विषयी अविश्वास दाखविण्याचें धाडस कोण करील ? पण, जर्म-नीच्या सामर्थ्याचा अंदाज या ब्रिटिश किंवा अमेरिकन सेनापतींपेक्षा त्याच्याशीं प्राणपणाने झुंज देत असलेल्या रशियालाच एकंदरींत अचूक लागलेला दिसतो; व हिटलरच्या आसनाखाली फितुरीचा सुरुंग लावण्याची जरी रशियाने आज पराकाष्ठा चालविलेली असली, तरी जर्मनी इतक्या लवकर कोलमडून पडेल, अशी खात्री त्याला अद्यापहि वाटत नाही, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. उलट, उडत्या बॉंबच्या मागोमाग जें दुसरें संहारास्त्र इंग्लंडवर सोडण्याच्या विचारांत जर्मनी आहे, त्याची पोलंडमधील नुकत्याच काबीज केलेल्या एका गावांतील प्रयोगशाळेंतून माहिती काढून रशियाने इंग्लंडला त्याच्या घातक स्वरूपाची आपल्या परीने कल्पना दिलेली आहे. पण, हें अस्त्र सुटण्यापूर्वीच जर्मनीने डोव्हरवर तोफा डागून या पराभवाच्या क्षणीं सुद्धा आपण किती निकराने आणि नैपुण्याने लढूं शकतों, याची चुणूक इंग्लंडला दाखवली आहे. प्राणांतिक जखम होऊन चवताळलेला वाघ जेव्हा शिकाऱ्यावर उलटतो, तेव्हा शिकाऱ्याची जी अवस्था होते, तीच इंग्लंडची स्थिति जर या नव्या संकटामुळे झाली असली, तर त्यांत नवल काय ? आपल्या समाधिस्थ पित्याचा पांडवांनी कपटाने वध केलेला पाहून चिडलेल्या अश्व-त्थाम्याने जसें त्यांचें सैन्य जाळून टाकण्यासाठी ब्रह्मास्त्र सोडलें— आणि तेंहि अशा सूडबुद्धीने की, पांडवांच्या स्त्रियांच्या पोटांतले गर्भहि जळून जावेत !—तसा दोस्तांनी चोहों बाजूंनी कोंडल्यामुळे खवळलेला हिटलर आज इंग्लंडची जाळपोळ करावयाला प्रवृत्त झाला आहे. म्हणून, युद्धाच्या या पांचव्या वाढदिवशीं, त्याच्या विद्वेषी विषारी आघातांपासून इंग्लंडचें रक्षण व्हावें, यासाठी आपण ईश्वराची करुणा भाकूं या.

पण, हिटलरसारख्या सूडबुद्धीने पछाडलेल्या आततायी शत्रूच्या आघातांपासून इंग्लंडचें संरक्षण करावें, एवढी प्रार्थना करूनच आज भागणार नाही. या बाहेरच्या दुष्ट शत्रूपेक्षाहि अधिक अपायकारक असें जें दुर्बुद्धीचें ग्रहण इंग्लंडला सध्या लागलेलें आहे, त्यांतून त्याची सुटका करण्यासाठीहि परमेश्वराची अनन्य भावाने प्रार्थना करण्याची तितकीच गरज आहे. हिटलर एकीकडे डोव्हरवर तोफा डागण्याच्या खटपटीत असतां से. माँटगॉमेरी यांना ज्याप्रमाणे युद्ध संपल्याचा क्षण जवळ आल्याचा भास होत आहे, त्याप्रमाणे जपान दुसरीकडे आपल्या युद्धसाहित्याच्या कारखान्यांत स्त्रियांना राबवून पुढील वर्षाच्या झुंजाची तयारी करीत असतां ऑस्ट्रेलियाचे मुख्य प्रधान श्री. जॉन कर्टिन यांना तो कोलमडण्याच्या बेतांत असल्याचा भ्रम झाला आहे ! ही जी अद्याप नजरेच्या टप्प्यांत पुरत्या न आलेल्या विजयाची धुंदी ब्रिटिश मुत्सद्यांच्या डोळ्यांवर चढलेली जाहे, त्या धुंदीमुळे त्यांना वारंवार गाजावाजा करून पुकारलेल्या युद्धहेतूंचें स्मरण राहिलेलें नाही किंवा लाल क्रांतीची जी लाट जगावर पसरत आहे तिच्या परिणामांचीहि अद्याप जाणीव झालेली नाही. म्हणूनच, ब्रिटिश उदार पक्षाने अशी अनुदार सूचना केलेली आहे की, ब्रिटिश सरकारने आपल्या साम्राज्यसत्तेची पोलादी पकड थोडीसुद्धा ढिली करतां कामा नये. या युद्धांतील रशिया आणि अमेरिका यांच्या दिग्विजयामुळे त्यांचा दरारा आज जगांत इतका वाढला आहे की, ब्रिटनला तिसऱ्या दर्जाचें राष्ट्र म्हणूनच यापुढे त्यांच्या ओंजळीने पाणी प्यावें लागेल, अशी दहशत ब्रिटिश मुत्सद्यांनी घेतलेली असून, कांही झालें तरी आपली साम्राज्यसत्ता सैल सोडूं नका, असा टाहो ते सध्या फोडीत आहेत. हा टाहो फोडण्यांत आपण युद्धहेतूंची अवज्ञा आणि युद्धजन्य क्रांतीचें अज्ञान प्रदर्शित करीत आहोंत, याचें या दुर्मंत्र्यांना कांही भान नाही. म्हणून, युद्धाच्या या पांचव्या वाढदिवशीं, इंग्लंडच्या संकटनिवारणाबरोबरच, असल्या घरबुडव्या बदमुत्सद्यांच्या दुर्मंत्रापासूनहि त्याचें रक्षण व्हावें, यासाठी आपण ईश्वराची करुणा भाकूं या.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम........
नों दि.........


या मदांध साम्राज्यवादी मुत्सद्यांच्या दुर्मंत्राचा इतका कांही पगडा इंग्लंडच्या बुद्धीवर आज बसलेला आहे की, हिटलरचा पराभव झाल्यावर आपलें खिळखिळें झालेलें साम्राज्य अधिक बळकट कसें करावें, हिंदुस्थान, ब्रह्मदेश वगैरेंवरील सत्ता अधिक दृढ कशी करावी आणि रशियाच्या वाढत्या वर्चस्वाला शह देण्यासाठी तहपरिषदेंत कोणते डाव टाकावेत, याची उघड चर्चा आज ब्रिटिश वृत्तपत्रांतून चाललेली असून, इटली आणि फ्रान्स यांना बगलेंत मारून तहपरिषदेंत रशियावर मात करण्याच्या कारस्थानांत सध्या चर्चिलबहादुर गुंतलेले दिसतात. या कारस्थानाचाच एक भाग असा आहे की, तह झाल्यावर जी शांततापरिषद भरवावयाची, ती वॉशिंग्टन येथे भरविण्यांत यावी. वस्तुतः, युरोपांतील युद्ध जर सुदैवाने यदा कदाचित् दिवाळीपूर्वी संपलेंच, तर तें रशियाने जर्मनीचें तीस लाख सैन्य पूर्व आघाडीवर गारद केल्यामुळेच संपलें, असेंच केव्हाहि कबूल करावें लागेल. तेव्हा, जर्मनीला नामोहरम करण्याची प्राणांतिक जबाबदारी ज्याने एवढ्या भीमपराक्रमाने पार पाडली, त्या रशियाला शांतता परिषद मॉस्कोला भरावी, असें जर वाटलें, तर तें स्वाभाविक नाही कांय ? पण, रशियाकडून ही मागणी येण्याचा संभव लक्षांत घेऊन तह परिषद वॉशिंग्टन येथे भरविण्यांत यावी, असा मतलबी प्रचार आज ब्रिटिश वृत्तपत्रें करित आहेत. त्यांतील हेतु असा की, वॉशिंग्टन येथे अमेरिकेच्या नेतृत्वाखाली शांतता परिषद भरल्यास लाल क्रांतीची लाट थोपवून धरता येईल आणि आपली साम्राज्यशाही अभंग राहील ! हा इंग्लंडचा डाव जर साधला, तर भावी युद्धे टळणार कशी ? कारण, नवीं साम्राज्यें मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षे-इतकीच आपलीं जुनीं साम्राज्यें राखण्याची आणि वाढविण्याची इच्छाहि युद्धांना प्रेरक होत नसते काय ? म्हणून, युद्धाच्या या पांचव्या वाढदिवशीं, युरोपच्या पूर्व आघाडीवर जी क्रांतिदेवता प्रकट झालेली दिसत आहे, तिने आपलें विश्वक्रांतीचें मूळ सामर्थ्य प्रकट करून आशियांतील परतंत्र देशांना दास्यमुक्त करावें, यासाठी आपण ईश्वराची करुणा भाकू या.

३–९–४४

# देवस्थानांवरील दरोडे

गेल्या आठवड्यांत जेजुरीच्या खंडोबाच्या देवस्थानावर ता २७ जुलै रोजीं पडलेल्या दरोड्याबाबत जी धरपकड नागपूर आणि कोल्हापूर येथे झाली, तिच्यासंबंधी वृत्तपत्रांत आलेल्या बातम्या वाचून विचारी लोकांच्या मनांत परस्परविरोधी भावनांचे काहूर उठल्याशिवाय रहाणार नाही. गेल्या पांच सहा वर्षांत प्रतापगड, पर्वती, आडिवरें आणि जेजुरी या महाराष्ट्रांतील चार पुरातन देवस्थानांवर एकामागून एक दरोडे पडले. यांपैकी पहिल्या दरोड्याची बातमी ज्या वेळी लोकांच्या कानांवर एक दिवस अचानक आदळली, तेव्हा हें नृशंस कृत्य कोणा विधर्मीयाने केलेलें असावे, असा आपला समज लोकांनी साहजिकच करून घेतला. कारण, हिंदु मनुष्य,—मग तो कोणत्याहि पंथाचा वा मताचा असो,—हिंदूंच्या देवस्थानावर दरोडा घालील आणि देवमूर्तींची विटंबना करील, अशी कल्पना लोकांच्या मनांत यावी तरी कशी ? त्यांतच, या चार देवस्थानांपैकी प्रतापगड येथील दरोड्याबाबत पठाणांना अटक झाल्यामुळे, हा संशय दृढ झाला. पण, त्यानंतर दोन वर्षांपूर्वी आडिवरें येथील महालक्ष्मीच्या आणि दोन महिन्यांपूर्वी जेजुरी येथील खंडोबाच्या देवस्थानावर पडलेल्या दरोड्यासंबंधांत जी धरपकड झाली, तिच्यावरून या प्रकारांत केवळ विधर्मीयांचाच हात असावा, असें आज तरी निश्चित म्हणवत नाही; व हिंदु समाजाच्या दुर्दैवाने जर ही गोष्ट पुढे मागे सिद्ध झाली, तर सोरटीसोमनाथाच्या मंदिराचा विध्वंस करणाऱ्या गझनीच्या मूर्तिभंजक महम्मुदाचे विसाव्या शतकांतील वारस खुद्द हिंदु समाजांतच पैदा झालेले पाहून लोकांच्या मनाला पराकाष्ठेच्या वेदना होतील.

महाराष्ट्रांतील ज्या या चार देवस्थानांची दरोडेखोरांनी लूट आणि विटंबना केली, त्या या देवस्थानांकडे केवळ धार्मिक दृष्टीने पाहून चालणार नाही; या देवस्थानांच्या धार्मिक महत्वापेक्षाहि

त्यांचें ऐतिहासिक वैशिष्टय अधिक महनीय, अधिक विलोभनीय आणि अधिक आदरणीय आहे. हीं चार देवस्थानें म्हणजे सह्याद्रीच्या पठारावरील महाराष्ट्राच्या श्रद्धेचीं, स्फूर्तीचीं, सौंदर्याचीं आणि कर्तृत्वाचीं अधिष्ठानें असून, ब्राह्मणापासून महारापर्यंत या महाराष्ट्र-भूमींतील सर्व जातींच्या जिव्हाळ्याच्या भावनांचे धागे त्यांच्याभोवती गुंतलेले आहेत. प्रतापगडची भवानी म्हणजे श्रीशिवाजीमहाराजांची कुलदेवता, श्रीसमर्थांची रामवरदायिनी ! अफझुलखानाच्या वधापूर्वी

**दुष्ट संव्हारिले मागे । ऐसें उदंड ऐकतों ।**
**परंतु रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवीं ।।**
**तुझा तूं वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखतां**

अशी जिची करुणा श्रीसमर्थांनी अनन्य भावाने भाकली आणि अफझुल-खानाच्या वधानंतर–

**प्रतापगिरिचे ठाईं । आदिशक्ति विराजते ।**
**कामना पुरती तेथे । प्रचीती रोकड्या जनीं ।।**
**रामवरदायिनी माता । गर्द घेऊन ऊठली ।**
**मर्दिले पुर्विचे पापी । आनंदवनभुवनी ।।**
**प्रत्यक्ष चालली राया । मूळमाया समागमें ।**
**नष्ट चांडाळ ते खाया । आनंदवनभुवनीं ।।**

असे हर्षोद्गार जिच्याविषयी त्यांनी साक्षात्काराच्या जाणिवेने काढले, त्या प्रतापगडच्या भवानीचा ऐतिहासिक महिमा महाराष्ट्रांत कोणाला माहीत नाही ? महाराष्ट्राच्या इतिहासांत जें महत्त्व प्रताप-गडच्या भवानीला आहे, तेंच महत्त्व पुण्याच्या पर्वतीलाहि असून, छत्रपति आणि पेशवे या दोघांचेंहि तें आवडतें उपास्यदैवत होतें. जेजुरीचा खंडोबा हें तर महाराष्ट्रांतील सर्व क्षत्रिय जातींचें कुलदैवत असून, छत्रपति, पेशवे, होळकर, शिंदे, आंग्रे प्रभृति साऱ्या मराठी राजघराण्यांच्या भक्तिभावाचें तें केंद्र आहे. स्वराज्यस्थापने-

नंतर स. १६६२ मध्ये श्रीशिवाजीमहाराजांनी आपले वडील शहाजीराजे यांची जी भेट बारा वर्षांचा काळ लोटल्यावर प्रथम घेतली, ती या जेजुरीच्या देवळांत खंडेरायाला साक्ष ठेवून; व औरंगजेबाच्या नजरकैदेंतून सुटल्यावर स. १७०७ सालीं महाराष्ट्रांत परत येतांना स्वराज्याचा कारभार हातीं घेण्यापूर्वी, थोरल्या शाहूमहाराजांनी याच खंडेरायाजवळ यशाची भाक मागितली होती. महाराष्ट्राच्या वरघाटी जेजुरीच्या खंडोबाचें किंवा प्रतापगडच्या भवानीचें जें महत्त्व, तेंच सह्याद्रीच्या पायथ्याशीं तळकोकणांत आडिवऱ्याच्या महालक्ष्मीचें महत्त्व. ज्यांच्या मुत्सद्देगिरीने महाराष्ट्राचे राजकारण गेलीं दोन शतकें रंगलें, ते कोकणांतील बुद्धिसागर ब्राह्मण आणि ज्यांच्या दर्यावरील मर्दुमकीला इंग्रजांनीहि अजीजीने माथा झुकवून मुजरा केला ते कोकणांतील जलझुंजार मराठे यांची आडिवऱ्याची महालक्ष्मी ही कुलस्वामिनी. अशा प्रकारचा या चारहि देवस्थानांचा गेल्या चार पांच शतकांचा इतिहास आणि ऐश्वर्य आहे.

तेव्हा, महाराष्ट्राच्या इतिहासांत अनेक कारणांमुळे अविस्मरणीय होऊन बसलेल्या या निसर्गसुंदर देवस्थानांवर बेछूटपणाने दरोडे घालून ज्या इसमांनी त्यांची विटंबना (desecration) केली,—मग त्यांचे हेतु कोणतेहि असोत,—त्यांच्या त्या नृशंस कृत्यांबद्दल विचारी लोकांना चीड आणि संताप येणें स्वाभाविक नाही काय? किंबहुना, अशा प्रकारचे दरोडे घालून या अत्याचारी इसमांनी महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाच्या भावनाच केवळ दुखवल्या आहेत असें नव्हे; तर सर्वमान्य आंतरराष्ट्रीय नीतिनियमांचीहि पायमल्ली केली आहे, असें म्हणावयाला शंका वाटत नाही. कारण, युध्यमान राष्ट्रांनी लढाईच्या ऐन धुमश्चक्रींत सुद्धा एकमेकांच्या प्रदेशांतील स्त्रिया, मुलें, अपंग वगैरेंवर हात टाकूं नये असा ज्याप्रमाणे पुरातन काळापासून चालत आलेला रणनीतीचा दंडक आहे, त्याचप्रमाणे एकमेकांच्या उपास्यस्थानांवरहि (places of worship) शस्त्र चालवूं नये, अशीहि राष्ट्रसंघाने मान्य केलेली आधुनिक आंतरराष्ट्रीय युद्धनीति

आहे. नाही तर, चालू महायुद्धांत ख्रिस्ती धर्मगुरु पोप याच्या व्हॅटिकनमधील मठमंदिरांवर विमानांतून अग्निवर्षाव करावयाला इंग्लंडसारख्या पाखंडी प्रॉटेस्टंट राष्ट्राचा किंवा रशियासारख्या धर्मलंड कम्युनिस्ट राष्ट्राचा हात कोणी धरला होता ? रोममधील पोपचें हें उपनगर म्हणजे शतकानुशतकें भाविकांनी अर्पण केलेल्या अपार संपत्तीचें केवळ आगरच आहे. पण, रोममधून काढता पाय घेतांना जर्मनीने किंवा रोममध्ये जबरदस्तीने घुसतांना दोस्त राष्ट्रांनी व्हॅटिकनवर जी आपल्या अग्न्यस्त्रांची एकहि ठिणगी पडूं दिली नाही, ती काय म्हणून ? व्हॅटिकनचें ऐतिहासिक वैशिष्टय व म्हणून अविवाद्य असलेलें रक्षणीयत्व लक्षांत घेऊनच नव्हे काय ? हा सर्वमान्य आंतरराष्ट्रीय नियम हिंदु देवस्थानांना लागू पडतो की नाही ? जर लागू पडत असेल, तर त्यांच्यावर दरोडे घालून त्यांचा विध्वंस करणें, हा आंतरराष्ट्रीय नीतीच्या दृष्टीने गुन्हा ठरत नाही काय ? का हिंदु समाज जसा आज सर्व जगाच्या तुच्छतेचा आणि आक्रमणाचा विषय होऊन बसलेला आहे, तसाच प्रकार हिंदु देवस्थानांचाहि झालेला आहे, असें समजावयाचें ?

अशा स्थितींत, स्वतःच्या देशबांधवांच्या भावनांची पर्वा न करतां, स्वदेशाच्या उज्ज्वल इतिहासाची जाणीव न बाळगतां आणि सर्वमान्य आंतरराष्ट्रीय नीतिनियमांचीहि चाड न ठेवतां, ज्यांनी महाराष्ट्रांतील या चार पुरातन देवस्थानांवर दरोडे घातले, त्यांच्या त्या कृत्याचा धिक्कार करणें, हें कर्तव्य ठरत नाही काय ? स्वतःला आधुनिक म्हणविणारे कांही लोक क्वचित् असा युक्तिवाद करतांना आढळतात की, तीर्थक्षेत्रें किंवा देवस्थानें हीं ऐदी संपत्ति आणि दुराचार यांचीं आगरें असल्यामुळे, पाहुण्याच्या हातून साप मारला जावा त्याप्रमाणे, त्यांचा अशा अत्याचारी दरोडेखोरांनी परस्पर निकाल लावला, तर त्याबद्दल तक्रार का करावी ? पण महाराष्ट्रांतील देवस्थानांना यांपैकी कोणतेंच विधान लागू पडत नाही. महाराष्ट्रांतील भक्तिपंथ हा, कै. सर रामकृष्ण भांडारकर यांनी आपल्या शैव–

वैष्णव पंथांवरील जगद्विख्यात ग्रंथांत म्हटल्याप्रमाणे, अत्यंत विशुद्ध आणि उन्नत आहे; व जेजुरीच्या देवस्थानांतील खंडोबाला मुलें वहाण्याचा अप्रशस्त आणि म्हणून अलिकडे झपाट्याने लोपत चाललेला प्रघात जर सोडला, तर इतर कोणत्याहि देवस्थानांत अनैतिक किंवा अमंगळ प्रकार घडत नाहीत. संपत्तीच्या दृष्टीने विचार केला, तर पोपचें व्हॅटिकन संस्थान, इंग्लंडांतील सेंट पॉलचें मंदिर किंवा फ्रान्समधील कुमारी मेरीचें नत्रदाम यांच्या तुलनेने पाहिल्यास गरीब महाराष्ट्रांतील हीं देवस्थानें खरोखरी दरिद्रीच ठरतील. पण, लोकांच्या धार्मिक, राष्ट्रीय आणि ऐतिहासिक भावनांच्या दृष्टीने जी वास्तु किंवा वस्तु रक्षणार्ह ठरते, तिची धुळधाण कोणी कोणत्याहि हेतूने केली, तरी ती क्षम्य कशी म्हणावी ? मूर्तिभंजनांत कृतकृत्यता मानणाऱ्या ज्या निजाम सरकारच्या पूर्वजांनी धर्मवेडाच्या भरांत पूर्वी हिंदूंच्या देवस्थानांची विटंबना केली, तेंच निजाम सरकार आज अजिंठा आणि वेरूळ येथील लेण्यांच्या संरक्षणावर लाखों रुपये दर वर्षी खर्च करीत आहे, तें कोणत्या भावनेने ? किंवा अनेक ब्रिटिश विभूतींच्या अंत्य विश्रांतीचें स्थान होऊन बसलेलें वेस्टमिन्स्टर ॲबे सारखें प्राचीन प्रार्थनामंदिर जर्मनी बाँब टाकून जाळून टाकील, या नुसत्या कल्पनेने देखील गांधीजींना युद्ध सुरू झाल्याबरोबर जें रडें कोसळलें, तें तरी दुसऱ्या कोणत्या भावनेचें निदर्शक होतें ? मॉस्को-मधील लेनिनचें समाधिमंदिर जर उद्या नाझींनी जमीनदोस्त केलें किंवा पॅरिसमधील नेपोलियनचें समाधिमंदिर जर उद्या कम्युनिस्टांनी बेचिराग केलें, तर त्या त्या देशांतील जनतेला काय वाटेल ? मग हें तारतम्य हिंदु देवस्थानांच्या बाबतींत कां दाखवलें जाऊं नये ?

दुर्दैवाने आज हिंदु देवस्थानांची स्थिति अशी आहे की, त्यांना न कोणी त्राता, न कोणी उद्धर्ता. शिवाय, महाराष्ट्रांतील बहुतेक पुरातन देवस्थानें हीं सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरांवर किंवा गर्द रानांत डोंगर-कपाटीं असल्यामुळे तीं जवळ जवळ अरक्षित आहेत, असेंच म्हटलें पाहिजे. वस्तुतः, हीं देवस्थानें प्राचीन वास्तुसंरक्षणाच्या कायद्याखाली

येण्यासारखीं असल्यामुळे, त्यांच्या जीर्णोद्धाराची, डागडुजीची किंवा संरक्षणाची जरूर ती व्यवस्था करणें, हें सरकारचें कर्तव्य नाही काय ? पण, जें सरकार ख्रिस्ती धर्म खात्यावर लक्षावधि रुपये दरसाल खर्च करतें, तें प्रजेच्या या धर्मस्थानांच्या रक्षणार्थ मात्र एक पैहि खर्च करीत नाही, हें त्यांच्या धार्मिक तटस्थतेच्या मतलबी ब्रीदाला शोभण्यासारखेंच आहे, असें कोण म्हणणार नाही ? त्यामुळे, हीं एकांत स्थळीं असलेलीं अरक्षित आणि उपेक्षित देवस्थानें उपद्व्यापी दरोडेखोरांच्या द्रव्यलालसेला बळी पडावींत, यांत नवल काय ? असल्या दरोड्यांच्या बाबतींत सरकारचें धोरण दुधारी आहे : एक तर, हे दरोडे राजकीय ठरवून त्यांत आपल्याला अप्रिय किंवा अनिष्ट वाटणाऱ्या राजकारणी व्यक्तींचा गळा गोवावयाचा; व दुसरें, तें नच साधल्यास, असल्या दरोड्यांच्या चौकशीच्या बाबतींत इतकी पद्धतशीर हयगय करावयाची की, ते आपोआप विसरून, जिरून, पचून जावेत. एरवी, पर्वती आणि प्रतापगड या दोन्ही देवस्थानांच्या दरोड्यांचा पुरेसा तपास सर्वसमर्थ सर्वसाक्षी सरकारला लावतां येऊं नये, याचा दुसरा अर्थ काय करणार ? हिंदु देवस्थानांची लूट आणि विटंबना जर हिंदु समाजांतीलच कांही अविचारी इसमांनी केली, तर त्याबद्दल सरकारला चीड काय म्हणून वाटेल ? उलट, असल्या दरोड्यांचा संबंध येन केन प्रकारेण चालू राजकारणाशी जोडून राजकीय चळवळ आणि कार्यकर्ते जर लौकिक दृष्टीने परस्पर बदनाम झाले, तर सरकारला ती इष्टापत्तीच वाटणार नाही काय ? त्यामुळे, सरकारचें धोरण अशा प्रकारच्या दरोड्यांच्या बाबतींत जमल्यास त्यांचा राजकीय दृष्ट्या फायदा घेण्याचें आणि तें न साधल्यास त्यांची उपेक्षा करण्याचें असें दुधारी असल्याकारणाने, सरकारकडून या बाबतींत कांही संरक्षण मिळेल, अशी आशा करणें व्यर्थच नाही काय ?

पण या दरोड्यांच्या बाबतींत आता गप्प बसून मात्र भागणार नाही. हा प्रश्न केवळ धर्माचा किंवा केवळ भावनेचा नसून, सांस्कृतिक आणि सामाजिक हक्कांच्या रक्षणाचा आहे. हिंदु देवस्थानें हीं ऐदी

संपत्तीचीं किंवा दुराचाराचीं आगरें आहेत असें ज्यांना प्रामाणिकपणानें वाटत असेल, त्यांनी त्यांत सुधारणा करण्याचे शक्य ते सर्व कायदेशीर प्रयत्न अवश्य करावेत; व मुंबई, मद्रास आणि मध्यप्रांत येथील कायदेमंडळांतून आलेलीं देवस्थानांच्या व्यवस्थेसंबंधीचीं बिलें हीं अशा प्रयत्नांची निदर्शक म्हणून दाखवतां येतील. पण, देवस्थानांची कायदेशीर सुधारणा व्हावी असें म्हणणें वेगळें आणि देवस्थानांची लूट किंवा विटंबना करण्यासाठी कायदा स्वतःच्या हातांत घेणें वेगळें ! अशा रीतीने कायदा हातांत घेण्यांत आपण दुसऱ्यांच्या भावनांची आणि हक्कांची किती बेछूट पायमल्ली करतों आहोंत, हें या बेकायदा वर्तन करणाऱ्या इसमांनी लक्षांत घ्यावयाला नको काय ? त्यांना जर दुसऱ्यांच्या भावना अशा रीतीने दुखवतांना यत्किंचितहि दिक्कत वाटत नसेल, तर लोकांनी तरी त्यांच्या भावनांची किंवा हेतूंची पर्वा काय म्हणून करावी ? देवस्थानें म्हणून हीं स्थानें एकाद्याला प्रिय वा श्रद्धेय असतील अगर नसतील. पण, धर्म, इतिहास, संस्कृति आणि शिल्प यांची स्मारकें म्हणून म्हणा किंवा अवशेष म्हणून म्हणा हीं देवस्थानें आदरार्ह आणि रक्षणार्ह आहेत की नाही ? व हिंदुस्थानांत जरी कदाचित् उद्या अगदी शुद्ध साम्यवादी सरकार स्थापन झालें, तरी त्यालाहि या स्थानांचें रक्षण त्या दृष्टीने करावें लागेलच की नाही ? मग हा साधा विवेक या देवस्थानांच्या बाबतींत स्वतःला भारतीय म्हणविणाऱ्या व्यक्तींनी कां दाखवूं नये ? हिंदु समाजानेहि गेली पांच सहा वर्षें विशिष्ट पद्धतीने आपल्या देवस्थानांवर पडत असलेल्या या दरोड्यांच्या मागील मनोवृत्ति लक्षांत घेऊन त्यांच्या रक्षणार्थ योग्य उपाय योजावयाला नकोत काय ?

१५-९-१९४४

# उच्चार, अनुच्चार आणि दुरुच्चार

'तरुण भारता'च्या मुंबई येथील एका फ्रेंचभाषाभिज्ञ मित्राने संपादकाला पत्र लिहून अशी तक्रार केलेली आहे की, "अलिकडे फ्रेंच आणि इतरहि युरोपियन शब्दांचे जे उच्चार 'तरुण भारता'त येत असतात, ते पाहून मी थक्क झालों आहे. 'बोर्डेक्स पडले' हा आपला सप्तस्तंभी मथळा पाहून तर मला धक्का बसला. आपल्या संपादकमंडळांत रेडियो ऐकणारे कोणी आहेत की नाहीत? जर असतील, तर बिचाऱ्या फ्रेंच आणि रशियन शब्दांचे असे चुकीचे उच्चार 'तरुण भारतां'त का यावेत? रेडियोवरील बातम्यांचा उपयोग करावयाला कायद्याची हरकत आहे, हें खरें. पण, शब्दांच्या उच्चारांचा उपयोग करावयाला हरकत नसावी, असें मला वाटतें. तेव्हा, यापुढे तरी 'तरुण भारत' फ्रेंच, रशियन वगैरे भाषांतील शब्दांचे उच्चार बिनचूक प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करील काय? किंवा, त्या शब्दांचे दुरुच्चार करण्याचा जो धडाका सध्या आपण चालविलेला आहे, त्याच्या बुडाशी कांही धोरण आहे?"

'तरुण भारता'च्या मित्राने ही तक्रार करून एका लहानशाच पण महत्त्वाच्या प्रश्नाला तोंड पाडलें, याबद्दल त्याचे खरोखरी आभार मानले पाहिजेत. कारण, फ्रेंच किंवा रशियनच काय, पण ज्या इंग्रजी भाषेचे अधिराज्य गेलीं सवाशे वर्षें महाराष्ट्रांत चालू आहे व आईच्या दुधाबरोबरच ज्या या 'वाघिणीचें दूध' महाराष्ट्रांतील मुलाबाळांना प्रत्यहीं जबरदस्तीने पाजलें जात आहे, त्या इंग्रजी भाषेचेहि उच्चार आम्हांला धड नीट करतां येत नाहीत, ही खुद्द इंग्रजांचीच आमच्याविषयी तक्रार नाही काय? जिथे शंभर दीडशें वर्षे अष्टौप्रहर अंगवळणी पडलेल्या इंग्रजी शब्दांच्या उच्चारांची ही रड, तिथे इतर पाश्चात्य भाषांतील शब्दांच्या उच्चारांची काय कथा? पण इंग्रजांना किंवा फ्रेंच वगैरे अन्य कोणा पाश्चात्यांना ही तक्रार

हिंदी लोकांविरुद्ध करावयाला खरोखरी तोंड आहे काय? इंग्रज लोक आज उणी पुरी दीडशें वर्षें हिंदुस्थानांत राज्य करीत आहेत; व हिंदी लोकांशी त्यांचा, नोकर किंवा सहकारी म्हणून, रात्रंदिवस निकट संबंध येत असतो. पण ते किती हिंदी, मराठी किंवा बंगाली शब्दांचा उच्चार बिनचूक करूं शकतात? रोजच्या व्यवहारांतील शब्दांचे तर राहोच. पण, शहरांच्या किंवा नद्यांच्या नावांचे जे दुरुच्चार इंग्रजांनी हिंदुस्थानांत आल्यावर प्रथम अज्ञानाने करावयाला सुरुवात केली, ते आता शंभर वर्षें या भरतभूमींत राहिल्यावर दुरुस्त करण्याची गरज त्यांना कधी तरी वाटली आहे काय? 'जगन्नाथा'चा उच्चार 'जगरनॉट', 'गंगे'चा उच्चार 'गँजेस', 'सिंधू'चा उच्चार 'इंडस' 'मथुरे'चा उच्चार 'मट्रा', 'वसई'चा उच्चार 'बेसीन', 'कृष्णे'चा उच्चार 'कित्स्ना' 'खंबायत'चा उच्चार 'कँबे', 'कांचनगंगा'चा उच्चार 'किचनजंगा' किंवा 'नर्मदे'चा उच्चार 'नर्बदा' करणाऱ्या इंग्रजांना त्यांच्या भाषेतील शब्दांचे उच्चार आम्ही बिनचूक करावेत, अशी अपेक्षा करण्याचा काय हक्क आहे? खरोखरी, 'फराशिस' (फ्रेंच) 'वलंदेज' (डच) 'फिरंगी' (पोर्तुगीज) 'इंद्रसेन' (अँडरसन), 'इष्टुर फांकडा' (कॅप्टन स्टुअर्ट), 'अलिपष्टन' (एलिफन्स्टन) हे मराठशाहींत दीडशें वर्षांपूर्वी सर्रास रूढ असलेले पाश्चात्य शब्दांचे उच्चार आज आम्ही उपयोगात आणीत नाही, याबद्दल इंग्रजांनी आमचे आभार मानले पाहिजेत.

कारण, त्यांच्या इंग्रजी शब्दांचे उच्चार करतांना आमच्या तोंडून जर कांही चुका खरोखरीच होत असतील, तर तो दोष आमचा नसून, सर्वंथैव त्यांची लिपि आणि भाषा यांचा आहे. देवनागरी लिपींतील अक्षरांचे उच्चार जसे निश्चित आहेत, तसे रोमन किंवा अन्य युरोपियन लिपींतील अक्षरांचे उच्चार निश्चित नसल्यामुळे, पाश्चात्य भाषांतील शब्दोच्चारांच्या बाबतींत सर्रास गोंधळ दृष्टीस पडतो. देवनागरींतील 'अ', 'क' किंवा 'ळ' या अक्षरांचा उच्चार ठरलेला आहे. त्यांत कोणत्याहि उपाधीमुळे बदल होत नाही. उलट इंग्रजींतील

'आय' 'यू' किंवा 'सी' हीं तीन अक्षरें घेतलीं, तर त्यांच्या उच्चारांत किती वैचित्र्य दृष्टीस पडतें ? 'आय' या अक्षराचा 'इट' शब्दांतील उच्चार निराळा, 'आइस' मधील उच्चार निराळा आणि 'आयडिया' मधील उच्चार निराळा ! अशा स्थितींत, असल्या अनिश्चित उच्चारांच्या अक्षरांनी घटित असलेल्या शब्दांच्या उच्चारांत जर चूक झाली, तर तो दोष त्या भाषेचा की ती भाषा बोलण्याचा प्रयत्न करणाऱ्या तिऱ्हाइतांचा ? 'डायरेक्ट-डिरेक्ट', 'एज्युकेशन-एडुकेशन', 'चँडलर-शँडलर' 'क्लार्क-क्लर्क' वगैरे शब्दांच्या उच्चारांच्या बाबतींत जे मतभेद खुद्द इंग्रजांतच आढळतात, ते किती म्हणून सांगावेत ? देवनागरींत 'च'चा उच्चार कधी 'ख' किंवा 'श' व्हावयाचा नाही. उलट रोमन लिपींतील 'सी एच' या अक्षरांचा उच्चार केव्हा 'च', केव्हा 'श' तर केव्हा 'ख' असाहि होऊं शकतो. तेव्हा, ज्यांचा उच्चार निश्चित नाही आणि कोशांचेंहि ज्यांच्या उच्चाराच्या बाबतींत मतैक्य नाही, अशा अक्षरांनी बनलेल्या भाषेंतील शब्दोच्चारांच्या बाबतींत ती मातृभाषा नसलेल्या आम्हा हिंदी लोकांच्या तोंडून जर चुका झाल्या, तर ध्वनिशास्त्रदृष्ट्या असल्या सदोष, सैल, भोंगळ भाषेच्या संतानांनी आम्हाला नाकें मुरडावींत, ही निव्वळ एक प्रकारची मुजोरीच नव्हे काय ?

उच्चारांच्या या घोटाळ्याच्या जोडीला आणखी अनुच्चारित अक्षरांचा उपद्रव बसवला, म्हणजे पाश्चात्य भाषांच्या भोंगळपणाचें वर्णन पूर्ण होतें. संस्कृत किंवा मराठी भाषांतील एकहि अक्षर अनुच्चारित नसतें. मराठींत कांही अनुस्वारच काय ते अनुच्चारित होते. पण, पंधरा वर्षांपूर्वी श्री. तात्यासाहेब केळकर यांनी, या अनुच्चारित अनुस्वारांविरुद्ध जोराची मोहीम करून, मराठी भाषेंतील त्यांची गर्दी मोडून काढली. तथापि, इंग्रजी, फ्रेंच वगैरे पाश्चात्य भाषांत अनुस्वारच काय, पण अक्षरेंच्या अक्षरें अनुच्चारित असल्याचें आढळून येतें; व त्यामुळे अक्षरांच्या अनुरोधाने जर कोणी या शब्दांचा उच्चार करूं गेला, तर त्याच्यावर अडाणी ठरण्याचा प्रसंग येतो. ज्या 'बोर्डेक्स'

शहराच्या नांवावरून 'तरुण भारता'च्या फ्रेंचभाषाभिज्ञ मित्राला तक्रार करण्याची इच्छा झाली, त्या नांवांतील शेवटचीं aux ही अक्षरें अनुच्चारित असल्यामुळे, त्याचा उच्चार 'बोर्डो' असा होतो. फ्रेंच भाषेंत असे हजारों शब्द आहेत की, ज्यांतील अक्षरांचा अजिबात उच्चार होत नाही; व इंग्रजी भाषेंत जरी अनुच्चारित अक्षरांचे प्रमाण त्या मानाने कमी असलें, तरी उच्चारांच्या बाबतींत दिशाभूल करण्याचे त्या भाषेचें सामर्थ्यहि कांही कमी नाही. त्यामुळे, अमेरिकन लोकांनी इंग्रजी शब्दांचे उच्चारानुसारी लेखन करण्याची प्रथा अलिकडे पाडलेली असून, सगळ्या अनुच्चारित अक्षरांना त्यांनी अर्धचंद्र दिला आहे. इंग्रजी भाषेंत त्यांनी केलेली ही इष्ट सुधारणा इंग्लंडांतील पुराणप्रिय इंग्रजांनी अर्थातच मान्य केलेली नाही. पण, सृष्टीच्या विकासक्रमांत ज्याप्रमाणे प्राण्यांचे निरुपयोगी अवयव कालांतराने आपोआप गळत गेले, त्याप्रमाणे हीं निरुपयोगी अनुच्चारित अक्षरेंहि, स्वभाषाभिमानाच्या चुकीच्या कल्पनांनी कोणी कितीहि त्यांचें रक्षण करण्याचा प्रयत्न केला तरी, अखेर लुप्त झाल्याशिवाय रहाणार नाहीत. उच्चारांचा लोप ही अस्तित्वाच्या लोपाची पहिली पायरीच नाही काय ?

तेव्हा, उच्चारांच्या बाबतींत जी भाषा इतकी अनिश्चित, सदोष, सैल आणि भोंगळ आहे, तिच्यांतील एकाद्या शब्दाचा उच्चार जर एकाद्या वेळीं चुकला, तर त्याबद्दल एवढा गहजब करण्याचें काय कारण ? संस्कृत भाषेने हिंदुस्थानांतील लोकांच्या जिव्हेला शतकानुशतकें असें वळण लावलेलें आहे की, शब्दांतील प्रत्येक अक्षराचा स्पष्ट, स्वच्छ आणि पूर्ण उच्चार करावयाचा. पवित्र वेदवाणीचा अशुद्ध उच्चार केल्याबद्दल ब्राम्हणाला नरकांत जाण्याचा प्रसंग यावा, इतकें संस्कृतांतील उच्चारतंत्र नियमबद्ध, निष्ठुर आहे. संस्कृत भाषेची ही शिस्त आज हजारों वर्षे ज्यांच्या जिव्हेला लागलेली आहे, त्यांनी जर इंग्रजी आणि फ्रेंच शब्दांचे उच्चार त्यांची अक्षरवटिका लक्षांत घेऊन तदनुसार केले, तर त्यांत त्यांचा काय दोष ? पाश्चात्य

भाषांतून असलेलीं अक्षरें उच्चारावयाचीं नाहीत आणि नसलेलीं अध्याहृत समजून उच्चारावयाचीं, असा दुहेरी घोटाळा आढळतो. 'बोर्डेक्स–बोर्डो' 'व्हर्सेल्स–व्हर्साय' 'कॉलोनेल–कर्नल' 'लयतनंत–लेफ्टनंट', 'रूटर–रॉयटर' वगैरे हजारों शब्द हे या घोटाळ्याचीं नमुनेदार उदाहरणें म्हणून दाखविता येतील. या घोटाळ्याला अक्षरानुरोधाने उच्चार करण्याची शिस्त जिव्हेला लागलेले आम्ही भारतीय कसे पुरे पडणार? पण, गंमत अशी की, पाश्चात्य भाषांतील हे उच्चारांचें अराजक लक्षांत न घेतां आमच्यांतले शिष्टंमन्य इंग्रजी किंवा फ्रेंच शब्दांचे दुरुच्चार केल्याबद्दल उलट आम्हांला नांवें ठेवणार! हा तरी बौद्धिक गुलामगिरीचाच एक प्रकार नव्हे काय? पाश्चात्यांनी हिंदी भाषांतील शब्दांचे वाटतील तसे वेडेवाकडे उच्चार खुशाल करावेत. किंबहुना ते दुरुच्चार आम्ही शिरोधार्य मानून रूढहि होऊं द्यावेत. पण आम्ही मात्र त्यांची भोंगळ, उच्चारदुष्ट भाषा बोलतांना जरासुद्धा चूक करतां कामा नये, हा कुठला न्याय? हा तरी आमच्या पारतंत्र्यजन्य न्यूनगंडाचाच एक परिणाम नाही काय?

१६–९–१९४४

# 'युद्धगुन्हेगार' ही काय चीज आहे?

जर्मनीच्या हद्दींत सगळ्या बाजूंनी दहा मैल घुसून सिगफ्रीड तटबंदी फोडण्याचा दोस्त राष्ट्रांच्या फौजांचा जो निकराचा प्रयत्न सध्या चालू आहे, तो जर यशस्वी झाला, तर से. आयझनहॉवर यांनी वर्तविलेल्या भाकिताप्रमाणे, जर्मनी पुढल्या महिन्यांत बहुधा कोलमडल्याशिवाय राहाणार नाही, अशीं चिन्हें दिसत आहेत. किंबहुना, जर्मनी लवकरच कोलमडणार असा अंदाज आपल्या मनाशी बांधून, त्याला युद्धाला प्रवृत्त करणारे हिटलर प्रभृति नाझी पुढारी हे जर्मनींतून निसटून जाऊं नयेत, म्हणून एका बाजूने रशिया आणि दुसऱ्या बाजूने

इंग्लंड हे आज नाकेबंदी करण्याच्या उद्योगांत आहेत, असें म्हटल्यास तें चूक होणार नाही. रशियाने स्पेन आणि तुर्कस्थान यांना, जर्मनीशीं संधान ठेवल्याचा आरोप करून, नभोवाणीवरून दिलेल्या जाहीर धमक्या व स्वीडन, स्वित्झर्लंड, स्पेन वगैरे तटस्थ राष्ट्रांपैकी हिटलर कुणाचा आश्रय घेईल, यासंबंधी ब्रिटिश वृत्तपत्रांनी आरंभिलेला कंड्या उठविण्याचा कुटिल खेळ हीं दोन्ही हिटलरचा कोंडमारा करण्यासाठी रशिया आणि इंग्लंड यांनी आपआपल्या परीने चालविलेल्या प्रयत्नांवर विदारक प्रकाश पाडतात. गेल्या महायुद्धाच्या अखेरीस जर्मनींत आपल्याविरुद्ध उत्पाती क्रांति होत आहे असें दृष्टीस पडतांच कैसर हॉलंडमध्ये पळून गेला; व त्यामुळे कैसरला सुळावर देण्याच्या लॉईड जॉर्ज प्रभृति ब्रिटिश मुत्सद्यांच्या वल्गना फोल ठरल्या. तसा प्रकार या वेळीं घडू नये व हिटलर आपल्या प्रभावळीसह जिवंत हातीं सापडावा, म्हणून रशिया आणि इंग्लंड हे आज त्याला सापळ्यांत पकडण्याच्या खटपटींत आहेत.

हा सापळा नैतिक आणि लष्करी असा दुहेरी आहे. युरोपांतील गेल्या पांचशें वर्षांची प्रथा अशी आहे की, युद्ध, राज्यक्रांति किंवा बंड यांतून पळून जर कोणी राजपुरुष, सेनापति किंवा क्रांतिकारक हा तटस्थ राष्ट्राच्या आश्रयाला गेला, तर शरणागताला अभय देण्याच्या पुरातन प्रघातानुसार, त्याला त्याच्या शत्रूंच्या स्वाधीन न करतां, तें तटस्थ राष्ट्र त्याचें संरक्षण करतें. फ्रेंच राज्यक्रांतिनंतर पदच्युत बुरबॉन घराण्यांतील राजपुरुष जेव्हा देशोधडीला लागले, तेव्हा इंग्लंडने त्यांना आपल्या दरबारीं किती इतमामाने आश्रय दिलेला होता, हें प्रसिद्धच आहे. पण, इंग्लंडने केवळ पदच्युत राजपुरुषांनाच आश्रय दिला असें नाही; तर इटलीचा बंडखोर नेता माझिनी आणि रशियाचा क्रांतिकारक धुरीण लेनिन हेहि आप आपल्या देशांतून हद्दपार झाल्यानंतर इंग्लंडच्या आश्रयाला येऊन राहिलेले होते. पदच्युत राजपुरुष किंवा निर्वासित क्रांतिकारक यांना इंग्लंड जें इतक्या साक्षेपाने आश्रय देत असे, त्यांत निव्वळ परोपकाराचा परमार्थ होता, असें कोण म्हणेल?

शेजाऱ्यांच्या घरांतलीं हीं सगळीं कोलितें आपल्या संग्रहीं बाळगण्यांत इंग्लंडचा हेतु जर, युरोपांतील आपलें वर्चस्व कायम ठेवण्यासाठी, क्रांतीची स्फोटक द्रव्यें म्हणून त्यांचा वेळी प्रसंगीं उपयोग करण्याचा असला, तर त्यांत नवल कसलें ? पण, हेतु कोणताहि असो, तटस्थ राष्ट्रांचा शरणागतांना अभय आणि आश्रय देण्याचा जो जन्मजात हक्क, तो युरोपांत आजवर किती दक्षतेने पाळला जात असे, हें या प्रथेवरून स्पष्ट दिसत नाही काय ? किंबहुना बॅ. विनायकराव सावरकर यांनी १९०९ सालीं मार्सेल्स बंदरांत बोटींतून उडी टाकून पोहत पोहत फ्रान्सचा किनारा गाठण्याचें जें अयशस्वी पण अचाट धाडस केलें, तें ही प्रथा लक्षांत घेऊनच ! आता, फ्रेंच सरकारने ब्रिटिश सरकारपुढे नांगी टाकून त्यांना ब्रिटिश पोलिसांच्या हवाली केलें, हा भाग वेगळा !

शरणागतांना आश्रय देण्याचा तटस्थ राष्ट्रांचा हा जो पुरातन, परंपरागत हक्क त्याचा फायदा हिटलरप्रभृति जर्मन नेत्यांना मिळून, कैसरप्रमाणे ते आपल्या हातून निसटून जाऊं नयेत, म्हणून दोस्त राष्ट्रांनी या वेळीं एक नवेंच खूळ उभें केलेलें आहे. तें खूळ असें की, जे युद्धगुन्हेगार (war criminals) म्हणजे युद्ध सुरू व्हावयाला कारण झालेले कुरापतखोर आक्रमक आहेत, त्यांना कोणत्याहि दोस्त राष्ट्राने आश्रय देऊं नये. हें त्यांचें खूळ यशस्वी होण्याचा पूर्ण संभवहि दिसतो. कारण, हिटलर कदाचित् स्वीडनमध्ये आश्रय घेण्यासाठी जाईल, अशी कंडी ब्रिटिश वृत्तपत्रांनी उठवतांच, स्वीडनच्या गृह-मंत्र्याने असें जाहीर केलें की, “स्वीडन कोणत्याहि युद्धगुन्हेगाराला आसरा देणार नाही; व त्याच्या हद्दींतून जे युद्धगुन्हेगार निसटण्याचा प्रयत्न करतील, त्यांचा न्यायइन्साफ व्हावा म्हणून त्यांना परत त्यांच्या देशीं पाठविण्यांत येईल.” (Sweden will not grant asylum to war criminals, and will return to their own countries for justice any of them who may have ‘slipped through’ Swedish frontiers.) या घोषणेचा अर्थ उघड आहे. रशियाची उत्पाती फितुरी यशस्वी

होऊन जर्मनींत राज्यक्रांति होत आहेसें दिसतांच हिटलर जर पळून शेजारच्या स्वीडनमध्ये आश्रयार्थ गेला, तर स्वीडनचें सरकार त्याला पकडून परत जर्मनीला पाठवील ! अशाच प्रकारची घोषणा स्पेन आणि तुर्कस्थान याहि तटस्थ राष्ट्रांनी केलेली आहे. अशा रीतीने, हिटलरच्या कृताकृत कर्मांची आंतरराष्ट्रीय न्यायपीठाकडून चौकशी होण्यापूर्वीच, दोस्त राष्ट्रांनी त्याला आपल्या अधिकारांत गुन्हेगार ठरवून, युरोपांतील तटस्थ राष्ट्रांना त्याला आश्रय देणें अशक्य करून सोडलें आहे. त्यांच्या लष्करी सापळ्यांत हिटलर पुढे सापडो न सापडो. पण, या नैतिक सापळ्यांत तरी तो आज पुरता सापडलेला आहे, हें स्वीडन, स्पेन वगैरे तटस्थ राष्ट्रांच्या घोषणांवरून स्पष्ट दिसत नाही काय ?

पण, 'युद्धगुन्हेगार' हा जो नवा शब्द दोस्त राष्ट्रांनी पैदा केलेला आहे, त्याचा अर्थ किंवा व्याप्ति काय ? हिटलरने पोलंडवर स्वारी केल्यामुळे चालू महायुद्धाचा वणवा भडकला, ही गोष्ट खरी; व तेवढ्या एकाच कारणासाठी हिटलरला जर कोणी फासावर चढवण्याचें ठरवलें, तर गोष्ट निराळी. पण, युद्धगुन्हेगारीचा हा जो दुर्धर रोग युरोपला जडलेला आहे आणि ज्या रोगाचा स्फोट दर वीस पंचवीस वर्षांनी होऊन त्याचे दुष्परिणाम साऱ्या जगाला भोगावे लागतात, तो रोग एकाद्या नेपोलियनला, एकाद्या कैसरला किंवा एकाद्या हिटलरला फासावर दिल्याने किंवा काळ्या पाण्यावर पाठवल्याने थोडाच निर्मूळ होणार आहे ? त्या रोगाचें मूळ, ब्रिटिश मुत्सद्दी भासवतात त्याप्रमाणे, एकट्या हिटलरच्या, एकट्या कैसरच्या किंवा एकट्या नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेंत नाही; तर युरोपांतील कोणत्या राष्ट्राने जगावर साम्राज्यसत्ता गाजवावयाची याविषयीच्या ईर्ष्येंत आणि स्पर्धेत आहे. स्पेनच्या फिलिप्स बादशहाने ज्या वेळीं आपलें अजिक्य म्हणून गाजलेलें 'आर्मडा' हें आरमार घेऊन इंग्लंडवर स्वारी केली, चक्रवर्ती नेपोलियनने ज्या वेळीं कॅलेच्या बंदरांत उभे राहून आपली विजिगीषु नजर दुर्बिणींतून डोव्हरवर फेकली किंवा कैसरने ज्या वेळीं आपल्या लांब पल्ल्याच्या तोफा कॅलेहून दक्षिण इंग्लंडवर रोखल्या, त्या वेळीं त्यांचा

डोळा कांही केवळ टीचभर इंग्लंडवर होता, असें थोडेंच आहे ? त्यांचा डोळा सर्व जगाला गिळून काढणाऱ्या, सर्व जगांतील संपत्ति लंडनकडे खेचून ओढून शोषून घेणाऱ्या बलाढच जगड्व्याळ ब्रिटिश साम्राज्यशाहीवर होता. जगावर अधिराज्य कोणी गाजवावें ? इंग्लंडने, फ्रान्सने, जर्मनीने की रशियाने ?—हा वाद हें या युद्धगुन्हेगारीचें मूळ आहे. एकादा हिटलर, एकादा कैसर किंवा एकादा नेपोलियन नव्हे. हिटलर काय, कैसर काय किंवा नेपोलियन काय हीं त्या त्या राष्ट्रांच्या साम्राज्यलालसेचीं निव्वळ प्रतीकें आहेत. त्यांना व्यक्तिशः शासन करून ती लालसा थोडीच नष्ट होणार आहे ?

अशा स्थितींत एकटचा हिटलरला सुळावर चढवून किंवा हत्तीच्या पायीं देऊन काय होणार ? फार तर, इंग्लंडांतील किंवा रशियांतील सूडबुद्धीने पिसाळलेल्या जनतेचे द्वेषाने जळजळणारे डोळे हिटलरचा नाश झालेला पाहिल्याने निवतील, एवढेंच. पण, जगांत साम्राज्यें आणि साम्राज्यलालसा या दोन्ही गोष्टी जोपर्यंत कायम आहेत, तोपर्यंत एकटचा हिटलरचा नाश करून युद्धगुन्हा करण्याची प्रवृत्ति जगांतून कशी निर्मूल होणार ? या प्रवृत्तीचें मूळ कोणत्याहि एका व्यक्तीच्या मनांत किंवा महत्त्वाकांक्षेंत नाही; तर ज्यांचीं साम्राज्यें आज जगभर पसरलेलीं आहेत आणि ज्यांना आपलीं साम्राज्यें जगावर स्थापन करण्याची तळमळ लागलेली आहे, अशा राष्ट्रांच्या चुरशींत, एकमेकांविषयींच्या असूयेंत आहे. नाझी पक्ष जर्मनींत अधिकारारूढ झाल्यावर हिटलरने अशी खणखणीत घोषणा केलेली होती की, "इंग्लंड आणि फ्रान्स हीं दोन राष्ट्रें आज सर्व जग आपल्या कवेंत घालून बसलेलीं आहेत. यापुढे जर्मनीला त्या सार्वभौम सत्तेचा योग्य वाटा मिळाला पाहिजे !" (Germany must have a place in the Sun) इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका यांचीं जगभर विस्तारलेलीं साम्राज्यें आणि व्यापार हीं दोन्ही लक्षांत घेतलीं असतां हिटलरचे हे उद्‌गार चुकीचे आहेत, असें म्हणण्याचें धाडस ब्रिटिश मुत्सद्दी तरी करूं शकतील काय ? तेव्हा, जगांतून युद्धगुन्हे करण्याची प्रवृत्ति अजिबात नष्ट व्हावी अशी

दोस्त राष्ट्रांची जर प्रामाणिक इच्छा असेल, तर त्यांनी तहाच्या वेळीं आपल्या सूडबुद्धीचें अभद्र प्रदर्शन न करतां, युद्धगुन्ह्यांचीं खरीं कारणें शोधून काढून त्यांचा प्रथम उच्छेद करावयाला नको काय ?

पण, तसें करावयाचें म्हणजे आपण पोलंडच्या रक्षणार्थ हिटलर-विरुद्ध धर्मयुद्ध करीत आहोंत, असा बहाणा करणाऱ्या दोस्त राष्ट्रांना आत्मनिरीक्षण करावें लागेल. तें करण्याची त्यांची तयारी कुठे आहे ? जर्मनी आज साम्राज्यविस्तारासाठी युद्धगुन्हे करीत असला, तर इंग्लंड आणि फ्रान्स यांनी सतराव्या, अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांत साम्राज्यविस्तारासाठीं तितकेच भीषण युद्धगुन्हे केलेले आहेत, हें इतिहास अद्याप विसरलेला नाही. किंबहुना, अमेरिका, आफ्रिका आणि आशिया या तीन खंडांचा गेल्या तीन शतकांचा इतिहास म्हणजे इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका यांच्या युद्धगुन्ह्यांचाच इतिहास आहे असें म्हटलें, तर ती अतिशयोक्ति होणार नाही. पण, दरोडेखोराचा राजा बनलेला मनुष्य जसा न्यायासनावर बसून आपल्या राज्यांत दरोडे घालणाऱ्या नवीन दरोडेखोराला शासन करावयाला उजळ माथ्याने उद्युक्त होतो, तशी आज इंग्लंड, फ्रान्स वगैरे साम्राज्यशाही राष्ट्रें जर्मनीला युद्ध-गुन्हेगार ठरवून फासावर चढवावयाला आणि त्याची खांडोळी करावयाला पुढे सरसावलेलीं आहेत. म्हणूनच, बर्नार्ड शॉ याने असा स्पष्ट इशारा दिलेला आहे की, "जर विच्छेदन आणि शस्त्रसंन्यास या दोन गोष्टी जर्मनीच्या बाबतींत इष्ट असतील, तर त्या इतरहि बड्या राष्ट्रांच्या बाबतींत तितक्याच इष्ट आहेत. पण त्यांपैकी कोणीहि राष्ट्र या गोष्टींना कबूल होणार नाही." (If disarmament and disintegration are desirable for Germany, they are also desirable for all big Powers as well. None of them will consent to it.) युद्ध संपल्याबरोबर मुलूखवाटणीची आणि बाजारपेठा काबीज करण्याची जीं खलबतें आज इंग्लंड आणि अमेरिका हीं राष्ट्रें अगदी लज्जाशून्य मनाने उघड उघड करीत आहेत, तीं ध्यानांत घेतलीं असतां बर्नार्ड शॉ याचा हा इशारा समर्पक

नाही, असें कोण म्हणेल ? इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका यांची साम्राज्यें जोंपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर कायम आहेत, जगांतील दुबळ्या दलित राष्ट्रांना पिळून काढण्याचा त्यांचा क्रम जोंपर्यंत अव्याहत चालू आहे, तोपर्यंत एकट्या हिटलरला फासावर चढवून किंवा एकट्या जर्मनीचा तेजोवध करून युद्धगुन्हेगारीला आळा कसा बसणार ?

१९-९-१९४४

# त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी

हिंदुस्थानांत श्रीनगरपासून तों म्हैसूरपर्यंत गेले नऊ दिवस सर्वत्र चालू असलेल्या नवरात्राची सांगता आज विजयादशमीच्या सीमोल्लंघनाने होईल. नवरात्राचा सण म्हणजे सांख्यांनी ज्यांना प्रकृति-पुरुष म्हटलेलें आहे, शैव ज्यांना शिव-शक्ति म्हणतात आणि कविकुलगुरूने रघुवंशाच्या प्रारंभीं ज्यांचें स्तवन पार्वती-परमेश्वर म्हणून केलेलें आहे, त्या सृष्टीच्या उत्पत्तीला, धारणेला आणि संहाराला कारण असलेल्या चित्तत्वाची उपासना. पण 'चित्तत्व' हा शब्द द्वैतसूचक असल्यामुळे, त्या शब्दाने शिव-शक्तींचें वर्णन करणें अयोग्य होणार नाही काय ? कारण, प्रकृति-पुरुष, शिव-शक्ति किंवा पार्वती-परमेश्वर हे शब्द द्वंद्व आणि द्वैत यांचे सूचक असले, तरी 'वागर्थाविवसंपृक्तौ' या अनन्य-सुंदर उपमेने त्यांच्या अद्वैताचें जें वर्णन कालिदासाने केलेलें आहे आणि ज्या वर्णनाचा वैचित्र्यपूर्ण साक्षात्कार अर्धनारीनटेश्वराच्या रूपोल्लासांत भाविकांना होतो, तें लक्षांत घेतलें असतां, त्यांचें द्वैत नाममात्र आहे, असें कोण म्हणणार नाही ? किंबहुना, एका हातांत महिषासुराचें नुकतेंच तोडलेलें मस्तक धरून दुसऱ्या हाताने जगाला अभयवचन देत आपल्या पतीच्या प्रेतावर उभी असलेली कालीची कराल पण कल्याणप्रद

दोस्त राष्ट्रांची जर प्रामाणिक इच्छा असेल, तर त्यांनी तहाच्या वेळीं आपल्या सूडबुद्धीचें अभद्र प्रदर्शन न करतां, युद्धगुन्ह्यांचीं खरीं कारणें शोधून काढून त्यांचा प्रथम उच्छेद करावयाला नको काय ?

पण, तसें करावयाचें म्हणजे आपण पोलंडच्या रक्षणार्थ हिटलर-विरुद्ध धर्मयुद्ध करीत आहोंत, असा बहाणा करणाऱ्या दोस्त राष्ट्रांना आत्मनिरीक्षण करावें लागेल. तें करण्याची त्यांची तयारी कुठे आहे ? जर्मनी आज साम्राज्यविस्तारासाठी युद्धगुन्हे करीत असला, तर इंग्लंड आणि फ्रान्स यांनी सतराव्या, अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांत साम्राज्यविस्तारासाठीं तितकेच भीषण युद्धगुन्हे केलेले आहेत, हें इतिहास अद्याप विसरलेला नाही. किंबहुना, अमेरिका, आफ्रिका आणि आशिया या तीन खंडांचा गेल्या तीन शतकांचा इतिहास म्हणजे इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका यांच्या युद्धगुन्ह्यांचाच इतिहास आहे असें म्हटलें, तर ती अतिशयोक्ति होणार नाही. पण, दरोडेखोराचा राजा बनलेला मनुष्य जसा न्यायासनावर बसून आपल्या राज्यांत दरोडे घालणाऱ्या नवीन दरोडेखोराला शासन करावयाला उजळ माथ्याने उद्युक्त होतो, तशी आज इंग्लंड, फ्रान्स वगैरे साम्राज्यशाही राष्ट्रें जर्मनीला युद्ध-गुन्हेगार ठरवून फासावर चढवावयाला आणि त्याची खांडोळी करावयाला पुढे सरसावलेलीं आहेत. म्हणूनच, बर्नार्ड शॉ याने असा स्पष्ट इशारा दिलेला आहे की, "जर विच्छेदन आणि शस्त्रसंन्यास या दोन गोष्टी जर्मनीच्या बाबतींत इष्ट असतील, तर त्या इतरहि बड्या राष्ट्रांच्या बाबतींत तितक्याच इष्ट आहेत. पण त्यांपैकी कोणीहि राष्ट्र या गोष्टींना कबूल होणार नाही." (If disarmament and disintegration are desirable for Germany, they are also desirable for all big Powers as well. None of them will consent to it.) युद्ध संपल्याबरोबर मुलूखवाटणीची आणि बाजारपेठा काबीज करण्याची जीं खलबतें आज इंग्लंड आणि अमेरिका हीं राष्ट्रें अगदी लज्जाशून्य मनाने उघड उघड करीत आहेत, तीं ध्यानांत घेतलीं असतां बर्नार्ड शॉ याचा हा इशारा समर्पक

नाही, असें कोण म्हणेल ? इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका यांची साम्राज्यें जोंपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर कायम आहेत, जगांतील दुबळ्या दलित राष्ट्रांना पिळून काढण्याचा त्यांचा क्रम जोंपर्यंत अव्याहत चालू आहे, तोपर्यंत एकट्या हिटलरला फासावर चढवून किंवा एकट्या जर्मनीचा तेजोवध करून युद्धगुन्हेगारीला आळा कसा बसणार ?

१९-९-१९४४

# त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी

हिंदुस्थानांत श्रीनगरपासून तों म्हैसूरपर्यंत गेले नऊ दिवस सर्वत्र चालू असलेल्या नवरात्राची सांगता आज विजयादशमीच्या सीमोल्लंघनाने होईल. नवरात्राचा सण म्हणजे सांख्यांनी ज्यांना प्रकृति-पुरुष म्हटलेलें आहे, शैव ज्यांना शिव-शक्ति म्हणतात आणि कविकुलगुरूने रघुवंशाच्या प्रारंभीं ज्यांचें स्तवन पार्वती-परमेश्वर म्हणून केलेलें आहे, त्या सृष्टीच्या उत्पत्तीला, धारणेला आणि संहाराला कारण असलेल्या चित्तत्वाची उपासना. पण 'चित्तत्व' हा शब्द द्वैतसूचक असल्यामुळे, त्या शब्दाने शिव-शक्तींचें वर्णन करणें अयोग्य होणार नाही काय ? कारण, प्रकृति-पुरुष, शिव-शक्ति किंवा पार्वती-परमेश्वर हे शब्द द्वंद्व आणि द्वैत यांचे सूचक असले, तरी 'वागर्थाविवसंपृक्तौ' या अनन्य-सुंदर उपमेने त्यांच्या अद्वैताचें जें वर्णन कालिदासाने केलेलें आहे आणि ज्या वर्णनाचा वैचित्र्यपूर्ण साक्षात्कार अर्धनारीनटेश्वराच्या रूपोल्लासांत भाविकांना होतो, तें लक्षांत घेतलें असतां, त्यांचें द्वैत नाममात्र आहे, असें कोण म्हणणार नाही ? किंबहुना, एका हातांत महिषासुराचें नुकतेंच तोडलेलें मस्तक धरून दुसऱ्या हाताने जगाला अभयवचन देत आपल्या पतीच्या प्रेतावर उभी असलेली कालीची कराल पण कल्याणप्रद

मूर्ति पाहिली, म्हणजे शिव–शक्तींचें तें विचित्र अद्वैत, प्रकृति–पुरुषांची ती अद्भुत एकात्मता मनावर तीव्रतेने बिंबल्याशिवाय राहात नाही.

म्हणूनच एकनाथमहाराजांनी शिव–शक्तींच्या विवाहाचें वर्णन करतांना असें म्हटलेलें आहे की—

**हिमवंताच्या पोटीं**
**एक जन्मली गोरटी ।**
**तये त्या धूर्जटी । वरियलें ।।**

**मंडपाच्या द्वारीं**
**आला जंव नोवरा ।**
**अगुणाचा म्हातारा । रूप नाही ।।**

**नांवा येव्हढिया बाळा**
**अति वृद्ध नोवरा ।**
**कुवारीच्या संसारा । शून्य जालें ।।**

हा शून्याचा संसार म्हणजेच आदिमायेने मांडलेला चौदा कोटि ब्रह्मांडांच्या घडामोडीचा खेळ. एकनाथमहाराजांनी तिचें वर्णन केव्हा प्रकृति, केव्हा विद्या, तर केव्हा अविद्या अशा निरनिराळ्या नांवांनी केलेलें असून, तिचा ज्या वेळीं शिवाशीं विवाह झाला, 'तैंचि शिवा शिवत्व आलें' असा तिचा महिमा वर्णन केलेला आहे. तेव्हा, जिच्या संयोगाने शिवाला शिवत्व आलें, त्या या आदिशक्तीला शाक्तांनी शिवापेक्षा श्रेष्ठ मानावी, यांत नवल काय ? किंबहुना उपनिषदांतहि या कल्पनेला थोडा आधार मिळतो. केनोपनिषदांत अशी कथा आहे की, ब्रह्माच्या सामर्थ्याने मिळालेल्या विजयाने उन्मत्त होऊन देव जेव्हा त्याला विसरले, तेव्हा हैमवती उमा ब्रह्माने पुढे टाकलेली गवताची काडी उचलावयाला असमर्थ ठरलेल्या देवांच्या दिङ्मूढ परिवारांत प्रकट झाली आणि तिने इंद्राला ब्रह्मज्ञान करून देऊन देवांचा गर्वपरिहार केला. केनोपनिषदावरील आपल्या भाष्यांत देवांना ब्रह्माच्या प्रभावाची ओळख करून देणाऱ्या उमेला श्रीमदाचार्यांनी 'विद्या'

म्हटलेलें आहे, तर डॉ. भाऊजी दप्तरी हे तिला ' बुद्धि ' म्हणतात; व ' विद्या ' ही स्वतंत्र स्वयंभू शक्ति नसून तो बुद्धीचा एक धर्म किंवा कार्य आहे हें लक्षांत घेतलें असता, विद्वद्‌रत्नांनी उमेला ' बुद्धि ' म्हणून जें संबोधिलेलें आहे, तेंच बरोबर वाटतें. अर्थात् उमेची उपासना म्हणजे विद्येची, शक्तीची आणि बुद्धीची उपासना होय. त्या उपासनेपरता आचरणीय धर्म जगांत दुसरा कोणता असूं शकेल ?

त्यामुळेच, महाराष्ट्र हा काश्मीरप्रमाणे शैव किंवा बंगालप्रमाणे शाक्त नसतांनाहि, देवीचें नवरात्र या आनंदवनभुवनांत घरोघर निष्ठेने साजरें केलें जातें किंबहुना, सह्याद्रीचें असें शिखर, कुहर किंवा विवर क्वचितच आढळेल की, जें शिवशक्तींच्या निवासाने पुनीत झालेलें नाही. विदर्भांतील माहूरच्या रेणुकाम्बेपासून तो गोमंतकांतील कवळयाच्या शांतादुर्गेपर्यंत महाराष्ट्रांत डोंगराच्या पठारावर किंवा समुद्राच्या किनाऱ्यावर ठिकठिकाणीं जगदंबा प्रकट झालेली आहे; व महाराष्ट्र जनतेच्या अभ्युदयाची आणि निःश्रेयसाची चिंता वहात जागोजाग उभी आहे. जणू कांही, हिमालयाच्या उत्तुंग गौरीशिखरावर अत्युग्र तप केल्यावर शिवाचा साक्षात्कार झालेली उमा व्रतसांगतेसाठी दक्षिणोदधीचें स्नान करावयाला म्हणून जी विंध्याचल ओलांडून दंडकारण्यांत आली, ती मग कुठे रेणुका म्हणून, कुठे अंबा म्हणून, कुठे भवानी म्हणून, कुठे योगेश्वरी म्हणून, कुठे महालक्ष्मी म्हणून किंवा कुठे दुर्गा म्हणून आपल्या अष्टविध रूपांनी महाराष्ट्रांत कायमची राहिली. रावणाने सीतेला पळवून नेल्यावर तिचा शोध करीत दंडकारण्यांत हिंडत असलेल्या रामलक्ष्मणांना तिनेच विजयाचा वर देऊन रावणवधाचा मार्ग मोकळा केला; व दंडकारण्य पर्यायाने मनुष्यवस्तीला निर्भय करून दिलें. म्हणूनच श्रीसमर्थांनी तिला ' रामवरदायिनी ' म्हणून आळविलें आणि "ज्या तुझ्या सामर्थ्याने त्रेतायुगांत राक्षसांचा संहार सुलभ झाला, तें तुझें सामर्थ्य तूं आज पुन्हा प्रकट कर," अशी तिची करुणा भाकली. इतकेंच नव्हे, तर त्यांनी तिला असें स्पष्ट सांगितलें की, " त्या त्रेतायुगांत तूं श्रीरामचंद्राला वर देऊन

राक्षसांचा नाश केलास, असें आम्ही ऐकत आलों आहोंत. पण तें खरें कसें मानावें? आज त्याची कांही तरी समक्षा, त्याचा कांही तरी साक्षात्कार पारतंत्र्याने गांजलेल्या आम्हांला दिसावयाला नको काय? तो दिसल्याशिवाय, हे माते, मी तुझें तें सामर्थ्य, तुझा तो महिमा खरा मानणार नाही—

**मला तो प्रत्ययो नाही। मानेना याच कारणें**

अफझुलखानाच्या वधापूर्वी ज्यांनी त्या जगन्मातेला इतक्या रोकडचा शब्दांनी सांकडें घातलें, त्याच समर्थांनी नंतर रायगडावर श्रीशिवछत्रपतींना राज्याभिषेक झाल्यानंतर हर्षभराने अशी ग्वाही दिली की,––

**बोळता भवानी माता। महींद्र दास्य इच्छिती**
**बोलणें हें प्रचीतीचें। अन्यथा वाउगें नव्हे**

ही ग्वाही जोपर्यंत महाराष्ट्र जनतेच्या हृदयांत दुमदुमते आहे, तोपर्यंत श्रीशिवाजीमहाराजांना स्वराज्यस्थापनेचा वर देणाऱ्या त्या रामवरदायिनीचा विसर महाराष्ट्राला कसा पडेल?

सतराव्या शतकांत श्रीसमर्थांनी महाराष्ट्राच्या दास्यमोचनार्थ ज्या जगन्मातेची परोपरीने आळवणी केली, त्याच जगन्मातेच्या त्या रुद्ररम्य ध्यानांत बंगालचे राष्ट्रकवि बंकिमचंद्र चतर्जी यांना एकोणिसाव्या शतकांत राष्ट्रमातेचा साक्षात्कार झाला. बंगालच्या फाळणीनंतर राष्ट्रीयत्वाची पहिली प्रबळ ऊर्मि ज्या वेळीं बंगालमध्ये उठली, त्या वेळीं शाक्तपंथी वंगजनतेला महिषासुराचें नुकतेंच तोडलेलें मस्तक हातांत धरून पतीच्या प्रेतावर उभ्या असलेल्या कालीच्या त्या प्रलयरूपांत जर दास्यमोचनाची आशा दिसली असली आणि आपल्या पददलित राष्ट्रमातेने तें उग्र रूप पुनश्च धारण करून पारतंत्र्याचा उच्छेद करावा असें जर तिच्या प्रक्षुब्ध मनाला वाटलें असलें, तर त्यांत नवल काय? दक्षिणेश्वरीच्या मूर्तीपुढे 'आई आई' म्हणत उन्मत्त होऊन नाचणाऱ्या श्रीरामकृष्ण परमहंसांसारख्या वामाचारी जीवन्मुक्तापासून तों मूर्तिपूजा न मानणाऱ्या

बाह्मो समाजाच्या परंपरेंत वाढलेल्या अरविंद घोषांसारख्या आधुनिक तत्त्वज्ञापर्यंत साऱ्या बंगाली पुढाऱ्यांनी वंगभूमिवरील त्या संकटाच्या काळांत दुर्गेची करुणा भाकली, त्या दशप्रहरणधारिणीला राष्ट्रमातेचें रूप घेऊन प्रकट होण्यासाठी विनविलें ! बंकिमचंद्रांचें 'आनंदमठां'तील 'वंदे मातरम्' हें गीत म्हणजे युगानुयुगें शक्तीची उपासना करीत आलेल्या दलित बंगालची जगन्मातेला आर्त हाक होय. त्या हाकेंतून 'अभिनव बंगाल'ची क्रांतिकारक चळवळ उफाळली; व 'वंदे मातरम्'चे ऊर्जस्वल प्रतिध्वनि साऱ्या जगभर दुमदुमले. म्हणूनच स्वामी विवेकानंदांनी म्हटलेलें आहे की, "आदिशक्तीची उपासना हा अखिल मानवजातीचा परम धर्म आहे; व त्या धर्माचें अनुष्ठानच या भरतखंडाला दास्यमुक्त करील." तेव्हा आज नवरात्राच्या सांगतेच्या दिवशीं त्या जगन्मातेचें अभिवादन करावयाला बंकिमचंद्रांच्या 'वंदे मातरम्' या गीतांतील

**सप्तकोटिकंठ-कलकल-निनाद कराले**
**द्विसप्तकोटिभुजैर्धृतखरकरवाले**
**अबला केन मा एत बले**
**बहुबलधारिणीं नमामि तारिणीम्**
**रिपुदलवारिणीं मातरम्**
**वंदे मातरम्**

या हृदयस्पर्शी नमनापेक्षा अधिक समर्पक स्तोत्र दुसरें कोणते सांपडेल ?

२७-९-१९४४

# महात्माजी

म. गांधी यांचा पंचाहत्तरावा वाढदिवस उद्या या भरतखंडांत सर्वत्र अत्यंत श्रद्धेने आणि उत्साहाने साजरा केला जाईल. गांधीजींचें

राजकारण आणि तत्त्वज्ञान हे दोन्ही आज विवाद्य विषय आहेत; व त्यांच्या सत्य–अहिंसेच्या तत्त्वज्ञानाची हिंदी राजकारणावर झालेली प्रतिक्रिया अनिष्ट आहे, असें म्हणणारे अनेक सच्चे आक्षेपक हिंदुस्थानाच्या सर्व भागांत निघतील. पण, गांधीजींच्या तत्त्वज्ञानाविषयी किंवा धोरणाविषयी प्रामाणिक मतभेद असला, तरी त्यामुळें त्यांचें लोकातिग विभूतिमत्व आणि त्यांनी केलेली दलित मानवजातीची सेवा यांच्या मान्यतेला थोडाच बाध येतो ? किंबहुना, जें त्यांचें अहिंसेचें तत्त्वज्ञान हिंदुस्थानाच्या सद्यःस्थितींत त्याला अपायकारक ठरण्यासारखें आहे असें त्यांच्या टीकाकारांना वाटतें, तें जगाच्या राजकारणांत प्रभावी आणि यशस्वी ठरून सत्य–अहिंसेच्या तत्त्वावर जर एकंदर मानवी जीवनाची पुनर्घटना झाली, तर जगांतून वैषम्य आणि नैर्घृण्य हीं मानवजातीच्या दुःखाचीं श्रीमदाचार्यांनी वर्णन केलेलीं दोन्ही आदिकारणें कायमचीं नष्ट होतील, याबद्दल कोणालाहि शंका नाही. तेव्हा, ज्या सत्याच्या परिपालनार्थ हरिश्चंद्राने आपल्या स्त्रीपुत्रांचा लिलाव केला, श्रियाळाने आपल्या एकुलत्या एक मुलाला उखळांत घालून स्वतःच्या हातांनी कांडलें आणि दधीचीने आपल्या तपःपुनीत अस्थींची आनंदाने आहुति दिली, त्या सत्याचा हा विसाव्या शतकांतील उद्‌गाता आपलें सत्य–अहिंसेचें तत्त्वज्ञान 'याचि देहीं याचि डोळां' विजयी झालेलें पहावयाला शतायुषी व्हावा, अशी प्रार्थना उद्या सर्व हिंदी जनतेने एकमुखाने करावी, यांत नवल काय ?

कारण, प्रथम दक्षिण आफ्रिकेंत आणि नंतर हिंदुस्थानांत गांधीजींनी ज्या तत्त्वांचे राजकीय प्रयोग केले, तीं तत्त्वें जर जगाच्या राजकारणांत क्रांति घडवून आणावयाला कधी काळीं सुदैवाने समर्थ झालीं, तरच मानवजातीचें दैन्य आणि दास्य नष्ट होण्याची कांही आशा आहे. भगवान् बुद्धाला अडीच हजार वर्षांपूर्वी ज्या चार 'आर्य सत्यां'चा साक्षात्कार झाला, त्यांपैकी पहिलें सत्य 'दुःख' हें होतें; व त्याच्या निवारणार्थ त्याने जगाला अष्टांगिक मार्गाचा उपदेश केला. पण त्या अष्टांगिक मार्गाच्या आचरणानेहि मनुष्याच्या

कपाळचें दुःख टळलें नाही. उलट, तें इतकें पराकोटीला पोचलें की, भौतिक सुधारणेचा आज परमोत्कर्ष झालेला असूनहि मानवजातीचें दैन्य, दास्य आणि दुःख यांना पारावार उरलेला नाही. कार्ल मार्क्सने अर्वाचीन औद्योगिक संस्कृतींतील आर्थिक विषमता हें या दुःखाचें मूळ आहे, असें निदान केलें; व साम्यवादाची स्थापना झाल्याने जग दुःखमुक्त होईल, असा शोध लावला. पण, साम्यवादाच्या तत्त्वांनुसार आर्थिक विषमता नष्ट केली, तरी संपत्तीचें बेसुमार उत्पादन आणि उपभोग यांच्यामुळे जी आसुरी वृत्ति माणसांत बळावेल आणि त्यांना एकमेकांचे गळे कापावयाला उद्युक्त करील, तिला आळा कसा बसणार ? आजची यंत्रारूढ भौतिक उद्योगप्रधान संस्कृति म्हणजे आसुरी संपत्तीचें आगर आहे. तिच्यांतून उत्पन्न होणारे नाना प्रकारचे संघर्ष हे केवळ संपत्तीची समान वाटणी केल्याने किंवा वर्गविषमतेचा नाश झाल्याने नाहीसे होणार नाहीत हे संघर्ष टळावयाचे,—मानवजाति स्वतंत्र, सुखी आणि स्वयंपूर्ण व्हावयाची,—म्हणजे मनुष्याची आसुरी वृत्ति बदलली पाहिजे. मनुष्याच्या दुःखाचें मूळ बाह्य सृष्टींत नाही; त्याच्या मनःसृष्टींत, त्याच्या हृदयांत आहे. तें दुःखमूळ म्हणजे मनुष्याची अदम्य आसक्ति, कधीहि तृप्त न होणारी दुरंत तृष्णा. भगवान् बुद्धाला तपश्चर्येनंतर प्रकट झालेलें पहिलें आर्य सत्य जसें दुःख हें होतें, तसें दुसरें आर्य सत्य तृष्णा हें होतें. या तृष्णेचा, या आसक्तीचा नाश झाल्याशिवाय जगांतील नाना प्रकारचे संघर्ष थांबून मनुष्याची उन्नति होणार नाही. कार्ल मार्क्सने साम्यवाद हा जगाच्या दुःखावरला तोडगा शोधून काढला; तर गांधीजींनी अनासक्तियोग,—टिळकांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे निष्काम कर्मयोग,—हा उपाय सुचविला आहे.

कार्ल मार्क्सच्या विचारप्रणालींतील मुख्य दोष हा की, तींत सर्व प्रकारच्या स्पर्धेला आणि लोभाला कारण होणारी भांडवलशाही संस्कृति कायम ठेवलेली असून, फक्त सत्ता आणि संपत्ति यांच्या समान वाटणीने तिचे अनर्थ टळतील, असें गृहीत धरलेलें आहे. संपत्तीच्या उत्पादनापेक्षा तिची आसक्ति आणि उपभोग हे माणसाच्या अधःपाताला

अधिक कारण होतात, ही साधी गोष्ट त्या अनात्मवादी तत्त्वज्ञाने मुळी लक्षांतच घेतली नाही. उलट माणसाच्या गरजा आणि हपाप बेसुमार वाढविणारी भांडवलशाही संस्कृतीच मुळी गांधीजींना त्याज्य वाटते. भांडवलशाही यांत्रिक संस्कृतीला असलेल्या त्यांच्या विरोधाचें चरखा हें प्रतीक आहे माणसाने आपल्या गरजा कमी कमी करीत आणल्या,— म्हणजेच अनासक्तियोगाचें जर निष्ठेने आचरण केलें,—तर भांडवलशाही संस्कृतींतून उत्पन्न झालेले सगळे संघर्ष टळतील, अशी त्यांची श्रद्धा आहे. म्हणूनच ते म्हणतात, "अनासक्ति में अहिंसा अपने आप आही जाती है." ज्या मनुष्याला कसल्याहि प्रकारची आसक्ति उरलेली नाही, तो हिंसा करीलच कशासाठी ? भगवद्गीतेंत स्पष्टच सांगितलेलें आहे की, "कामात्क्रोधोऽभिजायते". काम म्हणजे वासना जर तृप्त झाल्या नाहीत, तर मनुष्य चिडतो आणि हिंसेला प्रवृत्त होतो. म्हणूनच भगवद्गीतेंत काम, क्रोध आणि लोभ हे आसुरी संपत्तीचे तीन घटक, नरकाचीं तीन नाशाप्रत नेणारीं द्वारें आहेत, असें म्हटलेलें आहे. भांडवलशाही संस्कृतीचा पाया गरजांची वाढ हा आहे; तर गांधीजींच्या अहिंसाधिष्ठित नवीन समाजरचनेचा पाया अनासक्ति म्हणजे गरजांची घट हा आहे. अर्थात् भांडवलशाही संस्कृतीची दृष्टि भौतिक म्हणजे माणसाच्या आत्म्याकडे दुर्लक्ष करून फक्त त्याच्या शरीराकडे लक्ष देणारी आहे; तर गांधीजींचा अनासक्तियोग हा आत्म्याची उन्नति हेंच जीवनाचें एकमेव साध्य आणि साफल्य समजतो.

अनासक्तियोगाचें स्वाभाविक पर्यवसान जसें अहिंसा धर्म हें आहे, तशीच अहिंसा धर्माची परिणति आपोआपच अराजकांत होईल. नीतिनियम, कायदेकानू किंवा शासनसत्ता हीं आजच्या मानवी समाजाला आवश्यक कां वाटतात ? तर प्रचलित समाजरचनेचें अधिष्ठान आर्थिक आहे म्हणून,—समाजाचे सर्व व्यवहार पैसा नियंत्रित करतो म्हणून ! त्यामुळे, संपत्तीचें उत्पादन आणि संग्रह हीं साहजिकच मनुष्याची सर्वोच्च आकांक्षा होऊन बसते; व संपत्ति आणि संपन्न वर्ग

यांच्या रक्षणार्थ नीतिनियम, कायदेकानू किंवा शासनसत्ता हीं आवश्यक होऊन बसतात. अर्थात् संपत्तीच्या उत्पादनाची किंवा संग्रहाची ही प्रथा आणि मक्तेदारी ज्या क्षणीं नष्ट होईल, त्या क्षणीं आजच्या समाजरचनेंतील आर्थिक विषमता कायम ठेवण्यासाठी जे नीतिनियम, कायदेकानू किंवा शासनसत्ता हीं उत्पन्न करण्यांत आलेलीं आहेत, तींहि अनावश्यक ठरतील. याचा अर्थ असा की, अनासक्तियोगाचें आचरण करणाऱ्या अहिंसाधिष्ठित समाजांत कोणत्याहि प्रकारच्या दंडनाची, कोणत्याहि प्रकारच्या शासनाची गरज उरणार नाही. ही स्थिति म्हणजेच अराजक होय. महात्माजींचा अहिंसावाद जर कधी काळीं यशस्वी झाला, तर अत्यंत शुद्ध आणि उन्नत स्वरूपाचें आदर्श अराजक त्या अहिंसावादांतून आपोआप आविर्भूत होईल. मानवी आत्मा कैवल्यांत विलीन झाल्यावर त्याला जखडणारे पार्थिव वासना–विकारांचे पाश जसे आपोआप गळून पडतात, तसे अनासक्तियोगाच्या अहिंसा धर्माचा स्वीकार मानवजाति ज्या दिवशीं करील, त्या दिवशीं आज तिला जखडून टाकणारे नीतिनियमांचे, कायदेकानूंचे आणि शासनसत्तेचे सगळे पोलादी पाश आपोआप गळून पडतील. अहिंसाधिष्ठित समाजाचें गांधीजींचें हें ध्येयस्वप्न किती उदात्त, किती भव्य आहे! विशेषतः, वॉशिंग्टन येथे भरलेल्या शांततासंरक्षण परिषदेंत (World security conference) शांततेच्या रक्षणार्थ आंतरराष्ट्रीय सैन्य उभारण्याची आणि परिषदेचे सदस्य असलेल्या राष्ट्रांनी जास्तींत जास्त शस्त्रधारण करण्याची जी योजना मंजूर करण्यांत आलेली आहे, ती लक्षांत घेतली असतां, शासनसत्ता आणि शस्त्रास्त्रें यांनी विरहित असें अहिंसाधिष्ठित नवें विश्व, नवा समाज निर्माण करण्याची महात्माजींची मनीषा किती दिव्य, किती अकल्पनीय वाटते!

महात्माजींच्या या दिव्य, या अकल्पनीय ध्येयस्वप्नांतूनच ऑगस्ट ठराव आविर्भूत झालेला आहे. त्या ठरावाची जी इतकी चीड ब्रिटिश साम्राज्यशाहीला वाटते, तो ठराव गांधीजींनी रद्द करावा म्हणून हिंदुस्थान सरकार जें इतकें हट्टाला पेटलेलें आहे, त्या ठरावाकडे

बोट दाखवून श्री. जिना यांनी तडजोडीचा प्रयत्न जो बेदरकारपणाने उधळून लावला, त्याचें कारण हेंच की, त्या ठरावांत महात्माजींना जें भारतीय स्वातंत्र्याचे दर्शन आणि आकलन घडलेलें आहे, त्याचा हिंदी राष्ट्रीय जीवनावर होत असलेला प्रभाव त्यांना अनिष्ट आणि असह्य वाटतो. तो ठराव म्हणजे महात्माजींना घडलेलें मूर्तिमंत स्वातंत्र्यदर्शन होय. त्या युगंधर मनस्वी पुरुषाची सारी तपस्या आणि सारे तेज, त्याची सारी अभयता आणि सारें आत्मबल यांचें अमोघ सामर्थ्य त्या ठरावांत साठविलेले आहे. ब्रिटिश साम्राज्यशाही त्या ठरावाला जी इतक्या दुर्योधनी दुष्टाव्याने विरोध करीत आहे, ती त्याच्या सामर्थ्याची, भावी हिंदी राजकारणावर होणाऱ्या त्याच्या परिणामांची जाणीव असल्यामुळेच होय. परतंत्र पददलित भारतवर्षाला या ऑगस्ट ठरावाच्या रूपाने गांधीजींनी अमोघ मंत्रशक्ति दिलेली आहे. दधीचीने आपल्या तपःपुनीत अस्थींचें वज्र जसें दैत्यांनी पराभूत केलेल्या इंद्राला दिलें, तशी गांधीजींनी आपल्या अजेय आत्मबलाची ही चित्शक्ति परतंत्र भारताला दिली आहे. तेव्हा, त्या चित्शक्तीच्या प्रभावाने हें अवनत अभागी राष्ट्र दास्यमुक्त झालेलें त्यांनी आपल्या डोळ्यांनी पहावें, यापरतें आजच्या मंगल प्रसंगीं भगवंताजवळ दुसरें काय मागणार ?

१-१०-१९४४

# नव लाख दिवे हे तुझ्या घरीं

आज भरतखंडांत जिथे जिथे म्हणून हिंदुमात्राची वस्ती आहे, तिथे तिथे लक्ष्मीपूजन करण्यांत येईल. कारण दिवाळी हा हंगामाचा सण आहे. शेतांतून घरांत आणलेली धान्यसंपदा आणि व्यापारधंदा करून वर्षभर कमावलेली धनसंपदा यांच्या पूजनाचा, धनधान्याच्या गणनेचा आणि गौरवाचा हा सण आहे. म्हणूनच धनत्रयोदशीच्या

दिवशीं या सणाला प्रारंभ होऊन भाऊबिजेला चंद्राच्या औक्षणाने तो समाप्त होतो. धनधान्याचें सहपूजन आणि आप्तेष्टांचें सहभोजन असें या सणाचें सामाजिक आणि राष्ट्रीय स्वरूप आहे. दीपोत्सव आणि द्यूतक्रीडा हे या उत्सवांतील वैभवविलासाची परिसीमा दर्शवितात. पण, आज सायंकाळीं या भरतभूमींत, सूर्यास्तानंतर घरांत येणाऱ्या चपलचरणा, चंचलचित्त लक्ष्मीचें स्वागत करण्यासाठी, दिवसभर कंट्रोलच्या दुकानापाशीं धरणें धरून मोठ्या कष्टाने मिळविलेल्या तेलाचा एकाद दुसरा दिवा उंबरठ्याशीं मिणमिणत ठेवून, लोक ज्या वेळीं तिची उत्कंठेने वाट पहातील, त्या वेळीं त्यांना तिचें दर्शन होईल काय ? पुराणांत अशी एक कथा आहे की, एका दरिद्री इसमाच्या सुनेने पाटीखाली झाकून ठेवलेल्या दिव्याची मंदमधुर प्रभा पाहून अवसेच्या अंधाराला बिचकलेली चंद्राची ही ज्येष्ठ भगिनी त्याच्या चंद्रमौळी घरांत शिरली आणि आपल्या प्रभावाने तिने त्याला प्रासादाचें ऐश्वर्य प्राप्त करून दिलें ! पण, आज हिंदुस्थानांतील दरिद्रनारायणांनी भुकेने ओढलेल्या स्वतःच्या डोळ्यांत तेल घालून त्यांच्या निर्मल नीरांजनांचा केवढाहि दीपोत्सव केला, तरी त्यांच्या त्या ताटकळलेल्या दृष्टीला लक्ष्मीचें दर्शन घडण्याची काय आशा आहे ?

उलट, गरिबगुरीबांच्या झोपड्यांतील उंबरठ्यांवर ठेवलेली एकाद दुसरी पणती पाहून लक्ष्मी जेव्हा नाउमेद होऊन रोषाने मागे फिरेल आणि बाजारपेठेंत प्रवेश करील, तेव्हा त्या काळ्या बाजारांतील रोषणाईच्या लखलखाटांत आणि झगझगाटांत तिच्या दिपलेल्या डोळ्यांना कोणतें दृश्य आढळून येईल ? विद्युद्दीपांनी उजळलेल्या त्या दुकानांत शोभेसाठी सोडलेलीं तीं भरजरी सणगें, लाह्याफुलांनी आच्छादलेलीं तीं लालभडक वहीखातीं आणि सफेदी दिलेल्या भिंतीवर काढलेलीं तीं उत्कर्षदर्शक शुभ स्वस्तिकें—तीं पाहून ती शारदश्री हर्षभराने त्या दुकानांत शिरेल की भयभीत होऊन मागे हटेल ? त्या दुकानांचा तो भरजरी शृंगार आणि ती भव्य सजावट !—ती जर तिला प्रेतावर घातलेल्या जरीच्या शालीसारखी आणि जरतारी

हारांसारखी भडक आणि भेसूर वाटली, तर त्यांत नवल काय? आकाशांतील तारामंडळाला लाजविणाऱ्या रोषणाईच्या त्या काळ्या बाजारांतील लखलखाटांतहि चंद्रहीन अवसेचें काळतोंड जेव्हा ती भाग्यलक्ष्मी पाहील, तेव्हा नफेबाज भांडवलवाले आणि नतद्रष्ट नोकरशाही यांनी नियंत्रणाच्या नांवाखाली संगनमताने चालविलेली शेतकऱ्यांची निर्दय नागवणूक आणि जनतेची पाशवी पिळणूक यांचें तें त्या बाजारांतलें नागडें उघडें प्रदर्शन बघून ती भरल्या डोळ्यांनी आणि खचल्या हृदयाने परत फिरणार नाही काय? त्रेतायुगांतल्या त्या दरिद्री श्रमिकाच्या सुनेने पोटाला चिमटा घेऊन पाटीखाली तेवत ठेवलेला दिवा पाहून जी धनश्री त्याच्या खोपटांत आनंदाने शिरली, ती काळ्या बाजारांतील दीपोत्सव पाहून परत फिरेल ती कोणत्या भावनेने? त्या दरिद्रनारायणाच्या घरचा तो मिणमिणता दिवा जगांतल्या सगळ्या सात्विक भावनांच्या मांगल्याचा द्योतक होता; तर आज हिंदी बाजारपेठांतून होणारी दिवाळी ही कष्टजीवी भुकेल्या जनतेच्या हिताची होळी, काळ्या बाजारांतील कालकन्येचें विषवैभव आहे. त्या रक्ताळलेल्या शापित वैभवांत शुभ्र सागरोर्मींतून प्रकट झालेली चंद्राची ती ज्येष्ठ भगिनी अमृतमयी इंदिरा—ती कशी रमेल?

उलट, रस्त्यारस्त्यांतून पडलेले ते भूकबळी, खोपटाखोपटांतून खपाटीला लागलेलीं तीं उपाशी पोटें आणि नियंत्रणाधिकाऱ्यांनी खळ्यांतूनच धान्य वसूल करून नेल्यामुळे रिकाम्या पडलेल्या त्या शेतकऱ्यांच्या कोठ्या—शेताशेतांतून, घराघरांतून आणि गावागावांतून थैमान करीत असलेलें तें दैन्य आणि तो दुष्काळ—जेव्हा ती जगन्माउली पाहील, तेव्हा क्षीरसागरांतील लाटांच्या हिंदोळ्यावरल्या सुखशीतल शेषशय्येवर निजलेल्या नारायणाला ती कळवळून म्हणेल—

**अन्नचि मिळेना । चिंता लागली जना ।**
**धांव तूं जगजीवना । रे पावना ॥**
**ऐसा विषम काळ । जाली तळमळ ॥**
**लोक पडिले विकळ । तूं कृपाळ ॥**

कोण्ही नाही जनासी । सांगावें कोणापाशीं ।।
झाल्या दुःखराशी रे । जगजीवना ।।

दुःखभार असह्य झाल्यावर, गांजणूक आणि पिळणूक सोसवेनाशी झाल्यावर धरित्रीमातेने गाईचें रूप धारण करून हंबरडा फोडीत क्षीरसागरांत योगनिद्रा घेत असलेल्या भगवंताकडे धाव घेतली आणि मग त्या दयाघनाने तिच्या सगळ्या दुःखांचा परिहार केला, अशीं पुराणांतलीं वर्णनें आपण नेहमी ऐकतों आणि वाचतों. पण, एका काळीं सुवर्णभूमि म्हणून गाजलेल्या आणि शस्यश्यामला म्हणून गौरविलेल्या या भरतभूमींत सध्या क्रोडों लोक भुकेने तडफडत आणि हिवाने कुडकुडत मरत असतां, त्यांच्या त्या करुण किंकाळ्यांनी,—या असहाय भरतभूमीच्या आक्रंदनाने त्या श्रीहरीची योगनिद्रा कांही अद्याप मोडलेली दिसत नाही. आज सायंकाळीं काळ्या बाजारांतील विषवैभवाची अवकळा पाहून ती लोकमाता जेव्हा पिळवटलेल्या अंतःकरणाने आपल्या डोळ्यांतल्या अश्रुधारा आवरीत माघारी जाईल, तेव्हा तिने वर्णन केलेल्या भूकबळींच्या यातना ऐकून तरी भगवंताचें मन द्रवेल काय? की सिमल्याच्या सुखशैलावरील विलासमंदिरांत राहून हिंदी जनतेच्या योगक्षेमाची चिंता वहाणाऱ्या बड्या लाटांसारखेंच त्या भक्तवत्सलाचेंहि हृदय बधिर आहे?

अशा भीषण परिस्थितींत दिवाळीचा दीपोत्सव करावयाचा कशाला? आज युरोपांत आणि आशियांत सर्वत्र दोस्त राष्ट्रांचा दिग्विजय चालू आहे हें खरें; व तो दिग्विजय संपादन करण्याच्या कामीं रणशूर हिंदी सैनिकांचें रक्त सतत खर्ची पडलेलें आहे, यांतहि कांही शंका नाही. पण, युरोप, आफ्रिका आणि आशिया या तिन्ही खंडांतील रणांगणावर हिंदी योद्ध्यांचें जें हें रक्त सांडलें, त्याचा मोबदला हिंदुस्थानाला काय मिळणार आहे? त्यांच्या पराक्रमाच्या जोरावर परत जिंकल्या गेलेल्या आफ्रिकेच्या प्रदेशाचा टीचभर तरी तुकडा हिंदी लोकांना वसाहत करावयाला मिळणार आहे काय? किंवा, लोकशाहीच्या रक्षणार्थ त्यांनी जें हें बलिदान चालविलेलें आहे, त्याची फेड म्हणून त्यांचा मायदेश 'मुक्त'

होणार आहे ? ब्रिटिश साम्राज्याचा भाट रुडयार्ड किपलिंग याने आपल्या मायदेशाच्या दर्यावरील प्रभुत्वाचा दिमाख मिरवितांना खुद्द परमेश्वराला बजावलेलें आहे की, " हे प्रभो, जगांतल्या साऱ्या समुद्रांवर जर आज आमचें स्वामित्व असेल, तर त्या स्वामित्वाचा मोबदला आम्ही स्वतःच्या रक्ताने पुरेपूर दिलेला आहे! "—

If blood be the price of Admiralty
Lord God, we have paid it in full

चालू महायुद्धांत जगाच्या रणक्षेत्रावर हिंदी शिपायांनीहि आपल्या रक्ताचे सडे शिंपले खरे. पण ते कोणासाठी ? आणि, ते शिंपून त्यांनी असें काय संपादन केलें आहे की, ज्याच्या गौरवार्थ दैन्याच्या या दुर्धर अवकाळांतहि हिंदी जनतेने पोटाला चिमटा घेऊन दीपोत्सव करावा ? आज हिंदी शिपायांचें रक्त रणांगणावर अमाप सांडत असलें, तरी तें ॲबिसीनिया, इटली किंवा ग्रीस यांना 'मुक्त' करण्यासाठी; हिंदुस्थानाला, त्यांच्या स्वतःच्या या मातृभूमीला मुक्त करण्यासाठी नव्हे! तें रक्त ज्या दिवशीं हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यार्थ सांडेल, आपल्या असंख्य प्राणांच्या अमरज्योति ज्या दिवशीं हिंदी सैनिक स्वातंत्र्याच्या समरांगणावर उजळतील, त्याच दिवशीं पारतंत्र्याच्या अवनतीमुळे दुरावलेल्या भारताच्या भाग्यलक्ष्मीला हिंदी जनता एकमुखाने अधिकारपूर्वक म्हणू शकेल—

**नव लाख दिवे हे तुझ्या घरीं**
**का जातिस दुसऱ्यांच्या दारीं ?**

१६-१०-१९४४

# प्रबोधिनी

आज 'प्रबोधिनी' आहे. प्रबोधिनी म्हणजे परमेश्वराला जाग आणणारी एकादशी. आषाढाच्या शुद्ध पक्षांतील एकादशीला 'शयनी' आणि कार्तिकाच्या शुद्ध पक्षांतील एकादशीला 'प्रबोधिनी' म्हणतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम...
क्रमांक...
नों. दि...



या दोन एकादशींच्या काळांत जो चातुर्मास्याचा अवधि जातो, त्या अवधींत परमेश्वर निजलेला असतो, अशी धार्मिक कल्पना आहे. अर्थात् 'प्रबोधिनी' म्हणजे परमेश्वराला जाग आणणारी एकादशी. पण, या कलियुगांत परमेश्वराने जें रूप धारण केलेलें आहे आणि जें त्याचें सावळें सगुण रूपडें पाहाण्यासाठी आज पंढरपूरला भक्तजनांची गर्दी उडालेली असेल, त्या रूपांतला तो परमेश्वर जागा झाला, तरी काय करणार ? एकनाथमहाराजांनी या त्याच्या रूपाचें वर्णन असें केलेलें आहे की,--

**भक्ताद्वारीं उभाचि तिष्ठे । न बोले न बैसे खालुता**
**युगें जहालीं अठ्ठावीस । धरुनी आस उभाचि ।।**

तेव्हा, हातांत गदा किंवा चक्र नसलेला, अठ्ठावीस युगें विटेवरी उभा आणि अबोल असा हा परमेश्वर जागा झाला, तरी तो भक्तांच्या काय कामीं येणार ? म्हणूनच श्रीसमर्थांनी जेव्हा हें पंढरपूरचें निःशस्त्र, एकाकी मौन ध्यान पाहिलें, तेव्हा त्यांना दाशरथि रामाच्या त्या उग्र मूर्तीची आठवण झाली आणि त्यांनी कळवळून विचारलें की,–

**येथे उभा का श्रीरामा । मनमोहना मेघश्यामा**
**चापबाण काय केले । कर कटावरी ठेविले**
**का बा धरिला अबोला । दिसे वेष पालटला**

"त्रेतायुगांत ज्या तुझ्या त्या कोदंडाने देवांना आपल्या सिंहासनाखाली पालथ्या घालणाऱ्या उन्मत्त रावणाचीं दशशिरें उडविलीं, तें तुझें अमोघ धनुष्य आज कुठे गेलें ? कमरेवर दोन्ही हात ठेवून विटकुरावर उभा राहिलेला असा तूं कोणाची वाट पाहातो आहेस ?"

या प्रश्नाचें उत्तर भगवंतांनी काय दिलें असेल ? दंतकथा असें सांगते की, श्रीसमर्थांनी कळवळून केलेला तो प्रश्न ऐकतांच विटेवर उभी राहिलेली ती मौनी मूर्ति अदृश्य होऊन

**बळे आगळा वीर कोदंडधारी**

त्या ठिकाणीं त्यांच्या दृष्टीस पडला ! पण, श्रीसमर्थांची आर्ति पुरविण्यासाठी जरी भगवंताने क्षणमात्र धनुष्यबाण धारण करण्याची

नजरबंदी केली असली, तरी त्यामुळे त्याचें या युगांतलें रूप, त्याचा आजचा युगावतार निःशब्द, निष्क्रिय आणि निःशस्त्र आहे, या पुराणप्रणीत सत्याला थोडाच ढळ पोचतो? कृत, त्रेता आणि द्वापर या पूर्वीच्या तीन युगांत देवाने जे पाशवी म्हणा, अर्ध पाशवी म्हणा किंवा मानवी म्हणा दशावतार घेतले, त्या दशावतारांचें ध्येय एकच होतें. आणि तें म्हणजे दुष्टांचा संहार करून धर्माची संस्थापना करणें. मत्स्यापासून श्रीकृष्णापर्यंत जे आठ अंशावतार किंवा पूर्णावतार झाले, ते सगळे सशक्तिक, सायुध, सशस्त्र होते; व त्यांनी राक्षसांचा संहार करून त्या त्या काळांत धर्माची पुनर्घटना केली. विशेषतः, परशुराम, राम आणि कृष्ण या तीन अवतारांनी दुर्मद दैत्यांचा आणि दुराचारी क्षत्रियांचा उच्छेद इतक्या कांही प्रचंड प्रमाणावर केला की, त्यामुळे भारतवर्षाचें मनुष्यबळ कायमचें क्षीण झालें, असे उद्‌गार भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांनी काढलेले आहेत. भगवंताच्या पूर्वीच्या आठ अवतारांतलें हें त्याचें विश्वकार्य लक्षांत घेतलें असतां या कलियुगांत जेव्हा त्याच्या परित्राणाची आवश्यकता पावलोपावलीं जाणवत आहे, तेव्हा त्याने आपल्या हातांतलीं शस्त्रें खाली टाकून देऊन ते कमरेवर ठेवावेत आणि मौन धारण करून युगानुयुगें विटकुरावर स्तब्ध उभें रहावें, याचें कोणाला नवल वाटणार नाही? पंढरपूरच्या देवळांत उभें असलेलें हें भगवंताचें मौनी, निःशस्त्र ध्यान म्हणजे अहिंसेच्या युगधर्माचें मूर्तिमंत प्रतीकच नव्हे काय?

आणि, कलियुगांतील ही अहिंसाधर्माची प्रतीकमूर्ति भक्तांच्या लोभाने कर्नाटकांतून महाराष्ट्रांत यावी आणि चंद्रभागेच्या तीरावर भूवैकुंठ निर्माण व्हावें, हें महाराष्ट्र जनतेचें केवढें भाग्य! यादवांचें वैभवशाली साम्राज्य ज्या वेळीं महाराष्ट्रांत नांदत होतें, त्या वेळीं पंढरपूर हें कर्नाटकांत मोडत असावें, असें इतिहासज्ञांचें अनुमान आहे. तें खरें असो वा नसो! पण, विजयानगरचा सम्राट् कृष्णदेवराय याने आपल्यासाठीं बांधलेलें प्रचंड प्रासादसदृश मंदिर पाहून, "मला या भव्य मंदिरांत राहाण्याची इच्छा नाही,—मी भीमातटींच्या माझ्या साध्या-

भोळ्या देवळांतच परत जातो," असें उत्तर शाही लवाजम्यासह मुद्दाम पंढरपूरहून विजयानगरला नेलेल्या विठ्ठलाने कृष्णदेवरायाला स्वप्नांत दिलें आणि भानुदासमहाराजांबरोबर पायीं चालत चालत तो पंढरपूरला परत आला, अशी जी दंतकथा महाराष्ट्रांत प्रचलित आहे, तिच्यांत ऐतिहासिक सत्य आणि आख्यायिकेंतील सौंदर्य यांचा सुंदर मिलाफ झालेला आहे, यांत शंका नाही. विजयानगरचें राजवैभव झिडकारून पुंडलिकाच्या खोपटांत राहावयाला आलेल्या त्या भक्तकामकल्पद्रुमाला जे हे कष्ट पडले, त्यांचें वर्णन करतांना एका संतकवीने म्हटलें आहे--

**शिणलासी माझ्या बा, रे !**
**पायीं अनवाणी ।**
**संगे रुक्मिणी**
**कांटे कर्नाटकच्या वाटे**
**चालतांना उपवासी ॥**

पण, भक्तांच्या प्रेमासाठी महाराष्ट्रांत येऊन त्या पंढरिरायाला इतकीं वर्षें झालीं, तरी सुद्धा नामदेवराय

**विठ्ठल कानडें बोलूं जाणें ।**
**त्याची भाषा पुंडलिक नेणें**

अशी त्याची कुचाळी करावयाला चुकले नाहीत; व आपल्या दर्शनासाठी तळमळणाऱ्या भक्तांना चाळवण्या दाखवून छळणाऱ्या त्या भगवंताला 'कानडें परब्रह्म' असें नांव देऊन त्याच्या अगम्यत्वाचीहि थट्टा महाराष्ट्रीय संतांनी यथेच्छ केली आहे.

पण, 'वेदांसी कानडें, श्रुतीसीं कानडें' असें ज्या या कानडया परब्रह्माचें वर्णन संतांनी केलेलें आहे, तो हा अगम्य, अज्ञेय, अचिंत्य परमात्मा उराउरीं भेटावा असें कोणतें एक ठिकाण जर या पृथ्वीच्या पाठीवर असेल, तर तें फक्त पंढरपूर हें होय. म्हणूनच एकनाथ-महाराजांनी म्हटले आहे--

**जें शब्दासी नातुडे । वैखरीयेसी कानडें ।**
**तें रूप उघडें । पंढरीये ॥**

वेदांना आणि श्रुतींना जें परब्रह्म कानडें होऊन बसलेलें आहे, तें चंद्रभागेकाठच्या त्या भूवैकुंठांत सर्वांना उघडें, सगळ्या धर्मांच्या आणि जातींच्या लोकांना सुगम झालेलें आहे. कारण,

**कानडा विठ्ठल वो । उभा भीवरेतीरीं ।**
**भक्तांचें आर्त वो । जिवा लागलें भारी ॥**

भक्तांचें आर्त जिथे भगवंताच्या जिवाला लागलेलें आहे, अशी पंढरपूरसारखी मुक्तीची पेठ जगांत अन्यत्र कुठे आढळेल? म्हणूनच पंढरपूरला भूवैकुंठ म्हणावयाचें. किंबहुना हें भूवैकुंठ स्वर्गांतील वैकुंठापेक्षाहि एका परीने श्रेष्ठ म्हणावें लागेल. कारण स्वर्गांतील वैकुंठांत फक्त पुण्यवंतांनाच प्रवेश मिळतो. पण या भूवैकुंठांत अगदी पाप्यांतल्या पाप्यालाहि मुक्तद्वार आहे. तेव्हा, आज या 'प्रबोधिनी' एकादशीच्या पवित्र दिवशीं—परमेश्वर जागा होण्याची आशा असो वा नसो,—त्याचें तें अबोल अहिंसाप्रतीक भक्तांच्या हाकेला धावण्याचा संभव असो वा नसो,—समतेच्या उदात्त ध्येयाचें सगुण रूपडें म्हणून तो महाराष्ट्रीय जनतेला केव्हाहि विलोभनीय, केव्हाहि वंद्यच वाटणार नाही काय?

२८-१०-१९४४

# 'लपावें अती आदरें रामरूपीं'

गेल्या सोमवारीं म्हणजे आपल्या नेहमीच्या मौनाच्या आणि उपोषणाच्या दिवशीं म. गांधी यांनी, पतंजलीच्या योगसूत्रांचें चिंतन करीत, मननाच्या गुहेंत प्रवेश केल्याची बातमी आली आहे. गेल्या मे महिन्यांत महात्माजींची मुक्तता झाल्यापासून त्यांच्या मानसिक

आणि लौकिक हालचाली, भल्या भल्यांच्याहि बुद्धीला भोवळ यावी, अशा प्रकारच्या विद्युद्वेगाने सारख्या चालू होत्या. त्या वेगाचा परिणाम हळव्या जनमनावर तर झालाच; पण त्यांचें स्वत:चेंहि तें वज्रकठोर मन शिणल्याशिवाय राहिलें नाही. गेल्या आठवडयांत ते आपला सोमवारचा उपास करीत असतांना त्यांना दोन वेळां घेरी आली. पण, हा निसर्गाचा करडा इषारा न मानतां, त्यांनी आपला नित्यक्रम चालूच ठेवला. अखेर त्यांचे पट्टशिष्य श्री. राजगोपालाचार्य यांनी त्यांना आपल्या वर्ध्याच्या धावत्या मुक्कामांत असें निक्षून सांगितलें की, "हें पहा, तुम्हांला आपल्यावरलें गंडांतर टळावें अशी जर इच्छा असेल, तर तुम्ही आपल्या मनाचे हे सगळे अवचट व्यापार एकदम बंद करा !" आणि, गंमत अशी की, निसर्गाचा इषारा धाब्यावर बसवून तोपर्यंत अविश्रांत काम करीत असलेल्या गांधीजींनी, राजाजींनी 'खामोश' म्हटल्याबरोबर, चाबूकस्वाराचा शब्द कानांवर पडतांच गुरगुरणाऱ्या वाघानें पिंजऱ्यांत मुकाटयाने शिरावें त्याप्रमाणे, मननाच्या गुहेंत बिनतक्रार प्रवेश केला.

पण, राजाजींच्या प्रेमळ दरडावणीनुसार महात्माजी जरी मननाच्या गुहेंत आपल्याला चार आठवडे कोंडून घेणार असले, तरी या एकांतामुळे त्यांच्या त्या प्रमाथी मनाचे प्रचंड व्यापार, त्याच्या त्या अचाट विवंचना आणि वेदना थोडयाच थांबणार आहेत ? मानवी मन हें जात्याच वाऱ्याहून चपळ आणि पाऱ्याहून चंचळ. त्यांतून महात्माजींचें मन म्हणजे बोलून चालून अतिमानवाचें मन ! पेटाऱ्यांत कोंडून घातलेला नाग जसा आंतल्या आंत वळवळत आणि फुसफुसत रहावा, तसें त्यांचें तें अचपळ, अनावर, अनिर्बंध मन त्या मननाच्या गुहेंतहि, बाहेरच्या जगांतील आपदांचा आणि उत्पातांचा कल्पनेने कानोसा घेत, सदैव आंतल्या आंत तळमळत आणि जळफळत राहील. किंबहुना, आपल्या या एकांतवासासंबंधी जें पत्रक त्यांनी काढलेलें आहे, त्यांत त्यांनी असें स्पष्टच म्हटलें आहे की, "लाखों लोकांची उपासमार, काळा बाजार आणि सट्टेबाजी हीं सगळीं आज जशीं माझ्या मनाला सतावून सोडीत आहेत, तशींच तीं या विश्रांतीच्या काळांतहि माझ्या

मनाची छळणूक करतील. " त्यांनी स्वतःच काढलेले हे उद्गार लक्षांत घेतां, वर्तमानपत्रें न वाचण्याचा आणि भेटीगाठी न घेण्याचा निश्चय पाळूनहि, त्यांना विश्रांति कितपत मिळेल, याबद्दल जबर शंका वाटते. फार तर, आश्रमांतील नित्याची वर्दळ टळल्याकारणाने जें निवांत वातावरण त्यांच्या भोंवतीं निर्माण होईल, त्यामुळे त्यांच्या बेसुमार थकलेल्या शरीराला मात्र अवश्य ती विश्रांति मिळेल. पण, त्यांची ढासळलेली प्रकृति लक्षांत घेतां हा लाभ सामान्य आहे, असें कोण म्हणेल ?

तथापि, बाह्य जगांतल्या सगळ्या घडामोडींपासून निवृत्त होऊन मननाच्या गुहेंत शिरल्यावरहि महात्माजींचें मन थाऱ्यावर येऊं नये, यांत खरोखरी त्यांचा काय दोष ? ते बंधमुक्त झाल्यापासून गेल्या आठ महिन्यांत पाचगणीच्या उत्तुंग सह्यशिखरावर म्हणा किंवा बाळकेश्वराच्या रमणीय सुखशैलावर म्हणा ज्या नाना प्रकारच्या घटना आणि विघटना झाल्या, त्यामुळे त्यांच्या मनाला झालेल्या जखमा अद्याप ताज्याच नाहीत काय ? सेवाग्रामचा आश्रम हीच येऊन जाऊन काय ती त्यांना डोकें टेकण्याची निवाऱ्याची जागा. पण, चरखासंघाच्या सभेंत जें हृदयाविष्करण त्यांनी दोन महिन्यांपूर्वी केलें, त्यावरून तो निवाराहि आता पूर्वीइतका निवांत उरलेला नाही, हें जगाला कळून चुकलें आहे. म्हणूनच पतंजलीची योगसूत्रें हातीं घेऊन ते आता निर्विण्ण मनाने मननाच्या गुहेंत शिरले आहेत. पतंजलीचीं योगसूत्रें वाचावयाला त्यांनी सुरवात केली, याचा अर्थच हा की, भगवंताच्या मार्मिक शब्दांत सांगावयाचें म्हणजे त्यांना योगयुक्त व्हावयाचें आहे; बाहेरचे सगळे पाश आणि परिग्रह तोडून टाकून स्वस्वरूपीं लीन व्हावयाचें आहे. पण त्यांच्या सध्याच्या प्रक्षुब्ध मनःस्थितींत तें शक्य आहे का ? यतचित्त होऊन मनाला आवर घालण्याच्या या क्रियेचें वर्णन ज्ञानेश्वरमहाराजांनी 'पवनें पवनुचि धरी' म्हणजे 'वाऱ्यानेच वाऱ्याची मोट बांधावयाची' अशा समर्पक उपमेने केलेलें आहे. तेव्हा, आपल्या मनांत कोणता आगडोंब पेटलेला आहे, याची पुरेपूर जाणीव असतांनाहि, गांधीजींनी त्याला मननाच्या गुहेंत कोंडण्याची धडपड करावी, याचा अर्थ काय ?

याचा अर्थ अगदी उघड आहे. महात्माजींना आज आंत आणि बाहेर, अंत:सृष्टींत आणि बहि:सृष्टींत सर्वत्र गडद काळोख दिसत असून, त्यामुळे त्यांच्या मनाची तगमग बेसुमार होत आहे. मनाच्या या तगमगींतून सुटण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे मनाच्या पलिकडे असलेल्या बुद्धीला शरण जाऊन तिच्याहि पलिकडे असलेल्या परतत्वाच्या स्वसंवेद्य प्रकाशाचा साक्षात्कार प्राप्त करून घेणें ! यालाच भगवंतांनी बुद्धियोग म्हटलेलें आहे; व मनावर ज्या वेळीं मोहाचें कश्मल पसरून त्याचा कार्याकार्यविवेक नष्ट होतो, त्या वेळीं ज्ञानी पुरुष बुद्धीला शरण जातात आणि बुद्धीच्या पलिकडे असलेल्या परतत्त्वांतून जी सत्याची सुनील प्रभा प्रकट होत असते, तिच्या दर्शनाने मोहमुक्त होतात ! गांधीजींची चार आठवड्यांची ही कार्यनिवृत्ति म्हणजे एक प्रकारचें मनोदमन आहे; बुद्धियोगाचें अनुष्ठान आहे; बुद्धीच्या आश्रयाने, ‘ यो बुद्धे: परतस्तु स: ’ असा जो आत्मप्रकाश, त्याच्या साक्षात्काराची तपस्या आहे. श्रीसमर्थांनी ‘ रामरूपीं लपणें ’ असें या तपस्येचें लाक्षणिक गोड वर्णन केलेलें आहे. अशा या तपस्येनंतर महात्माजींना कोणता प्रकाश दिसेल, हें कोणी सांगावें ? एवढी गोष्ट मात्र निर्विवाद आहे की, जो रामरूपीं लपला, त्याला भयातीत अशा आत्मरूपाचा साक्षात्कार होतोच होतो. म्हणूनच श्रीमर्थांनी म्हटलेलें आहे—

**लपावें अती आदरें रामरूपीं ।**
**भयातीत निश्चीत ये स्वस्वरूपीं**

तेव्हा, गांधीजी मननाच्या गुहेंतून बाहेर पडल्यावर कोणता भयातीत प्रकाश जनतेला दाखवितील, हे कोणी सांगावें ?

६–१२–१९४४

## ‘ उखळांत दिलें शिर ! ’—

आष्टी आणि चिमूर प्रकरणांतील अपीलें प्रिव्ही कौन्सिलने फेटाळून लावल्यामुळे ज्या पंधरा आरोपितांचें देहांत शासन तूर्त तरी

कायम झाल्यासारखें दिसत आहे, त्यांना जीवदान द्या अशी आर्त हाक विदर्भाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत आज सारखी कंठरवाने उठलेली असून, समाजांतील सर्व पक्षांच्या, जातींच्या आणि पेशांच्या लोकांचा करुण साद त्या हाकेंत मिसळलेला आहे. ही करुणा दुबळीक दर्शविणारी आहे असें कोणी समजूं नये आणि खुद्द सरकारहि तसें समजत असेल, असें आम्हांला वाटत नाही. हायकोर्ट, फेडरल कोर्ट आणि प्रिव्ही कौन्सिल या एकाहून एक वरिष्ठ न्यायालयांनी न्यायदानाची मागणी डावलून दिल्यावर सत्ताधाऱ्यांच्या हृदयांतील दयाबुद्धीला कौल लावणें, हा मानवी हृदयांतील सद्भावनांना जागृत करून न्याय मिळविण्याचा अंतिम सनदशीर मार्ग आहे. त्यांत कोणत्याहि प्रकारची दुर्बलता नाही किंवा दैन्यहि नाही. मत्सरी दुःशासनाने आणि मदांध कीचकाने पदर हासडल्यावर, 'अर्थस्य पुरुषो दासः' असें म्हणणाऱ्या राजसभेंतील मिंध्या वृद्ध धर्मशास्त्रज्ञांकडून आपल्याला न्याय मिळत नाही असें दिसतांच, मानी द्रौपदीने आंधळ्या धृतराष्ट्राच्या आणि वेंधळ्या विराटाच्या सिंहासनाकडे आक्रोश करीत जी धाव घेतली, ती काय असहायतेची द्योतक होती ?

छे ! निदान द्रौपदीच्या बाबतींत तरी असें कोणी म्हणणार नाही. पराभूत द्रुपदाने सूडाच्या विद्वेषी बुद्धीने आरंभिलेल्या यज्ञांतून जी अग्नीच्या ज्वाळेसारखी आविर्भूत झाली आणि जिच्या अग्नीसारख्या तेजस्वी प्रखर चारित्र्याने अखेर कौरवांची आहुति घेतली, त्या मानिनीने धृतराष्ट्राच्या सिंहासनापुढे जाऊन करुणा भाकली आणि ती विफल होत आहे असें दिसतांच जगांतील सर्व सिंहासनांहून श्रेष्ठ अशा परमात्म्याचा धावा केला, याबद्दल तिला दीन कोण म्हणेल ? रवींद्रनाथांनी म्हटलेंच आहे की, न्याय ही व्यवहारी चीज आहे, तर दया हा हृदयाचा धर्म आहे. भगवद्गीतेंतहि 'दया भूतेषु' या शब्दानी भूतदयेचा गौरव दैवी संपत्ति म्हणून केलेला असून, रवींद्रांनी, "भगवंताच्या डोळ्यांतील चांदण्यांतून पडणारें दहिवर" असें दयेचें

सुंदर वर्णन केलेलें आहे. म्हणून, न्यायप्राप्तीचे सारे रीतसर मार्ग जेव्हा कुंठित होतात,—किंबहुना मानवी बुद्धि ही विकारवश झाल्यामुळे न्यायनिर्णय करावयाला असमर्थ बनलेली आहे असें जेव्हा प्रत्ययाला येतें,—तेव्हा मानवी हृदयांतील दयेच्या दैवी शक्तीला जागृत करणें, हा अन्यायाला आळा घालण्याचा एकच मार्ग फक्त शिल्लक उरतो. न्याय जेव्हा अप्राप्य ठरतो, तेव्हा दयेच्या आवाहनाची वेळ येते. कारण, न्याय हा बुद्धिवादाचा डोंबारी खेळ, तर दया हा मानवी हृदयांतील दैवी भावनांचा आविष्कार आहे. न्याय मिळण्याची आशा नष्ट झाल्यावर मानवी हृदयांतील दैवी भावनांना आवाहन करून सत्ताधाऱ्यांना अविवेकापासून परावृत्त करण्यांत कोणता कमीपणा, कोणती मानहानि आहे ?

तेव्हा, न्याय मिळण्याचे सर्व मार्ग आणि सर्व आशा कुंठित झाल्यावर आष्टी–चिमूरच्या दुर्दैवी आरोपितांसाठी जनतेने सर्वसत्ताधारी सरकारपुढे दयेसाठी पदर पसरावा आणि त्या सरकारच्या प्रतिनिधिभूत व्यक्तींच्या हृदयांतील सुप्त ईश्वरी भावनांना आर्त साद घालावा, यांत काय गैर आहे ? आणि त्यांना 'दुर्दैवी' म्हटल्याबद्दल तरी उद्वेग का वाटावा ? १९४२ च्या ऑगस्ट चळवळींत अचाट कृत्यें केल्याबद्दल जे साहसी इसम फासावर गेले, जाण्याच्या बेतांत आहेत किंवा फरार होऊन देशोधडीला लागले, त्यांच्यासारखे कमनशिबी दुनियेंत दुसरे कोण सापडतील ? त्यांची स्थिति आज 'ना अरत्र ना परत्र' अशीच झालेली नाही काय ? ज्या नेत्याचा आदेश शिरोधार्य मानून ते जिवावर उदार झाले, त्याने तो आदेश आपण कधी दिलाच नव्हता आणि असलीं कृत्यें करणारे इसम हे आपले सच्चे अनुयायीच नव्हेत असें म्हटल्यामुळे, त्यांची जी नैतिक नागवणूक आज झालेली आहे, तिच्यापरतें दुसरें दुर्भाग्य तें कोणतें ? आणि, देशाभिमानाच्या ईर्ष्येने 'उत्तेजित' होऊन केलेल्या साहसांबद्दल वीरोचित मृत्यु न येतां, फासावर लटकण्याचें हीन मरण यावें, हा तरी दुर्भाग्याचाच एक प्रकार नव्हे काय ? या दुहेरी दुर्दैवाची जाणीव

मनांत डाचत असतांनाच जर त्यांच्यावर उद्या, त्यांना वाचविण्यासाठी आज चाललेली सगळी धडपड व्यर्थ ठरून, फासावर लटकण्याचा प्रसंग खरोखरीच आला, तर त्या शेवटल्या क्षणीं, आपण दोहों बाजूंनी नागवलों गेलों, याबद्दल त्यांच्या जिवाची किती तळमळ होईल ?

पण, या सगळ्या दु:खांत आणि दुर्दैवांतहि आनंदाची गोष्ट जर कोणती असेल, तर ती ही की, ज्यांना वाचवण्यासाठी आज जनतेला एवढी तळमळ लागलेली आहे, त्या चिमूर-आष्टीच्या आरोपितांचें स्वत:चें धैर्य मात्र खचलेलें नाही. मृत्यूला कवटाळण्याची त्यांची हिम्मत मात्र कायम आहे. आणि याबद्दल त्यांना कोण धन्यवाद देणार नाही ? ऐन तारुण्यांत फासावर लटकण्याचा प्रसंग आणि तोहि अशा रीतीने नैतिक नागवणूक होऊन यावा,—पण तशाहि नाउमेदीच्या परिस्थितींत मनाची हिम्मत कायम राहावी,—ही या आरोपितांची केवढी थोरवी ! गांधीजीनी पाचगणीहून काढलेल्या एका पत्रकांत म्हटल्याप्रमाणे १९४२ साल हें भूतकालाच्या अथांग गर्तेत आता गडप होऊन गेलेलें आहे, हें तर खरेंच ! पण, त्या सालांतील ज्या क्रांतीच्या प्रयत्नाचें वर्णन त्यांनी 'चुकलेले आणि चुकीचे प्रयत्न' ( misguided ) म्हणून पुन:पुन्हा केलेलें आहे, ते प्रयत्न मृत्यूला कवटाळण्याच्या असल्या हिमतीमुळेच उज्ज्वल आणि अविस्मरणीय होऊन राहिलेले नाहीत काय ? कवीने म्हटलेच आहे—

**उखळांत दिलें शिर, काय अता ?**
**दुबळ्यांचें बळ केवळ दुस्तर,**
**करील कैसें दिव्य भयंकर,**
**बलोद्धतांची मोडिल कम्बर--**
**जग चकित होउं द्या हें बघतां !**

२०-१२-१९४४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........ विः ........
क्रमांक ........ नों: दि: ........
९३५९

REFBK-0013785
REFBK-0013785